गोईण म्हणजे मैत्रीण.

एका शिबिरात 'समुदरसोक' (किंवा 'बेशरम') या झाडाविषयी चर्चा सुरू असताना एक सुईण अचानक बोलून गेली, ''बाई, या झाडाचा उपयोग नवऱ्याला मारण्यासाठी करता येतो.'' हे ऐकून मला धक्काच बसला. कारण 'नवऱ्याला मारण्यासाठी झाडाचा उपयोग' हे मी पहिल्यांदाच ऐकत होते! मी विचारलं, ''नवऱ्याला का मारायचं?'' तर ताबडतोब काही सुईणी म्हणाल्या, ''बाई, तो आपल्याला त्रास देत असला, दुसऱ्या बाईसोबत लफूटपणा करत असला किंवा आपले दुसऱ्या पुरुषासोबत संबंध असले तर नवऱ्याला नाही मारायचं का बाई?''

गडचिरोली हा जंगलांचा जिल्हा! इथली जवळजवळ साठ टक्के जमीन जंगलाखाली आहे आणि जिल्ह्याच्या लोकसंख्येत पन्नास टक्के आदिवासी आहेत. गडचिरोली गावापासून सात-आठ किलोमीटर दूर गेल्यावर जंगल दिसायला लागते. सुरुवातीला झुडपी जंगल, पण आत-आत गेले की जंगल दाट होत जाते आणि झाडांची उंची पण वाढते.

येथील आदिवासींशी गप्पागोष्टी करण्यामधून इथले जंगल, इथली झाडे, त्यांचे विविध उपयोग– खाण्याचे पदार्थ, औषधी, सरपण, कुंपण वगैरेबाबत कितीतरी उपयुक्त आणि मनोरंजक माहिती मिळते जाते. तीच या पुस्तकात समाविष्ट केली आहे.

\- राणी बंग

ग्रंथाली

गोईण

डॉ. राणी बंग

ग्रंथाली



गोईण :
गडचिरोलीतील स्त्रियांचे झाडांशी नाते

डॉ. राणी बंग

ग्रंथाली

ग्रंथाली प्रकाशन क्र. १९५

गोईण : गडचिरोलीतील स्त्रियांचे झाडांशी नाते

पहिली आवृत्ती १६ जानेवारी १९९९
पुनर्मुद्रण १ मे २००३
पुनर्मुद्रण ३० मार्च २००६
पुनर्मुद्रण १ जुलै २००९

शोधग्राम,
पो. जि. गडचिरोली,
महाराष्ट्र - ४४२ ६०५

प्रकाशन
ग्रंथाली
इंडियन एज्युकेशन सोसायटीची
म. फुले कन्याशाळा, बाबरेकर मार्ग,
ऑफ गोखले रोड (उ),
दादर, मुंबई - ४०० ०२८
फोन : ०२२-२३८७ ५४ ८१/ २३८९ २४ ४५
२४४७ ४८ ४३
ई-मेल : granthali01@gmail.com

मुखपृष्ठ
रंजन जोशी

रंगीत छायाचित्रे
डॉ. अभय बंग

अक्षरजुळणी
वेद लेझर डेस्क सिस्टिम्स,
मुंबई - ४०० ०२८

मुद्रण
जयमल्हार प्रिंटिंग प्रेस
२१७ आशीष इंडस्ट्रियल इस्टेट
गोखले रोड (द.), दादर (प.),
मुंबई ४०० ०२५

मूल्य १६० रु.

मनोगत

तशी, मला लहानपणापासूनच झाडांची आवड! कारण माझ्या आईला झाडांची फार आवड होती. भाड्याच्याच घरातल्या अंगणात फार आवडीने तिने फळझाडे, फुलझाडे व भाजीपाला लावला होता; ते घर आम्ही १९७१ साली सोडले, पण त्या घराच्या आवारात मी व माझ्या भावाकडून आमच्या आईने आंब्याची जी झाडे लावून घेतली होती, त्याची फळे आता तिथले आजुबाजूचे सर्व लोक खातात आणि माझ्या आईची आठवण काढतात. झाडांना लहान लेकरांसारखे प्रेम द्यायचे, वाढवायचे हे तिनेच आम्हाला शिकवले. वेगवेगळ्या सणांमधली पूजा म्हणजे निसर्गपूजा ही दृष्टी तिने आम्हाला लक्ष्मीपूजन, तुळशीचे लग्न, सत्यनारायणाची कथा, या विविध सणांमधून दिली. प्रत्येक मोसमात असलेली फळे आम्ही मुलांनी खाल्ली पाहिजेत, म्हणून ती मुद्दाम आणून आम्हाला खायला द्यायची. यात बोरे, करवंदे, येरोण्या, जांभळे, शिंगाडे, टेंभरे, चार, पेरू सर्वांचा समावेश असायचा. इतर आया आपल्या लेकरांना सर्दी-खोकला होईल म्हणून ही फळे खाऊ द्यायच्या नाहीत आणि आमची आई मात्र आम्हाला मुद्दाम खायला द्यायची. ती म्हणायची, ''देवानं, निसर्गानं जे सर्व निर्माण केलं आहे ते चांगलंच आहे. ही फळं वाईट असती तर देवानं निर्माण केली नसती.'' झाडावर तिचे अनेक प्रयोग चालायचे. मोगऱ्याच्या झाडाची सर्व पाने उन्हाळ्यात खुडून टाकली तर झाडभर फुले लागतात हे तिने आम्हाला करून दाखवले होते. आजही मी स्वत: तसे करते आणि इतरांना पण सांगते.

याउलट आमचे वडील! त्यांना झाडे म्हणजे शत्रू वाटायची. अजूनही वाटतात. पण आईच्या मृत्यूनंतर आईने लावलेल्या झाडांची मात्र त्यांनी मनापासून काळजी घेतली. त्यांच्या मते, झाड घरात असल्याने मच्छर होतात. डॉक्टर आहेत ते, म्हणून डासांची भीती! त्यामुळे झाडे लावण्यात माझी आई गर्क असायची व ती झाडे कशी उपटायची, कशी काढून टाकायची याच्या विवंचनेत माझे वडील असायचे. मला आठवते, माझी लहान वहिनी, सौ. मीरा, लग्न होऊन आल्यावर आमच्या नवीन घराच्या भल्या मोठ्या अंगणात आईसोबत तिने पण हौसेने लिलीची व निशिगंधाची झाडे लावली आणि माझ्या वडिलांनी, माझी आई व वहिनी बाजारात गेलेल्या असताना, 'ये क्या घास लगाया मीराबाईने!' म्हणून ती सर्व झाडे उपटून फेकून दिली. आम्ही मूळचे आंध्रचे, म्हणून वडील महाराष्ट्रीय मीरावहिनीसोबत हिंदीत बोलतात. माझी वहिनी घरी आल्यावर खूप रडली. सुदैवाने त्याच दिवशी मी तिथे गेले होते. वडिलांना मी समजावले, त्यानंतर त्यांचा रोष ते प्रकट करायचे, पण झाडे उपटून टाकण्याचे सत्र त्यांनी थांबवले. आम्हा मुलींवर त्यांचे खूप प्रेम! घरातल्या लिंबाच्या झाडाला खूप लिंबे लागलीत, तेव्हा पहिले लिंबू राणीने खाल्ल्याशिवाय बाकीची लिंबे तोडायची नाहीत असा त्यांचा आग्रह होता.

या वातावरणातून, लग्न होऊन १९७७ साली मी गोपुरीला (वर्धा जिल्हा) सासरी आले. तिथे माझे भासरे, अशोक बंग हे कृषितज्ज्ञ असल्यामुळे त्यांच्याकडूनपण मला झाडांविषयी विविध माहिती मिळत गेली. माझी झाडांमधली आवड पाहून त्यांनी मला झाडांवरची अनेक

पुस्तके भेट दिली. माझे पती, डॉ. अभय बंग यांच्या विषयीचा एक किस्सा त्यांच्याकडून व माझ्या सासुबाईंकडून मी सतत ऐकत आले. अभयचे पूर्ण बालपण सेवाग्राम आश्रमात गेले. 'नयी तालीम' शिक्षण पद्धतीत स्वत: झाडे लावणेपण होते. आठवीत असताना अभयने खूप खत देऊन वांग्याच्या एका झाडाला पावणेदोन किलोचे वांगे लागल्यावर बाजारात विकायला नेले, तर तेव्हढे मोठे वांगे विकत घ्यायला कुणी तयारच होईना! मागल्या वर्षी सेवाग्राम आश्रमात गेल्यानंतर हे ऐतिहासिक वांगे ज्या जागी पिकवले गेले होते ती जागा अभयने मला व मुलांना खूप अभिमानाने दाखवली व आम्हीपण तितक्याच कौतुकाने ती पाहिली.

१९८६ साली आम्ही गडचिरोलीला राहायला आलो. गडचिरोलीत आम्ही 'सर्च' नावाची एक स्वयंसेवी संस्था उभारून आरोग्याचे काम सुरू केले. आमच्या कामाचा मुख्य भर स्त्रियांचे व लहान मुलांचे आरोग्य, युवक-युवतींचे आरोग्य शिक्षण, गुप्तरोग व एड्स या रोगांचा प्रतिबंध आणि गुप्तरोगांवर इलाज, व्यसनमुक्ती, पाच वर्षांखालच्या लहान मुलांत न्युमोनियाचे, मृत्यूचे प्रमाण कमी करणे इत्यादी गोष्टींवर आहे.

गडचिरोली हा जंगलांचा जिल्हा! इथली जवळजवळ साठ टक्के जमीन जंगलाखाली आहे आणि जिल्ह्याच्या लोकसंख्येत चाळीस टक्के आदिवासी आहेत. गडचिरोली गाव पाहिल्यावर या जिल्ह्यातल्या जंगलाची कल्पना येत नाही, पण जिल्ह्याच्या ठिकाणापासून सात-आठ किलोमीटर दूर गेल्यावर जंगल दिसायला लागते. सुरुवातीला झुडपी जंगल; पण जसजसे आपण आत जाऊ, तसतसे जंगल अधिक दाट होत जाते आणि झाडांची उंची पण वाढत जाते.

मला व अभयला, दोघांनाही जंगलाची आवड. सुरुवातीला आम्ही जंगल नुसते दुरून किंवा गाडीतून भुर्रकन फिरून बघायचो. पण हळुहळू इथल्या आदिवासींसोबत, सुईणींसोबत जवळीक वाढायला लागली. आदिवासी खेड्यांत आरोग्याची शिबिरे घेताना, रात्री शेकोटीभोवती बसून आदिवासींशी गप्पा मारताना आदिवासींचे खरे अंतरंग खुलायला लागले. त्यातूनच ज्या अनेक नवीन गोष्टी कळायला लागल्या त्यातील एक गोष्ट होती - झाडे! इथले जंगल, इथल्या झाडांचे विविध उपयोग – खाण्याचे पदार्थ, औषधी, सरपण, कुंपण आम्हाला थोडे थोडे उमजायला लागले. मला आठवते, आम्ही सर्व कार्यकर्ती मंडळी गडचिरोली जिल्ह्यातल्या टिप्पागढ नावाच्या डोंगरावर सहलीसाठी गेलो होतो. गाडी जेव्हा डोंगराच्या पायथ्याशी असलेल्या एका गावात थांबली, तेव्हा मला व अभयला एक दृश्य पाहून आश्चर्याचा धक्का बसला. एक मोठे आंब्याचे झाड पिकलेल्या आंब्यांनी लदबदलेले होते. जमिनीवर पण पिकलेल्या आंब्यांचा सडा पडला होता. आमच्या सोबतची सर्व गैर आदिवासी मंडळी धावत जाऊन पडलेले आंबे वेचायला व झाडावरचे आंबे दगडांनी पाडायला लागली. अशाच प्रकारचे दृश्य आम्ही अनेक आदिवासी खेड्यांत पाहिले आणि आम्हाला उत्सुकता वाटली, हे असे कसे? हे आदिवासी लोक आंबे तोडत का नाहीत? आमचे अगदी जवळचे मित्र, हिरामणजी वरखेडे, इथले आदिवासी नेते व माजी आमदार आहेत. त्यांनी आमच्या प्रश्नाचे उत्तर दिले. ''झाड, जंगल, पशू-पक्षी आणि आम्ही माणसे, आम्ही सर्व सोबत राहतो. आम्ही सर्व एकमेकांवर अवलंबून आहोत. या निसर्गावर प्रत्येकाचा अधिकार आहे. त्यामुळे झाडाची फळे आम्ही मुद्दाम तोडत नाही. खाली पडलेली आम्हाला आवश्यक तेवढी वेचून घेतो. आमच्यासारखेच खाली पडलेली फळे डुकरे, गायी, म्हशी, बकऱ्या, शेरड्या, कोंबड्या सर्व खातात. झाडावरची फळे पक्षी, माकडे खातात,'' वरखेडेजींचे हे बोलणे म्हणजे 'सर्वेपि सुखिन: संतु' हीच भावना होती; या उलट आम्ही 'सुसंस्कृत, आधुनिक' माणसे ज्या हावरटपणाने केवळ आपल्या स्वार्थासाठी निसर्गाच्या सर्व अंगावर क्रूर आक्रमण करीत होतो, त्याची लाज वाटली.

सुरुवातीला आम्हाला जंगलातली सारी झाडे एकसारखी दिसायची; पण एके दिवशी जंगलात फिरत असताना, एका वनाधिकाऱ्याने आम्हाला पाव एकर जंगलात जवळपास पन्नास प्रकारची झाडे दाखवली. त्यामुळे झाडांविषयीची उत्सुकता अजूनच वाढत गेली.

याच दरम्यान, आम्ही इथल्या साठ खेड्यांमधल्या शंभर सुईणींचे आरोग्य प्रशिक्षणाचे काम सुरू केले. प्रत्येक महिन्यात दोन ते तीन दिवस प्रशिक्षण शिबिर चालत असे. दाईंच्या प्रशिक्षणाची मुख्य जबाबदारी माझी! पहिल्याच शिबिरात दाईसोबत ठरवले, ''मी तुम्हाला काही शिकवेन, त्या बदल्यात तुम्ही मला काही शिकवायचं,'' सुईणीपण आनंदाने तयार झाल्या. स्त्री-रोगांवरील उपचाराच्या संदर्भात या सुईणींचे प्रशिक्षण सुरू होते. त्यामुळे सहाजिकच मी त्यांना म्हटले की, या आजारांवर घरगुती, जडीबुटीचा काय इलाज करतात ते तुम्ही मला सांगा. आणि अशा प्रकारे झाडांवरची चर्चा सुरू झाली.

एका शिबिरात 'समुदसोक' आणि 'बेशरम' या झाडांविषयी चर्चा सुरू असताना एक सुईण अचानक बोलून गेली, ''बाई, या झाडाचा उपयोग नवऱ्याला मारण्यासाठी करता येतो.''

हे ऐकून मला धक्काच बसला. 'नवऱ्याला मारण्यासाठी झाडाचा उपयोग' हे मी पहिल्यांदाच ऐकत होते. मी विचारले, ''नवऱ्याला का मारायचं?''

ताबडतोब काही सुईणी म्हणाल्या, ''बाई, तो आपल्याला त्रास देत असला, दुसऱ्या बाईसोबत लफुटपणा करत असला, किंवा आपले दुसऱ्या पुरुषासोबत संबंध असले तर नवऱ्याला नाही मारायचं का, बाई?''

सुईणी भराभर खुलायला लागल्या. ताबडतोब त्यांनी मला इतरही काही झाडांचा नवऱ्याला मारण्यासाठी कसा उपयोग करता येतो ते सांगितले. अनेकांनी या झाडांचे विविध अन्नप्रकार (नवऱ्याला मारण्यासाठी!) कसे तयार करायचे ते सांगितले. काहीजणींनी अनेक जवळचे किस्से सांगितले की, अमक्या अमक्या बाईने आपल्या नवऱ्याला का व कसे मारले!

ही सर्व चर्चा सुरू असताना सुईणी अगदी सहज मूडमध्ये होत्या. पण बायांचे हे खास 'गुपित', महत्त्वाची 'कला' कळल्यामुळे मी मात्र हैराण झाले होते; अंगाला घामच फुटला होता.

दुसऱ्या दिवशी सकाळी फिरायला जाताना मी अभयला हे सर्व सांगितले. अभयलाही ते ऐकण्यात खूप मजा वाटत होती. पण त्यानंतर बराच वेळ अभय विचारातच दंग होता आणि काही वेळाने तो अचानक मला म्हणाला, ''राणी, अग तुझ्या बोलण्यावरून लक्षात येतं की

इथल्या स्त्रियांचं झाडांसोबत एक विशेष, वेगळं नातं आहे. आपल्याला झाडांचे फक्त औषधी, आर्थिक व पर्यावरणाच्या दृष्टिकोनातून उपयोग माहीत आहेत. पण 'स्त्रियांच्या नजरेतून झाडे' याबद्दल बहुतेक कुठेच माहिती नाही. तू याचा अधिक अभ्यास कर.''

मी ताबडतोब तयार झाले. कारण ज्या लोकांसोबत व ज्या जंगलात आम्ही राहतो ते समजून घेण्याची मनापासून इच्छा होती. त्यामुळे पुढल्या शिबिरापासून 'स्त्रियांच्या नजरेतून झाडे' याविषयीची माहिती घ्यायला सुरुवात केली. या सुईणींमध्ये बऱ्याच जणी स्वत: 'वैद' पण होत्या. काही सुईणी आदिवासी होत्या, तर काही जणी नव्हत्या. ही सारी माहिती सहभागी पद्धतीने गोळा केली.

सुरुवातीला आम्ही सर्वांनी मिळून इथल्या जंगलातल्या झाडांची एक यादी बनवली. ('फ्री लिस्टींग' चे तंत्र यासाठी वापरले) मग एकेका झाडाविषयी माहिती विचारली, तेव्हा लक्षात आले की या बायांजवळ माहितीची खाणच आहे. जितके खणावे तितके अजून आतले थर बाहेर पडत गेले; अधिक माहिती मिळत गेली. अनेक सुईणींना त्यांच्याजवळ असलेली काही 'खास' माहिती मला एकटीला सांगायची असायची, पण ते इतरांना कळायला नको म्हणून त्या मुद्दाम घरी येऊन किंवा मला जंगलात नेऊन, ते झाड प्रत्यक्ष दाखवून माहिती द्यायच्या.

या माहितीत झाडाचे वर्णन, त्याची पाने, फुले, फळे, त्या झाडाचे विविध उपयोग, औषधी गुणधर्म, त्या झाडाचे स्वयंपाकातील महत्त्व, धार्मिक महत्त्व, झाडाबद्दलच्या गोष्टी, गाणी इत्यादी अनेक प्रकारची माहिती असायची. काही गाणी आम्ही टेप पण केली, कारण काही सुईणी ती गाणी फारच छान म्हणायच्या. विशेषत: बोधली-मेंढा गावच्या उरकुडा आजी भैसारे, पार्वता आजी मेश्राम, कन्हेरीच्या सुगंधा आजी गेडाम.

औषधी माहितीत, इतर आजारांसोबतच गर्भपात करण्यासाठी वापरात येणाऱ्या वनस्पती, कुटुंब नियोजनासाठी वापरण्यात येणाऱ्या जडीबुटी यांविषयी जाणून घेण्यात मला विशेष रस होता. याचे कारण एक तर मी स्वत: स्त्री-रोगतज्ज्ञ; आणि दुसरे म्हणजे, याआधी अशाच एका शिबिरात घडलेली घटना. एप्रिलच्या तिसऱ्या आठवड्यात आमचे शिबिर सुरू होते. शेवटल्या दिवशी माझ्या लक्षात आले की, काही सुईणींची आपसात खूप खुसपूस सुरू होती. उत्सुकतेने मी 'काय आहे?' म्हणून विचारले. सुरुवातीला सुईणी सांगायला थोड्या लाजत-बिचकत होत्या. पण माझा आग्रह पाहून त्यांनी मला सांगितले, ''बाई, या काही सुईणी पानं तोडण्यासाठी झाडीत जाणार आहेत. (आमच्याकडे बरेच लोक मे महिन्यात टेंभराच्या झाडाची पाने तोडतात, याला तेंडुपत्ता किंवा बिडीपत्ता म्हणतात. यावेळी अनेक लोक आपलं घर सोडून आत, दाट जंगलात पानं तोडायला जातात). आम्ही त्यांना पटवून आहोत की, येताना दोन गोष्टी आणा. एक म्हणजे टेंभराचा डिंक व दुसरी वस्तू म्हणजे 'येल्या सरप' ''

हा झाडावर आढळणारा हिरव्या रंगाचा बारीक साप असतो.

मी विचारले, ''या वस्तू कशासाठी?'' तर त्यांनी मला सांगितले, ''बाई, मूल-बाळ होत नसलेल्या बाईला येल्या सरप खायला दिला तर तिला लेकरं-बाळं होतात; व टेंभराचा डिंक गुळात मिसळवून, गोळ्या बनवून माहवारीच्या पाचव्या दिवसापासून पाच दिवस एक गोळी सकाळी व एक गोळी संध्याकाळी खाल्ली तर मूलबाळ होत नाही. आणि बाई, या दोन्ही गोष्टी सहज मिळत नाहीत. कुणाला तरी झाडीत भेटते आणि मग ते लोक आणून इतरांना विकतात व पैसा कमावतात.''

''यांचा खरंच उपयोग होतो काय?'' असे मी विचारल्यावर पटापट दहा-बारा सुईणी उभ्या राहून म्हणाल्या, ''बाई हे तुमचं ऑपरेशन वाटी (कॉपर-टी-तांबी), फुगे (निरोध) वगैरे आता आले. आम्ही बाया पूर्वीपासून हा डिंकच खात आलो, पोर नको म्हणून!''

या सुईणींनी मला नंतर थोडा डिंक आणून दिला. माझ्या विनंतीवरून हेमलकशाचे आमचे मित्र 'नेगल'प्रसिद्ध विलास मनोहर यांनी पण काही डिंक गोळा करवून आणून दिला. ही औषधी वनस्पती खरेच काम करते की नाही हे आम्ही अजून सिद्ध करू शकलो नाही. (खरे म्हणजे या डिंकाचे रासायनिक पृथक्करण करवावे अशी आमची इच्छा आहे. पण अजून ते करू शकलो नाही.) पण एवढे निश्चित की, हा डिंक काय, किंवा नवरा मारण्याची झाडे काय, बायांना ती आपल्या जवळची फार मोठी 'शस्त्रास्त्रे' वाटतात. आपल्याजवळ काही 'पॉवर' आहे याचे निश्चित समाधान त्यांना लाभते.

या टेंभराच्या झाडाच्या संदर्भात दुसरी घटना मला आठवते. उन्हाळ्यात आमच्या भागातील जंगलात टेंभराला नवीन पाने फुटतात. पूर्ण जंगलभर जमिनीवर टेंभराच्या पानांचे हिरवेगार आच्छादन दिसून येते. पण एकही ढोर, शेळी-बकरी त्यांना तोंड न लावता आमच्या कॅम्पसच्या आत शिरून आमच्याकडील झाडे खात असत. आम्ही जाम वैतागायचो, पण आमचे मित्र वरखेडेजी परत आमच्या मदतीला आले. जंगलात त्यांच्या सोबत फिरताना त्यांना आम्ही विचारले. तर ते म्हणाले, ''पुनरुत्पादन ही फक्त मनुष्याची गरज नाही, इतर प्राणिमात्रातही त्याची तीव्र इच्छा असते. जनावरे मूर्ख नाहीत. त्यांच्या अनेक पिढ्यांचा वर्षानुवर्षाचा अनुभव त्यांच्या गाठीशी आहे. त्यांना माहीत आहे की, ही पाने खाल्याने आपण वांझ होऊ!''

वरखेडेजींशी बोलताना सतत जाणवायचे की, जसे प्रत्येक माणसाचे एक व्यक्तिमत्त्व असते, तसेच प्रत्येक झाडाचे एक व्यक्तिमत्त्व आहे. ही आदिवासी माणसे वर्षानुवर्षे झाडांसोबत जंगलात राहिल्याने या माणसांना झाडांच्या व्यक्तिमत्त्वाचे दर्शन झाले. शोधग्रामचे पूर्ण आवार अभयने तीन वर्षे आपला वेळ देऊन मनासारखे बांधून घेतल्यावर त्यातल्या प्रत्येक इमारतीशी त्याचे जवळचे नाते निर्माण झाले. त्याच्या लक्षात आले की, प्रत्येक घराचे झाडासारखेच एक स्वतंत्र व्यक्तिमत्त्व आहे. म्हणून आमच्या इथल्या प्रत्येक इमारतीला, तिच्या व्यक्तिमत्त्वाला शोभून दिसेल असे इथल्या झाडाचे नाव अभयने दिलेले आहे. उदाहरणार्थ, आमच्या ऑफिसमधल्या गंभीर वातावरणामुळे त्याचे नाव आहे औदुंबर, (अभयला बालकवींची 'औदुंबर' कविता आठवली). प्रशिक्षण सभागृहाला 'पिंपळ भवन', कारण पिंपळाच्या झाडाखाली गौतम बुद्धांना ज्ञानप्राप्ती झाली. आमच्या रसोड्याला 'मोहा माऊली'. कारण बाहेरच्या लोकांना मोहाचे झाड म्हटले की फक्त दारू आठवते, पण आमच्या आदिवासींच्या नजरेतून मोहाचे झाड म्हणजे

मोहा माय, आई, मोठा देव! गेस्ट हाऊसचे नांव 'बहावा' (अमलताश), कारण उन्हाळ्यात सर्वत्र रुक्षता असताना बहाव्याची पिवळी फुले अचानक बहरतात. तसेच आमच्या दैनंदिन रुक्ष जीवनात अचानक पाहुणे येऊन आनंदाचा बहर आणतात.

झाडांची माहिती घेत असतानाच काही जाणकार सुईणींसोबत जंगलात जाऊन आम्ही झाडे ओळखू लागलो. या वेळी लक्षात आले की, ग्रामीण बाईचे झाडांशी एक वेगळे नाते आहे. तिच्या दृष्टिकोनातून, त्या नात्यातून, ही झाडे बघितली तेव्हा नवेच रंग दिसले. तिचे व तिच्या संसाराचे पोट, चूल, औषधे, पाणी, बरेचसे या झाडांवर अवलंबून आहे. म्हणून या बायांचे झाडांसोबत एक भावनिक नाते पण निर्माण झाले. बायांच्या जीवनातील व्यथांवर सीतेच्या नावाने कथा आहेत. सीता म्हणजे सार्वकालिक स्त्री! भाऊ-बहीण, आई-वडील व मुलगी, पती-पत्नी, सून व सासू, सून व सासरे, वहिनी व दीर, प्रेयसी व प्रियकर अशा विविध संबंधांत झाडांसोबत नाजूक नाते जुळलेले दिसून येते; आणि म्हणूनच, इथल्या बाया झाडांना आपल्या 'गोईणी' म्हणजे मैत्रिणी म्हणतात.

पती-पत्नीचे प्रेमाचे नाते अनेक झाडांमधून व्यक्त होते. उदा. लक्ष्मण सीतेला वनवासात सोडून आल्यावर दुःखाने राम लक्ष्मणाला म्हणतो,''हाय हाय रे लक्ष्मणा, कोण्या वनात सोडलेस सीतेला? वाघ दिसला जंगलात तर येन-धावडे स्वर्गाला जाती; पण माझी सीता काय करती?''

येन व धावडा ही झाडे खूप उंच उंच वाढतात. म्हणून रामाला वाटते की वाघाला पाहून ही झाडे अजून उंच वाढून आपले रक्षण करून घेतील, पण सीतेचे काय?

रामजन्माच्या वेळी पळस फुलतो. म्हणून पळस म्हणजे 'सीतामायचा पुरुष राम'! वनवासात लक्ष्मणाने सीतामाईसाठी पळसाच्या पानांच्या द्रोणात पाणी आणले. तेव्हा सीतामाई म्हणते, ''हा द्रोण माझा पुरुष आहे. मी यात पाणी पीत नाही. पळस माझा पुरुष, नाही पीत मी उदक!''

नवऱ्याच्या विरहात बाई बोलते, ''फुलामंधी फूल, गोंगलाचे फूल, या फुलाची महिमा लाल ग, देवा तू कृष्णा! चटक चांदण्या निघाल्या आंगणी, 'शायी' (नवरा) गेले का देशावरी, 'मायास' (प्रेम) लावून!!''

आपल्या नवऱ्यासाठी आपण काहीतरी खास वेगळे करून प्रेम व्यक्त करावे म्हणून, ''आरशी बारशी, शंभू देवाला निराळ, अन् गौरा हिडते शिवार, गोंगलाच्या फुलासाठी अन् शंकराच्या पूजेसाठी.''

माहेरी आपल्या नवऱ्याचे मोठेपण व्यक्त करण्यासाठी कुडाच्या झाडाच्या संदर्भात बाया पोळ्याला गाणे म्हणतात, ''आला पोळीयाचा सन, कुडाचा पानांची पत्रावळ मांडते॥१॥ आला पोळीयाचा सण, साडी नेसेन मी पाचसेची, 'जोडी' (बैलाची) पूजेन मी माझ्या पिताजीची॥२॥ आला पोळीयाचा सण, साडी नेसेन मी हजाराची, 'जोडी' (बैलाची) पूजेन मी माज्या 'भरताराची' (भ्रताराची)॥३॥

पळसाचे झाड रामाचे, म्हणजे सीतामाईच्या आदर्श नवऱ्याचे प्रतीक आहे. म्हणून काही बाया नवरा चांगला वागवत नसला तर पळसाच्या झाडाला उद्देशून दुःखाने गातात, ''वाटेवरचा 'परस' (पळस), शेंडीले कोवळा, लेकी देऊन सोयरा, पिताजी व ऽऽ माझा॥१॥ वाटेवरचा परस, शेंडीले पिकला, लेकी देऊन चुकला पिताजी व ऽऽ माझा॥२॥ वाटेवरचा परस, वाटुल्या पानांचा, सखा निष्ठुर मनाचा, बंधुजी व ऽऽ माझा॥३॥''

नवऱ्याची थोडी गंमत-टवाळकी करताना, चिडवताना आणि 'माझा नवरा कसा साधाभोळा, काही कळत नाही त्याला' असे म्हणताना बाया परत सीतेचा आधार घेतात. ''राम नेते वखर, सीता नेते भाकर, बिनफुलाचा फळ आणशील तवा खाशील भाकर!!'' वनवासात सीता रामाला म्हणाली, ''तुम्ही बिनफुलाचे फळ आणा, मगच मी तुम्हाला भाकर देईन.'' रामाने पुष्कळ शोध केला पण शेवटी 'हदून' (थकून) गेला. राम हरला. मग सीतेने रामाला सांगितले की, ''बिनफुलाचे फळ म्हणजे उंबर! उंबराच्या झाडाला फूल येत नाही.''

नवरा बायकोची इच्छा कशी पूर्ण करतो, हे कवठाच्या गाण्यात आहे. एका गरोदर बाईला कवठाचे डोहाळे लागले आहेत. तिची सखी म्हणते, ''पहिल्याने 'गरवार' (गरोदर), आवड झाली कवठाई, तुझ्या 'फिरतीचा' (प्रेमाचा) 'शाई' (नवरा), शोधलो आंबराई (जंगलात).''

बहीण-भावाच्या नात्याचे वर्णन, कोवा व त्याच्या बहिणीच्या उंबराच्या संबंधातील गोष्टीत आहे. कोवा नावाचा भाऊ रस्त्यात उंबराच्या झाडाखालून जाऊनही उंबराचे फळ खात नाही, आणि एकाच गावात सात श्रीमंत बहिणी असूनही त्या त्याला जेवायला वाढत नाहीत. शेवटी कोवा भुकेने तडफडून उंबराच्या झाडाखाली मरतो. ''कोवा रे कोवा, कोवा पडला रानी, सात जणी बहिणी, नाही अवरूला पाणी, सात बहिणींचा॥'' या गोष्टीतून आमच्याकडे लोक निष्कर्ष काढतात की, उंबराच्या झाडाखालून जाताना एकतरी उंबर खाल्लाच पाहिजे. उंबर फोडून खायचे नाही कारण फोडले तर आतून जे चिलटे उडतात ते म्हणजे कोवाच्या बहिणी! त्या 'कोवा कोवा' म्हणून आक्रोश करतात. पण भाऊ मेल्यावर आक्रोश करून काय उपयोग? आणि त्यामुळे बहिणीचे कर्तव्य आहे की, आपला भाऊ जर आपल्या घरी आला तर काही अपेक्षा न करता त्याला नीट जेवण वाढायचे, त्याचे आतिथ्य करायचे.

बहिणीचे प्रेम सालई-मोवई या झाडातून व्यक्त होते. आमच्याकडे समज आहे की, सालई-मोवई या बहिणी आहेत. दिवसा त्या झाडाच्या रूपात असतात, रात्री स्त्रियांच्या. लक्ष्मणाने सीतेला रामाच्या आज्ञेवरून जंगलात नेऊन सोडले. तेव्हा जंगलात सीतामाईचे रक्षण करण्यासाठी लक्ष्मणाने सालई-मोवईनाच विनंती केली, ''सालया-मोवया, रात्रीच्या बायका, माझ्या सीतेचा गहिंवर आयका॥१॥ सालया-मोवया आंदीच्या बायका, माझ्या सीतेचं रक्षण करा ॥२॥''

इंद्रजिताचा लक्ष्मणाला बाण लागला असताना हनुमानाने जी औषधी वनस्पती आणली, ती म्हणजे सालई-मोवईच होय असे समजतात. दोन बहिणी एकत्र, प्रेमाने राहिल्या तर त्यांच्यात किती मोठी शक्ती असू शकते हे या उदाहरणावरून दिसते असे इथल्या बायका सांगतात. (म्हणूनच आम्ही आमच्या एका जुळ्या घराचे नाव सालई-मोवई ठेवलेले आहे.)

पण दोन बहिणींत भांडण, द्वेष असले तर त्याचे वर्णन 'नागवेल' (विड्याच्या पानांचा वेल) आणि सेहऱ्याचे झाड यांच्या भांडणाच्या रूपात दाखवले आहे. नागवेल स्वतःला 'श्रीमंत,

मोठी' समजून गर्व करते आणि 'सेहरा' हे झाड गरीब बहिणीचे प्रतीक आहे. आई-वडिलांनी पण आपल्या मुलींमध्ये कसा भेदभाव करू नये याचे वर्णनही सेहरा व नागवेल या दोन बहिणींच्या भांडणात दाखवले आहे.

मुलीवर आई-वडिलांचे प्रेम हे परत उंबराच्या झाडाच्या रूपात दाखवले आहे. आमच्या भागात मुलीसाठी वर बघताना मुलीचे आई-वडील मुलाच्या 'दंडावर' (शेतात) उंबराचे झाड आहे की नाही हे पाहतात. कारण असे की, काही कारणांमुळे आपली मुलगी नवऱ्यावर किंवा सासरच्या लोकांवर रागावून शेतात निघून गेली तर तिने तिथे तीन-चार दिवस तरी उपाशी राहू नये. उंबराची दोन-तीन फळे खाल्ली तर भूक व तहान, दोन्ही लवकर लागत नाही.

सासू-सासऱ्यांचे सुनेशी असलेले संबंधही झाडांमधून दाखविले आहेत. सीतामाईच्या संदर्भातली गोष्ट आहे. ''सीतामाईला तिची सासू खूप 'वनवास' (छळ) करायची. सासू सीतेला काही खायला द्यायची नाही. मग बिचारी सीतामाई जंगलात जाऊन आज्ण, रोहण, खैर यांची फळे खाऊन आपले पोट भरायची. पण सीतामाईची सासू खूप दुष्ट होती. तिला वाटायचे की, आपण सुनेला काही खायला देत नाही. तरी ती इतकी 'बाकी' (चांगली) कशी दिसते? म्हणून ती सुनेच्या पाळतीवर राहिली आणि एकदा सीतामाई 'ओट्यात' (ओच्यात) रोहण, आजण, येनाची फळे खाण्यासाठी आणताना पाहून सासूने ओट्यावर लाथ मारली. त्याबरोबर ती फळे खाली पडून विषारी झाली आणि ही फळे तेव्हापासून माणसे तर सोडाच, पण पाखरंसुद्धा खात नाहीत.'' बाया ही गोष्ट सांगून म्हणतात, ''म्हणून सासूने सुनेचा छळ करू नये; सुनेला नीट खायला द्यावे नाहीतर जंगलातील फळे विषारी होतात.'' आता इतर धान्यप्रकार लावणे, शेती करणे आले पण पूर्वीचे लोक फक्त झाडांवरच अवलंबून असल्याने विषारी फळे त्यांना परवडण्यासारखी नव्हती.

सासऱ्याने एकटे सुनेसोबत कुठे जाऊ नये, या संदर्भात हिवराच्या झाडाची गोष्ट आहे.

एकदा एक सासरा आपल्या सुनेसोबत एकटाच जात होता. ते थकले, ऊन झाले म्हणून विश्रांतीसाठी हिवराच्या झाडाखाली बसले. सासऱ्याची वाईट नजर सुनेवर गेली. इतर कुणीच बघणारे नव्हते पण 'हिवर' बघेल म्हणून त्याची परवानगी सासरा मागतो. म्हणतो, ''मला सुनेची इच्छा झाली आहे. हे पाप की 'पुन'? (पुण्य)''. त्यावर हिवराचे झाड सासऱ्याला म्हणते, ''अरे अरे मूर्खा, तू आहेस हलका, सुनेला झवलास तर किती पाप होते!'' हिवराने सुनेचे रक्षण केले आणि तेव्हापासून सुनेसोबत सासरा एकटा जात नाही.

स्त्रीच्या शरीरात लहानपणी, तरुणपणात, व म्हातारपणात होणारे बदल पळसाच्या या गाण्यात व्यक्त होतात, ''लहानपणी काळी, जवानपणी लाल, आन् मोठेपणी टापड-टिपड!'' (शेंगा लागतात)

जवान पोरीचा पदर नीट खांद्यावर राहावा म्हणून पळसाला उद्देशून बाया म्हणतात, ''जवानपणी काजळ 'लेलो' (लावलं), कुंकू लेलो, गेली 'आडावर' (विहिरीवर), मागे फिरून पाहे पोरी काष्टा कडेवर!!''

तरुण वयात एखादा प्रियकर आपल्या प्रेयसीला उद्देशून, करकरीच्या झाडाच्या संदर्भात म्हणतो, ''करकरीचा फूल पोरी सोना पिवळा, होशील माझी बायको तर घडीन 'तानोडा'!!'' (कानातल्या बिऱ्या)

बायांना आपला प्रपंच, संसार करताना काय अनुभव येतात त्याचे सुंदर वर्णन आंब्याच्या झाडाच्या संदर्भात आहे, ''सखुबाई साजणी, बारा सोळा जणी, कांडुनिया 'देहेचा' (देहाचा) उखळ, मनाचा मुसळ, पाखडून पाखडीला उडवे कोंडा॥१॥ 'परपंचा' (प्रपंच) हांड्यात मांडीला आंदण, जोडीला 'इंजन' (नवरा) कामापुरता॥२॥ आंदणावा उत येतो वेळोनवेळी, जवळ हांता सत्त्वधारी॥३॥ 'कैरीच्या' (आंब्याच्या) पानाच्या जोडल्या पत्रावळी, जेवण जेवतो श्रीहरी॥४॥

नैसर्गिक मिश्र जंगल तोडून केवळ सागाचे रोपवन सरकार जे लावते त्याविषयी रोष प्रकट करताना बाया म्हणतात, हे झाड माणसांच्या कामाचं नाही, कारण फळं, फुलं काहीच खाता येत नाही. पानं एव्हढी मोठी दिसतात, पण त्यात जेवण करता येत नाही; कारण एकतर पान खरबरीत असते व त्यात भाताचा रंग बदलतो. झाडाची सावली मिळत नाही, दाट झाड नसल्यानं पाखरं यावर घरटी बांधत नाही. पाखरं, प्राणी या झाडाची फळं खात नाहीत. मोहा, जांभळ, टेंभर चाराची झाडं तोडून साग लावल्यामुळे अस्वलांची संख्या जंगलात कमी झाली. कारण इतर फळं अस्वलं आवडीनं खायची. तेंदूची अधिक पानं यावीत म्हणून ठेकेदार लोक जंगल जाळतात. त्यामुळे जंगली जनावर, पक्षी होरपळून मरतात, बिया व नवीन रोप जळून जातात, जंगलातला पालापाचोळा जळून गेल्यानं, सोन्यासारखं नैसर्गिक खत नष्ट होतं.

खेड्यातली माणसे, आदिवासी यांना शिक्षण नसेल पण आम्हा 'सुशिक्षित' लोकांपेक्षा त्यांच्याकडे अधिक शहाणपण आहे हे जाणवते. सरकारची टिंगल हे लोक करताना दिसतात. ''गावठी बाभूळ चांगले, पण रस्त्याच्या बाजूला सरकार जी सरकारी बाभळीची झाडं लावत आहे त्याची सावली तर मिळतच नाही. पण काटा मात्र खूप पडतो.''

मोहाच्या झाडाविषयी बोलताना बाया, 'आमची माऊली', 'आमचा मोठा देव' म्हणूनच वर्णन करतात. झाडांसोबतच मध, नदीची माती यांना पण ते 'आपले' मानतात. कारण दुष्काळात भूक भागवण्यासाठी यांचाच उपयोग होतो.

किती म्हणून सांगू? झाडांची माहिती वाचताना वाचकांच्या लक्षात येईल की, इथल्या लोकांचे, बायांचे झाडांसोबत किती जवळचे नाते आहे! पण बाहेरच्या जगाला याचा पत्ता नाही. १९५६ साली मुंबई प्रांतात दारुबंदीच्या अंमलबजावणीसाठी महाराष्ट्र शासनाने 'जी. आर.' काढला होता. आदिवासी भागातली सर्व मोहाची झाडे कापून टाका, कारण मोहापासून आदिवासी दारू काढून पितात व दारू घातक आहे. पण टोळीची सर्व झाडे राखून ठेवा, कारण टोळीपासून आदिवासी तेल काढून खातात. ते त्यांच्या तब्येतीसाठी चांगले आहे. एक झाड कापा व एक राखा यात विशेष काय? यातले गुपित आमचे आदिवासी हसून सांगतात, ''या दिल्ली-बंबईच्या लोकाले कसा न्हाई माहीत की मोहाचा फळ म्हणजेच टोळ आहे!''

अशा प्रकारे माहिती गोळा करता करता दीड वर्षांत जवळपास ३१० झाडांची माहिती

गोळा झाली. त्यातल्या काही झाडांची, उदा. मोहासारख्या कल्पवृक्षाची खूप माहिती मिळाली, तर काही झाडांची अत्यंत मर्यादित माहिती मिळाली. काही झाडांचा उपयोग जीवन-मरणाशी निगडित आहे, तर काही झाडांचे उपयोग वरवरचे आहेत. पण हे असे झाडांचे जिवंत जंगल सुईणींनी आमच्याभोवती उभे केले, तेच इथे मांडले आहे.

मी काही लेखिका नाही, की पर्यावरण तज्ज्ञ किंवा वनस्पतिशास्त्रज्ञ नाही. खरे म्हणजे, ही माहिती प्रकाशित करावी या उद्देशाने मी गोळा केली नाही. माझ्या ज्ञानासाठी ही माहिती मी गोळा केली. पण सर्व झाल्यावर लक्षात आले की, यातली काही माहिती खरेच फार रंजक आहे. पुण्याचे डॉ. अनिल अवचट यांच्यासोबत जंगलातून जाताना काही झाडांची माहिती मी त्यांना सांगितली. त्यांना आश्चर्य वाटले की, या डॉक्टरबाईला झाडांची इतकी माहिती कशी? त्यावेळी त्यांना या अध्ययनाविषयी मी सांगितले. वसंत पळशीकर आणि पुढे 'ग्रंथाली'चे आमचे मित्र दिनकर गांगल यांनी आम्हाला ही सारी माहिती पुस्तकरूपात एकत्र मांडावी असे सुचवले आणि म्हणून हा सारा खटाटोप!

ही माहिती गोळा करताना सर्व काही इथल्या बायांच्या बोली भाषेतच लिहिले होते. त्यामुळे इथले अनेक प्रचलित शब्द मला कळले. इथल्या मराठी बोलीभाषेला जो एक सुगंध आहे तो कायम ठेवावा अशा धडपडीतून काही वेळा वाचकांना वाचताना मी त्रासही देणार आहे. डॉ. अनिल अवचट, वसंत पळशीकर, दिनकर गांगल यांनी वेळोवेळी सूचना देऊन प्रोत्साहन दिले. गडचिरोलीचे डेप्युटी कॉन्झरव्हेटर ऑफ फॉरेस्ट रामकृष्णराव यांनी काही झाडांची बॉटॅनिकल नावे स्वतः काढून दिली. आमची सामाजिक कार्यकर्ती सुनंदा खोरगडे हिने मला झाडांची बॉटॅनिकल नावे शोधण्यासाठी लायब्ररीतून वेगवेगळी पुस्तके आणून दिली, आणि आमचेच कार्यकर्ते बळवंत सुर्वे यांनी अगदी मन लावून ही पूर्ण माहिती सुंदर टाईप करून दिली. टाईप करून आलेले कागद माझे पुतणे आकाश, आलोक आणि माझा मुलगा आनंद यांनी, लहान वय असूनही, उन्हाळ्याची सुट्टी खेळण्यात न घालवता, तपासून दिले. या मुलांचे मनातून खूप कौतुक आहे. आणि मला विशेष आनंद हा की, हे कागद वाचताना त्यांना पण झाडांमध्ये रुची निर्माण झाली. वरील सर्व व्यक्तींचे मी आभार मानते. पण ज्या सुईणींशिवाय हा विषय सुचला नसता व ज्यांच्याशिवाय ही सारी माहिती गोळा करता आली नसती, त्यांच्याविषयी कृतज्ञता शब्दांत व्यक्त करणे मला अशक्य आहे.

माझी आई रक्ताच्या कॅन्सरने वारली. माझ्या वडिलांना सध्या हाडांच्या कॅन्सरसाठी उपचार (किमोथेरपी) सुरू आहे. या दोघांनाही सदाफुलीच्या/जगन्नाथाच्या झाडापासून बनविलेले औषध 'व्हिनक्रिस्टीन' दिले गेले. झाडांचा हा माहिती -संग्रह त्या दोघांना - स्व.सौ. वसुमती चारी आणि डॉ. के. व्ही. चारी यांना, विनम्र अभिवादन करून अर्पण!

- राणी बंग

झाडांची यादी

चिंचेचे झाड साधारणपणे घराच्या जवळ लावत नाहीत. कारण भूत व सापाची भिती! तसेच, झाडाच्या फांद्या पडून घर मोडू शकते.

गाणी

माझ्या मन आवडीनं, झाड लावी ग चिंच,
आन् तिची सावली, उंच, उंच!!
आपयेला हस्तकानं (हाताने) ग,
झाड रोवयलो (रोवलो) चिंच,
आन् तिचा फळ 'बारो' (बारा) मास,
तुकाराम बोले॥

(कच्च्या चिंचा सहा महिने व पिकलेल्या चिंचा सहा महिने झाडावर असतात. तसेच आपल्या घरी पण बाराही महिने पिकलेली चिंच ठेवता येते)

पंढरीला जाता जाता कोण कोण,
करू एक मन, करू एक मन,
पुढे आहे बन, चिंचेचा,
चिंचा वाहू देवावरी,
मखमल्या झुली नंद्यावरी!!

(महादेवाला जाताना हे गाणे म्हणतात.)

हळद

Adina cordijolia

मोठ्या पानांचा हा मोठा वृक्ष असतो. पिवळी सुंदर फुले लागतात. या झाडाचे फळ मोठे व सुंदर असते.

हळदूचे खोड खूप मजबूत असते. खोडापासून शेतीची अवजरे, बैल-बंडी, 'बाजा' (खाटा), टेबल-खुर्च्या, स्टूल बनवतात. लहान फांद्या जाळण्यासाठी वापरतात. हळदूचे लाकूड थोडे पिवळे असते.

शिकेकाई

शिकाकाई
Acacia Concinna

मोठा वृक्ष असून याला शेंगा लागतात. या शेंगा 'निरमा' आहेत. पाण्यात शेंगा उकडून त्याने डोके घासतात; कपडे पण धुतात. दोन्ही एकदम साफ निघतात.

महारुख

महारुख
Ailanthus excelsa

हा उंच वाढणारा मोठा वृक्ष असतो. याच्या लाकडापासून घरासाठी फाटे, मयाली, टेबल, खुर्च्या, कपाट, दरवाजे-खिडक्या तयार करतात. लहान फांद्या जाळण्यासाठी वापरतात. झाड दिसायला सुंदर दिसते. म्हणून काही लोक आपल्या घरासमोर, शेतात मुद्दाम लावतात.

याची साल कडू असते. 'महारोग' (कुष्ठरोग) झाल्यास महारुखची साल कुटून तशीच कच्ची, त्यात खडीसाखर व जिरे टाकून खातात.

उंबर (औदुंबर)

उंबर / औदुंबर
Ficus glomerata, Ficus racemoma, Ficus hispida

उंबर - मोठा वृक्ष औदुंबर - मध्यम आकाराचा वृक्ष

मोठा वृक्ष असतो. फांद्या जाळण्यासाठी वापरतात. उंबराची फांदी खूप 'दमाने' (भरभर) जळते. खोडापासून जेवण करायला लाकडी ताट बनवतात. मांडव करताना काही लोक उंबराच्या फांद्या टाकतात. फांद्यांचा वापर करून जनावरांसाठी गोठा तयार करतात. पण बरेच लोक उंबराचे झाड तोडत नाहीत, उपटत नाहीत व याचे लाकूड जाळत पण नाहीत. कारण या झाडाखाली दत्त दिगंबराची वस्ती आहे असे मानतात.

खूप दिवसांची जुनी जखम असली तर उंबराच्या झाडाची साल जाळून त्याची 'मस' (राख) खोबरेल तेलात टाकून जखमेवर लावतात. त्यामुळे जखम लवकर भरून येते.

या झाडातून पांढऱ्या रंगाचे चिकासारखे दूध निघते. जखमेवर उंबराचे दूध लावले तर जखम लवकर भरून येते. तोंडात फोड आले तर उंबराचे दूध तोंडात लावतात. 'छात्यात दुख भरंला' (छातीत दुखत असल्यास) छातीला उंबराचे दूध लावून कागद चिकटवितात. त्यामुळे 'दुख' (दुखणे) निघून जाते. उन्हाळी लागली तर उंबराचे दूध व बोराची पाने कुस्करून त्यात खडीसाखर व जिरे टाकून देतात. उंबराचे दूध सकाळीच निघते, उन्ह आल्यावर नाही.

उंबराच्या झाडाचे कोवळे 'डिरे' (जिथे पाने फुटतात) त्या थोड्या खुडून-कुटून त्यात खडीसाखर व जिरे टाकून एखाद्या स्त्रीला कितीही 'उन्हाळी' (लघवी करताना होणारी आग) असेल व लाल-पिवळी 'पिशाब' (लघवी) जात असेल तर पाच दिवस प्यायला दिल्यास एकदम आराम होतो.

जनावरे, बकऱ्या पानं खातात. उंबराचा पाला खाल्ल्यावर बकरी जास्त दूध देते. उंबराच्या पानांना लहान लहान फोड येतात. हे फोडे लहान लेकरे, मोठी माणसे सर्व खातात. तोंड आल्यावर पानांचे फोडे खाल्ले तर आराम पडतो.

उंबराच्या झाडाला लाल फूल लागते असे म्हणतात. जी व्यक्ती भाग्यवान आहे तिलाच हे फूल दिसते इतरांना नाही.

उंबराच्या लहान कच्च्या फळांना 'दोडे' म्हणतात. या दोड्यांची भाजी करून खातात. गरीब लोक उंबराच्या फळांची भाकरी करून खातात. कोवळे फळ शिजवून 'जवारीच्या' (ज्वारीच्या) पिठात टाकून भाकऱ्या करून खातात. या भाकऱ्या भुकेला फार 'दमदार' आहेत, म्हणजे खाल्ल्यावर लवकर भूक लागत नाही.

पिकलेले उंबर सर्वजण खातात, ते अमृतासारखे गोड लागते. कोल्ही, माकडे, गुरे-ढोरे, पाखरे सर्वच आवडीने उंबराची पिकलेली फळे खातात. कुत्रा चावला तर मात्र उंबर खात नाहीत.

जुन्या काळी मुलगी द्यायची असेल तर आई-वडील उंबराचे झाड शेतात पाहून देत असत. याचे कारण असे की, मुलीचे आपल्या नवऱ्याशी किंवा सासूशी भांडण झाले व ती रागाने शेतात गेली किंवा दुष्काळ पडला तर ती उंबराच्या दोड्या, उंबर खाऊन पोट भरू शकत असे आणि उपाशी राहत नसे. म्हणून उंबराचे झाडे शेतात पाहत असत.

उंबराच्या झाडाखाली दत्त दिगंबराची वस्ती असते असे मानतात. त्यामुळे बरेच लोक उंबराचे झाड उपटत नाहीत, तोडत नाहीत.

लग्नमांडवात एक तरी उंबराची 'डार' (फांदी) पाहिजे.

मुली लग्न लवकर व्हावे म्हणून गुरुवारचा 'उपास' (उपवास) करतात व दर गुरुवारी उंबराच्या झाडाला एकशेएक प्रदक्षिणा घालतात.

''उंबर फोडून कुसर 'दावतेस' (दाखवतेस) काय?'' असे म्हणतात. उंबर अमृत आहे. उंबर फोडल्यावर आतून बारीक पाखरे निघतात. ती पाखरे परमेश्वराचाच अवतार आहे. पाखरू पाहिल्याने काही लोक मग उंबर खात नाहीत, म्हणून उंबर न फोडताच खाल्ले पाहिजे.

उंबराला फूल येत नाही. फक्त भाग्यवानालाच उंबराचे फूल दिसते, याबाबत खालील गाणे व गोष्ट आहे

राम नेते वखर,
सीता नेते भाकर
बिन फुलाचा फळ आणशील,
तवा खाशील भाकर॥

वनवासात सीता रामाला म्हणाली, ''तुम्ही बिन फुलाचे फळ आणा, मगच मी तुम्हाला भाकर देईन'! रामाने पुष्कळ शोध 'केला' (घेतला), 'हदून' (थकून) गेला, राम हरला, मग सीतेने रामाला सांगितले की बिन फुलाचा फळ म्हणजे उंबर! उंबराला फूल येत नाही.''

एक 'बुडगी' (म्हातारी) आई आपल्या लेकीच्या घराले जात होती. रस्त्यावर उंबरीचा झाड पडला. बुडगी बसली झाडाखाली तर तिच्या अंगावर झाडांची आसवं पडले. बुडगी वर पाहते, पण ती दिसायची वस्तू थोडीच आहे? काही दिसले नाही म्हणून उठली व अजून थोडी दूर पुढे गेली. इतक्यात 'माय' (माऊली) साधूचे रूप घेऊन आली व बुडगीला विचारले, ''तू कुठे चालली?'' बुडगी म्हणते, ''बाप्पा, मी पोरीला भेटायला चालले.'' तो साधू मग विचारते, ''तुझ्या गाठोडीत शिदोरी आहे? मी पण तुझ्या संगे येतो. मला थोडी शिदोरी दे.'' बुडगीजवळ

पोरीसाठी न्यायला काही भाकऱ्या होत्या. पण साधूबोवाला भूक लागली, म्हणून तिने त्या भाकऱ्या त्याला देऊन टाकल्या. दोघे सोबत चालत होते, पण अचानक साधू अदृश्य झाला. बुडगी मागे पाहते तर कोणीच नाही, मग बुडगी 'म्हनते' (म्हणते), ''दैवा! हा कोण साधू शिदोरी खाऊन बेपत्ता झाला?'' बुडगी पुढे चालू लागते! समोर रस्त्यात जांभळीचे व उंबराचे झाड ओळीने पडले. बुडगीने दहा-बारा जांभळे व उंबर वेचून पोरीकडे नेले. पोरीने आईच्या गाठोड्यात काय आणले आहे म्हणून पाहिले, तर तिला तिथे सोन्याची वीट दिसली. मुलगी आईला म्हणाली, ''आई, ही कुठून चोरी केलीस?'' बुडगी आई म्हनते, ''मी चोरी नाही केली. भाकरीच्या शिदोरीची ही सोन्याची वीट झाली.'' व ती घडलेली गोष्ट पोरीला सांगते. पोरगी म्हनते, ''आई, मी गरीब! माझ्या घरी ही वस्तू कशी पचेल? मी तुझ्या सोबत येते. भाऊ ही वीट घेऊन थोडी मलापण देईल.'' दोघी मायलेकी घरी येतात. भाऊ असतो श्रीमंत, पण मोठा खराब! तो आईच्या बोलण्यावर विश्वास ठेवत नाही व उलट आईला रागावतो की तूच बहिणीसाठी माज्या घरून चोरी केलीस. मुलगा रागावून आईचा वनवास करू लागला. आईला अन्न-पाणी देत नव्हता. बुडगी मेली. तिकडे पोरगी पर आपल्या घरी जायला निघाली. दुष्ट भावजईने नणंदेला 'शेणकुडीच्या भाकऱ्या' (गोवऱ्या) शिदोरी म्हणून बांधून दिल्या, त्या शेणकुडीच्या परत सोन्याच्या विटा झाल्या. बहीण झाली श्रीमंत व भाऊ झाला भिकारी!

उंबर ओलांडून जाऊ नये. रस्त्यात उंबराचे झाड पडले असेल तर एकतरी उंबर जरूर खावे. त्याला पाठ देऊन समोर जायचे नाही, नाहीतर त्याचा परिणाम उलटा होतो. याची पण एक गोष्ट आहे.

सात बहिणी व एक भाऊ होता. भावाचे नाव होते 'कोवा'! सात बहिणी एकाच गावी दिल्या होत्या. एकदा भाऊ म्हणतो, ''मी बहिणींना भेटायला जातो त्यांच्या गावी.'' मग कोवा आंघोळ करून चांगले कपडे 'लावून' (घालून), कपाळाला गंध लावून उपाशीच हातात थैली व 'लाठी' (काठी) घेऊन निघाला. जंगल-पहाडातून वाट होती. रस्त्यात त्याला तहान भूक लागली. जाता जाता जंगलात त्याला उंबरीचा झाड पडला, त्याच्या खाली तो विश्रांतीसाठी बसला व मनात म्हणतो, ''देवा, इतकी तहान-भूक लागली, पण या जंगलात पाणी-अन्न कुठे मिळणार!'' थोड्या वेळात त्याच्या अंगावर उंबराचे फळ पडले. तो म्हणतो, ''हा काय फळ पडला माझ्या अंगावर?'' व टाकून देतो. उठतो व परत बहिणीच्या गावाकडे निघतो. उन्हाचे दिवस! भुकेने तो व्याकूळ झाला. अगोदर मोठ्या बहिणीकडे गेला. भावाच्या कपाळाकडे पाहून ती विचार करते की भाऊ दुसऱ्या बहिणीकडे जाऊन, अन्न खाऊन, आंघोळ करून, कपाळाला गंध लावून आला आहे. त्यामुळे ती भावाशी इतर गोष्टी करते. आई, मुले बरी आहेत का विचारते. पण जेवणाचे विचारीत नाही. भाऊ पाणी मागतो व दुसऱ्या बहिणीकडे जातो. तिलाही मोठ्या बहिणीसारखेच वाटते. ती पण जेवणाचे विचारत नाही. तिथून तिसऱ्या, चौथ्या, पाचव्या, सहाव्या, सर्व बहिणींकडे तसेच होते. कोणीच त्याला जेवणाचे विचारत नाही व भाऊही काही म्हणत नाही की माझा जेवण झाला नाही. ''कर्माची गत न्यारी, अन् काय

करेल बुद्धी बिचारी!''

मग कोवा शेवटी सातव्या बहिणीकडे जातो. तिला वाटते, भाऊ सकाळीच आला, सर्व बहिणींकडे जाऊन आला म्हणजे शांतच आहे. तिनेही जेवणाचे विचारले नाही. भाऊ पाणी मागतो व म्हणतो की, आता गावाला जातो. पण चांडाळीण म्हणत नाही की, आज थांब, भाऊ निघाला, जाता जाता परत त्याच उंबराच्या झाडाखाली बसला. म्हणतो, ''देवा! 'मगा' (मघा) फळ पडला तर खाल्ला नाही, आता एकतरी पडू दे!'' पण आता फळ काही पडला नाही आणि भाऊ भुकेने व तहानेने कंठ सोकून (सुकून) त्याच झाडाखाली मेला. त्या जंगलात बहिणींच्या गावच्या बाया काड्या गोळा करण्यासाठी आल्या होत्या. प्रेत पाहून सोमी, गोमी गोष्टी करतात, ''अरे! हा कोवा हाय. आपल्या गावात त्या सात श्रीमंत सावकारणी आहेत. त्यांचा हा भाऊ आहे.'' मग त्या बाया गावात जाऊन मोठ्या बहिणीला सांगतात, ''तुमचा भाऊ आला होता काय? जंगलात उंबराच्या झाडाखाली मरून पडला आहे.'' मोठी बहीण मग इतर सर्व बहिणींना जाऊन हे सांगते. साऱ्या बहिणी विचार करतात की, आम्ही कोणीच आपल्या भावाला अन्न-पाणी दिलं नाही, आम्ही वैरीण! लहान बहिणीचा जीव खूप तडफडतो, ती इतर बहिणींना म्हणते, ''तुमच्यामुळे मी कोवाला काही दिलं नाही,'' खूप रडते, शोक करते. मग दुधाचा, तुपाचा आंदण मांडून त्यात तांदूळ वैरून खीर करते. गंजात खीर टाकून डोक्यावर मांडून निघते, 'कोवा, कोवा, कोवा' म्हणत! उंबरीच्या झाडाखाली जाते व झाडाला म्हणते, ''ही खीर माझा भाऊ थोडा जिवंत असेल म्हणून आणली.'' भाऊ मेला असे पाहून दुःखाने ती खीर डुंबरात ओतते. डुंबरावर खीर पडल्यावर, डुंबराच्या आतून 'फिपुली' (पाकळ्या असलेले किडे) निघतात.

या गोष्टीचे तात्पर्य हे की, उंबराच्या झाडाखालून कितीही श्रीमंत माणूस गेला तरी उंबर खायला पाहिजे व उंबर फोडून खाऊ नये; आतून फिपुल्या निघतात.

गाणी :

१. कोवा रे कोवा,
कोवा पडला रानी,
सात जणी बहिणी,
नाही अवसला पाणी,
सात बहिणांचा॥

२. आपयेला हस्तकान ग, झाड रोवयेलो उंबर,
आन् तेथे पुण्याची आंघोळ, तुकाराम बोले॥

३. औदुंबराच्या झाडाखाली,
दत्त - दिगंबर दिसले,
मन प्रसन्न झाले हो, मन पवित्र झाले॥

सेहरा (आपटा)

याला 'आपटा' किंवा 'सोन्याचे झाड' म्हणतात. हे मोठे झाड असते. काड्या जाळण्यासाठी वापरतात. शेळ्या-बकऱ्या पाने खातात. याच झाडाची पाने दसऱ्याला 'सोना' म्हणून वाटतात. (पण हा शमीवृक्ष नाही.) या झाडाच्या सालीपासून 'वाक' (दोरी) काढतात. वाकापासून शिंके, गाई-म्हशी-बैलांसाठी दावे व खाटा विणायला नवार बनवतात.

दिवाळीच्या वेळी सेहऱ्याचा वाक गाई-म्हशींच्या गळ्यात बांधतात. याला 'गेटा' म्हणतात.

या झाडाला 'रावणाचे झाड' म्हणतात. दसऱ्याच्या दिवशी गावचे पाटील खाचर-बैल जुंपून 'वाजा-बाजाने' (वाजत-गाजत) जाऊन या झाडाची पूजा करतात. हातात कुऱ्हाड घेऊन एका घावात जितके जमेल तितके झाड 'पाडतात' (तोडतात). मग त्याची पाने 'बुरून' (तोडून) आणून गावात वाटतात. पाटील गावात परत आल्यावर गावातल्या बाया त्याची आरती ओवाळतात. पाटील आरतीच्या तबकात पैसे टाकतात. मग बाया आपापल्या घरी जाऊन आपला नवरा घरी आल्यावर त्याला 'सोने' देऊन ओवाळून त्याच्या पाया पडतात व मग इतरांना सोने देतात. पाटलाबरोबर सोने आणायला जंगलात फक्त पुरुष जातात, स्त्रिया नाही. दसरा हा 'मर्दाचा' म्हणजे पुरुषांचा सण आहे.

दसऱ्याच्या पाच दिवसांनंतर 'आशीनला' हा सण येतो (म्हणजेच कोजागिरीला). त्या दिवशी 'भुलाया' (बाहुल्या) बसवतात. या दिवशी मोहाच्या पानांची पत्रावळ बनवतात. आंबील शिजवतात. यासाठी आधी सेहऱ्याची फांदी आणून सेहऱ्याचा 'वाक' (दोरी) काढतात. मग या वाकाचा 'येट करून' (गोल गोल फिरवून / वळवून) चुंगडी करतात. कुंभाराकडून नवीन मडके व त्याला झाकायला 'येरणी' किंवा 'मालकी' किंवा 'सराई' (झाकण) आणतात. त्यावर सेहऱ्याचा 'येट' (चुंगडी) ठेवतात. रांगोळी काढून त्यावर मोहाच्या पानांची पत्रावळ ठेवून त्यावर सव्वाशेर तांदूळ टाकतात. त्यावर सेहऱ्याचा येट ठेवून मडके ठेवतात. मडक्याला हळद-कुंकवाची पाच बोटे लावतात. मग आंबील दही टाकून शिजवतात. मडक्याला आंब्याच्या पाच पानांचे तोरण बांधून, पूजा करून, पाया पडून आंबीलवा 'नैवेद' (नैवेद) खातात.

येट मात्र सेहऱ्याच्याच झाडाचा असला पाहिजे.

गाणे

धान रोवणीच्या वेळी बाया सेहऱ्याचे हे गाणे म्हणतात. एकदा सेहरा व 'नागवेल' (विड्याच्या पानांचा वेल) यांच्यात मोठे कोण याचे भांडण लागले त्याचे या गाण्यात वर्णन आहे.

आंबील आहे 'भानवशीत (चुलीवर),
नागवेल आहे 'कूप-काठी' (कुंपणापाशी),
'मचला' (जुंपले) दोघीचा भांडण ॥१॥
आंबेल म्हणते अधिक
नागवेल म्हणते अधिक
मचला दोघीचा भांडण ॥२॥
त्याका झगडत भांडत
त्याही झगडत भांडत
गेल्या मातेच्या (आईच्या) जवळ ॥३॥
बोलती झाली आंबील बाई,
माता व ऽऽ माझे अंबाबाई,
आमचा न्याय कराया येवा ॥४॥
बोलती झाली अंबाबाई,
जा जो पित्याच्या सभेला,
पिता 'करेयल' (करेल) व न्याय ॥५॥
त्या दोघी झगडत भांडण,
गेल्या न व ऽऽ पित्याच्या सभेला,
आंबील 'मुंडीयाच्या आड' (खांबाच्या मागे)
नागवेल गेले 'सभेयेते' (सभेत) ॥६॥
आंबील राहिली 'मुंडीयाच्या' (खांबाच्या) आड,
पण नागवेल जाऊन बसली, पित्याच्या मांडीवर,
नागवेल म्हणते मी अधिक,
आंबील म्हणते मी अधिक ॥७॥
दोघी बोलल्या,
पित्यानं माज्या चंदन राजा,
आमचा करावया न्याय येवा ॥८॥
बोलता झाला चंदन राजा,
आंबील गोंड - गोवाऱ्याची व ऽऽ
आंबील गोंड-गोवाऱ्याची.
आंबील तेल्या - भाल्यायाची (म्हाल्याची) व ऽऽ
आंबील तेल्या - भाल्याची ॥९॥
नागवेल मोठ्या लोकायेची (लोकांची),
नागवेल राजा लोकायेची ॥१०॥
आंबीलचा मान फक्त 'उन्हाळीत ग' (उन्हाळ्यात ग),
आंबीलचा मान फक्त उन्हाळीत,
पण नागवेल आहे, आधी व ऽऽ
पण नागवेल आहे आधी, ऐक''॥११॥
आला आंबीलाले राग,

आंबील बाई रुसली,
निघाली सभेच्या बाहेर,
राजाला 'देईला' (दिला) 'सराप' (शाप) ॥१२॥
मर मर, चँदन राजा,
जळणे जळो तुझा माडी गा,
जळण जळो तुझी माडी,
'खसण खसो' (खचो) तुझी माडी गा,
खसण खसो तुझी माडी ॥१३॥
नागवेल केलास अधिक,
मला ने केलास उन्हाक,
नागवेल 'खावूयेन' (खाऊन) राहे गा,
नागवेल खावूयेन राहे'' ॥१४॥
निघाली सभेच्या बाहेरगा,
राजाले 'देलेना' (दिला) 'सराप' (शाप) ॥१५॥
सभेचा 'मारग' (मार्ग) सोडली,
वनाचा मारग धरली,
चालली वन 'शोधयेत' (शोधत)
नाही 'रमयेला' (रमला) मन ॥१६॥
'सातान' (साता) डोंगरात राहे गा,
सातान डोंगरात राहे गा,
'तेथीन' (तेथे) सेहऱ्याचा झाड गा,
तेथीन सेहऱ्याचा झाड ॥१७॥
कन्याचा 'रमयेला' (रमला) मन गा,
कन्याचा रमयेला मन,
जाऊन बसली झाडावर गा,
जाऊन बसली झाडावर ॥१८॥
'लटाने बट्टा' (केस) सोडयेली (सोडली) गा,
लटाने बट्टा सोडयेली,
'अरधा' (अर्धा) झाड 'पिवळेला' (पिवळा),
अरधा झाड 'पांढयेरा' (पांढरा) ॥१९॥
मग त्या सेहऱ्याच्या झाडावर गा,
कन्याचा रमयेला मन गा,
कन्याचा रमयेला मन ॥२०॥

आंबा

आंब्याच्या झाडाचे काहीच वाया जात नाही. झाडाची खूप छान थंडगार सावली मिळते. लाकूड फार मजबूत असते. लाकडापासून घरासाठी फाटे, मयाली, टेबल-खुर्च्या, दरवाजे, खिडक्या, कपाट, बाजा बनवतात. आंब्याच्या लाकडापासून ढोल बनवतात. बाया म्हणाल्या, ''प्लावूड बनविण्यासाठी आंब्याचे लाकूड वापरतात. याचा कारखाना चंद्रपूरात सुरू झाला आणि आंब्याची खूप झाडे तोडली गेली.'' आंब्याच्या फांद्या जाळण्यासाठी वापरतात.

एखाद्या बाईला 'रक्तसुर्ला' किंवा 'विटाळसुर्ला' असल्यास (म्हणजे मासिक पाळीच्या वेळी पोटात दुखत असल्यास) आंब्याची साल कुटून त्याचा अर्क पाजतात. गळा सुजल्यास आंब्याची साल कुटून त्यात चुना टाकून गळ्याला बांधतात.

पोटात दुखत असेल, पोटात 'गरमी-दाह' (जळजळणे, आग) असेल तर आंब्याची अंतर्साल कच्ची कुटून, त्यात खडीसाखर व जिरे टाकून खायला देतात. लहान मुले, मोठी माणसे सर्वांनाच याचा फायदा होतो. हगवण लागल्यास आंब्याच्या झाडाची 'ओली' (कच्ची) साल कुटून त्याचा अर्क प्यायला देतात.

हगवण, पोटदुखी असल्यास आंब्याच्या झाडाची कोवळी साल चावून खातात. आंबा, कडुलिंब व कंटसावरी यांच्या साली कुटून त्याचा रस काढून त्यात खडीसाखर व जिरे टाकून गरमी-परम्याच्या रोगात, पांढऱ्या पाण्याच्या आजारात (श्वेतप्रदर) व 'नळहागीत' (कॉलऱ्यात) प्यायला देतात.

'वायवात' (संधिवात) असल्यास, अंग-पाय दुखत असल्यास आंब्याचा पाला आणि निरगुडीचा पाला पाण्यात शिजवून, त्या पाण्याने आंघोळ करतात. आंब्याचे एक जरी कोवळे पान सकाळी खाल्ले तरी दिवसभर मन 'पसंद' (प्रसन्न) राहते.

आंब्याचे कच्चे फळ - कैरी - तशीच खातात. मुले व गरोदर बाया यांच्यासाठी ही मोठी मेजवानी असते. कच्च्या आंब्याचे 'रायते' (लोणचे), मुरांबा, चटणी, सरबत करतात. कच्चा आंबा 'दाळीत' (वरणात) टाकतात. भातासोबत छान 'लागे' (लागते). कैरीच्या फोडी वाळवून आमसूल तयार करतात. कच्च्या आंब्यातून तेल निघते. काहीजणांच्या तोंडाला हे तेल लागले तर तिथे फोड येतात. कच्च्या किंवा पिकलेल्या आंब्याच्या फळाचे तेल 'इचू' (विंचू) चावलेल्या जागेवर लावतात.

पिकलेले आंबे खातात. आंब्याचे बरेच प्रकार असतात. पिकलेल्या आंब्याचा रस काढतात व भात, पोळी किंवा शेवई यांच्याबरोबर खातात. पिकलेला आंबा टॉनिक आहे; खाल्ल्याने तब्येत एकदम सुधारते. पिकलेला आंबा खाल्ला तर 'झाडा' (शौचाला) साफ होते. आंब्याचा रस ताटावर टाकून, वाळवून त्याची पापडी आणि धोपोडी करतात. तांदूळ व गहू वेगवेगळी दळतात. तांदळाचे पीठ, आंदण मांडून उकडून घेतात. गव्हाच्या पिठाची कणिक भिजवून कणकेची लाटी बनवून त्यात तांदळाचे उकडलेले पीठ भरून पोळी बनवतात व ही पोळी

आंब्याच्या रसासोबत खातात; ती खूप छान लागते.

आंब्याची घुई (बी) उगाळून 'घामगुंड' (उन्हाळ्यात होणारे बेंड) झाल्यास लावतात. 'हागी' (हगवण) लागल्यास आंब्याची घुई उगाळून त्याचा रस पितात. घुई जाळून 'मस' (राख) करून खोबरेल तेलात मिसळून बेंडांना किंवा फोडांना लावतात. फोड एकदम 'चेमतो' (बसतो, बरा होतो.) आंब्याची घुई भाजून त्याचा भुरका पाण्यात टाकून हगवणीत किंवा आवरक्त हगवणीत प्यायला देतात. आंब्याच्या घुईपासून साबण बनवतात.

खोकला होतो म्हणून काही लोक कच्चा आंबा खात नाहीत! बाळंतीणसुद्धा बाळाला खोकला होऊ नये म्हणून कच्चा आंबा खात नाही. पिकलेला आंबा 'गरम' मानतात. त्याची उष्णता उतरविण्यासाठी सोबत दूध, तूप, ताक, दही देतात. आंबा गरम असल्याने जास्त खाल्ल्यास काहीजणांच्या अंगातली उष्णता अंग फोडून बाहेर येते व बेंड होतात.

आंब्याच्या झाडावर अनेक पाखरे घर करतात. पक्षीदेखील आंबे खातात. आंब्याच्या झाडावर बहुतेक 'वांदा' (शंकहाड, बांडगूळ) असतोच. आंब्याच्या झाडाच्या ढोलीत कधी कधी नाग असतो. बाया म्हणाल्या, ''काही वैद बदमाशीने फळे असलेल्या आंब्याच्या झाडावर भूत आहे म्हणून सांगतात, म्हणजे जवळ जाऊन कोणी फळे तोडू नये! 'कोऱ्या' (आंबे नसलेल्या) झाडावर भूत आहे म्हणून सांगत नाहीत.''

कुठल्याही सणाला, शुभप्रसंगाला, लग्नाला, पूजेला आंब्याच्याच पानांच्या डहाळीचे तोरण बांधतात. चैत्रगौरीच्या हळदीकुंकवाला कच्च्या आंब्याचे 'शरबत' (पन्हे) बनवतात व चण्याची दाळ भिजवून, कच्चा आंबा किसून त्यात टाकून खातात.

गाणी

१. आपयेला हस्तकानं ग, झाड रोवयेलो आंबा,
आन् त्याचा त्रिलोकी झेंडा, तुकाराम बोले ॥
(कितीतरी जण फळे खातात म्हणून 'त्रिलोकी झेंडा'!)

२. - बाया दळण काडताना खालील गाणे म्हणतात :
सखुबाई साजरीं, बारा-सोळा जणी,
कांडुनीया 'देहेचा' (देहाचा) उखळ, मनाचा मुसळ,
पाखडून पाखडीला उडवे कोंडा,
'परपंचा (प्रपंच) हांड्यात मांडीला आंदणं,
जोडीला इंजन, कामापुरता,
आंदणाचा ऊत येतो वेळोनवेळी,
जवळ होता सत्त्वधारी,
कैरीच्या (आंब्याच्या) पानाच्या जोडल्या पत्रावळी,
जेवतो जेवतो श्रीहरी ॥

वड

या झाडाला 'वटवृक्ष'पण म्हणतात. हा मोठा वृक्ष असून त्याची थंडगार सावली असते. या झाडावर अनेक पक्षी घरटी करतात. याचे खोड, फांद्या जाळण्यासाठी वापरतात.

वडाच्या झाडाचे दूध निघते. लहान बाळाला उलटी-हगवण झाली तर वडाचे दूध देतात. वडाचे दूध जास्त दिले तर ते बाळाला प्राणघातक ठरते. त्यामुळे 'खायच्या' (खाण्याच्या) कापरात एक थेंब वडाचे दूध खलून प्रमाणात द्यायचे.

पानांपासून पत्रावळी, द्रोण तयार करतात. सुकलेली पाने, डोक्याचे केस, चिंचेची साल, एक 'मिरवी' (मिरची) व कोरडी पोळी हे सर्व जाळून व तेलात एकत्र घोटून त्याचे मलम करून खांडकांना किंवा फोडांना लावतात.

लाल रंगाची फळे लागतात. लहान मुले व पाखरे ही फळे खातात. वडाच्या लटकत्या मुळांना (पारंब्या) 'वडाचा पहाड' म्हणतात. वडाचा पहाड आणून 'खावाच्या' (खायच्या) तेलात कढवून डोक्याला लावले, तर केस खूप चांगले येतात. पण परत वडाच्या झाडाकडून गेले तर मात्र आलेले सर्व केस जळून निघून जातात.

वडाचे कोवळे पहाड कुटून, बाळंतीण बाईला गुळात खायला दिले तर तिला भरपूर दूध येते. वडाच्या पहाडाचे 'वाक चिरून' (दोरी बनवून) बैलाला बांधायला दावे बनवतात. वडाचा पहाड एकाच हातात जितका येईल तितका आणायचा व त्यात गूळ आणि तीन खारका टाकून, कांडून, मासिक पाळीच्या तिसऱ्या दिवसापासून तीन मात्रा द्यायच्या. त्यामुळे मूल-बाळ मुळीच होत नाही.

बाळंतपण लांबले, पाय किंवा मांड्या दुखत असतील व जोर देता येत नसेल (कळा नीट देता येत नसल्या) तर वडाचा पहाड कांडून पाण्यात मिसळून प्यायला देतात. त्यामुळे पायात, मांडीत शक्ती येते.

जमिनीतल्या मुळांना 'जटाशंकर' म्हणतात. या मुळांना गाठी-गाठी निघतात. या गाठी आणून, कुटून, अंग दुखत असेल, 'वात वाताचा' (संधीवाताचा) आजार असेल तर खायला देतात. बाळंतपणाच्या वेळी किंवा बाळंतपणानंतर अंगावर खूप रक्त जात असेल तर जटाशंकर शिजवून, पाण्यात टाकून खायला किंवा प्यायला देतात.

वडाच्या झाडाला खूप पवित्र मानतात. लक्ष्मीपूजनाला नदीची वाळू आणून त्यात तीन-तीन पाने असलेल्या वडाच्या फांद्या, वडाची पाने, वडाचे वाक, वडाचे फळ इत्यादी गाडून त्याची पूजा करतात.

वट पौर्णिमेला स्त्रिया वडाच्या झाडाची पूजा करतात व हाच नवरा जन्मोजन्मी मिळावा म्हणून प्रार्थना करतात. काही जणी कणकेची वडाची फळे बनवून पूजेसाठी सोबत नेतात.

याच झाडाखाली सावित्री सत्यवानाचे डोके आपल्या मांडीवर घेऊन बसली होती आणि तिने सत्यवानाचे प्राण यमराजाकडून परत आणले. म्हणून या झाडाचे इतके महत्त्व आहे.

गाणी

आपुल्या ग हस्तकानं, झाड रोवयलो वड,
आन् शंकराच्या जटासन, तुकाराम बोले ॥

माझे मन आवडीने,
झाड रोवी गं वड,
आन् त्याची सावली घनघोर ॥

चार

चार / चारोळी
Buchanania lanzan

हा वृक्ष असतो. चाराचे लाकूड पार पक्के नसते. लवकर कीड लागते. तरी पण काही जण चाराचे लाकूड घर बांधायला, टेबल-खुर्च्या बनवायला वापरतात. काहीजण नांगर पण बनवतात. चाराच्या लाकडाची 'डोंगी' (नाली) करून मिरचीला, वांग्याला पाणी द्यायला वापरतात. चाराच्या लाकडाचा 'चाटू' (पळी किंवा डाव) बनवतात. आंबील 'वरायला' (वाढायला), भाजी काढायला चाटू कामी येतो. चाराचे लाकूड लवकर जळते म्हणून जाळण्यासाठी वापरतात.

चाराच्या झाडाला डिंक फुटतो. पण हा डिंक एखाद दुसऱ्या चाराच्या झाडालाच फुटतो, नेहमी मिळत नाही. हा डिंक काळा असतो. चाराचा डिंक तरुण बाया मुळीच खात नाही, कारण खाल्ल्यास त्या बाईची मासिक पाळी बंद होते व मूल-बाळ होत नाही. वाटल्यास म्हाताऱ्या बाया खातात. ज्या बायांना मूल-बाळ नको त्या पण मुद्दाम खातात.

छातीत 'दुख भरला' (दुखत असल्यास,) चाराचा डिंक घासून कोऱ्या कागदावर 'डिकवून' (चिकटवून) ज्योतीवर किंवा 'इस्त्यावर' (विस्तवावर) गरम करून छातीला लावायचे म्हणजे तो डिंक सारे दुखणे नाहीसे करतो. दुखणे बरे झाल्याशिवाय कागद निघतच नाही.

काहीजण असे मानतात की चाराचा डिंक खाल्ला तर बहिरेपणा येतो.

चाराच्या पानांच्या पत्रावळी बनवतात. पावसाळ्यात रोवायला जाताना चाराच्या पानांचा 'मोरा' तयार करतात आणि पाऊस लागू नये म्हणून मोरा पांघरतात. बिबा उतला किंवा बिब्याचा घाव झाला तर त्यावर चाराचे पाने किंवा चाराची झिलपी घासल्यास बरे होते.

चाराला 'चारफळे' लागतात, ती खातात. फार छान लागतात. चारफळ 'गरम' आहे. जास्त खाल्ली तर 'बेंड' (फोड) होतात. तरीपण सर्व लोक आवडीने खातात. चारफळे म्हणजे अस्वलाचे, हरिणाचे आवडते अन्न! वाळलेले चारफळ मोहात टाकून ठेवतात. पावसात काढून खाल्ले तर अजून गोड लागते. रोवणीच्या वेळी बाया तोंडात चार, बोर टाकून रोवणी करतात. त्यामुळे झोप येत नाही.

चार फळ दळून आतून बी काढतात. त्याला 'चारोळी' म्हणतात. (चार फळाच्या

आठोळीच्या आत हे बी असते) दुकानात एक शेर चारोळीला दोन किलो जाड मीठ भेटते. बाया म्हणाल्या, ''जाड मीठ परवडते; पुड्यातले बारीक मीठ नाही. 'माड्या लोक' (आदिवासी) चार बी विकून पोते पोते मीठ विकत घेतात. पायलीभर चार बीला एक पोते मीठ असे अजूनही काही ठिकाणी विकल्या जाते.''

चार बी काढण्यासाठी कच्चे चार फळ मडक्यात ठेवतात व काही दिवसांनी दळतात. त्यामुळे बऱ्याचदा पिकलेली चार फळे खायला मिळत नाहीत. आदिवासींकडून स्वस्तात या चारोळ्या विकत घेऊन दुकानदार लोक मात्र चढत्या भावात दुकानात विकतात. त्यामुळे त्यांना चांगला फायदा होतो. चारोळ्या खिरीत, बासुंदीत, शेवयात, लाडून, करंज्यांत, आंब्याच्या रसात टाकतात. मुले चारोळ्या तशाच खातात.

चार फळे पाडण्यासाठी इथली पारंपरिक पद्धत म्हणजे झाडाच्या बुंध्याला किंवा खोडाला दगड मारायचा. म्हणजे टपटप पिकलेली चारफळे खाली पडतात. (वरखेडेजींनी आम्हाला या पद्धतीने जंगलात चारफळे पाडून खूप खायला दिली.)

सुईणी म्हणाल्या की, ''चाराची झाडे पूर्वीपेक्षा आता फार कमी झाली आहेत. डिंकासाठी लोक खोड तासून ठेवतात. त्यामुळे झाड मरते. तसेच चार बियांसाठी मोठमोठ्या 'खांद्या' (फांद्या) तोडल्या जातात. चारोळी काढण्यासाठी लोक कच्चे चार तोडतात. चारफळ पिकून, त्याचे बी पडून दुसरे झाड उगवायला संधीच देत नाही!

लग्नाच्या वेळी नारळाच्या डोळ्यांत छिद्र पाडून त्यांत 'चाराच्या बिया' (चारोळ्या) व जिरे टाकतात. मग ते छिद्र थोडे टोकर काढून 'दडपून' (दाबून) बुजवून टाकतात. लग्नाच्या पोरीच्या साखरपुड्याच्या वेळी इतर अनेक वस्तूंसोबत हे नारळ तिच्या 'ओट्यात' (ओटीत) टाकतात. 'लगन' (लग्न) झाल्यावर नवरी ते नारळ दिवाळीपर्यंत आपल्या घरीच (नवरदेवाकडे) ठेवते. खराब होवो की काही होवो, हे नारळ दिवाळीपर्यंत सांभाळून ठेवतात. या नारळाला 'जोडवाटी' म्हणतात.

कडुलिंब

कडुलिंब
Azadirachta indica, Melia azadirachta

हा मोठा वृक्ष असतो. उन्हाळ्यात पण या झाडाची खूप थंड व घनदाट सावली असते आणि या झाडाच्या आसपास थंडगार हवा असते. याचे लाकूड अतिशय मजबूत असते, पण कडुलिंब हा 'मायचा' (माऊलीचे, आईचे) झाड असल्याने बहुतेक तोडत नाही. काड्या जाळण्यासाठी मुळीच वापरत नाही. जर वापरले तर 'अगीन' (अग्नी) खूप जोर करते असे म्हणतात आणि ही आग पूर्ण गावभर पसरते. ज्या व्यक्तीला 'माय' होऊन ती मरते त्याच्या प्रेताचा 'अगीन' (जाळ) खूप असतो.

कडुलिंबाच्या काडीचा दातण बनवतात. हे दातण दातांसाठी फार चांगले असते. त्यामुळे 'मुखरोग' होत नाही. ज्या व्यक्तीला 'मोठी माय' (मोठी देवी) किंवा 'लहान माय' (कांजण्या,

गोवर) किंवा 'मदुरा माय' (टॉयफॉईड) निघाली, त्या व्यक्तीला कडुलिंबाचे दातण मुळीच कडू लागत नाही. इतरांना मात्र हे दातण खूप कडू लागते.

ताप आल्यास कडुलिंबाच्या झाडाच्या एकवीस काड्या ओल्या कापडात गुंडाळून व आगीत गरम करून, कुटून त्याचा रस तीन दिवस पाजतात.

ताप असेल, अजीर्ण झालेले असेल तर लिंबाची अंतर्साल आणून कपड्यात 'दाबून' (गुंडाळून), राखेत गरम करून, कुटून त्याचा रस प्यायला देतात. किरीम झाल्यास साल कुटून त्याचा रस प्यायला देतात.

खरूज झाल्यास पाला ठेचून लावतात आणि आंघोळीच्या पाण्यात पाला टाकतात. किडा चावला तर पाला कुटून लावतात. उन्हाळ्यात 'झाँव' (उन्ह) लागली तर कोवळ्या पाल्याचा रस काढून त्यात जिरे व खडीसाखर टाकून देतात. काही बेंड / फोड झाले तर पाला वाटून लावतात. 'इचू' (विंचू,), साप 'डसला' (चावला) तर पाला कुटून त्याचा रस प्यायला देतात. 'पान लागला' (नाग चावला) आणि विष चढले म्हणजे कडुलिंबाचा पाला गोड लागतो. नारूच्या रोगात, पाला वाटून त्याचा रस पाजतात.

धान्य सुरक्षित ठेवायला त्यात वाळलेला कडुलिंबाचा पाला मिसळतात.

जखम झाल्यास पाला सुकवून त्याचा भुरका करून 'खावाच्या' (खायच्या) तेलात मिळवून लावतात. माता निघाल्यावर फोडाच्या ज्या जखमा राहतात त्यावर कडुलिंबाचा पाला कुटून लावतात. थंड वाटते. 'मायची बिमारी' (गोवर, कांजण्या, देवी, टॉयफॉईड) असलेल्या व्यक्तीच्या बिछान्यात, उशीखाली, पलंगाखाली कडुलिंबाच्या डहाळ्या ठेवतात. यामुळे 'माय शांत होते' (थंडावा येतो.)

योनीत आग, खाज असल्यास कडुलिंबाचा पाला वाटून त्याचा रस किंवा कडुलिंबाची काडी उगाळून त्याचा गंध आत लावतात. आंबेहळद व कडुलिंबाचा पाला वाटून 'पालवावर' (घडीवर) धरतात.

पांढरे पाणी जात असल्यास कडुलिंबाचा पाला कुटून त्याच्या रसात खडीसाखर व जिरे टाकून प्यायला देतात.

फुलांचा सुगंध सुंदर असतो पण फुलांची चव मात्र कडू असते. किरीम झाल्यास फुले कुटून रस काढून साखर टाकून प्यायला देतात.

फळांना 'लिंबोण्या' किंवा 'लिंबोळ्या' म्हणतात. पाखरे आवडीने लिंबोळ्या खातात. 'झाडा' (शौचाला) साफ न झाल्यास लिंबोळ्या वाटून खातात. लिंबोळ्यापासून तेल काढतात. लिंबोणीच्या तेलापासून साबण बनवतात. अंगावर कुठेही जखम झाली तर लिंबोळीचे तेल लावतात. जखम एकदम भरून जाते. डोक्यात उवा झाल्यास डोक्याला लिंबोणीचे तेल लावतात. उवा मरून जातात. मूळव्याध झाल्यास हे तेल लावतात. 'वाय-वाताच्या' (संधिवाताच्या) विकारात मालीश करून हे तेल जिरवतात. लिंबोणीच्या तेलाने अंगाची मालीश केले तर चामडी स्वच्छ राहते. फोड किंवा खांडके होत नाही.

लहान मुलांना किंवा मोठ्या माणसांना कोणालाही हगवण किंवा आव-रक्त हगवण लागली तर कडूलिंबाची साल, पाला, फुले व लिंबोळ्या एकत्र किंवा वेगवेगळे कुटून रस काढून पाजल्यास त्रास कमी होतो.

कडुलिंब हे 'मायचेच' (माउलीचे, आईचे) झाड आहे. माऊलीच्या पूजेसाठी कडुलिंबाच्या पाला वापरतात. कोणत्याही बाईला अंगात देवी आल्यास ती बाई पहिल्यांदा कडुलिंबाचाच पाला खाते.

गुडीपाडव्याला लिंबोळ्यांचा रस पितात.

रामजन्माच्या दिवशी कडुलिंबाची कोवळी पाने, फुले यांचा देवाला नैवेद्य दाखवितात व खातातपण!

कडुलिंबाच्या काड्या आणून 'वाढई' (सुतार) कडून, माऊलीच्या मूर्ती बनवतात. तीन घागरी आणून त्यांना बाया हळदीकुंकवाचे बोट लावतात. घागरीत पाणी व कडूलिंबाच्या 'डाया' (डहाळ्या) टाकतात. सेवक मूर्ती धरतो. त्यावर कापड झाकून माऊलीकडे नेतात. तिथे गड्डा करून त्यात हळद, पाच पैसे, दही टाकून मूर्ती उभी गाडतात व पूजा करतात. ज्यांच्या घरी लग्न आहे त्यांच्याकडे अशा रीतीने तेही बहुधा संध्याकाळी पाचनंतर पूजतात.

मूर्ती गाडल्यावर पिवळ्या कपड्यात पाच पैसे, हळद, सुपारी व जिरे टाकून मूर्तीच्या कंबरेला बांधतात व नारळ फोडून पूजा करून पाया पडतात. पाच वडे, पाच पुऱ्या, पाच पापड यांचा 'नैवेद' (नैवेद्य) 'दावतात' (दाखवतात). घागरी उपड्या करून ठेवतात. आतल्या कडुलिंबाच्या डहाळ्या तिथेच टाकतात व नंतर सेवक त्या घागरी घरी नेतो.

गाणी

१. आपयेला (आपल्या), हस्तकानं (हाताने)
झाड रोवयेलो (रोवलो) लिंबोणी,
आन् तिचा फळ 'दर्शनी', तुकाराम बोले ॥

(दर्शनी म्हणजे सर्वांनाच - पाखरांना, माणसाला, देवा-धर्माला उपयोगी)

आपयेला हस्तकानं,
झाड रोवयलो निंबाचा,
आन् माता- मायच्या 'सावुलीचा' (सावलीचा),
तुकाराम बोले ॥

२. पंढरीला जाता जाता कोण कोण,
करू एक मन, करू एक मन,
पुढे आहे बन, कडूलिंबाचा,
मायची सावली आहे देवावरी,
आन् मखमल्या झुली नंद्यावरी ॥
(महादेवाला जाताना हे गाणे म्हणतात)

३.'माय'चे गाणे : यात कडुलिंबाच्या झाडाचे व मायचे नाते वर्णन केलेले आहे.

माता का माय येंचे,
लहान मोठे चेले,
आन् सावलीसाठी,
कडुलिंबाले गाडे गेले गं माय,
माझी वो माता माय ॥१॥

माझ्या न ऽऽ माता-मायचा,
लिंबाखाली हो आहे ठाना,
'पानी' (पाणी) गंगेचं आणा,
आणा वो माय,
मायच्या आंघोळीला,
माझी वो माता माय ॥२॥

माता का माझी माय,
'धरतरा' (धरित्री, जमीन) फोडून येना,
डार लिंबाचा धरून येना व ऽऽ माय,
ये माझे माता माय ॥३॥

काटसावरी

काटसावर

Bombax ceiba, Bombax salmalia, Bombax malabaricum

या झाडाला काही जण 'रानसावरी' किंवा नुसती 'सावरी' म्हणतात. मोठा वृक्ष असतो. झाडाला काटे असतात. या झाडाचे लाकूड खूप नरम असते. लग्नात या झाडाची 'मुंडी' (खांब) तयार करतात. या लाकडापासून आगपेटीच्या काड्या; खोके बनवतात. मोठ्या लाकडापासून डोंगा बनवतात. मासे पकडण्यासाठी या डोंग्याचा वापर करतात. फांद्या जाळण्यासाठी वापरतात. या झाडापासून डिंक निघतो.

कुऱ्हाड लागली, जखम झाली तर सावरीची साल कुटून जखमेत भरतात. त्यामुळे जखमेत खाज होत नाही, पू होत नाही व जखम लवकर भरते. एखाद्या बाईला 'पदर' (पांढरे पाणी) जात असल्यास सावरीची साल कुटून त्यात खडीसाखर व जिरे टाकून खायला देतात. पुढे पांढरे पाणी जाऊ नये म्हणून बाया काटसावरीची कोवळी रोपे खुडून खातात व आपल्या लहान मुलींना पण खायला देतात.

'डब्बा' (न्युमोनिया) झाला तर सावरीची आंतरसाल कुटून पाण्यात प्यायला देतात. मासिक पाळीच्या वेळी अंगावरून जास्त रक्त जात असल्यास सावरीची साल, पळसाची साल, 'बोरीची' (बोराच्या झाडाची) साल व आंब्याच्या झाडाची साल सर्व एकत्र शिजवून काढा करून त्यात साखर टाकून प्यायला देतात.

सावरीचे काटे, तुळशीचा पाला व मिठाचा खडा एकत्र करून खातात. त्यामुळे तोंड रंगते - ओठ लाल होतात.

एखाद्या बाईला मूल-बाळ होत नसल्यास शुक्रवारी जंगलात जाऊन एखाद्या लहान सावरीच्या झाडावर लाल-पिवळ्या तांदळाच्या अक्षता टाकून म्हणायचे -

''आधी होता विरुक्ष,
आता झाला मिरुक्ष,
तुझा साल नेल्यावर,
मला फायदा झाला पाहिजे!!''

असे म्हणून साल एका हाताने 'फलकवून काढून' (ओरबाडून, वाकवून काढून) कुटून मासिक पाळीच्या तिसऱ्या दिवशी तीन मात्रा प्यायला द्यायच्या. गुण येतो पण या झाडाच्या उपचाराने मुलगीच होते.

फार सुंदर, लाल रंगाची फुले लागतात. या फुलांची भाजी करून खातात. हरीण, सांबर, नीलगायी आवडीने फुले खातात. फुलांमुळे अनेक प्रकारची पाखरे या झाडावर राहतात.

कोणत्याही प्रकारची उष्णता झाली तर सावरीची फुले व इलंजाचा पाला एकत्र कुटून त्यात दही व खडीसाखर टाकून खायला देतात.

फळातून खूप नरम कापूस निघतो. या कापसाच्या उशा बनवतात.

बाया म्हणाल्या की, ''पूर्वीपेक्षा आता जंगलात काटसावरीची झाडे खूप कमी दिसून येतात. कारण खोके व आगकाड्या बनवायला बरीच झाड-तोडणी झाली आहे. तसेच आता पांढऱ्या पाण्याचा आजार पण पूर्वीपेक्षा जास्त वाढला आहे त्यामुळे बाया औषधासाठी कोवळी रोपे खुडून टाकतात; वाढूच देत नाही.''

लग्नात या झाडांची मुंडी बनवतात. काटसावरी शिवाय 'शिमगा' (होळी) पेटतच नाही. शिमगा पेटवायला काटसावरीची एक तरी 'खांदी' (फांदी) लागते. होळीला काटसावरीचा 'वाक' (दोरी) आणून लहान मुले, स्त्री-पुरुष हाता-पायाला हा वाक बांधतात. त्यामुळे 'लष्टन' (लागट, बाहेरंच) होत नाही.

गाणी

१. लहान मुली खेळताना म्हणतात,
''सावरीचा गेला काट,
मला लागली आट आट ॥''

२. - होळीला सावरीच्या फांद्या जाळतात. तेव्हा 'परस' (पळस) सावरीला म्हणतो,
''गाव जळे, सावर रडे,
परस का 'म्हनते' (म्हणते),
का सावरी रडते?
माझा आहे आता आट,

का गेला सावरी तुझा काट?
माझा वाक 'अवसते (उपयोगी येते),
माझा 'खांदा' (फांदी) ही अवसते,
फूल ही अवसते,
आणि पान ही अवसते
आणि काडी ही अवसते,
तुझा काहीच अवसत नाही,
नुसता का म्हणावा, डोंगा अवसते ॥''

गोंगल

गोंगल
Cochlospermum religiosum

हा मोठा वृक्ष असतो. याचे लाकूड मजबूत असते. मोठ्या लाकडापासून घरासाठी फाटे, मयाली, कपाट, खिडक्या, धाबे, बाजा, टेबल-खुर्च्या वगैरे वस्तू बनवतात. लहान फांद्या जाळण्यासाठी वापरतात. लग्नाच्या मांडवावर गोंगलाच्या फांद्या टाकतात.

गोंगलाच्या दोन झाडांची एकमेकांवर सावली पडली पाहिजे. अशा त्या दोन झाडांचे 'वाक' (दोरी) काढून त्याचा पट्टा करून 'वांझोट्या' (मूल-बाळ होत नसलेल्या) बाईच्या 'भेजेला' (हाताला) बांधतात, लेकरू होते.

एखाद्या बाईला मूल-बाळ होत नसल्यास शुक्रवारी जाऊन झाडावर 'काळे-पिवळे अक्षत टाकतात' व शनिवारी 'बीन पचार' (पहाटे, तोंड न धुता) जाऊन गोंगलाच्या झाडाचे मूळ खोदून आणून पहिल्या भरलेल्या गुंडाच्या पाण्यात ठोकठाक करून मासिक पाळीच्या तिसऱ्या दिवशी तीन मात्रा – सकाळ, संध्याकाळ व दुसऱ्या दिवशी सकाळी – प्यायला द्यायचे. फायदा होतो. पण असा समज आहे की, गोंगलाचे मूळ आणणाऱ्याच्या मागे नाग'सरप' (साप) धावतो, त्यामुळे मूळ आणणे हे हिंमतवान माणसाचे काम आहे. चांदाळा गावच्या पार्वजाआजी म्हणाल्या, ''मी हा प्रयोग अनेक वेळा केला. गुण पण घडला. पण दरवेळी माझ्या मागे सरप लागला. मी सापासमोर रेघ ओढून 'आन' शपथ टाकायची. त्यामुळे सरप रेघेच्या समोर न येता मागे जाते.''

दोन गोंगलांच्या झाडांच्यामध्ये 'काकोडा तार बांधतो' (कोळी जाळे विणतो). एखादे लेकरू जर 'वारत' असेल (वाळत असेल, – कुपोषित असेल) – याला 'ठोका केला' म्हणतात – तर हे तार किंवा सूत आणून 'भारून' (मंत्र टाकून) त्याचा धागा लेकराला बांधतात.

गोंगलाची फुले पिवळी सुरेख व सुगंधी असतात. ती देवाच्या पूजेला वापरतात.

फळे आणून जाळून 'मस' (राख) बनवायची अन् खोबऱ्याच्या तेलात टाकून फोडांना लावल्यास, फोड बसतात.

शिवरात्रीला महादेवाच्या पूजेत गोंगलाची फुले फार महत्त्वाची असतात. लग्नाच्या मांडवावर

गोंगलाची एकतरी फांदी पाहिजेच.

गाणी

१. ''पंढरीला जाता जाता, करू एक मन,
पुढे आहे बन, गोगलाचं,
गोंगलाची फुले वाहू देवावरी,
अन् मखमल्या झुली आहे नंद्यावरी!!''
(महादेवाला जाताना हे गाणे म्हणतात.)

२. ''मारकंड्याच्या ऋषिदेवा, बेलफुलाची आवड,
अन् 'कोसामनी' (कोसभर) आहे,
'बाऱ्या' (कोवळ्या) गोंगलाचा झाड!!''
(मार्कंड्याला महादेवाच्या जत्रेत हे गाणे म्हणतात.)

३. ''आरशी-बारशी, शंभू देवाला निराळ,
अन् गौरा हिंडते शिवार,
गोंगलाच्या फुलासाठी,
अन् शंकराच्या पूजेसाठी!!''
(चैत्रगौरीला, बाया हे गाणे म्हणतात.)

४. ''फुलामधी फूल, गोंगलाचे फूल,
या फुलाची महिमा लाल ग,
देवा तू कृष्णा,
चटक चांदणी निघाल्या अंगणी,
'शायी' (नवरा) गेले का देशावरी,
'मायास' (प्रेम) लावूनी ॥''
(धान रोवणीच्या वेळी बाया हे गाणे म्हणतात.)

बेल

बेल
Aegle marmelos

मोठा वृक्ष असतो. या झाडाचे काटे खूप लांब-लांब असतात. 'गडले' (रुतले) की खूप 'दुख उठते' (दुखते). मोठ्या लाकडाची कोणतीही वस्तू होते. उदा. टेबल-खुर्च्या, कपाट, दरवाजे, खिडक्या, बैलगाडीचे चाक, घरासाठी पाट्या-मयाली इत्यादी. लहान काड्या जाळण्यासाठी वापरतात.

एखाद्या बाई-माणसाच्या 'खांडकात' (फोडात) 'किडे' (अळ्या) झालेले असतील तर शनिवारी बेलाची अडीच पाने तोडून आणून कुस्करून खायला द्यायचे व तसेच पोतली करून खांडकाला लावायचे. सारे किडे पडून जातात. काही 'वरण' (व्रण - जखम) झाल्यास त्यावर

बेलाची ताजी पाने वाटून लावावी. लघवीत 'अंगार' (आग) होत असली तर बेलाच्या पानांचा रस काढून त्यात खडीसाखर व जिरे टाकून पितात. 'साखरेची बिमारी' (मधुमेह) असल्यास रोज बेलाची कोवळी पाने खाल्ली तर फायदा होतो. मूळव्याधीच्या बिमारीत पण बेलाची कोवळी पाने चावून खातात.

ज्या बेलाच्या झाडाच्या मोठ्या मुळांवरून बैलगाडीचे एकतरी चाक गेलेले आहे, त्या बेलाच्या झाडाचे मूळ खणून काढतात व पाण्यात शिजवून 'कशा' (अर्क, काढा) काढून मासिक पाळीच्या पाचव्या दिवसापासून पाच दिवस पाच मात्रा प्यायला दिल्यास एखाद्या बाईला मूल-बाळ नसल्यास 'तिला गुण घडतो' (तिला फायदा होतो) व या उपचारानंतर निश्चित मुलगाच होतो.

बेलास फळे लागतात. कोवळ्या बेलफळांचा 'रायता' (लोणचे) करतात. पिकलेल्या बेलफळाचा गर पाण्यात टाकून सरबत बनवून प्याल्याने 'झाँव' (उन्ह) लागत नाही. हगवण विशेषत: आवरक्ताची हगवण होत असल्यास पिकलेला बेल आणून खातात. 'एकदम आरून घेते' (एकदम शौचाला जाणे कमी होते). खूपच गुणी औषध आहे! पिकलेल्या बेलाचा मुरांबा करून ठेवतात. हगवणीत खायला देतात. 'डुंबरावरीचा' (वारुळावरचा) बेल 'ठिकारू' (विषारी) असतो; तो कधीच खात नाही.

बेलाच्या झाडाला फार महत्त्व आहे. महादेवाच्या, गणपतीच्या, मारुतीच्या पूजेत बेलपानाचे फार महत्त्व आहे. बेलफांद्याही पूजेत वापरतात.

सत्यनारायणाच्या कथेच्या वेळी बेलाची फांदी किंवा झिलपी पूजेत ठेवतात. गणपतीची प्राणप्रतिष्ठा करताना बेलाच्या झिलपीचा गंध काढून देवाला लावतात. बेलखोड न मिळाल्यास चंदनखोड वापरतात.

पोळ्याच्या दिवशी बेलाची फांदी बैलाच्या कपाळाला बांधतात व मग बैलाची जोडी महादेवाच्या पूजेला नेतात. 'तीज' या सणाच्या वेळी 'कळसा' (घागर) कुंभाराकडून आणून पूजतात.

पूजेच्या वेळी कळशाला व हळदीला कुंकवासाठी आलेल्या बायांना बेलाच्या झिलपीत गंध उगाळून लावतात.

गाणे

''मारकंड्याच्या ऋषिदेवा,
बेला-फुलाची आवड,
आन् 'कोसामनी' (कोसभर) आहे.
मोठा बेलाचा झाड!!''

(मार्कंड्याला महादेवाचे खूप जुने व सुंदर देऊळ आहे. दरवर्षी महाशिवरात्रीला तथे मोठी यात्रा भरते. त्यावेळी लोक हे वरील महादेवाचे गाणे म्हणतात.

पिंपर

या झाडाला काहीजण 'पिंपरी' पण म्हणतात. मोठा वृक्ष असतो. या झाडाची फार छान दाट सावली असते. या झाडाजवळची हवा शुद्ध असते. याचे लाकूड पाण्यात टिकते. म्हणून त्याचा डोंगा तयार करतात. फांद्या जाळण्यासाठी वापरतात.

'वाय-वात' (संधिवात) झाला, अंग दुखत असेल तर या झाडाच्या सालीचा कशा काढून त्याने शेकतात.

'गरमी झाली', अंगार काही चट्टे आले तर साल जाळून त्याची 'मस' (राख) तेलात मिसळून लावतात. उलटी येत असल्यास साल जाळून त्याची मस तेलात मिळवून अंगाला लावतात. लहान मुलांना अंगावर किंवा डोक्यात फोड अथवा बेंड झाले तर साल उगाळून त्याचा गंध लावतात.

पानांचा आकार सुंदर असतो. उन्हाळ्यात बैलांना पिंपळाच्या पानांचा चारा देतात. बैल खूप आवडीने खातात. पानांची पत्रावळ करून त्यावर एरंडीचे तेल लावून गरम करून मस्तक (डोके) दुखत असेल तर, कान बद्ध आले असतील तर डोक्याला बांधतात.

'रक्तहागी' (रक्त-हगवण) लागल्यास कोवळ्या पाल्यात खडीसाखर टाकून चावून खातात.

या झाडापासून डिंक निघतो. 'झाँव' (उन्ह) लागली तर हा डिंक खातात. थंड-शांत वाटते.

पिंपळाची फळे माणसे व पाखरे आवडीने खातात. अनेक 'पाखरे' पिंपळाच्या झाडावर घर करून राहतात.

असा समज आहे की, पिंपळाच्या झाडावर ब्रह्मा-विष्णू राहतात. या झाडाखाली सर्व जण, शेठ किंवा मारवाडीसुद्धा, विष्णू भगवानाची पूजा करतात.

याच झाडाखाली गौतम बुद्धांना ज्ञानप्राप्ती झाली होती.

काहींच्या मते या झाडावर 'मुंजा' (भूत) असतो. मांत्रिक लोक बऱ्याचदा या झाडाखाली बसून भूत काढतात.

गाणी

१. माझ्या मन हस्तकानं,
झाड रोवी ग पिंपळ,
सर्व पाखरांचा मेळ, माझ्या मना आवडीन!!
रस्त्याच्या पिंपळेर,
शेंड्याला 'कोवरा' (कोवळा)
लेकी देऊन सोयारा,
पिताजी व ऽऽ माझा ॥१॥

रस्त्याच्या पिंपळेर,
शेंड्याले पिकला,
लेकी देऊन चुकला,
पिताजी व ऽऽ माझा ॥२॥

२. बयनीने सार केला,
आवळ्याच्या रानातून,
हृदय फोडे मनातून,
बयणीच्या जीवासाठी ॥१॥
बापानं दिला लेकी,
चुलत्यानं दिला गांव,
मंडपात त्या रानावर ॥२॥
रस्त्यावरचा पिकला,
बुडाले पिकला,
लेकी देऊन चुकला,
पिता चुकला ॥३॥

आवळा
Emblica officinalis, Phyllanathus emblica

'मोठा जात झाड' (मोठा वृक्ष) असते. याचे लाकूड पांढऱ्या रंगाचे असते; पाण्यात खराब होत नाही व सागासारखेच मजबूत असते. या लाकडाच्या घरासाठी काडी-फाटा, मयाली, दरवाजे-खिडक्या, टेबल-खुर्च्या, आलमाऱ्या, बाजा, विहिरीवरच्या पाट्या तयार करायला उपयोग होतो. काड्या जाळण्यासाठीही वापरतात. शेळ्या-बकऱ्या पाला खातात.

आवळे खाल्ल्यावर तोंड चांगले होते. वरून पाणी प्याल्यास, तोंड गोड होते. आवळ्यात 'लोण' (मीठ) टाकून उकडून त्याच्या पाकळ्या निसून, वाळवून ठेवतात. याला 'आवळ्याची सुपारी' म्हणतात. ही खाल्ल्याने तोंडाला चव येते व भूक वाढते. आवळ्याची भाजी करतात. आवळे उकडून तिखट, मीठ, कांदे टाकून 'तुडपुडी, (मोकळी - रस्सा नाही) भाजी बनवतात. भातासोबत खायला छान लागते. आवळ्याचा मुरांबा करतात. आवळ्यांचे 'रायते' (लोणचे), चटणी करतात.

आवळा 'गरम' आहे. गरोदर बाई आवडीने खाते. बाळंतपणानंतर खात नाहीत कारण आईमुलाला दोघांना पण खोकला होतो.

'बार' (बाळ - लहान कच्चे फळ) आवळा, बार हिरडा, बार आंबा व वावडिंग टाकून लहान मुलांच्या दम्यासाठी औषध बनवतात. आवळा, बेहडा व हिरडा वाळवून कुटून त्याची 'भुकनी' (पावडर) बनवून ठेवतात. पोट साफ झाले नाही किंवा दम, खोकला, ताप असला तर

ही पावडर खायला देतात. याला 'त्रिफळा चूर्ण' म्हणतात.

आवळ्याच्या बियांपासून तेल काढतात. सुईणी म्हणाल्या, ''पूर्वीपेक्षा जंगलात आता आवळ्याची झाडे खूप कमी दिसतात. एक कारण आहे जंगल तोडणी व दुसरे कारण म्हणजे बंबईला म्हने 'कोनता का' (कोणते तरी) 'औसध' (औषध) बनते. त्यासाठी आवळा लागते. (बहुतेक बैद्यनाथ च्यवनप्राश असेल!) आवळ्यांसाठी लोक झाडाच्या मोठ-मोठ्या फांद्या तोडून टाकतात. 'बाहेरचे लोक' (गैर-आदिवासी) इथे आल्यानंतर हे फार वाढले.''

तुळशीच्या लग्नाच्या वेळी, आवळ्याच्या झाडाची डहाळी पूजेसाठी ठेवतात, आवळ्यावर कापसाची वात ठेवून 'ज्योती' (दिवा) लावतात.

'आठवीच्या' सणाला कुंभाराकडून, 'केरी' (छोटी घागर) आणून त्यात पाच चिंचा असलेली चिंचेची खांदी (फांदी), आवळ्याची खांदी व बोरीची खांदी ठेवून पूजा करतात. सोबत घागरीत पायातले जोडवे टाकतात. उदबत्ती, कापूर लावतात. दोन गडवे घागरीवर मांडतात व भिंतीला खिळा ठोकून त्यावरून सूत लांबवतात, घागरीला गुंडाळतात व बेल-फूल वाहून पूजा करतात. सवाष्ण बाईच ही आठवीची पूजा करू शकते; कुमारिका व विधवा स्त्रिया यांना तशी परवानगी नाही.

जांभूळ
Syzygium cumini, Syzygium jambolanum, Eugenia jambolana

जांभळाचे दोन प्रकार आहेत. एक 'कटोरी जांभूळ' - याची फळे लहान व आंबट असतात. दुसरा प्रकार म्हणजे 'रात्री जांभूळ' याची फळे मोठी व गोड असतात.

जांभळाच्या झाडाचे लाकूड खूप मजबूत असते व पाण्यात खराब होत नाही. मोठ्या खोडाचा घर बांधायला, टेबल-खुर्च्या, दरवाजे-खिडक्या, आलमाऱ्या व डोंगा करायला उपयोग होतो. विहिरीला पाणी काढायला वरचा फाटा जांभळाच्याच झाडाचा टाकतात. लहान फांद्या जाळण्यासाठी वापरतात. मांडवासाठी जांभळाच्या फांद्या वापरतात. लग्नाच्या मांडवावर एकतरी 'डार' (फांदी) जांभळाच्या झाडाची टाकतात. जांभळाच्या झाडाच्या मांडवाखाली थंड वाटते.

जांभळाचे झाड जास्त करून नाल्याकाठी, नदीकाठी, तलावाकाठी दिसून येते. सावली थंड असते. त्यामुळे या झाडाच्या खाली अनेक जनावरे बसतात. जांभळाच्या काडीने दातण करतात.

'वांत्या' (उलट्या) होत असल्यास जांभळाच्या झाडाची साल जाळून त्याची 'मस' (राख) मधात खायला देतात. 'रक्तप्रदर' (रक्तमिश्रित पांढरे पाणी जाणे) होत असल्यास, जांभळाची साल वाटून त्याच्या रसात खडीसाखर व जिरे टाकून प्यायला देतात. 'मुखरोग' (दात, दाढ दुखत असेल, तोंड सुजले असेल, दातातून पू निघत असेल, तोंडाचा वास येत असेल) असल्यास जांभळाची अंतर्साल पाण्यात शिजवून त्या पाण्याने गुळण्या करतात. 'गरमी'

झाल्यास जांभळाच्या झाडाची साल कुटून खातात. काही जखम झाली तर जांभळाची साल जाळून त्याची 'मस' (राख) त्यावर लावतात. 'साखरेच्या बिमारीत' (मधुमेह) जांभळाची अंतर्साल रात्रभर पाण्यात भिजवून सकाळी ते पाणी पितात.

जांभळाच्या झाडाचा पाला ढोरे-बकऱ्या आवडीने खातात. जांभळाच्या झाडाच्या पाल्याचे 'खाद' (खत) चांगले होते.

जांभळाची फळे खायला गोड लागतात. जांभूळ हे फळ 'उतार' आहे. जास्त खाल्ल्याने इतर औषधी, इंजेक्शन 'उतरतात' (लागू पडत नाही.) जांभूळ 'थंडी' (थंड) आहे. नाही मानवले तर अंगावर सूज येते. जांभूळ 'फोडीक' आहे. 'वरण' (व्रण - न भरणारी जखम) असले तर जांभूळ खाल्ल्याने वाढते, म्हणून मुळीच खाऊ नये. गरोदर व बाळंतीण बाईला जांभूळ खायला देत नाहीत. तसेच कुत्रा 'डसला' (चावला) तर जांभूळ मुळीच खाऊ नये; औषध उतरते.

पण हे सर्व दोष जरी असले तरी 'वर्सातून' (वर्षातून) एकदा तरी, एकतरी जांभूळ खाल्ले पाहिजे. त्यामुळे पोटात केस राहत नाही; केस वितळून जातात. (अनेकांच्या पोटात चुकन केस जातात व आत त्याचा गोळा होतो.)

'साखरेच्या बिमारी'त, जांभळाच्या बिया वाळवून त्याची 'भुकनी' (पावडर) खाल्ली तर बिमारी कमी होते. घामोळ्या झाल्यास जांभळाच्या बिया पाण्यात उगाळून खातात व घामोळ्यांवर लावतातसुद्धा! माकडे, 'आसोली', हरीण, सांबर या प्राण्यांना जांभळे फार आवडतात. आसोली वरचा गर खातात व बिया विष्ठेत फेकून देतात. ही विष्ठा पाहून जंगलात जवळपास अस्वल आहे हे समजते.

गाणे

आपयेला हस्तकाने
झाड रोवयेलो जांभूळ,
आन् तिचा फळ काळा भोर
तुकाराम बोले ॥

सालई

Boswellia serrata

याचे लाकूड मजबूत असते. मोठ्या झाडापासून घरासाठी फाटे, टेबल, खुर्च्या, कपाट, दरवाजे, खिडक्या व शेतीचे अवजार बनवतात. सालईच्या लाकडापासून बैलबंडीचे उभार व चाक चांगले बनतात. याच्या लाकडापासून लगनाचा मांडव, 'डेर' किंवा 'मुंडी' (खांब) करतात. काही लोक काड्या जाळण्यासाठी वापरतात. पण बहुतेक लोक वापरत नाहीत. कारण या झाडाला खूप पवित्र मानतात.

सालईच्या झाडाचा धूपासारखा सुगंध येतो. काडी पेटवली तर चांगला वास येतो. 'धुवाँ' (धूर) सुवासिक असतो. सालईची काडी, सिगारेट-बिडी सारखी मागे पेटत येते.

सालईच्या लाकडाच्या आगकाड्या बनवतात. सालीचे लाकूड वजनाने थोडे हलके असते. त्यामुळे मोठ्या खोडापासून डोंगा बनवतात.

लहान लेकराला 'डब्बा' (न्युमोनिया) झाला तर सालईची साल कुटून, त्याचा रस पाजतात. सालईची ओली साल कुटून, त्यात खडीसाखर व जिरे टाकून दिल्यास, डोळ्यांची उष्णता निघून जाते. तोंडात फोड आले तर साल चावून खातात. नारूचा रोग झाल्यास साल वाटून रस पाजतात. 'रक्त-हागी' (आव रक्त हगवण) व 'नळहागी' (कॉलरा) लागला तर, सालईची आंतरसाल ठेचून त्यात कडुलिंबाच्या सालीचा अर्क टाकून खडीसाखर, जिरे यांच्याबरोबर टाकून देतात.

या झाडापासून डिंक निघतो. डिंकाच्या मेणबत्त्या, कंगवे व चमकदार टिकल्या बनवितात. पण कंगवा लवकर तुटतो. चमकदार टिकल्या जाळीत लावून त्याने केस बांधतात.

शेळ्या-बकऱ्या पाला खातात. लाल सुवासिक फुले लागतात; पूजेसाठी विशेषतः मारुतीच्या पूजेत ही फुले वापरतात. फुले व फळे खातात.

लहान मुले, मोठी माणसे, सालईच्या कच्च्या बिया खातात. या बिया छान 'तुपट' (तुपासारख्या) लागतात.

सालईची फुले देवाच्या, विशेषतः मारुतीच्या पूजेत वापरतात. सालईची एक तरी 'खांदी' (फांदी) लग्नाच्या मांडवावर पाहिजे. लग्नात सालईच्या लाकडाची 'मुंडी' (खांब) बनवतात.

गोष्टी

असा सम्ज आहे की, 'इंदरजिताशी (इंद्रजिताशी) 'लडाई' (लढाई) 'खेळताना' 'लक्षमण' (लक्ष्मण) बेहोष पडला. त्यावेळी हनुमंताने द्रोणागिरी पर्वतावरून मोवई व सालईची झाडे आणून त्याची साल ठेचून लक्ष्मणाला त्याचा सुवास 'दावला' (दाखवला) तवा लक्ष्मणाला 'शुद्ध' (शुद्धी) आली. म्हणून हे झाड खूप पवित्र आहे.

दुसरी गोष्ट अशी आहे की, लक्ष्मणाने ज्यावेळी सीतामाईला जंगलात नेऊन सोडले त्यावेळी सालई-मोवई यांनीच सीतामाईचा गहिवर ऐकला. त्यांनीच तिला धीर देऊन तिचे रक्षण केले.

सालई-मोवई या दोघी बहिणी आहेत असे मानले जाते. दिवसा झाडाच्या रूपात असतात व रात्री स्त्रिया होतात.

गाणी

सालया-मोवया, आंदीच्या बायका,
सीतामाई गेली वनवासा,
तुम्ही, कान देऊन 'आयका' ऐका ॥

सालया - मोवया रात्रीच्या बायका,
माझ्या सीतेचा गहिवर आयका ॥

माया मेदी (मधी) माया,
कोण करील माया,
डोंगरी सालया,
पालून आल्या ॥

सालया-मोवया, तास-तास ग वाढ या,
'आमी' (आम्ही) 'बईणी' (बहिणी),
'चिड्या' (चिमण्या) उडून जाऊ या ॥

सालया - मोवया, शेंडी फुटे डिरे,
वैरागडे 'इळे' (विळे) ॥

(या झाडांचे कोवळे डिरे - फांद्या, वैरागड नावाच्या गावातल्या प्रसिद्ध विळ्यांसारखे दिसतात.)

मोवई

Lannea coromandelica

याचे लाकूड मजबूत नसते. त्यामुळे विशेष उपयोगी नाही. लग्नात मोवईच्या खोडाची 'मुंडी' करतात. लग्नात बसायला मोवईचे पाट करतात. या झाडाच्या काड्या चुलीत जाळण्यासाठी वापरतात. पण काड्या लवकर पेटत नाही. काड्यांचा खूप धूर निघतो, वास येतो व लवकर विझतात.

मोवईची ओली साल कुटून त्यात खडीसाखर व जिरे टाकून दिल्यास, डोळ्यांची उष्णता कमी होते. फळ लागतात. पाखरे फळे खातात.

हनुमंताने द्रोणागिरी पर्वतावरून सालई व मोवईचे झाड आणून, त्याची साल कुटून लक्ष्मणाला 'सुवास दावला' (सुंघायला लावले) असे मानतात. त्यामुळे हे झाड खूप पवित्र आहे.

गाणे

सालया, मोवया, रात्रीच्या बायका,
आन् रक्षण करा सीतेचा!

हिवर

Acacia leucophloea, Mimosa leu-cophloea

मोठे झाड असते. हिवराच्या काड्या जाळण्यासाठी वापरतात. या झाडाच्या काड्या टिकून राहात नाहीत. त्याला कीड लागून 'छेद-छेद' (छिद्रे) पडतात. त्यामुळे चुलीत जाळण्याशिवाय दुसरा उपयोग नाही.

हिवराच्या झाडाला गाठी येतात. या गाठी जाळून, त्याची 'मस' (राख) तयार करतात. आणि ही मस खोबरेलतेलात टाकून 'खांडकांना' (फोडांना) लावतात.

या झाडाच्या सालीपासून 'वाक' (दोरी) काढतात. हा 'वाक' गळ्याला, कंबरेला (करगोटा म्हणून) हाता-पायाला बांधतात. 'मस्त' (खूप) घाण वास येतो - सहन होत नाही. त्यामुळे 'किरीम' (कृमी) झालेले असल्यास पडून जातात.

किरीम झालेले असल्यास, लहानशा, कोवळ्या झाडाचे मूळ खोदून आणून, उगाळून त्याचा रस पाजायचा. मुळांचा खूप घाण वास येतो. त्यामुळे किरीमाचे जटच्या जट पडतात.

गोष्ट व गाणे

''सुनेला धरून एक सासरा येत होता. 'तपन' (उन्ह) लागले म्हणून दोघे हिवराच्या झाडाखाली बसले. सासऱ्याची वाईट नजर सुनेवर गेली. सासरा मग झाडाला 'म्हनते' (म्हणतो)

अरे अरे हिवरा,
तुझा 'फोदा' (योनि) 'पिवरा' (पिवळा),
सुनेला 'झवीन' (शारीरिक संबंध करीन),
तर पाप का 'पुण'? (पुण्य)

मग हिवराचे झाड सासऱ्याला म्हणते,

अरे अरे मूरखा (मूर्खा),
तू आहेस हलका,
सुनेला झवलास
तर किती पाप होते!

त्यामुळे बहुधा सुनेला आणायला सासरा कधीच जात नाही.

रक्तरोहणी (रक्तचंदन)

Pterocarpus santalinus

या झाडाला 'रक्तरोहिणी' किंवा 'रगतचंदन' किंवा 'रक्तचंदन' म्हणतात. मोठा वृक्ष असतो. हे झाड खूप 'गुणकारी' (उपयोगी) आहे, पण जंगलात लवकर दिसत नाही. ही झाडे आता जंगलात खूप कमी झालेली आहेत.

रक्त-आव, हगवण लागली तर या झाडाला साल कुटून, दह्यात किंवा ताकात, सोबत खडीसाखर व जिरे टाकून देतात. साल कुटून, नुसत्या कापरात पण देतात. वेळेवर साल मिळेल की नाही म्हणून, साल आणून, वाळवून 'भुकनी' (भुकटी) करून ठेवतात.

डोळ्यात रक्त जमले तर साल घासून त्याचा गंध डोळ्यात लावतात. खूप थंडावा

वाटतो. उन्हात किंवा 'उष्णतेने' किंवा तसेच डोळे आले तर, डोळे लाल झाले असतील तर साल घासून त्याचे गंध डोळ्यात लावल्याने एकदम 'शांत' (बरे) वाटते.

अंगावर कुठेही सूज येऊन जागा लाल झाली असेल तर साल पाण्यात घासून, त्याचे गंध लावतात. अंगावर खाज येऊन, 'धावडे' (पित्त) आले तर साल उगाळून त्याचा गंध लावतात. भाजल्यामुळे अंगावर फोड आले तर रक्तचंदनाचे गंध त्यावर लावतात. त्यामुळे थंड वाटते व आग कमी होते. उचकी थांबत नसेल तर रक्तचंदनाची साल उगाळून त्याचे गंध कोमट पाण्यात टाकून ते पाणी प्यायला देतात.

चंदनाचे खोड नाही मिळाले तर या झाडाचा गंध उगाळून पूजेच्या वेळी स्वत:च्या व देवाच्या कपाळाला लावतात.

बाहावा

बहावा / अमलताश
Cassia fistula

मध्यम ते मोठ्या आकाराचे झाड असते. याच झाडाला कोणी 'अमलताश' कोणी 'रामदांडा' कोणी 'बावाशीर' तर कोणी 'सोटी' म्हणतात. मोठ्या झाडाच्या लाकडापासून घरासाठी पाट्या, टेबल-खुर्च्या, दरवाजे-खिडक्या तयार करतात. मुळ्या, खोड, फांद्या जाळण्यासाठी वापरतात.

हगवणीत या झाडाची साल कुटून देतात. एखाद्या बाईला 'रक्तसुर्ला' किंवा 'विटाळसुर्ला' (मासिक पाळीत पोटात दुखणे) असल्यास बाहाव्याची साल कुटून त्याचा रस पाण्यातून देतात.

पांढरे पाणी जात असल्यास पानांचा रस काढून त्यात खडीसाखर व जिरे टाकून देतात. गजकर्ण 'खसू' (खरुज) असल्यास बहाव्याची पाने वाटून लावतात. बिबा उतला तर पानांचा रस लावतात.

उन्हाळ्यात या झाडाला फार सुंदर पिवळ्या-पिवळ्या फुलांचे घोसच्या घोस लागतात. फुले उकडून भाजी करतात. लोक ही भाजी खूप आवडीने खातात. बाहाव्याची फुले गरम आहेत. जास्त भाजी खाल्ली तर हगवण लागते. पूर्ण फुललेल्या झाडाखाली वाघ लोटांगण घालतो असे म्हणतात.

याला लांब लांब काळ्या शेंगा लागतात. कुठल्याही प्रकारचा ताप आला तर या शेंगाचा 'कशा' (काढा) काढून देतात. मुले व मोठी माणसे पिकलेल्या शेंगा चुरपून खातात. 'शहदासारखा' (मधासारखा) गोड गाभा असतो. बिया चुरपून फेकून देतात. या शेंगा खाल्ल्याने खोकला कमी होतो. बहाव्याची शेंग पाठीवर मारली तर कुबड 'बागते' (तयार होते.) म्हणून घरात शेंगा वरती टांगून ठेवतात. पोराबाळांच्या हाती लागू देत नाही.

बैलाला कुठलाही रोग झाला तरी शेंगांचा गाभा कुटून पाजतात. बैलाला भोवळ आली तर (यात बैल गरगर फिरून खाली पडतो) बहाव्याची शेंग, जुनी चिंच, 'सांबार' (धणे), रान झेंडू (याला काटे असतात) आणि घराच्या छपराला स्वयंपाक करतांना जो काळा धूर बसतो तो

झाडून, सर्व एकत्र करून व कांडून त्यात मिरची पावडर टाकून पाजतात.

लोखंडी

लोखंडी
Ixora arborea

लोखंडी व लोगडी हे एकच झाड आहे. हे झाड नेहमीच हिरवगार असते. झाड मोठे असून ते खूप पसरते.

या झाडाच्या दोन जाती असतात. एक बारीक पानांची लोखंडी - ही उंच वाढते व दुसरी मोठ्या पानांची लोखंडी (याला 'मोठी लोखंडी' असेही म्हणतात) ही बाजूला खूप पसरते. याचे खोडही चांगले 'ठोकळ' (जाड) होते. याची काडी खूप टणक असते, लवकर तुटत नाही पर (पण) जाळली, तर मात्र 'दिव्यापानी' (दिव्यासारखी) 'साजरी' (सुरेख) जळते. त्यामुळे काड्या जळण्यासाठी वापरतात.

लोखंडाची काडी खूप 'निगट' (मजबूत) असते. त्यामुळे त्याचे कुंपण तयार करतात. लोखंडाचे झाड तोडायला खूप वेळ लागतो.

लोखंडीचा पाला हिरवागार असतो. त्यामुळे या झाडाची खूप छान 'छाया' (सावली) असते. या झाडाखाली खूप थंड असते म्हणून जंगली जनावरे मुख्यत: वाघ या झाडाखाली बसून असतात. वाघाला लोखंडी, कोजब, जांभूळ व उंबराच्या झाडाखाली राहाणे खूप आवडते. कारण या झाडांची उन्हाळ्यातसुद्धा थंड, दाट सावली असते.

लोखंडाची साल गरम पाण्यात उकडून, 'कशा' (काढा) काढून, वात असल्यास शेकतात व पितात.

ढोरे, 'शेरड्या' (शेळ्या), बकऱ्या, लोखंडीचा पाला खातात.

वात असल्यास लोखंडी, मेडसिंग, दट्टीकट्टी व निरगुडी या सर्व झाडांचा पाऊ एकत्र पाण्यात शिजवून त्या पाण्याने अंग शेकतात. या पाण्यात तांदळाची पोतली बांधून टाकून शिजवतात. दम असल्यास हा भात खातात.

शिसम

काळा रुख / शिसू
Dalbergia sissoo, Dalbergia latiolia

यालाच 'काळा रुख' पण म्हणतात. मोठा वृक्ष असतो. या झाडाची पानेपण आमटीच्या झाडाच्या पानांसारखीच दिसतात. शिसम हे फारच मजबूत, किमती, इमारती लाकूड आहे. खोडाचा आतील भाग काळ्या रंगाचा असतो. मोठ्या लाकडापासून घरासाठी पाट्या, मुंड्या (खांब) टेबल, खुर्च्या, दरवाजे, खिडक्या, पलंग, बैलबंडी, बंडीचे 'भोवरे' (चाक) व इतर सर्व शेतीचे अवजार बनवतात. लहान काड्या जाळण्यासाठी वापरतात. पण हे झाड तोडले तर खूप दंड भरावा लागतो. सोन्याची किंमत आहे त्याला!

याची साल वाळवून, त्याचा भुरका करून, कुठे खांडूक झाला, बेंड किंवा फोड झाला,

जखम झाली, मार बसला तर त्यात कथ्थ्यासारखे (बेन्झॉईनच्या बोळ्यासारखे) भरतात.

पोटदुखी असेल किंवा 'रक्तशुला' किंवा 'विटाळशुला' असेल (मासिक पाळीच्या वेळी पोटात दुखणे) तर शिसमची साल बारीक कांडून, कांडीत किंवा मोहाच्या 'डारूत' (दारूत) मिसळवून पाच-सहा मात्रा प्यायला देतात.

गाई-ढोरे, बकऱ्या-शेळ्या कोवळा पाला खातात. फोड किंवा बेंड तर पाला वाटून लावतात.

एखाद्या बाईच्या अंगावरून जास्त रक्त जात असेल तर, शिसमचा पाला कुटून, त्याचा रस, साखर टाकून प्यायला देतात.

एखाद्या बाईला पांढर-पाणी जात असेल किंवा एखाद्या स्त्रीपुरुषाला गरमी-परम्याचा रोग असेल तर पाला कुटून, त्याच्या रसात खडीसाखर व जिरे टाकून, पाच दिवस प्यायला देतात.

येन

येन
Terminalia alata

मोठा वृक्ष असतो. खूप उंच वाढतो. या झाडाची साल मगरीच्या चामडीसारखी दिसते. या झाडापासून खूप डिंक निघतो. हा डिंक बाजारात दहा रुपये किलो या भावाने विकला जातो. या डिंकापासून 'पिपरमिंट' (पेपरमिंट) बनवतात. हा डिंक 'घुगरीत' (गोवऱ्यांच्या विस्तवावर) भाजून खातात, पापडासारखा! डिंक लाहीसारखा फुटतो. तसेच डिंक भाजून साखर टाकून खातात. बाळंतीण बाईला मुद्दाम डिंकाचे लाडू खायला देतात. त्यामुळे अंगात ताकद येते व अंगावरून जास्त रक्त जात नाही.

येनाचे लाकूड फार मजबूत असते. त्यामुळे घर बांधायला, शेतीचे अवजार व टेबल-खुर्च्या, 'कवाड' (दरवाजे), खिडक्या तयार करायला हे लाकूड फार उपयोगी आहे.

येनाच्या लाकडापासून झोपडी बांधताना गाडायला लागणाऱ्या 'मुंड्या' (खांब) आणि कवेलू (कौले) लावण्याच्या आधी लागणाऱ्या पाट्या बनतात. लहान काड्या जाळण्यासाठी वापरतात.

येनाच्या पानांचे पुडे बनवतात. हे पुडे हलवायाच्या कामी येतात.

गाई, बैल, बकऱ्या पाने खातात. पाने आणून, वाळवून, कुटून, त्यात मोहाची फुले टाकून, बैलाला खायला देतात. बैलाला यामुळे खूप ताकद येते व हगवण पण होत नाही.

येनाच्या झाडावर ढिवर लोक 'कोसे' बांधतात. यापासून कोसा सिल्क बनवतात. एक झाडावर एक कोसा बांधतात.

येनाची फळे खात नाहीत. कारण सीतामाईला तिची सासू खूप वनवास करायची; काही खायला द्यायची नाही. एकदा भूक लागल्यामुळे सीतामाई जंगलातून येनाची फळे आणून खात होती. ते पाहून सासूने रागाने त्या फळांना 'लात' (लाथ) मारली. त्यामुळे ते फळ विषारी झाले व तेव्हापासून कोणीच खात नाही; पाखरेदेखील!

गोईण :

गाणे :

सीतेला जंगलात लक्ष्मणाने सोडून आल्यावर दुःखाने राम लक्ष्मणाला म्हणतो.

हाय हाय रे लक्ष्मणा,
कोण्या वनात सोडला सीतेला?
वाघ दिसला तर,
येन, धावडे स्वर्गाला जाती,
ससे खोडाशी दडती,
मेल्या आस्वल्या गुरगुरती,
हरणी चमकत पाण्यावर जाती,
ढोरे-वाग डकरतो,
भुई चिलाटी खाली घोरती
पण माझी सीता कुठे जाती?

रोहण

Soymida febrifuga

खूप मोठा वृक्ष असतो. रोहणचे लाकूड आतून लाल असते. लाकूड विशेष मजबूत नसले तरी काही लोक त्यापासून घरासाठी फाटे, 'मुंड्या' (खांब), टेबल-खुर्च्या, दरवाजे खिडक्या, कपाट, बाजा, शेतीचे अवजार बनवतात. या झाडाला उधळी लागत नाही. याच्या काड्या जाळण्यासाठी वापरतात. लग्नात रोहणच्या खोडाची 'मुंडी' (मुंडी म्हणजे कोरलेला खांब. हा नवऱ्या मुलाच्या अंगणात गाडतात) बनवतात.

या झाडातून डिंक निघतो. हा डिंक खातात. तसेच हा डिंक काही कागद, पट्ट्या चिकटविण्याच्या कामी येतो. या झाडाच्या सालीपासून 'वाक' (दोरी) काढतात. हा वाक लाल दिसतो.

रोहणची साल, धावडीचा व आवळीचा पाला सर्व एकत्र करून, चामड्याच्या आत भरतात व मस्त कुटतात. त्यामुळे चामड्याला खूप मजबूती येते व मग हे चामडे नेऊन 'बोडीवर' (लहान तलाव) धुतात.

बैलाला काही जखम झाली तर रोहणची साल कुटून लावतात तसेच त्याचा रस पाण्यात टाकून पाजतात.

रक्त-आव हगवण किंवा साधी हगवण लागल्यास रोहणची साल पाण्यात उकडून त्याचा 'कशा' (काढा) प्यायला देतात. 'वायवाताच्या' (संधिवाताच्या) बिमारीत साल ठेचून बांधतात व त्याचा कशा काढून प्यायला देतात.

गुरेढोरे, वासरे, 'शेरड्या' (शेळ्या), बकऱ्या पाला खातात.

फुलांचे गुच्छ लागतात. फुलांना थोडा सुगंध येतो.

रोहणचे फळ सुंदर दिसते. त्याचा आकार आंब्यासारखा असतो. या फळाला जमिनीवर आपटले असता त्यातून 'पांडुरक्या' (पांढुरक्या) रंगाचे छिलटे बाहेर पडते. हे फार छान दिसते. रोहणचे फळ खात नाही.

सीतामाईला तिची दुष्ट सासू काहीच खायला द्यायची नाही. एकदा सीतामाई जंगलातून रोहणचे फळ आणून 'ओट्यात' (ओच्यात) ठेवून खात होती. सासूने ते पाहून रागाने ओट्यावर लाथ मारली. त्याबरोबर ते फळ विषारी झाले. म्हणून तेव्हापासून रोहणचे फळ कोणीच खात नाही; पाखरेसुद्धा खात नाही!

चंदन

पांढरा चंदन
Santalum album

याला 'पांढरा चंदन'पण म्हणतात. मोठा वृक्ष असतो. चंदन म्हणजे 'सोने' आहे, कारण लवकर मिळत नाही व याचे लाकूड फार महाग पडते. आपल्या जिल्ह्यात चपराळा गावापाशी जंगलात चंदनाची बरीच झाडे आहेत. इतर ठिकाणी पण जंगलात अधूनमधून हे झाड दिसते.

खोडाचा मोठा सुंदर सुवास येतो. चंदन खूप 'थंड' आहे. थंडपणामुळे व सुवासामुळे चंदनाच्या झाडापाशी नेहमी 'सरप' (साप) असतो. अंगाची आग होत असल्यास, चंदनाची झिलपी पाण्यात घासून, ते गंध अंगाला लावतात. अंगावर फोड आले, उष्णता झाली, खाज आली तर चंदनाचा गंध लावतात. थंड वाटते. लहान मुलाच्या 'पिशाबीच्या' (लघवीच्या) जागेला खाजवून सूज आली तर चंदनाचे गंध लावतात. डोके खूप दुखत असल्यास चंदन व सूंठ एकत्र उगाळून त्याचे गंध डोक्याला, कपाळाला लावतात. आव-रक्ताची हगवण होत असल्यास चंदनाचे गंध दह्यात किंवा ताकात खायला देतात. गरमी-परम्याची बिमारी असली, पांढरे पाणी जात असले तर चंदनाच्या गंधात खडीसाखर व जिरे टाकून प्यायला देतात. उचकी लागल्यास चंदनाचा गंध 'सहदात' (मधात) चाटण म्हणून देतात.

अडपल्लीच्या सुईण जनाबाई म्हणाल्या, ''मोठ्या माणसाचा म्हणजे 'इंदिरा आई' (इंदिरा गांधी), राजीव गांधी यांचा प्रेत जाळायला चंदनाची लाकडे वापरतात. आम्हा गरीबासाठी मात्र गराडीचा लाकूड! आन् तोही महागाईमुळे जास्त नाही घेऊ शकलो तर प्रेत अर्धेच जळते किंवा लाकडे भेटलीच नाही तर आम्ही गरीब माणसं प्रेत गाडूनच टाकतो.''

चंदनाच्या खोडापासून देवाची मूर्ती बनवतात. चंदनाचे खोड उगालून त्याचा गंध देवाला लावतात. पूजेसाठी छोटी झिलपी तरी घरात ठेवतात. पूजा करतांना लोक चंदनाचा गंध स्वत:च्या कपाळी पण लावतात. नव्याची अवस पूजताना, चंदनाचा गंध वापरतात.

बिबा

बिबू
Semecarpus anacardium

खूप मोठा वृक्ष असतो. याचे लाकूड खूप मजबूत असते. मोठ्या झाडाची घरासाठी फाटे,

टेबल-खुर्च्या, दरवाजे-खिडक्या, आलमाऱ्या, 'बाजा' (पलंग) बनवायला उपयोग होतो. लहान फांद्या जाळण्याच्या कामी येतात.

याच्या फळांना 'बिबा' म्हणतात. बिब्याचे फळ काजूच्या फळासारखे दिसते. पिकलेल्या फळाला 'मुकी' किंवा 'बोबली' म्हणतात. ते भाजून खातात.

बिब्याच्या फळांचा मुरांबा, बाळंतीण बाईला मुद्दाम 'टॉनिक' (शक्तिवर्धक) म्हणून देतात. हा मुरांबा दुकानात खूप महाग मिळतो.

बिब्याचे बी फार उपयोगी आहे. कुठेही जखम झाली तर, त्या ठिकाणी बिबा साबणात उगाळून लावतात. कोणाला डोकेदुखी असली, दाढ हलत असतील किंवा फोड झाले असतील तर, बिबा व तीळ एकत्र कुटून लावतात.

बैलांना किरीम झाले, गाठ आली किंवा दात हलले तर बिबा कुटून, एरंडीच्या तेलात लावतात.

बिब्याच्या बीपासून तेल निघते. बिब्याला छिद्र पाडून 'ज्योतीवर' (दिव्याच्या वातीवर किंवा निखाऱ्यांवर) धरले तर त्यातून तेल निघते. नखाला फोड आला तर बिब्याचे तेल लावतात. जखम झाली, लचक भरली किंवा डोके दुखत असल्यास बिबा लावतात. हगवण, उलटी झाली तर, लाल कांदा कुटून, त्याच्या रसात बिब्याचे एक-दोन थेंब तेल व जाळण्याचा कापूर मिसळून देतात. कॉलऱ्यातपण हे औषध फार गुणकारी आहे.

काही जणांना बिबा 'उततो' म्हणजे बिब्याचे तेल अंगावर पडले तर त्या जागी 'खांडके' (फोड) होतात. त्यामुळे बिब्याचे तेल अंगावर पडले तर ताबडतोब जवसाच्या तेलात कापूस टाकून पुसून घ्यायचे.

टोपल्यांना बिब्याचं तेल 'उपसतात' (लावतात) त्यामुळे टोपल्या स्वच्छ राहतात. लोखंडासारखा पक्का रंग बसतो.

बेहडा

Terminalia belerica

बेहड्याचे दोन प्रकार आहेत. एक गोड बेहडा व दुसरा आहे ठिकारू बेहडा.

गोड बेहडा हा मोठा वृक्ष असतो. बेहड्याचे लाकूड खूप मजबूत असते. त्यामुळे मोठ्या झाडाचा उपयोग घर बांधायला, शेतीचे अवजार, टेबल-खुर्च्या, कपाट, दरवाजे, खिडक्या तयार करायला होतो. लहान काड्या जाळण्यासाठी वापरतात. बेहड्याच्या काडीचे दातण करतात.

लहान मुलांना किरीम झाले तर बेहड्याच्या झाडाची साल ठेचून त्याचा अर्क पाजतात. गुरांच्या जखमेत किडे झाले तर बेहड्याच्या सालीचा अर्क पाजतात.

या झाडाचा डिंक निघतो. तो खातात. शेळ्या-बकऱ्या या झाडाचा पाला खूप आवडीने खातात. डोके दुखत असल्यास, बेहड्याचा पाला लहान मुलाच्या 'पिशाबीत' (लघवीत)

शिजवून, त्याचा टोप डोक्याला बांधतात.

बेहड्याचा, हिरड्याचा, आवळ्याचा, मैदीचा, बाभळीचा पाला आणि बेहडा, हिरडा, आवळा, हे सर्व एकत्र करुन, वाळवून, चक्कीत दळून, त्याची पावडर करून त्याच्या पुड्या बांधून ठेवतात. 'मुखरोगात' (हिरड्या सुजणे, दात दुखणे, दातातून - हिरड्यातून रक्त-पू जाणे, तोंडाचा वास येणे) या मंजनाने दात घासतात. तसेच मुखरोग होऊच नये म्हणूनही या मंजनाने दात घासतात.

डोके दुखत असल्यास, बेहड्याच्या पानांचे 'पात्र' (पत्रावळ) बनवून, त्याला एरंडीचे तेल लावून गरम करून, डोक्याला बांधतात.

याच्या फळांना 'बेहडे' म्हणतात. शेळ्या-बकऱ्या हे बेहडे आवडीने खातात. दमा-खोकला असल्यास बेहड्याच्या फळाचा (ओला किंवा वाळलेला) तुकडा तोंडात धरतात. उलटी हगवण झाल्यास, पोटाला फुगारा आल्यास, बेहड्याचे फळ वाटून, पाण्यातून देतात. किरीम झाल्यास, बेहड्याचे फळ वाटून पाण्यातून देतात.

बेहडा, हिरडा व आवळा, ही तिन्ही फळे वाळवून त्याचे चूर्ण करतात. यालाच 'त्रिफळा चूर्ण' म्हणतात. अजीर्ण, दमा-खोकला, उलटी-हगवण किंवा किरीम झाल्यास हे चूर्ण खायला देतात. पोट फुगले तरी खातात. त्यामुळे 'झाडा' (शौचाला) साफ होते.

बेहड्याचे फळ फार उपयोगी आहे. म्हणून वाळवून नेहमी घरात ठेवतात. बिबा उतला तर त्या जागी, बेहड्याचे फळ पाण्यात घासून लावतात. बेहड्याचे फळ फोडून आतली बी खातात. बदामासारखी गोड लागते.

ठिकारू बेहरा हा 'डुंबरावर (वारुळावर) असतो. डुंबरावरचा बेहडा कधीच खात नाही; कारण विषारी असतो. डुंबरावरच्या बेहड्याच्या बिया खाल्ल्या तर तोंडातून फेस येऊन माणूस मरतोच!

हिरडा

Terminalia chebula

मोठा वृक्ष असतो. याचे मोठे लाकूड घर बांधायला टेबल-खुर्च्या, दरवाजे, खिडक्या, कपाट, शेतीची अवजारे इत्यादी तयार करण्याच्या कामी येते. लहान काड्या जाळण्यासाठी वापरतात. या झाडाच्या काडीचे दातण करतात.

ढोर, 'शेरड्या' (शेळ्या), बकऱ्या खूप आवडीने पाला खातात. फळाला 'हिरडा' म्हणतात. कच्च्या खाली पडलेल्या फळाला 'बाळ हिरडा' म्हणतात. खोकला झाल्यास, हिरडा व मीठ 'सोबत' (एकत्र) खातात. फळ वाळवून, त्याची साल खोकला-दमा आल्यास तोंडात धरतात. दाढ दुखली तर वाळलेल्या हिरड्याचा भुरका दाढेवर दाबतात.

हिरडा, बेहडा व आवळा एकत्र करून त्याचे मंजन बनवतात. याला 'दात रंजन' म्हणतात. याने दात घासल्यास, दात खूप 'प्यार' (छान) लागते.

मूळव्याधीच्या आजारात हिरडा वाळवून त्याची 'भुकनी' (भुकटी) खडीसाखर टाकून खायला देतात.

'तोंड आले' (तोंडात फोड आले) तर बाळहिरडा पाण्यात घासून, त्याचे गंध तोंडात लावतात. जास्त घाम येत असल्यास हिरड्याचे चूर्ण पाण्यात मिसळवून अंगाला लावतात.

रोज थोडे त्रिफळा चूर्ण तसेच किंवा मधात टाकून खाल्ले तर तब्येत चांगली राहते व अंगात शक्ती येते.

हिरड्याची फळे सडवून पाणी काढतात. त्याचा काळा रंग निघतो. हे पाणी, कपडे व इतर काही रंगविण्याच्या कामी येते. तसेच हिरड्याचे फळ सडवून, त्याचा काळा धागा काढतात.

करू

करई

Sterculia urens

मोठा वृक्ष असतो. याचे खोड चांदीसारखे पांढरे दिसते. मोठ्या झाडापासून घराचे फाटे-मयाली, टेबल-खुर्च्या, दरवाजे-खिडक्या, कपाट, 'बाजा' (पलंग) तयार करतात. लहान फांद्या जाळण्यासाठी वापरतात.

या झाडापासून 'वाक' (दोरी) काढतात. या वाकाचे शिके तयार करतात. पत्ता हंगामात म्हणजेच पाने तोडणीच्या वेळी (मे च्या साधारण दुसऱ्या आठवड्यापासून, शेवटल्या आठवड्यापर्यंत बिडी पत्ता किंवा तेंदू पत्ता तोडण्याच्या वेळी) तेंदू पत्याचे पुडे बांधण्यासाठी हा वाक वापरतात.

या झाडाला 'वांदा' (झाडाच्या खोडावर गाठी येणे) येतो. चुलीत जाळण्यासाठी वांदा वापरतात. वांदा जाळून, त्याची 'मस' (राख) 'खावाच्या' (खायच्या) तेलात टाकून अंगाला फोड झाल्यास लावतात.

हातापायाला 'वायजाल' किंवा 'फुटाळी' किंवा 'चिऱ्या' झाल्या (यात हात-पाय फुटतात किंवा हाता-पायाला भेगा पडतात) तर करूच्या झाडावर (खोडाला) हात-पाय घासल्याने 'नरम पडते' (बसतात). जंगलात जाऊन झाडाला घासायचे घरी आणून नाही. शनिवारी जायचे! घासल्यावर त्या झाडाकडे न पाहता घरी जायचे. पुढे कधीच वायजालाचा त्रास होत नाही.

या झाडापासून डिंक काढतात. करूच्या झाडाला इतर झाडांपेक्षा फार लवकर डिंक फुटतो. एक करूचे झाड असले की त्या डिंकाने दोघा नवरा-बायकोचे रोजचे पोट भरते; इतका जास्त व चांगला डिंक निघतो! हा डिंक खातात. डिंक दुकानात नेऊन विकतात. बाळंतीण बाईला करूचा डिंक खायला देत नाही कारण त्यामुळे मासिक पाळी बंद होते व पुढे मूल-बाळ होत नाही. मूल-बाळ होऊ नये म्हणून काही बाया करूचा डिंक खातात. हगवण लागल्यास करूचा डिंक भिजवून त्यात साखर टाकून खातात.

जर पाठीत, छातीत काही दुखणे झाले तर डिंक भिजवून कोऱ्या कागदावर टाकून त्या जागी लावतात. त्यावर 'शेणकुडीचा (गोवरीचा) किंवा सरात्याच्या शेक 'दावायचा' (द्यायचा).

दुखणे पार उडून जाते.

या झाडाचा पाला आणून 'धुवणी करतात' (पानांचा जाळ करून धूर काढतात) त्यामुळे घरात 'कोंबडीच्या कुशी' (कोंबडीवरचे एक प्रकारचे किडे) मुळीच होत नाही.

झाडाला बारीक फळे लागतात, ती खातात.

पूर्वीपेक्षा आता करूची झाडे फारच कमी दिसतात. कारण लोभामुळे डिंक काढून काढून झाड वाळून जाते, झाडाचा कस निघून जातो! (डिंक काढण्यासाठी झाड तासतात - झाडाला खाचा पाडतात.)

गावठी बाभूळ

Acacia arabica, Acacia nilotlla

साधारण मोठे झाड असते. झाडाला काटे असतात. 'सरकारी बाभळीपेक्षा' आपल्या 'गावठी बाभूळ' जास्त उपयोगी आहे. बाभळीची काडी टणक व चिक्कण असते. 'तुटल्यानी' (तोडल्याने) लवकर तुटत नाही. 'मोठा जात' (मोठे झाड) राहिले तर घरासाठी पाटे, टेबल-खुर्च्या, दरवाजे, खिडक्या तयार करतात. फांद्या जाळण्यासाठी वापरतात. बाभळीची काडी छान जळते. फांद्या 'कुंपावन' (कुंपण) करायला वापरतात.

मोठ्या झाडाच्या काडीचा दातण करतात. हे दातण कडू नसते; खूप छान 'तुपट' (तुपासारखे) लागते. दात हलत असले तर बाभळीच्या दातणाने 'दात आवळून घेते' (दात घट्ट होतात) व दात हलणे बंद होते.

बाभळीच्या झाडापासून डिंक निघतो. हा डिंक खातात. कागद, पट्ट्या चिकटविण्यासाठी हा डिंक वापरतात.

शेळ्या-बकऱ्या बाभळीचा पाला व शेंगा खातात.

पाला वाळवून, त्याची भुकटी बनवून, पांढर पाणी जात असल्यास पाण्यात टाकून देतात. प्रदर किंवा पांढरे पाणी जात असल्यास काही जण बाभळीचा कच्चा पाला वाटून, त्याच्या रसात खडीसाखर व जिरे टाकून पितात.

बी लावल्याने नवीन झाड 'वापते' (उगवते). बाभळीच्या बिया बाजारात विकल्या जातात. या बिया वाटून, त्याची 'भुकनी' (भुरका) बनवून, त्यात 'हिराकसी' (हिराकस) टाकून दात घासतात. या मंजनाला 'मिसी' म्हणतात. त्यामुळे दात काळे होतात. पण खूपच मजबूत बनतात.

बाभळीच्या मुळांचा खूप सुंदर दरवळणारा सुगंध येतो. लहान झाड असेल तर ते खोदून आणतात. मुळावरची साल काढून मूळ उगाळून त्याचे गंध लहान मुलांना 'किरीम' झाल्यास पाजतात.

'किरीम' झाले तर मुळाचा 'वाक' (दोरी) करून गळ्याला, कंबरेला बांधतात. या वाकामुळे पूर्ण अंगाला वास येतो व या वासाने 'किरीम' 'भेदरून' (घाबरून) नष्ट होतात.

मेढ्याच्या उरकुडा आजी म्हणाल्या, ''किरीम मोठे भयानक राहते. लहान राहिले तर गांडीतून पडते. पण मोठे होऊन डोक्यात 'एंगले' (चढले) की तोंडातून पडते; त्यामुळे माणूस मरतो.''

देवबाभूळ

सरकारी बाभूळ
Acacia farnesiana

हे झाड बाभळीच्या झाडासारखेच दिसते. पण हे झाड सरकार रस्त्यांच्या बाजूला लावते, म्हणून या झाडाला 'सरकारी बाभूळ' पण म्हणतात. या झाडाला काटे असतात. हे काटे 'गडले' (रुतले) तर खूप 'दुख होते', (दुखते, आग होते) कारण हा काटा 'सुवाट' (लांबसडक) असतो.

हे झाड मजबूत-चिक्कन नसते. त्यामुळे वादळ आले तर लवकर पडून जाते. याच्या फांद्या चुलीत जाळण्यासाठी वापरतात. पण काटे 'गडण्याची' (रुतण्याची) खूप भीती असते.

हे झाड लवकर 'पालते' (मोठे होते) आणि 'फल्लर' (झुडुपासारखे) वाढते. पाण्याची जास्त गरज नसते. त्यामुळे रस्त्याच्या बाजूला या झाडामुळे थोडी सावली राहते. पण ही सावली दुरूनच बरी आहे. झाडाखाली जाऊन उभे राहिले तर काटा खुपण्याची भीती असते.

शेळ्या-बकऱ्या मुळीच पाला खात नाहीत.

बहुतेक सुईणींचे म्हणणे होते की, ''हे सरकारी झाड म्हणजे 'फजूलचे' (फालतू) रोवणे आहे; या झाडाचा उपयोग तर काहीच नाही उलट याचा काटा 'मस्त' (खूप) खुपतो.''

बोरे

बोर
Ziziphus mauritiana, Ziziphus jujuba

मोठे, काटेरी झाड असते. बोराच्या 'काड्याचे' (फांद्याचे) कुंपण करतात. बोराच्या काड्या जाळण्यासाठी पण वापरतात. 'शेरड्या' (शेळ्या) बकऱ्या पाला खातात.

बोराची पाने कुटून, त्याच्या रसात साखर टाकून, हगवणीत देतात. एकदम 'आराम' (फायदा) होतो.

हात-पाय अंग दुखत असल्यास, बोराचा पाला व उतरणीचा पाला एकत्र वाटून, त्यात मीठ टाकून, त्याच्या 'पोतल्या' (कापडात गुंडाळून लहान घड्या करतात) बनवतात व या पोतल्या गरम करून त्याने अंग शेकतात.

अर्धे डोके दुखत असले तर, अगदी पहाटे, बोराची अडीच पाने आणून गुळात खायला देतात.

उन्हाळी लागल्यास बोराचा पाला वाटून त्याच्या रसात खडीसाखर व जिरे टाकून प्यायला देतात.

'इचू' (विंचू), 'डसला' (चावला) तर चावलेल्या जागी बोरीचा पाला वाटून लावतात.

बेंड, फोड झाले तर, बोरीचा पाला वाटून लावतात. पिकलेली फळे (बोरे) खातात. बोरे

वाळवून, बोराच्या पापड्या, वड्या, बोरकूट तयार करतात.

वाळलेले बोर कांडून, त्यात मीठ साखर व पाणी टाकून प्याले तर 'झाँव' (उन्ह) लागत नाही.

वाळलेले बोर मोहात शिजवून, त्यात तिखट, मीठ टाकून खातात. उन्हाळी लागल्यास, बोराचा भुरका पाण्यात टाकून पितात. 'थंड' असते. चण्याची दाळ भिजवून, त्याच्या पाण्यात बोराच्या 'आठ्या' (आठोळ्या-बिया) भिजवून ते पाणी प्याले तर झाँव लागत नाही. बोर वाळवून, उकडून माठ व गूळ किंवा साखर टाकून खातात.

कच्चे बोर खाल्ले तर 'गरा' (गळा) खरखर करतो. बोर खाल्ल्याने खोकला होतो असा समज आहे. पण सर्व लोक, विशेषत: मुले, खूप आवडीने बोर खातात. ''बोर म्हणजे पोर'' असे म्हणतात.

संक्रांतीला वाणात बोर वाटतात. तुळशीच्या लग्नात बोराची 'खांदी' (फांदी) तुळशीपाशी ठेवतात. आठवीच्या पूजेच्या वेळी घागरीत बोराची खांदी टाकतात.

जंगलात राम-लक्ष्मणाला शबरी आईने बोराचेच जेवण दिले होते. मेढ्याच्या सुईण पार्वतीबाई म्हणाल्या, 'बोरे खात खात जंगलात गेलो तर झोप येत नाही; सावध राहतो माणूस! म्हणूनच शबरी आईने रामाला बोरे खायला दिली.''

ताड

ताड
Borassus flabellifer

उंच झाड असते. फार उंच असल्यामुळे, अनेकदा या झाडावर पावसाळ्यात वीज पडते. त्यामुळे झाड एकदम 'फलकूनच' (फाकून) जाते.

ताडाची काडी जाळण्यासाठी वापरत नाहीत. कारण त्यामुळे घरात 'बाजेला' (पलंगाला) 'खटमल' (ढेकूण) होतात.

ताडाच्या झाडाला 'पानोरे' (पान) फुटतात. ही पाने मोठी असल्यामुळे, झोपडीच्या छपरावर टाकतात. ताडाच्या पानांपासून, झाडण्यासाठी फडे तयार करतात.

ताडाच्या झाडाला ताडफळ लागतात. ते 'थंड' असते. लहान कोवळे फळ खाल्ले तर खोबऱ्यासारखी चव असते 'पर' (पण) उघडून, थोडा वेळ तसेच ठेवलं तर 'हवा घेते' (हवा लागते) व त्यामुळे ते 'निब्बर' (वातड) होते. 'कडसर' (कडवट) होते; चावता येत नाही त्यामुळे खाऊ शकत नाही.

या झाडापासून 'ताडी' (एक प्रकारची दारू) 'उतवतात' (काढतात) ताडी पितात. 'थंड' असते म्हणून मुद्दाम उन्हाळ्यात पितात. आता ताडी काढणे हे पहिल्यापेक्षा खूप कमी झालेले आहे. पूर्वी बाया पण ताडी प्यायच्या. ताडीचा आंबट-आंबट वास येतो. ज्या स्त्रीपुरुषाच्या पोटात, अंगात, जास्त उष्णता आहे ते विशेष करून ताडी पितात.

पूर्वी गडचिरोलीत ताडाचे 'बनच्या बन' (जंगलच्या जंगल) दिसायचे. पण सरकारी

दारुदुकाने सुरू झाल्यामुळे ताडाची अनेक झाडे कापण्यात आली. (अनेक सुईणींचे म्हणणे होते की, लोकांनी घरच्या घरी ताडी काढून पिऊ नये, पण त्यांनी सरकारी दारू प्यावी म्हणून सरकारनेच मुद्दाम ताडीची झाडे तोडून टाकलीत.)

ताडाच्या 'पानोऱ्याच्या' (पानाच्या) काडीत पाच काळे मणी ओवून विकतात. काजळतीच्या वेळी गौरीला गरसुरी (मंगळसूत्र) म्हणून हे वापरतात. काजळतीच्या पूजेत याचे फार महत्त्व आहे.

सिंदी

शिंदी
Pnoenix acaulix, Roxb

ताडाच्या झाडासारखेच हे पण झाड आहे. याची पाने खूप मोठी असतात. या पानांच्या 'चापरी'(चटया) विणतात. झोपडीवर ही पाने टाकतात. घरात पाण्याची झडप येऊ नये म्हणून 'छपरीवर' (छपरावर), भिंतीवर ही पाने बांधतात. याची फुले सुंदर असतात. दिवाळीत शिंदीची फुले लावून रोषणाई करतात. फळांचे 'झोके' (झुबके) लागतात. यांना शिंदोडे किंवा सिंदोळ्या म्हणतात. पिकल्यावर हे शिंदोडे खिरण्यासारखे खातात. वरचा गोड गर खाऊन बिया फेकून देतात.

शिंदीच्या झाडापासून 'निरा' काढतात. झाडाला गपकण्या करून, छाटून, दोराने 'बुड्डी' (लहान मडके) बांधतात. त्यात निरा गळते. निरा ही ताकासारखाच पांढरी व गोड असते. उन्हाळी लागली तर निरा प्यायला देतात. कारण निरा 'थंडी' असते. गरोदरपणात लघवीत 'अंगार' (आग) झाली, पांढरे पाणी जात असेल किंवा उष्णतेमुळे अंगावर, योनीत फोड आले असतील तर मुद्दाम निरा प्यायला देतात.

कोवळ्या शिंदीच्या झाडाचा ताजा गाभा खातात. हा गाभा मुळ्यासारखा पांढरा-सफेद राहतो. याला हवा लागली तर 'कडसर' (कडवट) लागते.

गोरगा

ताड
Family Palmae (Variety of ताड)

ताडाच्या झाडाचाच हा एक 'परकार' (प्रकार) आहे. झाड खूप उंच व मोठे, दिसायला फार सुंदर असते. झाड वाढायला बरीच वर्षे लागतात. बी लावल्यावर जवळपास एका वर्षाने त्यातून रोप उगवते. जंगलात 'माड्याच्या' (माडिया गोंड आदिवासी) घरी हे झाड बहुतेक असतेच कारण ते फार उपयोगी आहे. बाया म्हणाल्या, ''एक गोरगा एका कुटुंबाला बारा मास पोसते.''

गोरग्याच्या झाडाला गाभा वाळवून, त्याची 'भुकनी' (पावडर) करुन त्याची आंबील बनवतात. त्याला सोजीसारखे शिजवून किंवा भाकऱ्या बनवून खातात. दुष्काळात 'माड्या'

लोकांना गोरग्याचाच आधार असतो.

आंबील बनवायला गोरग्याच्या गाभ्याची जी भुकटी बनवतात, ती एकदम बारीक पाहिजे. 'वस्त्रगाळ' किंवा 'लिहीनगाळ' (म्हणजे फडक्यात गाळून) भुकटी बारीक बनवतात. समजा ही भुकटी जाड राहिली व सालीची 'शिलीक' (शिलक) पोटात गेली तर ती पोटातून फुटून बाहेर येते.

गोरग्यापासून दारू काढून पितात. गोरग्याच्या झाडाची पाने घराच्या छपरावर टाकतात.

सूर्या

Xylia xylocarpa, Roxb

मोठा वृक्ष असतो. याचे लाकूड मजबूत असते. मोठ्या लाकडाचा घरासाठी काड्या-फाटे, बैलबंडीचे धुरे, दरवाजे-खिडक्या, टेबल-खुर्च्या बनवायला उपयोग करतात. लहान काड्या जाळण्यासाठी वापरतात.

कुंबी

कुंभी
Careya arborea

मोठा वृक्ष असतो. या झाडाच्या सालीपासून 'वाक' (दोरी) काढतात. या वाकाने 'टेंभराचे' (तेंदुचे) पान बांधतात. लहान झाडाचे कोवळे पान शेळ्या, बकऱ्या, ढोरे खातात. लालसर-पांढरे सुगंधी फुले लागतात. याची फळे बेलफळासारखे मोठी असतात.

'झांव' (उन्ह) लागली तर फळ पाण्यात घासून हाता-पायाला, छातीला लावतात. फळ आणून शेणाच्या गोवऱ्यांच्या ढिगात, काड्यात (लाकडात) ठेवतात. त्यामुळे साप येत नाही असा समज आहे.

महादेवाच्या पूजेसाठी या झाडाची फुले फार महत्त्वाची असतात. 'मार्कंड्याला' (गडचिरोली जिल्ह्यात वैनगंगेच्या किनारी या गावात महादेवाचे खूप सुंदर व जुने हेमांडपंथी मंदिर आहे. शिवरात्रीला इथे मोठी यात्रा भरते.) शिवरात्रीला फुले वाहतात.

बाकावी

बकनिंब
Melia azedarach

या झाडाला काही जण 'बकनिंब' किंवा कवडचानिंबपण म्हणतात. मोठे झाड असते. झाडाची वाढ लवकर होते. या झाडाची पाने कडूलिंबाच्या पानांसारखीच दिसतात. पण यांचा आकार थोडा मोठा असतो. हे झाड साधारणपणे कुंपणाला लावतात. फांद्या जाळण्यासाठी वापरतात.

एखाद्या बाईला किंवा पुरुषाला जास्त उष्णता असल्यास, या झाडाचा पाला कुटून त्याच्या

रसात खडीसाखर किंवा दही टाकून प्यायला देतात.

एखाद्या बाईला 'पदर' (पाढरे पाणी) जात असल्यास, पाला कुटून, त्याच्या रसात खडीसाखर व जिरे टाकून देतात.

जनावरांना कुठलाही आजार झाला की या झाडाच्या पानांचा रस पाजतात. सारे किडे मरून जातात.

बोरासारखी लहान फळे लागतात. लहान मुले या फळांसोबत खेळतात व पाखरे ही फळे खातात.

खैर

खैरा
Acacia catechu

मोठा वृक्ष असतो. लाकूड फार मजबूत असतो. मोठ्या लाकडापासून घरासाठी पाट्या मयाला, कपाट, दरवाजे-खिडक्या, टेबल-खुर्च्या, नांगराचा 'हरीस' (दांडी), धान्य कांडायला 'मुसळ' अशा अनेक वस्तू बनवतात. चांगल्या झाडाची लग्नात 'मुंडी' (खांब) बनवतात. (आदिवासी लोकांच्या घरात मुलाचे लग्न असल्यास वेगवेगळी चित्रे कोरून अशी मुंडी घरासमोर गाडतात. या मुंडीवरून कळते की घरात किती मुलांची लग्न झाली आहेत.) लहान काड्या जाळण्यासाठी वापरतात. या झाडाची एकही काडी वाया जात नाही.

या झाडाचा कोळसा बनवतात. या झाडापासून डिंक काढतात. हा डिंक खायला खूप छान लागतो. अनेक प्रकारचे डिंक मिळवून लोक कंगवे, छोट्या वाट्या बनवतात. पण यांना पाणी लागले तर कामातून जातात. कारण डिंक पाण्यात विरघळतो.

खैराच्या झाडाच्या सालीचा 'रांधा करून' (शिजवून) 'कथ्था' (काथ) बनवतात.

'शेरड्या' (शेळ्या) व बकऱ्या पाला खातात. शेंगा लागतात. शेंगेतलं बी फोडून नर्सरीत लावतात.

गरोदर बाईला 'खैरा धरला' (म्हणजे एक पाय कंबरेतून दुखतो व ती लंगडत चालते) तर खैराच्या झाडाची फांदी आणून दारात ठेवतात व येता जाता तिला ही फांदी ओलांडायला सांगतात.

खैराचे फळ माणसे, पाखरे कोणीच खात नाही. कारण सीतामाईची सासू तिला 'वनवास करायची' (छळायची). काहीच खाऊ द्यायची नाही. एकदा सीता माईला खैराचे फळ खाताना सासूने पाहिले. रागाने तिच्या सासूने फळांवर लाथ मारली. तेव्हापासून हे फळ विषारी झाले, खाण्याच्या योग्य राहिले नाही. म्हणून सुनेला छळू नये.

धामणी

धामण
Grewia tiliaefolia

मोठा वृक्ष असतो, पण वेलासारख्या फांद्या लटकतात. या फांद्या सापासारख्याच दिसतात.

म्हणून या झाडाचे नाव 'धामणी' आहे. लाकूड मजबूत असते. घर बांधायला व शेतीचे अवजार बनवायला याचे लाकूड कामी येते. काड्या जाळण्यासाठी वापरतात. या झाडापासून 'वाक' (दोरी) काढतात. ढोर, 'शेरड्या' (शेळ्या) बकऱ्या पाला खातात. हिवाळ्यात फळे लागतात. कच्चे फळ आंबट व पिकलेले फळ गोड लागते; लोक आवडीने खातात. गाई-ढोरे, बकऱ्या, हरणे, 'आसोल' (अस्वल) रानम्हशी पण या झाडाचे फळ आवडीने खातात.

रक्त हगवण असल्यास या झाडाची साल पाण्यात 'कुटून' (ठेचून) देतात.

अंगावर खाज आली, 'धामणे' (पित्त) उठले तर साल पाण्यात कुटून लावतात.

या झाडाचे खोड वाळवून, त्याची 'भुकनी' (भुकटी) करून ठेवतात. पोटात कुठलही विष गेले तर ही भुकनी पाण्यात देतात. त्याने उलटी होऊन विष बाहेर पडते.

पूर्वीपेक्षा आता हे झाड जंगलतोडीमुळे जंगलात खूप कमी दिसून येते.

गराडी

Cleistanthus collinus

मोठे झाड असते. याच्या कोडाचा रंग एकदम काळा असतो. लाकूड विशेष मजबूत नसते. पण या लाकडाला बहुतेक उधळी, कीड लागत नाही म्हणून घर बांधायला, शेतीचे अवजार, टेबल-खुर्च्या, कपाट, दरवाजे, खिडक्या, बैलबंडी करायला मोठ्या लाकडाचा उपयोग होतो. याच्या फांद्या घराला 'कुंपावन' (कुंपण) करायला व जाळण्यासाठी वापरतात. प्रेत जाळायला गराडीच्या काड्या वापरतात. कारण त्या स्वस्त असतात व लवकर पेट घेतात.

ढोरे, बकऱ्या, 'शेरड्या' (शेळ्या) पाला व फळ खात नाहीत, कारण विषारी असते. साल पण 'जहरी' (विषारी) असते. थोडी जरी साल खाल्ली तरी माणूस 'ठिकते' (म्हणजे त्याची जीभ जड पडून त्याला बोलताच येत नाही.) गाई-म्हशी, बकऱ्या यांच्यापैकी कुणीही हा पाला किंवा साल खाल्ली तरी असेच होते. त्याची जीभ जड होते व तोंडातून आवाजच निघत नाही.

शेतात धान्य पेरल्यावर कीड लागू नये म्हणून गराडीची फळे व पाला शेतात फेकतात. गराडीच्या पाल्यापासून खूप चांगले 'खाद' (खत) तयार होते. त्याने पीक तर चांगले येतेच पण कीडसुद्धा लागत नाही.

किनी

किन्ही

Albizzia procera

मोठा वृक्ष असतो. याचे मोठे लाकूड घरासाठी फाटे, टेबल-खुर्च्या, कपाट, दरवाजे, खिडक्या तयार करायला वापरतात. लहान काड्या जाळण्यासाठी वापरतात.

बैलाचे किंवा माणसाचे अंग लचकले किंवा जड पडले तर, किनीची साल पाण्यात शिजवून, त्या पाण्याने शेकतात.

लकवा मारला (झाला) असल्यास, किनीची साल व आंतरसाल आणून, मडक्यात चार पायल्या पाणी टाकून 'रांधायचे' (उकळवायचे) व मग त्या पाण्याने आंघोळ करायची.

लाल रंगाचा थोडा डिंक निघतो; मुले व स्त्रिया हा डिंक खातात.

रिठा

Sapendus detergens, Sapendus mukorossi, Sapendus emarginatus

मोठा वृक्ष असतो. मोठे लाकूड घरासाठी फाटे, टेबल-खुर्च्या, दरवाजे, कपाट, खिडक्या करायला वापरतात. काड्या जाळण्यासाठी वापरतात. कोळसा, काड्यापासून तयार करतात.

फळ लागतात त्यांना 'रिठे' म्हणतात. हे फळ पाण्यात भिजू घातले तर साबणासारखा फेस निघतो. या फेसाने डोके 'घासतात' (धुतात), कपडे धुतात. रिठ्यांचा 'निरमा' (पावडर) बनवतात. याच्याने सोने-चांदी घासतात. चमक येते.

रिठ्याचे फळ वाळवून, भुकटी करून, दंतमंजन करायला वापरतात. रिठ्याने दात कुजत नाही.

रिठ्यातले बी गोल व काळ्या रंगाचे असते. या बिया गरम करून, त्याला सुईने छिद्र पाडून, दोऱ्यात ओवून, एखाद्या लहान लेकराला 'सटवी लागली असेल' (लेकरू सुकत असेल - हे कुपोषणामुळे होते - सटवीने नाही) तर किंवा तसेही, लहान लेकरांना 'नजर' (दृष्ट) लागू नये म्हणून, ही माळ गळ्यात कंबरेला बांधतात.

रिठ्याच्या झाडाच्या काड्या, रिठ्याचे मूळ व आकवलेचे मूळ सर्व घासून, एकत्र रस 'महारोग्याच्या' (कुष्ठरोगाच्या) रोगात पाजतात.

जंगलतोडीमुळे पूर्वीपेक्षा आता रिठ्याची झाडे फार कमी दिसतात. मेढ्याच्या उरकुडा आजी म्हणाल्या, ''आमचा गावचा 'निरमा' संपला व आम्ही आता बाजारचा 'निरमा' विकत घेतो.''

बिवला

बिजा

Pterocarpus marsupium

मोठा वृक्ष असतो. याचे लाकूड खूपच मजबूत असते. ''बिवल्या इतक्या झाडांचा नवरा आहे. कारण त्याचा इतकुसाही फाटा वाया जात नाही!'' ''सागवान आणि बिवला म्हणजे बहीण-भाऊ!'' ''सोने मिळेल पण बिवला व सागवान नाही; कारण या झाडांची एवढीशी काडी जर आणली तरी दंड बसतो.''

याच्या लाकडापासून घरासाठी फाटे, बंडीचे धुरे, टेबल-खुर्च्या, दरवाजे-खिडक्या, पलंग, बाजा, कपाट बनवतात.

बिवल्याचे लाकूड 'बल्ल्यासाठी' खूप प्रसिद्ध आहे. (बल्ल्या म्हणजे, घरावर कौले टाकण्याआधी वापरण्यात येणाऱ्या पाट्या किंवा कमच्या).

बिवल्याच्या फांद्या तोडताना पिवळा रंग निघतो व हा रंग कपड्याना लागला तर निघत नाही.

'परम्याचा आजार' (लिंगातून, योनीतून पू जाणे) लागल्यास बिवल्याची आंतरसाल कुटून, त्याच्या रसात खडीसाखर व जिरे टाकून देतात.

बिवल्याचा डिंक निघतो, हा डिंक काळा असतो. गोंदणेवाले हा डिंक घेऊन जातात. गोंदवताना बिवल्याचा 'गोंद' (डिंक) टाकला तर गोंदलेले निघत नाही. पूर्वी बाया खूप गोंदवून घ्यायच्या, आता मात्र गोंदवणे कमी झाले आहे.

तिवस

काळा पळस
Ougeinia oojeinensis, Ougeinia dalbergioides

हे मोठे झाड असते. याचे लाकूड मजबूत व टिकाऊ असते. त्यामुळे हे लाकूड नांगर, वखर, बैलखंडीचे चाक, बैलबंडी, घरासाठी पाट्या, 'मुंड्या' (खांब), टेबल-खुर्च्या, दरवाजे-खिडक्या, आलमाऱ्या, बाजा बनविण्याच्या कामी येते. लहान काड्या जाळण्यासाठी वापरतात.

शेळ्या-बकऱ्या पाने खातात. पूर्वीपेक्षा आता जंगलात हे झाड फार कमी दिसते. खरे म्हणजे हे झाड जंगलात जास्त उपलब्ध असले पाहिजे कारण फार उपयोगी आहे.

शेलवटी

शेंबडी
Acacia pinnata

हे मोठे झाड असते. झाडाला झुबकेच्या झुबके फळे लागतात. हिरव्या फळांची भाजी व 'रायता' (लोणचे) करतात. पिकलेले फळ खातात; ते चिकट लागते.

गरमी-परमा, धातू किंवा प्रदर जाण्याचा रोग असल्यास या झाडाची साल पाण्यात कुटून, त्याच्या अर्कात खडीसाखर व जिरे टाकून प्यायला देतात. खूप 'थंड' असते.

मेडसिंग

Helicteres isora

हे खूप मोठे झाड असते. याची काडी खूप चिकट असते. लवकर तुटत नाही. तुटायला मोठी जड! त्यामुळे एक 'काडी' (फांदी) तोडण्यात सगळा दिवस जातो. पण काडी दिव्यासारखी लवकर पेट घेते.

याच्या लाकडापासून बाजेचे ठावे, बाजेचे 'गात' (आडवे खावे), टेबल-खुर्च्या, दरवाजे-खिडक्या व घरासाठी फाटे तयार करतात.

भाजल्यामुळे जखम झाल्यास मेडसिंगाची पाने जाळून त्यांची 'मस' (राख) तेलात टाकून भाजलेल्या जागी लावतात.

टटू

टेटू
Oroxylum indicum

हा मोठा वृक्ष असतो. याच्या फुलांची भाजी करतात. झाडाला लांब शेंगा लागतात. शेंगाची पण भाजी करतात.

टटूच्या शेंगाचे 'रायत' (लोणचे) घालतात. आंब्याच्या, लिंबाच्या लोणच्यात पण या शेंगा टाकतात. टटूच्या शेंगाचे लोणचे लोक खूप आवडीने खातात. पण जंगल कटाईमुळे, पूर्वीपेक्षा आता या शेंगा खूप कमी दिसतात.

'महारोग' (कुष्ठरोग) असल्यास चण्याची डाळ भिजवून, त्यात टटूचे मूळ, चिटुकलीच्या झाडाच्या फांद्या टाकून, वाटून, गाईच्या तुपात वडे रांधून (बनवून) खायला देतात.

रावण बेल

या झाडाचा पाला व साल पाण्यात शिजवून त्या पाण्याने आंघोळ केली, अंग शेकले तर वात, सूज उतरते.

इंग्रजी चिंच

विलायती चिंच
Pithecellobium dulce

या झाडालाच 'चिंचबुलाई' पण म्हणतात. याचा मोठा वृक्ष असतो. झाडाला काटे असतात. फांद्या जाळण्यासाठी वापरतात. बकऱ्या-शेरड्या (शेळ्या) पाला खातात. उन्हाळ्यात चिंचाच लागतात. पिकल्यावर खायला खूप छान गोड लागतात. मोठी माणसे, पोरे, बकऱ्या या चिंचा खातात. काही लोक मुद्दाम या चिंचेच्या आवडीने हे झाड घरात लावतात. बी खाली पडले तर झाड 'वापते' (उगवते.)

पाकड

Ficus lacor

हा मोठा वृक्ष असतो. लाकूड जास्त मजबूत नसते. त्यामुळे नाईलाजानेच (इतर मजबूत लाकूड न मिळाल्यामुळे) हे लाकूड घर बांधायला व शेतीचे अवजार बनवायला वापरतात. फांद्या जाळण्यासाठी वापरतात.

झाडाला फळे लागतात. पिकल्यावर त्यांचा रंग काळा होतो. माणसे, पाखरे, ढोरे, वासरे हे फळ खातात. हे फळ खाण्यासाठी या झाडावर खूप पाखरे जमतात. त्यामुळे माणसांना त्यांची शिकार करणे फार सोपे जाते.

आमच्या सुईणी मला आग्रहाने सांगत होत्या, ''बाई, तुमच्या घरात पाकड लावाच. तुम्ही

नाही खात पर आम्ही तर 'कवड्या' (एक प्रकारचा पक्षी) आवडीने खाऊ!''

या झाडाला 'वांदा' (शंकहाड) असतो. हा वांदा शनिवारी आणून जाळून, त्याची मस (राख) खोबरेल तेलात टाकून, फोडांना लावतात.

या झाडाखाली 'नागोबा देव' मांडतात.

पळस पांजरा

पांजरा
Erythrina suberosa

हे मोठे झाड असते. हा एक प्रकारचा पळसच आहे. याचे लाकूड नरम असते. त्यामुळे याच्या लाकडापासून बूच, आगकाड्या व खोके बनवतात. काड्या जाळण्यासाठी उपयोगी नाही. कारण याची काडी बुडाकडे मागे जळत येते व खूप धूर होतो.

शेळ्या व बकऱ्या याची पानं खातात.

'धात' जात असल्यास (म्हणजे लघवीतून पांढरा पदार्थ जात असल्यास), या झाडावर तांदळाच्या 'अक्षदा' (अक्षता) टाकून नंतर मूळ ठेचून त्याच्या रसात खडासाखर व जिरे टाकून प्यायला देतात.

चिचवा

Albizia odoratissima, Roxb

मोठा वृक्ष असतो. लहान फांद्या जळण म्हणून वापरतात तर मोठ्या खोडाचा घरासाठी पाट्या, मयाली, दरवाजे, खिडक्या, टेबल-खुर्च्या करायला उपयोग होतो. शेळ्या व बकऱ्या याचा पाला खातात.

मोका

Schrebera swietenioides

खूप 'मोठा जात झाड' (वृक्ष) असते. लाकूड मजबूत असते.

मोठ्या लाकडाचा घर बांधण्यासाठी, बैलबंडी व शेतीची अवजारे तसेच टेबल-खुर्च्या, कपाट, दरवाजे-खिडक्या तयार करण्यासाठी 'उपवोग' (उपयोग) करतात. लहान काड्या जळणासाठी वापरतात.

सेहना

Legerstromia parviflora, Roxb

हा मोठा वृक्ष असून त्याचे उपयोग वर दिलेल्या मोका वृक्षासारखे आहेत.

इखटेंभरू

इखटेंभरू / कुचला / काजरा
Diosphyros montana, Strychnus nuxvomica

याच झाडाला काहीजण 'कुचला' किंवा काजरापण म्हणतात. मोठा वृक्ष असतो.

या झाडाची साल, बी व फळे अगदी कडू जहर असतात. पाखरेसुद्धा फळे खात नाहीत.

किरीम झाल्यास बी किंवा साल उगाळून ते खायला देतात किंवा अंगाला लावतात. त्यामुळे सारे किरीम मरतात.

कुठे जखम झाली अथवा सूज आली तर त्या जागेवर बी उगाळून लावतात.

हगवण-उलटी होत असल्यास किंवा काही कारणाने पोट दुखत असल्यास साल उगाळून देतात.

मूळव्याधीत बिया वाटून, तेलात मिसळवून 'त्या जागेवर' (गुदमुख) लावतात. बिया विषारी आहेत. अगदी प्रमाणातच दिले पाहिजे. जास्त दिल्यास 'आकडी' (झटके) येतात. विष झाल्यास उलटी करवतात, दूध-तूप खायला देतात.

कोजब

कोजबी / कुसुम
Schleichera oleosa

या झाडाला कोजबा किंवा कोजबी म्हणतात. मोठा वृक्ष असतो. उन्हाळ्यात हे झाड हिरवेगार असते. त्यामुळे उन्हाळ्यात या झाडाची जंगलात खूप छान सावली असते. जंगलात वाघ बहुतेक या झाडाखाली बसून राहतो. कारण हे झाड खूप थंड असते.

याचे लाकूड खूप मजबूत असते. याच्या लाकडापासून नांगर, घरासाठी पाट्या, 'मुंड्या' (खांब), टेबल-खुर्च्या, दरवाजे-खिडक्या, कपाटे बनवतात. लहान काड्या जाळण्यासाठी वापरतात.

कोजबाची पाने ही टेंभराच्या पानांच्या पुडक्यात, ते खराब होऊ नये म्हणून टाकतात. तसेच, मोह चांगले राहावे म्हणून कोजबीच्या पानांच्या पत्रावळी मोहात 'दडपून' (घालून) ठेवतात.

कोजबाला फळे लागतात. फळे खातात. कोजबाच्या फळांना एरंडी भाजल्यासारखे भाजून त्यातून तेल काढतात. कोजबीचे तेल स्वयंपाकात फोडणी द्यायला, अंगाला - डोक्यात खांडक-फोडे झाले तर तिथे लावायला वापरतात. अंगाला 'दव फुटल्यामुळे' (थंडीमुळे) हात-पाय 'खाल्ले' (चामडी फाटली) तर कोजबीचे तेल लावून चोळतात.

पिंगला

या झाडाला फळे लागतात. बैलाला-ढोराला एखादा आजार झाला तर या झाडाचे कच्चे

आणि पिकलेले अशी दोन्ही फळे व या झाडाची साल ठेचून त्याचा अर्क पाजतात.

भोवरी

भोवर

Garuga pinnata

मोठा वृक्ष असतो.

'भोवर' (भोवळ) येऊ नये म्हणून या जाडाची साल कुटून देतात.

दोडांची व पानांची भाजी करतात. आधी पाण्यात उकडून, पाणी पिळून, फेकून देतात व मग 'तुडपुडी' (मोकळी) भाजी बनवतात. छान लागते.

झाडाला शेंगा लागतात. त्यात चापट मण्यासारख्या बिया असतात.

भोवळ (चक्कर) येऊ नये म्हणून या बिया दोऱ्याला बांधून ते गळ्यात घालतात किंवा कानाला बांधतात.

दुसरा उपाय म्हणजे बिया कुटून खायला देतात किंवा पाण्यातून देतात.

'झाडा' (शौचाला) नाही झाला तर बिया जाळून, त्याची 'मस' (राख) पाण्यातून प्यायला देतात.

खिरणी

Wrightia tomentosa, Manilkara hexandra

मोठा वृक्ष असतो. याचे लाकूड जास्त मजबूत नसते. काड्या जाळण्यासाठी वापरतात.

खिरणीच्या काडीला खडे असतात. चौदा खड्यांची काडी हातात धरायला छान असते. म्हातारे लोक खिरणीची काडी आधारासाठी हातात घेतात. या काडीला 'घोडा' म्हणतात.

खिरणीची छोटीशी तरी फांदी - लाकूड नेहमी घरात ठेवतात. त्यामुळे घरात दैत-भूत येत नाही असा समज आहे.

कोणाला भूत लागलं तर त्याच्या हातात खिरणीची काडी धरायला देतात. खिरणीच्या झाडाची साल त्याच्या गळ्यात व हाताला बांधतात आणि खिरणीची काडी घरात पण आणून ठेवतात. खिरणीच्या झाडाचा पाला ढोर--बकऱ्या खातात.

गोड फळांना खिरण्या म्हणतात. माणसे, पाखरे खिरण्या आवडीने खातात. बाळंतिणीला दूध येण्यासाठी खिरण्या खायला देतात.

या झाडापासून दूध निघते. किरीम झाल्यास हे दूध पाजतात.

किरीम झाल्यास खिरणीच्या झाडाची साल कुटून त्याचा रस पाजतात.

अंगात कुठे 'दुख भरला' (लागले, लचकले) तर साल कुटून, तिचा रस गाईच्या दुधात प्यायला देतात. तसेच खिरणी, मोह व पळस यांच्या साली एकत्र ठेचून व शिजवून त्याचा लेप लावतात.

बीपासून नवीन झाड उगवते. पूर्वीपेक्षा आता हे झाड जंगलात खूप कमी दिसते!

करकरी

Gloriosa superba

मध्यम आकाराचे झाड असते. याच्या बुडाशी कांदा असतो. हा कांदा खूप 'जहरी' (विषारी) असतो. तो खाल्ला तर माणूस मरतोच! नवरा सोडायचा असला तर 'बाई' (बायको) कांदा आणून, जेवणात नवऱ्याला देते.

पायाला, हाताला किंवा 'खाकेत' (काखेत) सूज अथवा फोड आल्यास, करकरीचा कांदा ठेचून तिथे बांधतात. बसले तर बसते नाहीतर फोड फुटून त्यातून रक्त व पू निघते.

या झाडाला पिवळी सुंदर, मोठी फुले लागतात. पूजेच्या कामी येतात. फुलेपण विषारी असतात. त्यामुळे आणून, धुवून फडक्यात गुंडाळून ठेवतात. मुलाबाळांच्या हाती फुले लागू देत नाहीत.

गणपती बसतो तेव्हा गणपतीला ही फुले वाहतात. पोळ्याच्या वेळी बैलाच्या शिंगाला ही फुले बांधतात. गावात पाटलाच्या बैलजोडीला ही फुले 'बराबर' (हमखास) असतात.

गाणे

पोळ्याच्या दिवशी बहुतेक मुले हे गाणे म्हणतात -

करकरीचा फूल पोरी सोना-पिवळा,
होशील माझी बायको तर घडीन 'तानोडा'!!
(तानोडा म्हणजे कानातल्या बिऱ्या किंवा 'टॉप' (टॉप्स)

आजन

आंजन

Hardwickia binata

मोठा वृक्ष असतो. याचे लाकूड फार मजबूत असते. त्याच्यापासून टेबल-खुर्च्या, दरवाजे-खिडक्या, बाजा, घरासाठी पाट्या, मयाली, 'मुंड्या' (खांब), आलमाऱ्या, झोपडीसाठी खांब, वखर, बैलबंडी अशा अनेक वस्तू बनवतात. फांद्या जाळण्यासाठी वापरतात. नर्सरीत मुद्दाम आजनाची रोपे तयार करतात कारण याचे लाकूड फार मजबूत असते.

झाडाच्या वाळलेल्या सालीचा भुरका करून किंवा ओली साल कुटून तेलात भाजलेल्या जागी लावतात. एकदम दुरुस्त होते.

कुणाला कुऱ्हाड लागली, 'घाव' (जखम) झाला तर वाळलेल्या सालीचा भुरका करून किंवा ओली साल कुटून त्यात धणे व हळद टाकून जखमेत भरतात. जखम भरून येते.

बैलाच्या पायाला दुखापत झाली तरी, बैलाचे पाय दुखू नयेत म्हणून आजनाच्या सालीने शेकतात.

ढिवर लोक आजनाच्या झाडावर कोसा वाढवतात.

आजनचे फळ खात नाहीत.

सीतामायला खूप सासुरवास होता. तिची सासू तिला काहीच खायला द्यायची नाही. त्यामुळे बिचारी सीतामाय जंगलात जाऊन आजनाची फळे वेचून आणून खायची. तिच्या सासूची तिच्यावर हजर होतीच. सासू बघतच होती की जेवण नाही दिला तरी ही सीता अशी कशी 'बाकी' (चांगली) दिसते! तिने लपून पाहिले व एक दिवस तिला सीतामायच्या ओटयात आजनाचा फळ दिसला. रागात सासूने ओटयावर लाथ मारली तर ते फळ एकदम जहरीच झाले. तेव्हापासून आजनाचे फळ माणसं, पाखरं, जनावरं कोणीच खात नाहीत.

(हीच गोष्ट येनाचे फळ व रोहणच्या फळांसाठीपण आहे. त्यामुळे येन, आजन व रोहणचे फळ खाण्याच्या कामाचे नाही.)

कवठ

Limonia acidissima, Feronia elephantum

मोठा वृक्ष असतो. याच्या फळांना कवठ म्हणतात. या झाडाचे सरळ खोड असल्यास त्यापासून घरासाठी पाट्या, टेबल-खुर्च्या, दरवाजे-खिडक्या बनवतात. वेड्यावाकड्या काड्या जाळण्यासाठी वापरतात.

कवठाचा कोवळा पाला खातात. हा पाला चवीला शुद्ध ओव्यासारखा लागतो. तोंड 'तुपट' (तूप खाल्ल्यासारखं) होते. कवठाचा पाला खाल्ला तर पोटातले सारे जंतू मरून जातात, किरीम होत नाही. अजीर्ण झालं, 'पोट फुगारा आला' (पोट गॅसेसने फुगलं) तर कवठाचा पाला खातात; पोट एकदम साफ होतं. पाला कुटून त्याचा रस थंडाई म्हणून, 'उन्हाळीत' प्यायला देतात. कवठाचा पाला कपड्यात गुंडाळून, तव्यावर गरम करून त्याने अंग शेकल्यास किरीम पडतात. 'दोषिक उठल्यास' (म्हणजे वेड्यासारखे करणे, वागणे), कवठाचा पाला, कोसा, मोराचे पंख व वावडिंग सर्व एकत्र जाळून त्याची राख मधात टाकून चाटायला देतात.

अनेक 'दवाईं'च्या (औषधांच्या) काढ्यात वैद्य कवठ व कवठाचा पाला टाकतात.

कच्च्या कवठाची भाजी करतात. पिकलेल्या कवठाची चटणी, मुरांबे करतात. पिकलेले कवठही खातात. गरोदर बायका व पोरंबाळं आवडीने पिकलेले फळ खातात. आंबट-गोड छान लागतात. माकडे, हरणे, 'आसोल' (आस्वल) आवडीने कवठे खातात.

गाणे

एका गरोदर बाईला कवठ खाण्याचे डोहाळे लागले आहेत.
तिची सखी तिला म्हणते -
पहिल्याने गरवार (गरोदर), आवड झाली कवठाई!
तुझ्या पिरतीचा (प्रेमाचा) शाई (नवरा), शोधलो आंबराई (जंगलात)!!

करंजी

करंज
Pongamia pinnata, Pongamia glabra

याच झाडाला काही जण 'करंजी पिपर'पण म्हणतात. झाड मोठे असते; काही झाडे उंच वाढतात तर काही 'घेरेदार' (गोल)! याचे लाकूड फार टिकाऊ नसते. काही जण याच्या लाकडापासून बैलगाडीची चाके बनवतात. याच्या फांद्या जाळण्यासाठी वापरतात. हे झाड सावलीसाठी खूप उपयोगी आहे. उन्हाळ्यात एकदम हिरवेगार दिसते व लवकर वाढते. त्यामुळे लोक मुद्दाम हे झाड लावतात. उदा. चौकात, रस्त्याच्या बाजूला, जिथे सावली नाही तिथे, बस स्टँड, रेल्वे स्टेशन. करंजीची झाडे पूर्वीपेक्षा आजकाल जास्त दिसतात कारण बऱ्याच ठिकाणी मुद्दाम लावली जातात.

या झाडाची साल पाण्यात टाकून ते पाणी गरम करून त्याने 'आंग धुतल्यास' (आंघोळ केल्यास) वात व अंगावरची सूज कमी होते.

'खांडूक' (फोड, बेंड) झाले, कुऱ्हाड बसली तर करंजीची साल वाळवून किंवा तशीच ओली ठेचून लावली तर एकदम 'बसून जाते' (फायदा होतो).

बैलांचा पाय मोडला तर करंजीची साल पाण्यात भिजवून, गरम करून त्या गरम पाण्याने शेकतात. साल पाण्यात शिजवून, ती साल हाड मोडलेल्या जागी बांधतात. 'सारं दुख ओढून घेते' (सारे दुखणे कमी होते).

पाला कुणीच - मुले, ढोर, शेळ्या, बकऱ्या खात नाहीत. अंगात कुठे दुखत असेल, फोड झाले असतील तर त्यावर पाला वाटून बांधतात. तापात या पाल्याचा रस पाजतात. मूळव्याधीत करंजीचा पाला जाळून त्याची 'मस' (राख) ताकात प्यायला देतात.

बाळंतपणानंतर ताप आल्यास (बाळंतज्वर) करंजीची पाने किंवा बिया जाळून त्यांची 'मस' (राख) तेलात टाकून खायला देतात.

या झाडाला करंजीच्या आकारासारखीच फळे लागतात. हे फळ खूप कडू असते. मुले या फळांसोबत खेळतात. या फळाच्या आत भरपूर चिक्की असते, बेलफळासारखीच! त्यामुळे यापासून चांगले तेल निघते. करंजीचे तेल दिव्यात वापरतात.

खांडके - फोड झाले तर त्यावर करंजीचे तेल लावतात. 'वायवाताचा' (संधीवाताची) आजार असल्यास, अंगावर सूज असल्यास, दम्याचा त्रास असल्यास किंवा 'लहाक सुटली असल्यास' (धाप लागली असल्यास) करंजीच्या फळांचा 'कशा' (काढा) करून प्यायला देतात.

धावडा

धावडी
Anogeissus latifolia

मोठा वृक्ष असतो. हे झाड खूप उंच वाढते. याचे लाकूड मजबूत असते. मोठ्या लाकडापासून घरासाठी पाट्या-मयाली, टेबल-खुर्च्या, दरवाजे-खिडक्या, आलमाऱ्या, शेतीचे

अवजार बनवतात. लहान फांद्या जाळण्यासाठी वापरतात.

अंगाला खाज आली, 'धामे' किंवा 'धवडे' (पित्त) आले तर धावडीच्या झाडाची साल उगाळून लावायची. थंड असते, गारगोटीसारखी!

मुलाला लघवीच्या जागी खाजवून सूज आली तर धावडीच्या सालीचा गंध त्या जागेवर लावतात.

या झाडापासून निघणारा डिंक खातात.

गाणे

लक्ष्मणाने सीतेला वनवासात सोडून आल्यावर, दु:खाने राम लक्ष्मणाला म्हणतो -

हाय हाय रे लक्ष्मणा,
कोण्या वनात सोडला सीतेला?
वाघ दिसला जंगलात तर,
येन-धावडे स्वर्गाला जाती,
ससे खोडाशी दडती,
मेल्या आस्वली गुरगुरती,
हरणी चमकत पाण्यावर जाती,
ढोरे-वाग डकरती,
भुई चिलाटी खाली घोरती!!

शेवडोर

Debergia paniculata

'मोठा जात' (खूप मोठं) झाड असते. खोड मोठं व हलके असते. त्यामुळे त्याचा डोंगा करतात.

काही लोक मोठ्या खोडाचा वापर घरासाठी पाट्या, कपाटे, टेबल-खुर्च्या, दरवाजे, खिडक्या, शेतीची अवजारे इत्यादी बनवायला करतात.

काड्या जाळण्यासाठी वापरतात कारण त्या लवकर जळतात.

मुंगणा

शेवगा
Moringa oleifera, Moringa pterygosperma

यालाच 'शेवगा'पण म्हणतात. मोठे झाड असते. मोठ्या खोडाचा घरासाठी शिवार-फाटा टेबल-खुर्च्या बनवायला वापर करतात. लहान काड्या जाळण्यासाठी वापरतात.

उचक्या लागल्यास मुंगण्याचे मूळ पाण्यात शिजवून ते पाणी पाजतात.

लघवीतून रक्त जात असल्यास झाडाची साल कुटून त्याचा रस प्यायला देतात.

स्त्री व पुरुष दोघांच्या लघवीच्या जागी सूज आल्यास सालीचा अर्क काढून पाजतात.

साप चावल्यास या झाडाची साल कडू दोडके व रिठे एकत्र वाटून त्याचा रस पाजतात.

नारू झाल्यास झाडाची साल कुटून बांधतात.

या झाडाचा पाला खात नाहीत. पांढरी फुलं लागतात. कान फुटल्यास फुलांचा रस कानात टाकतात.

झाडाला लांब शेंगा लागतात. या शेंगांना 'उतार' मानतात. 'उतार' म्हणजे या शेंगा खाल्ल्यावर इतर काहीही औषध-इंजक्शन घेतले की ते 'उतरून' जाते, लागू पडत नाही. त्यामुळे बहुतेक लोक या शेंगा खात नाहीत. खाणारे लोक मात्र, शेंगांची भाजी करून खातात.

बहुतेक स्त्रियांनी सांगितले, ''या शेंगा व कारले, दोन्ही एकत्र शिजवून खाल्लं तर माणूस मरतोच. एकदम जहरी आहे. जीभ आठरून जाते (जड पडते). एखाद्या बाईला नवरा सोडायचा असला तर हा उपाय एकदम गुणकारी आहे.''

या झाडाजवळ खूप मुंगळे राहतात. त्यामुळे घराच्या एकदम जवळ हे झाड राहू देत नाहीत.

भेरा

भेरा
Chloroxylon swietenia

हा मोठा वृक्ष असतो. भेराचे लाकूड अतिशय मजबूत असते. याच्या लाकडापासून घरासाठी फाटे, टेबल-खुर्च्या, कपाट, दरवाजे-खिडक्या, बाजांचे (पलंगाचे) ठावे, नांगर, बैलबंडीचे चाक अशा अनेक वस्तू तयार करतात. लहान लहान फांद्या जाळण्यासाठी वापरतात.

डोके फार दुखत असल्यास, भेऱ्याच्या झाडाचा पाला लहान मुलाच्या 'पिशाबीत' (लघवीत) शिजवून त्याचा लेप डोक्याला लावतात आणि वरून त्याला एरंडीचे तेल लावून, गरम करून डोक्याला त्याचा टोप बांधतात.

काकई

कल्लोड
Gmelina indica, Flacourtia ramontchi

या झाडाला काहीजण 'कल्लोड'पण म्हणतात. झाड मोठे असते पण काकईचे झाड हे कसईच्या झाडापेक्षा लहान असते.

झाडाला काटे असतात. याचा काटा खूप 'टॉनिक' असतो. 'गडला' (रुतला) तर खूप दुखते म्हणून कुंपण करायला लोक हे झाड वापरत नाहीत.

या झाडाचे लाकूड मजबूत असते. पाण्यात कुजत नाही. काड्या जाळण्यासाठी वापरतात.

उन्हाळ्यात फळे लागतात. त्यांना 'काकया' म्हणतात.

हिरवे (कच्चे) फळ 'बटर बटर' (कडवट) लागते. पिकलेले फळ गोड असल्यामुळे खातात.

कई

Strychnos potatorum

हे मोठे झाड असते. हे झाड विषारी असते. या झाडाचे मूळ आणि फळे पाण्यात टाकले तर 'मच्छी' (मासोळ्या) मरून वर येतात व मग ढिवर लोक त्या मासोळ्या पकडतात.

अटई

आटई
Dolichandrone Falcata

हे मोठे झाड असते. या झाडाच्या शेंगा खूप 'आरट-पिरट' (वाकड्या) असतात. म्हणूनच हे नाव पडलं.

हगवण - उलटी असल्यास व किरीम झाल्यास या झाडाची 'वारलेली' (वाळलेली) शेंग पाण्यात घासून ते गंध चाटायला देतात.

काड्या जाळण्यासाठी वापरतात. शेळ्या-बकऱ्या पाला खातात.

या झाडापासून 'वाक' (दोर) काढतात. वाकापासून शिक, दावे बनवतात तसेच पावसाळ्यात पांघरण्याचे मोरे बांधतात.

दहीवरस

खूप मोठे झाड असते. याचे लाकूड फार मजबूत असते. मोठ्या लाकडाचा, घरासाठी पाट्या, शेतीची अवजारे, टेबल-खुर्च्या, कपाट, दरवाजे, खिडक्या बनवायला वापर करतात. लहान फांद्या जाळण्यासाठी वापरतात.

पलंग

Heterophragma quadriculare, Roxb

ह्या मोठ्या वृक्षाचे दहीवरसासारखे आहे.

हिंगणा

Balanites aegyptica

हा मोठा वृक्ष असतो. याचे लाकूड फारच मजबूत असते. मोठ्या लाकडापासून घरासाठी फाटे, बाजी, बैलबंडी, नांगर-वखर, टेबल-खुर्च्या, कपाट, दरवाजे-खिडक्या बनवतात. लहान काड्या जाळण्यासाठी वापरतात.

याच्या फळांचे कवच खूप कडक असते. कुऱ्हाडीने हे कवच फोडले तर आतून पिवळ्या बिया निघतात. त्या खूप कडू असतात.

हगवण झाल्यास, किरीम झाल्यास या बिया पाण्यात उगाळून ते गंध चाटायला देतात. याच्या बिया व सुपारी कुटून किंवा तसच कपड्यात बांधून त्याच्या पोतल्या बनवतात. या पोतल्या पाण्यात उकळवून बाळंतीण बाईला थंडी होऊ नये म्हणून खायला देतात.

हिरंजा

हा मोठा वृक्ष असतो. मोठ्या लाकडाचा उपयोग घरासाठी पाट्या मयाली, शेतासाठी नांगर-वखर, बैलगाडी, टेबल-खुर्च्या, बाजा (पलंग), दरवाजे-खिडक्या बनवायला करतात. लहान काड्या जाळण्यासाठी वापरतात.

शिवण

Gmelina arborea

हा मोठा वृक्ष असतो. या झाडाचे लाकूड चांगलेच 'निगट' (मजबूत) असते. बैलबंडी बनविण्यासाठी शिवणचा लाकूड फार चांगला आहे. तसेच शिवणच्या लाकडापासून शेतीचे अवजार, घर बांधायला फाटे-मयाली, टेबल-खुर्च्या, पलंग, दरवाजे-खिडक्या तयार करतात. लहान काड्या जाळण्यासाठी वापरतात.

निरगुडी

Vitex negundo

हे मोठे झाड असते. निरगुडीच्या काडीचा दातण करतात. छान असते.

वायवाताचा आजार असेल किंवा अंगावर सूज असेल तर निरगुडीचा पाला पाण्यात शिजवून त्या गरम पाण्याने आंघोळ करतात, शेकतात व थोडे पाणी पितातसुद्धा!

गरोदर बाईच्या अंगावर सूज आल्यास निरगुडीचा पाला पाण्यात टाकून गरम करून त्या पाण्याने आंघोळ करतात, शेकतात व थोडे पाणी प्यायला देतात.

अंग जड आले असेल किंवा ताप आला असेल तर निरगुडीचा पाला, टाकरचा पाला, आकवलचा पाला, आंब्याची पाने, मीठ, हळद, सर्व एकत्र करून पाण्यात टाकतात व गरम करून त्या पाण्याने पूर्ण अंगाला वाफ देतात. ही वाफ अंगात जिरून हलकेपणा येतो.

कटउंबर

Ficus hispida linn

हे मोठे झाड असते. या झाडाच्या पानांची पत्रावळ करून, त्याला एरंडीचे तेल लावून गरम करून डोके दुखत असल्यास डोक्याला बांधतात - हवा लागू नये म्हणून!

झाडाला फळे लागतात. या फळांची कापून भाजी करतात. वायवाताचा विकार असल्यास दम, खोकला, ताप लवकर बरा होत नसल्यास फळांच्या फोडी करून मोहात शिजवून खातात.

'अवसेच्या' दिवशी, या झाडाच्या पानांची पत्रावळ करतात. पत्रावळीची पूजा करून त्यावर मेलेल्या माणसाला 'जवू' (जेवण) वाढतात.

चिलाटी

Mimosa hamata

हा झुडुपी वृक्ष असतो. झाडाला काटे असतात त्यामुळे या झाडाच्या फांद्या 'कुप' (कुंपण) करायला वापरतात. फांद्या जाळण्यासाठी वापरतात. गुलाबी रंगाची फुले येतात वा नंतर शेंगा लागतात. भाजल्यामुळे झालेली जखम एकदम भरून येते. वेळेवर मूळ मिळेल की नाही म्हणून मूळ आणून, वाळवून, चुरा करून ठेवतात व कुणाला भाजले तर हा चुरा खाण्याच्या तेलात मिसळून लावतात.

हेटी

Sesbania grandiflora

उंच व मोठे झाड असते. हे झाड फार झपाट्याने वाढते. याला पांढऱ्या रंगाची सुंदर फुले लागतात. या फुलांचे भजे, 'तुडपुडी' (मोकळी) भाजी, 'दारभाजी' (दाळभाजी) व चून (पिठले/बेसन) करतात. लांब शेंगा लागतात. शेंगाची पण भाजी बनवतात. या झाडाच्या पानांची पण मोकळी भाजी कांदे टाकून किंवा बेसन लावून बनवतात.

शेळ्या, बकऱ्या, ढोर-वासरे पाला, फुले व शेंगा खातात.

हे झाड लवकर वाढते. कुंपणाला लावतात.

फुले देवाला वाहतात. महादेवाला हेटीचे फूल फार प्रिय आहे.

आमटी

हा मोठा वृक्ष असतो. या झाडाची पाने शिसमच्या झाडाच्या पानांसारखीच दिसतात; पण शिसमचे पान आकाराने लहान पण आमटीचे मोठे असते.

या झाडाचे लाकूड मजबूत असते. मोठ्या लाकडाचा, बैलबंडी, बंडीचे बुधले (चाक) घरासाठी काडीफाटा, टेबल-खुर्च्या, दरवाजे-खिडक्या, बाजा व आलमाऱ्या बनवायला उपयोग होतो. लहान फांद्या जाळण्यासाठी वापरतात.

ढोर-वासरे, बकऱ्या-शेरड्या (शेळ्या) पाला खातात. याच्या पानांपासून चांगले 'खाद' (खत) तयार होते.

शिरीष

Albizia lebbeck, Mimosa lebbeck

मोठा वृक्ष असतो. याची थंडगार सावली असते. उन्हाळ्यात आणि इतर वेळी पण आपण या झाडाखाली उभे राहिलो असताना झाडातून आपल्या अंगावर पाण्याचे थेंब पडतात.

याचे लाकूड मजबूत असते. पण त्याला उधळी व कीड लवकर लागते; तरी पण काही लोक लाकूड मजबूत असल्यामुळे घर बांधायला, शेतीचे अवजार, टेबल-खुर्च्या, दारे-खिडक्या तयार करायला त्याचा उपयोग करतात. लहान काड्या जाळण्यासाठी वापरतात. पण याच्या काड्या चांगल्या जळत नाही; धूर होतो.

ढोर-वासरे पाला खातात. उन्हाळ्याच्या सुरवातीला खूप सुंदर फुले लागतात फुलांना फार सुंदर सुगंध असतो.

पक्षी शेंगा खातात.

अनेक पाखरे या झाडावर घर करतात. पूर्वीपेक्षा आजकाल हे झाड जास्त दिसून येते; कारण रस्त्याच्या बाजूला सरकार हे झाड लावते.

करंब

कळंब / कदंब

Mitragyna parvifolia, Stephegyne parvifolia

याला 'करंब' किंवा 'कदंब' म्हणतात. हा मोठा वृक्ष असतो. याचे लाकूड फार मजबूत असते; पाण्यात सोबत होत नाही. या लाकडापासून घराचे फाटे-मयाली, मुंड्या (खांब), टेबल, खुर्च्या, आलमाऱ्या, दरवाजे-खिडक्या, बाजा, बैलबंडी, नांगर, वखर लाकडाचे ताट, चमचे, भांडे अशा अनेक वस्तू बनवतात. लहान काड्या जाळण्यासाठी वापरतात. काडी खूप छान जळते. सालीपासून वाक (दोर) काढतात.

ताप येत असल्यास, पोटात मुरडा होऊन दुखत असल्यास, साली पाण्यात शिजवून, त्याचा 'कशा' (काढा) पितात.

अंग-पाय दुखत असल्यास, वायवाताचा विकार असल्यास साल पाण्यात शिजवून, त्या पाण्याने शेकतात.

फुले व फळ एकत्र असते. पावसाळ्याच्या सुरुवातीस हिरवट रंगाचे सुंदर फळ लागते. 'सुवास' असतो. कच्चे फळ हिरव्या रंगाचे व वाळलेले फळ काळ्या रंगाचे दिसते. कच्चे फळ काटवलीसारखे दिसते. पण आकाराने गोल असते. कच्च्या फळांची भाजी, चटणी बनवून खातात.

कळंबाचे झाड म्हणजेच कृष्ण भगवानाचे झाड आहे.

कळंबाचे फूल देवाच्या पूजेत वापरतात. महादेवाला हे फूल फारच आवडते असे मानतात.

घोगर

Garuga pinnata (Roxb)

मोठा वृक्ष असतो. साधारणपणे नाल्याकाठी हे झाड दिसून येते. याचे खोड पांढुरक्या राखट रंगाचे असते. याच्या खोडापासून ढोलक्या, 'टापर' (एक प्रकारचे वाद्य) बनवतात. काड्या जाळण्यासाठी वापरतात. फळे खातात.

'नव्याच्या' (नववर्षाच्या) अवसेला या झाडाच्या पानांची पत्रावळ 'लावून' (बनवून) त्याचा पूजा करून, त्यात वाडवडिलांच्या नावाने जेवण वाढून, घराच्या छपरावर ठेवतात. जेवणात गव्हाची 'रोटी' (पोळी), मासळीची 'कडी' (कढी) व दोडके ठेवतात. याला 'कागोरी टाकणे' म्हणतात. मग त्याला कावळा येऊन शिवतो व त्यानंतर घरचे सर्व लोक जेवण करतात.

काकड

भोकर

Cordia dichotoma

मध्यम आकाराचे झाड असते. नदी-नाल्याकाठी विशेष दिसून येते. अंग दुखत असल्यास, लचक भरली असल्यास या झाडाची साल पाण्यात ठेचून, त्याचा रस पाजतात. भूक लागत नसल्यास, ताप आल्यास, या झाडाच्या सालीचा किंवा पानांचा काढा करून पाजतात. डोके दुखत असल्यास, फोड झाल्यास, काही व्रण (जखम) झाल्यास, या झाडाची पाने वाटून लावतात. याला फळे लागतात. कच्च्या फळाचे लोणचे घालतात. गजकर्ण झाल्यास बिया वाटून लावतात. 'पान लागले' (साप चावला) तर वैद लोक या झाडाची औषधी देतात. पिकलेली फळे खातात.

माली

डिकामाली

Gardenia gummifera, Gardenia resinifera

माली व डिकामाली एकच झाड आहे. मध्यम आकाराचे झाड असते. याची काडी 'निगट' (घट्ट) असते; लवकर मोडत नाही. त्यामुळे याचे 'कुप' (कुंपण) तयार करतात.

मालीची फांदी ज्योतीवर किंवा दिव्यावर गरम करून थंड पाण्यात टाकून हलवली तर त्यातून पिवळ्या-पिवळ्या टिकल्यांसारखं पडते. या टिकल्या हळदीसारख्या पिवळ्या दिसतात. पोरी-बाळी चांगलं दिसण्यासाठी या टिकल्या कपाळाला लावतात.

गावठी जनावरे मालीचा पाला खात नाही. अर्धे डोके दुखत असल्यास, 'दोषिक उठला असल्यास' (पागलसारखे करीत असल्यास) मडक्यात लहान मुलाची लघवी घेऊन त्यात मीठ व मालीचा पाला टाकून, शिजवून, डोक्याला त्याचा टोप बांधतात.

मालीच्या झाडापासून तेल निघते. 'किरीम' झाले तर मालीचे तेल अंगाला, पायाला, टाळूला लावून मालीश करून जिरवतात. तेलाच्या वासाने किरीम 'भेदरून' (घाबरून) पळून

जातात.

विष्टेला वास असेल किंवा 'किरीम' पडत असेल तर मालीचे तेल अंगाला लावतात. कानात व नाकात पण टाकतात. ''किरीम डोक्यात जरी चढले असले तरी, तेलाच्या वासामुळे खाली उतरतात; गुणकारी आहे!''

एखादी जखम झाली तर त्यावर माशा बसून नये म्हणून हे तेल लावतात. मडक्याला 'छेद' (छिद्र) झाला तर मालीच्या बिया किंवा तेल लावून त्यावर आगकाडी धरतात. छेद बुजते.

पाऊस पडल्यावर या झाडाला सुंदर पांढरी फुले लागतात. या फुलांचा व झाडाचा सुगंध छान असतो. या सुगंधामुळे मालीच्या झाडाच्या जवळपास 'सरप' (साप) असतात.

थंडीच्या मोसमात मालीला फळे लागतात. फळे खातात. गोड लागतात. मालीचे फळ खाल्ल्याने किरीम होत नाही व किरीम झालेले असल्यास ते गुदद्वारातून पडतात. या फळात बिया असतात. या बियांना 'माली' म्हणतात. लहान लेकरांना किरीम होऊ नये म्हणून या बिया खायला देतात.

पूर्वीपेक्षा आता डिकामालीची झाडे खूप कमी दिसतात. कारण 'कुप' (कुंपण) बनविण्यासाठी लोकांनीच या झाडाची खूप तोड केली आहे.

पापडी

मोठा वृक्ष असतो. लाकूड मजबूत नसते. काड्या जाळण्यासाठी वापरतात. शेळ्या-बकऱ्या, ढोरे-वासरे याचा पाला खातात.

खांडक किंवा फोड झाले, जखम झाली तर पापडीच्या मुळ्या किंवा साल ठेचून त्याचा लेप फोडाना लावतात व जखमेच्या आत भरतात. जखम लवकर भरून येते.

'गोंदेच्या गोंदे' (झुपकेच्या झुपके) शेंगा लागतात. आत बिया असतात. या बियांपासून तेल काढतात. हे तेल डोक्याला लावायला, दिवा लावायला व 'रांधायला' (स्वयंपाक करण्याच्या) उपयोगी पडते. डोक्यात उवा झाल्या तर पापडीचे तेल डोक्याला लावतात. या तेलात शिजलेली भाजी चांगली लागत नाही पण या तेलात वडे तळले तर छान लागतात. मोहा शिजवून खाताना त्यावर थोडे पापडीचे तेल टाकल्यास चांगली चव येते.

तळहाताला, तळपायाला भेगा पडल्या तर पापडीचे तेल लावून मालीश करतात.

अर्जुन

अर्जुन

Terminalia arjuna

मोठा वृक्ष असतो. हे झाड हिरवेगार दिसते. याचे लाकूड बाहेरून पांढरे व चोपडे आणि आतून लाल रंगाचे असते. ते नरम असते. मोठ्या लाकडाचा उपयोग घरासाठी पाट्या-मयाली,

टेबल-खुर्च्या, दरवाजे, खिडक्या, बाजा बनवायला होतो. लहान फांद्या जाळण्यासाठी वापरतात. काड्यांचे दातण करतात. 'मुखरोगात' (दात दुखत असेल, हिरड्या सुजल्या असतील, हिरड्यातून पू-रक्त जात असेल, तोंडाचा वास येत असेल) या झाडाची पाने किंवा साल वाटून त्याच्या रसाने दात घासतात.

कान दुखत असल्यास पाने वाटून त्याचा रस कानात टाकतात. चेहऱ्यावर काळे किंवा पांढरे डाग पडले तर झाडाची साल वाटून त्याचा लेप लावतात. मूळव्याधीचा त्रास असल्यास, गुदमुखाची जागा अर्जुनाच्या सालीने शेकतात.

मासिक पाळीच्या वेळी अंगावर खूप रक्त जात असल्यास किंवा नाकातून रक्त जात असल्यास किंवा जखमेतून खूप रक्त जात असल्यास अर्जुनाची साल व पाने, आंब्याची पाने, जांभळाची पाने एकत्र वाटून त्याचा रस प्यायला देतात. आवरक्ताची हगवण होत असल्यास अर्जुनाची साल वाटून त्याचा रस प्यायला देतात.

पांढऱ्या रंगाची बारीक फुले लागतात.

सप्तपर्णी

Alstonia scholaris

मोठा हिरवागार वृक्ष असतो. 'उंच वाढतो'. या झाडाला सात-सात पाने असतात. झाड दिसायला सुंदर दिसते. याची साल खूप जाड असते. व फांदी कापली, साल छिलून काढली तर त्यातून दूध निघते. हिरवट पांढरे गुच्छच्या गुच्छे फुले लागतात. त्यांना सुगंध असतो.

कुष्ठरोगाच्या आजारात सप्तपर्णीची साल पाण्यात शिजवून त्या पाण्याने आंघोळ करतात व थोडे पाणी पितातसुद्धा! दात दुखत असल्यास सप्तपर्णीची साल कच्चीच चावून खातात किंवा साल वाळवून त्याच्या 'भुकनीने' (पावडरीने) मंजन करतात. त्यामुळे दातातले किडे पटापट मरून जातात.

एखाद्या बाईला दूध कमी असेल किंवा दूध 'शुद्ध नसेल' (पातळ/पिवळ्या रंगाचे दूध व त्यामुळे मुलाचे पोट भरत नाही) तर सप्तपर्णीची साल जेष्ठीमध (ज्येष्ठमध) एकत्र पाण्यात शिजवून प्यायला देतात.

पंडूरोगात, ज्वरतापात, हाडीतापात, कमजोरी, असल्यास सप्तपर्णीच्या सालीचा काढा पाजतात. त्यामुळे रक्त 'शुद्ध' होऊन अंगात ताकद येते.

जांब

पेरू

Psidium guajava

मध्यम आकाराचे झाड असते. ताप आल्यास जांबाच्या झाडाच्या सालीचा काढा पाजतात. थंड वाटते. हगवण बंद होण्यासाठी जांबाच्या झाडाच्या सालीचा किंवा मुळांचा काढा करून पाजतात. मुखरोगात दाढ दुखत असल्यास जांबाच्या झाडाच्या सालीच्या काढ्याने तोंड धुतात.

'किरीम' झाले, अंगावर पांढरे चट्टे आले तर जांबाच्या पानांचा काढा प्यायला देतात.

भांगेची किंवा दारूची नशा उतरविण्यासाठी पिकलेला जांब खायला देतात किंवा जांबाचा पाला वाटून त्याचा रस प्यायला देतात. कच्चा जांब खात नाही. पिकलेला व कच्चा जांब 'थंडा' (थंड आहे). खाल्ल्याने खोकला होतो म्हणून अनेकजण खात नाही पण अनेक लोक, मुले, पाखरे आवडीने जांब खातात. जांब खाल्ल्यावर पाणी पिऊ नये कारण त्यामुळे सर्दी-खोकला होतो. बाळंतीण बाईला जांब खायला देत नाही कारण बाळाला सर्दी होते. अंगात 'थंडी' असलेल्यांना, वात विकार असलेल्यांना जांब खाऊ देत नाही.

पिकलेले जांब तसेच खातात किंवा त्याची भाजी, चटणी करून खातात. पिकलेले जांब साखरेत किंवा गुळात शिजवून मुरांबा करतात. पिकलेला एक जरी जांब रोज खाल्ला, (विशेषत: बिया असलेला जांब) तर 'झाडा' (शौचाला) एकदम साफ होते.

काही बाया म्हणाल्या की जांब जरी 'थंड' आहे तरी जर दम्याच्या विकारात सकाळी उठून पिकलेला एक जाम खाल्ला तर दमा बसतो. जांबाच्या झाडावर पिकलेले फळ खाण्यासाठी खूप पक्षी, विशेषत: पोपट, जमतात.

केळ

Musa paradisiaca

• मध्यम आकाराचे झाड असते. केळीचे नवीन उगवलेले खुंट रोवले (जमिनीत लावले) तर नवीन झाड वापते (उगवते, तयार होते.)

केळीचे पान आकाराने मोठे असते या पानात जेवण करतात. लाल रंगाचे मोठे फूल लागते. या केळफुलाची भाजी करून खातात. अजीर्ण झाले, 'बोका उठला' (आम्ल-पित्ताचा त्रास) तर ही भाजी खाल्लाने 'गुण घडतो' (फायदा होतो.) केळ जन्मताना (फुलातून केळीचे घड फुटताना किंवा तयार होताना) आवाज होतो. तो आवाज ऐकला तर अशुभ होते. हा आवाज ऐकायला येऊ नये म्हणून बहुतेक घराच्या समोर केळ लावत नाही. बाजूला थोडे दूर किंवा मागे लावतात. कच्च्या केळाची भाजी करून खातात. भजे तळतात. वडे 'रांधतात' (बनवतात) कच्च्या केळाचे कपड्यावर काळे डाग पडतात. ते लवकर निघत नाही.

गर्भ पाडण्यासाठी केळीचे मूळ 'फुलाच्या' (गर्भाशयाच्या) आत टाकतात. पिकलेले केळ गोड लागते. केळ खाल्ल्याने भूक मिटते, अंगात ताकद येते पण केळ 'थंडी' (थंड) आहे. केळी जास्त खाऊ नयेत व केळे खाल्ल्यावर पाणी पिऊ नये नाहीतर थंडी बाधते. केळी खाल्ल्याने 'नाक वाहते' (सर्दी होते) वाताचा विकार वाढते. बाळंतीण बाईला केळ खायला देत नाही. कारण मुलाला सर्दी होते.

पोटात काही विष गेल किंवा कुणी काच, 'खिडा' (खिळा), टाचणी खाल्ली तर केळ खायला देतात. काच, खिळा किंवा टाचणी विष्टेद्वारे बाहर टाकल्या जाते. पातळ हगवण होत असली तर पिकलेले केळ खायला देतात. एकदम 'आरून घेते' (शौचाला घट्ट होते)

कावीळ झाली तर केळे खायला देतात. उन्हाळी लागली, पांढऱ्या पाण्याची, गरमी-

परम्याची, धातू जाण्याची आजार असली तर पिकलेले केळ खायला देतात; कच्च्या केळांची भाजी करून खायला देतात तसेच मुळ्यांचा रस काढून पाजतात.

भाजलेल्या जागेवर पिकलेले केळ कुस्करुन लावून, पट्टी बांधली तर एकदम फायदा होतो.

सणात, लग्नात, केळीच्या पानात जेवण करतात. लग्नाच्या मांडवात, तुळशीच्या लग्नात केळीचे खुंट गाडतात, सवाष्ण बाईला वाणात दोन केळी देतात. देवीला केळीचा प्रसाद चढवतात.

गाणे

आपयेला हस्तकानं गं,
झाड रोवयोलो केळी,
अन् फन्या तिच्या बरोबरी,
तुकाराम बोले॥

पपई

Carica papaya

मध्यम आकाराचे झाड असते. खोड मजबूत नसते पपईच्या झाडाचे दोन 'परकार' (प्रकार) असतात. पान तोडले, खोड तोडले, कच्ची पपई तोडली किंवा कापली तर त्यातून चिकासारखे दूध निघते.

'गजकरण' (गजकर्ण), इसब, 'खसू' (खरुज), फोडे, खांडकं, बेंडे, मूळव्याध झाल्यास त्या जागी पपईचे चिकदूध लावतात. किरीम झाल्यास पपईच्या चिकदुधात साखर टाकून प्यायला देतात.

कच्च्या पपईचा गर जखमेवर लावल्यास जखम लवकर बरी होते. पायाला हाताला भेगा पडल्या तर कच्ची पपई शिजवून लावतात.

कच्च्या पपईची भाजी, वडे, सांडगे करतात. कच्ची व पिकली दोन्ही पण पपई 'गरम' आहे. गरोदर बाईला पपई भाजी व पिकलेली पपई खायला देतात. त्यामुळे 'फुल' (गर्भाशय) साफ होते, आतील घाण रक्त निघून जाते. अंगात ताकद येते.

बाळंतीण बाईला दूध कमी असले किंवा दूध येत नसले मुद्दाम कच्ची व पिकली पपई खायला देतात. पिकलेल्या पपईला 'एरण पपई' म्हणतात. आवरक्ताची हगवण असल्यास, आम्लपित्त असल्यास, पिकलेली पपई खायला देतात, त्रास एकदम कमी होतो. पिकलेली पपई माणसे, पाखरे आवडीने खातात. जास्त पिकलेली पपई आंब्या 'वानी' (सारखी) गोड लागते तर थोडी कमी पिकलेली पपई खोबऱ्यासारखी गोड लागते.

पिकलेल्या पपईत काळपट रंगाच्या बिया असतात. या बिया खाल्ल्या तर किरीम होत

नाही. बिया वाळवून त्याची 'भुकनी' (पावडर) करून किरीम झाल्यास पाण्यात टाकून प्यायला देतात. या बियांची भुकनी तेलात टाकून किंवा बिया तेलात उकळवून ते तेल जर डोक्याला लावले तर उवा मरतात. ही बियांची भुकनी जखमेत भरली तर जखम लवकर भरून येते. बिया रोवल्या तर नवीन झाड 'वापते' (उगवते).

अशोक

अशोका
Saraca asoca

अशोकाचे झाड इथल्या मूळच्या जंगलातले नाही, पण आता सरकारने व इतर लोकांनी यांची खूप लागवड केली आहे. मोठे, हिरवेगार झाड असते. या झाडाचे खोड मजबूत नसते, लवकर तुटते. फांद्या खूप लवकर जळतात. त्यामुळे जाळण्याच्या कामाच्या नाहीत. शेळ्या-बकऱ्या पाला खातात.

याची फुले सुंदर दिसतात. पोरी-बाळी व बाया फुलांच्या माळा करून वेणीला लावतात व जुड्यात खोचतात.

एखाद्या बाईला मासिक पाळीत रक्त जास्त जात असेल, किंवा मासिक पाळीच्या वेळी पोटात खूप दुखत असेल, गर्भाशयाची सूज असेल, कोठ्यात दुखत असेल, लघवी करताना आग होत असेल, 'संसारात' (नवरा-बायकोच्या संबंधात) आग होत असेल तर या झाडाच्या आंतरसालीचा व पानांचा काढा बनवून प्यायला देतात. थंड असते.

आवरक्त हगवणीत फुलांना पाण्यात त्याचा काढा प्यायला देतात.

निलगिरी

Eucalyptus L Hesit

हे झाड मूळचे या जंगलातले नाही. पण गेल्या काही वर्षात जंगल खात्याने अनेक ठिकाणी नैसर्गिक जंगल कापून निलगिरीच्या झाडांची लागवड केली आहे. हे झाड उंच व सरळ वाढते. लाकूड मजबूत असते. या लाकडापासून घरासाठी 'वासे' (मयाली) बनवतात.

'डबऱ्या वात' (यात गुडघे सुजतात व दुखतात) झाला तर निलगिरीची पाने वाटून त्या जागी लावतात व निलगिरीच्या पानांचा काढा पाजतात. निलगिरीची पाने व बिया भाजून त्याने दात घासतात. त्यामुळे तोंड व दात स्वच्छ होतात आणि हिरड्या मजबूत होतात; मुखरोग होत नाही, तसेच 'प्यारं तोंड होते' (म्हणजे तोंडाला चांगली चव येते). तापातून उठल्यावर विशेषत: तोंडात कडू चव लागत असेल तर निलगिरीच्या बिया किंवा पाने भाजून त्याने तोंड धुतात.

बाजारात जिरा, लसूण यासोबतच निलगिरीची वाळलेली पाने विकायला असतात. ही पाने वाटून मसाल्यात टाकतात. त्यामुळे गरम मसाल्याचा 'महक' (सुंदर वास) येतो.

आडरोस

आडुळसा
Adhatoda vasica, Adhatoda zeylanica

या झाडाला काहीजण 'आडरुस', 'आडुसा', 'अडुळसा' किंवा 'आडुसा' पण म्हणतात. हे मध्यम आकाराचे झाड असते. झुडपासारखे वाढते. याच्या पानांना एक प्रकारचा वास असतो. त्यामुळे ढोरे-बकऱ्या खात नाही म्हणून हे झाड 'कुंपावनच्या' (कुंपणाच्या) कामी येते.

सर्दी-खोकला झाल्यास या झाडाच्या पानांचा रस काढून देतात. पानांच्या शिरा काढून, पाने व फुले घेऊन, गंजात पाणी टाकून, त्यावर फडके बांधून ही पाने व फुले त्यावर ठेवून, वाफवून, त्याला कुटून, पाण्यात टाकून ताप असल्यास देतात.

पानांना येरंडीचे तेल लावून, गरम करून, अंगात कुठे बेंड किंवा फोड झाले तर त्यावर बांधतात. डोके दुखत असल्यास, पाने वाटून, त्याचा लेप डोक्याला लावतात. पांढरे पाणी जात असल्यास पाने वाटून, त्याच्या रसात खडीसाखर व जिरे टाकून प्यायला देतात. नाकातून, तोंडातून रक्त येत असल्यास पानांचा रस प्यायला देतात.

बाळंतपणानंतर किंवा मासिक पाळीच्या वेळी, अंगातून खूप रक्त जात असल्यास या पानांचा रस पितात.

पाने आणून, 'मोड बागवून' (शिरा काढून), 'पालवात' (कपड्यात) गुंडाळून, 'घुगरीत' (गोवऱ्यांचा विस्तव) भाजून घ्यायचे व मग पालवातून काढून पाण्यात शिजवून अर्क काढायचा. हा अर्क, सर्दी-खोकला, ताप, क्षयरोग असल्यास प्यायला देतात. 'मदुरा मायची' (टॉयफॉईडची) गोळी पण वैदू लोक या पाण्यात घासून देतात.

पानांना ओल्या पालवात गुंडाळून, त्याला माती लावून, 'इस्तवात' (विस्तवात) शेकून (कपडा मातीमुळे जळत नाही), त्याचा रस काढून, त्यात लेंडी-पिपरी व 'सहद' (मध) टाकून दम्याच्या आजारात 'चाटण' (चाटायला) देतात.

आडरोसची पिवळी पाने शिरा काढून भाजतात व 'भुकनी' (भुकटी) करून ठेवतात. दम खोकल्यात ही भुकनी सहदात मिळवून चाटण देतात.

जोंधली

जोंधुर्ली
Antidesma Ghaesembilla Linn

हे झुडुपासारखे झाड असते. झाडाला काटे नसतात व झाड एकदम चोपडे असते. याच्या काड्या जाळण्यासाठी वापरतात. शेळ्या-बकऱ्या पाला खातात. पावसाळ्यात या झाडाला येरोणीसारखे बारीक बारीक फळे लागतात. पिकलेले फळ माणसे आणि जनावरे आवडीने खातात.

हगवणीत, पोटदुखीत या झाडाचे मूळ खायच्या व तेलात उगाळून ते तेल प्यायला देतात.

लाल जिलबुली

Woodfordia floribunda

या झाडाला काही जण 'लाल चिलबुली' पण म्हणतात. हे मध्यम आकाराचे झाड असते. याला खूप 'पालत्या' (फांद्या) फुटतात आणि त्या आजुबाजूला खूप पसरतात. या झाडाचं 'आंग' (खोडाचा आंतला भाग) 'कुकवावानी' (कुंकवासारखं) लाल असते. या झाडाला काडीचे दातण करतात. फांद्या व मुळ्या जाळण्यासाठी वापरतात.

घटसर्प झाला तर किंवा तोंडातून फेस निघत असेल तर या झाडाचे मूळ कुटून, त्याच्या अर्कात खडीसाखर टाकून, तीन-चार मात्रा खायला देतात.

एखाद्या बाईला 'धात' (लघवीत पांढरा पदार्थ जाणे) किंवा गरमी-परम्याचा रोग असल्यास, जिलबुलीचे मूळ व पिटोंडीचे मूळ, एकत्र वाटून, त्याचा रस काढतात व त्यात खडीसाखर आणि जिरे न टाकताच हा रस तसाच प्यायला देतात.

मूल-बाळ होत नसल्यास लाल जिलबुलीचे मूळ पाण्यात उकडून, गाळून त्यात दारूचे फूल व गुळ टाकून, एक-दोन कढ (उकळ्या) घेऊन, मासिक पाळीच्या तिसऱ्या दिवसापासून तीन ते पाच दिवस प्यायला देतात.

ढोरे-बकऱ्या पाने खातात. या झाडाला झुपकेच्या-झुपके फिक्कट लालसर रंगाची फुले लागतात. ही फुले शोभेसाठी छान दिसतात. लहान मुले या फुलांसोबत खेळतात.

बाळंतपण झाल्यावर तिला ही फुले जाळून त्याचा 'धुवाँ' (धूर) देतात. त्यामुळे तिचे 'अंग लवकर वाळते.' (अंगावरून रक्त जाणे कमी होते.)

एखाद्या बाईला मासिक पाळीत खूप रक्त जात असल्यास ही फुले पाण्यात उकडून, त्याचा 'कशा' (काढा) सकाळ-संध्याकाळ पाच दिवस प्यायला देतात.

फळांचे झुपके लागतात पण झाडावरच गळून जातात. या फळांचा काहीच उपयोग नाही.

चिलबुली

पांढरी जिलबुली
Woodfordia floribunda

हे मध्यम आकाराचे झाड असते व बाजूला खूप पसरते. दिसायला हे झाड लाल जिलबुलीच्या झाडासारखेच दिसते पण याचा 'आंग' (सालीचा रंग) पांढरा असतो. याच्या काड्या जाळण्यासाठी, 'कुप' (कुंपण) करण्यासाठी वापरतात. काडीचा दातण करतात. पांढऱ्या रंगाची फुले येतात. मुले त्यासोबत खेळतात.

एरंडी

एरंड
Ricinus communis, Euphorbia thymifolia, Euphorbia tirucallis

मध्यम आकाराचे झाड असते.

आवरक्ताची हगवण लागल्यास एरंडीचे मूळ पाण्यात कुटून, त्याचा रस पाजतात.

'वायवाताचा' (संधिवाताचा) आजार असला, अंग दुखत असले तर एरंडीची मुळी पाण्यात शिजवून त्या पाण्याने शेकतात व तेच पाणी थोडे पितात.

एखाद्या बाईच्या स्तनांत दुधाच्या गाठी होऊन सूज आली, दुखत असले, स्तन कडक झाले तर एरंडीचे पान गरम करून, त्याने शेकतात.

एरंडीच्या बियांपासून तेल निघते. हे तेल घट्ट असते. या तेलाचे बरेच उपयोग आहेत. अंग-पाय, कंबर दुखत असेल तर या तेलाने मालिश करून जिरवतात.

अजीर्ण झाले, 'झाडा' (शौचाला) साफ नाही झाले तर एरंडीचे तेल पाजतात. त्यामुळे जुलाब होते. बाळंतीण बायांना व नवजात बाळांना, आंघोळीच्या आधी, एरंडीच्या तेलाने मालीश करतात. यामुळे 'थंडी' बाधत नाही व चामडी नरम राहते. लहान लेकराच्या टाळूला एरंडीचे तेल लावतात. त्यामुळे टाळू लवकर भरतो. एरंडेल तेलाने 'ज्योत' (वात, दिवा) पेटवतात.

बाळंतपण करताना सुईण हाताला एरंडीचे तेल लावून आत 'हात चालवते' (आतून तपासणी करते, हात आत घालते). त्यामुळे बाईच्या योनीची जागा नरम होते व फाटत नाही.

बाळंतीण बाईच्या घडीवर एरंडीचे तेल व हळद लावतात. त्यामुळे 'खाली' (मायांगात) दुखत नाही; वास-पू येत नाही. बाळंतपण लवकर व्हावे म्हणून बाईला एरंडेल तेल पाजतात. लहान मुलाला शौचाला झाली नाही तर एरंडेल तेलाचे एक-दोन थेंब पाजतात.

लहान मुलाच्या 'बोंबलीला' (बेंबीला), एरंडीचे तेल व हळद लावतात. त्यामुळे पू होत नाही व नाळ लवकर पडते. सांध्यावर सूज आली तर एरंडीच्या किंवा रुईच्या पानाला एरंडीचे तेल लावून, गरम करून त्याने शेकतात.

गाय-म्हैस जनल्यावर एरंडीचे तेल तिच्या जननेंद्रियावर लावतात.

'धान्याला' (गहू, ज्वारी, डाळी) एरंडीचे तेल लावून ठेवलं तर मुळीच कीड लागत नाही.

वावडिंग

Embella ribes, Embella glandulifera

या झाडाला झुबकेच्या झुबके फळे (वावडिंग) लागतात. ते आणून वाळवून, डब्यात भरून ठेवतात.

कुणाला 'थंडी' जास्त झाली तर, वावडिंगच्या झाडाच्या मुळांचा भुरका करून, पाण्यात उकडून ते पाणी प्यायला देतात.

किरीम झाल्यास वावडिंगाचे पाणी प्याल्याने सर्व किरीम मरतात.

'बिलटी' (ठसा) घट्ट येत असल्यास वावडिंगचे पाणी प्याल्याने. बिलटा पातळ होतो. 'गऱ्याची' (गळ्याची) घरघर कमी होते.

बाळंतीण बाईला वावडिंगचा काढा देतात. ती शांत राहते.

लहान मुलाला उलटी-हगवण होऊन, 'होठ' (ओठ) 'सोकल्यास' (सुकल्यास) वावडिंगचे पाणी पाजतात. ''पोटात छान शांतता राहते.''

लहान मुलांना, मोठ्या माणसांना, कुठल्याही आजारात, तापात, तहान खूप लागत असेल, गळा सुकत असेल तर एकतर वावडिंग पाण्यात भिजवून किंवा पाण्यात शिजवून, ते पाणी प्यायला देतात. ग्लुकोजच्या पाण्यासारखे छान लागते.

चांदाळाच्या सुईण, पार्वता आजी म्हणाल्या, ''वावडिंगचा पाणी हा फार जुना औषध आहे. लाल रंगाचं पाणी निघते. आता मीठ-साखर पाणी निघाला. पूर्वी कुठे हे होतं? वावडिंगचं पाणीच रक्षण करणारा होता.''

लाल कोरटी

Barleria prioritis - linn

या झाडाच्या बियांच्या आत सात पडदे असतात. बियांना 'तालीमखाना' म्हणतात.

हगवणीत या बिया कुटून देतात. एखाद्या बाईला 'रक्तसुर्ला' किंवा 'विटाळसुर्ला' असेल (म्हणजे मासिक पाळीच्या वेळी पोटात दुखणे) तर लाल कोरटीचा पाला, 'बुगडी' (बुटकी) मिरची, 'एक डोया लसूण' (यात लसणाला एकच पाकळी असते) व आले, सर्व सोबत ठेचून, रस काढून दारूच्या फुलांत प्यायला द्यायचे, मासिक पाळी साफ जाते व पोटदुखी थांबते.

'थंडी', वात-विकार असल्यास, त्या व्यक्तीला बाजेवर बसवून, लाल कोरटीच्या मुळांचा काढा करून बाजेखालून त्याचा वाफारा देतात.

लेंजी

कोहका

Litsea glutinosa

मध्यम आकाराचे झाड असते. याचे फळ कांडून, वाळूत मिसळवून, नदीत, तलावात टाकतात. जहरी (विषारी) असल्यामुळे मासऱ्या (मासोळ्या) मरतात व पाण्यावर तरंगतात. ढिवर लोक लेंजीचा असा वापर करून मासोळ्या पकडतात.

लेंजीची साल ठेचून, त्याचे पाणी दह्यात टाकून, हगवण-उलटी, 'शेंबूड-मांदा परसाकडे' (आवरक्त हगवण) किंवा कॉलरा झाल्यास प्यायला देतात.

ढोरांना पण हगवण-उलटी झाल्यास या झाडाची साल पाण्यात ठेचून, ते पाणी पाजतात.

घंटा

पिवळा कन्हेर

Thevetia peruviana

याच झाडाला काही लेक 'पिवळा कन्हेर' पण म्हणतात. मध्यम आकाराचे झाड असते. खूप छान पिवळी फुले लागतात. त्यामुळे शोभेसाठी हे झाड खूप छान दिसते.

याच्या फळांना 'बिट्ट्या' म्हणतात. मुले-मुली बिट्ट्या खेळतात. याची फळे (बिट्टा) विषारी असतात म्हणून खात नाहीत.

या झाडाची फांदी किंवा पान तोडले तर दूध (चिक) निघते. काही 'गलवे' (बेंड) झाले, 'खांडके' (फोडे) झाले तर त्याला या झाडाचे दूध लावतात.

या झाडाची पाने जाळून, त्याची 'मस' (राख) खोबरेल तेलात मिसळून खांडकांना लावतात.

ढोर, शेरड्या (शेळ्या), बकऱ्या पाला खात नाही कारण 'जहरी' (विषारी) असतो.

देवाच्या, महादेवाच्या, नागोबाच्या, मारुतीच्या पूजेसाठी घंट्याचे फूल फार महत्त्वाचे आहे.

सीताफळ

Annona squamosa

याच्या काड्या चुलीत जाळतात. शेळ्या-बकऱ्या, ढोरं-वासरे पाला खात नाही कारण विषारी असते. पोरे बाळे, बाया, कच्ची फुले खातात. सीताफळ पिकल्यावर खातात, गोड लागते. सीताफळ 'थंड' आहे. कुणाकुणाला सीताफळ खाल्ल्यावर वात, दम उठतो; सर्दीपण होते. बाळंतीण बाई सीताफळ खात नाही कारण 'थंडी' होते. हातापायाला मुंग्या येता व बाळाला 'शर्दी' (सर्दी) होते.

सीताफळातल्या बिया बारीक कूटून, खोबरेल तेलात कढवून, ते तेल 'डोईला' (डोक्याला) लावल्यास डोईतले 'जनावर' (उवा) मरतात.

एखाद्याची लघवी रोखली असल्यास या झाडाची मुळे पाण्यात घासून देतात.

याचा पाला 'कुचकरून' (कुस्करून), 'पालवात' (फडक्यात) पुंगणी करून, नाकात 'सुवास' (वास) घेतला तर दारूची नशा उतरते.

चक्कर येऊन कुणी बेहोष पडला तर पाल्याचा सुवास 'दावला' (दाखवला) तर 'शुध' (शुद्धी) येते.

शाळेत धावण्याचे खेळ, स्पर्धा असले तर मैदानावर सीताफळाच्या 'खांद्या' (फांद्या) तयारच ठेवतात. एखादे पोर धावताना, खेळताना चक्कर येऊन खाली पडला तर पानाचा वास दाखवतात.

लक्ष्मीपूजनाला पूजेच्या वेळी सीताफळ ठेवणे आवश्यक असते.

कोलाटी

कोल्ह्याची आंड

हा मध्यम आकाराचे झाड असते. या झाडाला 'कोल्ह्याची आंड' म्हणतात. कारण खूप झोकेच्या झोके फळे लागतात. हे फळ चिकट असतात. फळ खातात.

कुठल्याही प्रकारची हगवण असली तरी कोलाटीचे फळ खाल्ल्याने एकदम 'रोकते' (बसते).

विष्णुकंठा

E Volvulus alsinoides

या झाडाचा पाला, कोवळ्या फांद्या, गुरेढोरे खातात.

किरीम होऊन नये म्हणून लहान मुलांना या झाडाचा 'कशा' (काढा) करून पाजतात. ढोराला 'सड'चा रोग झाला तर (या रोगात ढोर गरगर फिरते व बदकन म्हणजे पटकन् खाली पडते), या झाडाचा कसा काढून पाजतात.

चंद्रज्योत

चंद्रज्योती

Jatropha curcas

हे मध्यम आकाराचे झाड असते; 'कपशीच्या' (पऱ्हाटीच्या) झाडासारखेच दिसते. याच्या फळांपासून तेल काढतात व 'वायवाताच्या' (संधिवात) आजारात या तेलाने चोळतात. साप चावल्यास या झाडाची 'मुळी' (मूळ) उगाळून त्याचा गंध चावलेल्या जागी लावतात. उलटी होत असली तर मूळ वाटून, त्याच्या रसात खडीसाखर टाकून खायला देतात. डोके दुखत असल्यास या झाडाचा पाला वाटून डोक्याला बांधतात आणि थोडा रस पाजतात.

हे झाड विषारी आहे त्यामुळे जपून वापरले पाहिजे. अगदी थोड्या प्रमाणातच दिल्या पाहिजे. काही बाया नवऱ्याच्या त्रासातून स्वत:ची सुटका करून घेण्यासाठी चंद्रज्योतीच्या बिया खातात.

लहान मुले या झाडाच्या फांद्याची (आतून पोकळ असते) पुंगळी करुन 'खेरतात' (खेळतात) आणि पानातून साबणाचे फुगे काढतात.

अमृत साजण

या झाडाच्या काड्या जाळण्यासाठी वापरतात.

धातू-परम्याच्या आजारात या झाडाचे मूळ पाण्यात 'कुटून' (ठेचून) त्याच्या रसात खडीसाखर व जिरे टाकून प्यायला देतात.

इलंजा

हे मध्यम आकाराचे झाड असते.

एखाद्या गरोदर बाईचा गर्भ 'बराबर' (बरोबर) फिरत नसल्यास इलंजीचा पाला कुटून, त्यात तूप व खडीसाखर टाकून खायला देतात.

कोणत्याही प्रकारची 'उष्णता' झाली तर इलंजीचे पान, व सावरी फूल कुटून, त्यात

खडीसाखर व जिरे टाकून खायला देतात. 'थंड' असते.

निरुकी

Elaeodendros glaucum

हे मध्यम आकाराचे झाड असते. निरुकीचे मूळ खूपच कडू असते. किरीम झाल्यास या झाडाचे मूळ पाण्यात घासून, त्याचा गंध खायला देतात.

'सरप' (साप) 'डसला' (चावला) तर, निरुकीचे मूळ पाण्यात घासून देतात. काही लोक यासोबत कुडाच्या झाडाची मुळी (मुळे) पण घासून देतात.

निरुकीच्या झाडावर विटाळशी बाईची सावली मुळीच पडू देत नाही; कारण हे झाड 'पान लागले' (सर्पदंश झाला) तर त्यावर फार गुणकारी औषध म्हणून वापरतात. निरुकीच्या झाडाची (मुळासकट) पुडी बांधून वरती छपरावर किंवा गोठ्यात ठेवतात; कारण छपरावर बाईचा हात पोचत नाही व गोठ्यात ती जात नाही. विटाळशी बाईची सावली या झाडावर पडू नये म्हणून ही काळजी घेतात.

रानकेळी

Dillenia pentagyna

हे मध्यम आकाराचे झाड असते. दिसायला सुंदर दिसते.

हगवण - उलटी होत असल्यास या झाडाची साल पाण्यात कुटून ते पाणी पाजतात.

घोटी

बोराटी

Ziziphus glaberrima

या झाडाला 'बोराटी'पण म्हणतात. कारण बोरासारखी फळे लागतात. हे मध्यम आकाराचे झाड असते. शेळ्या-बकऱ्या झाडाचा पाला व फळे खातात. काड्या जाळण्यासाठी वापरतात. या झाडाला थोडे काटे असतात त्यामुळे 'कुप' (कुंपण) करायला या झाडाचा वापर होतो.

रानआंबा

रानआंबा

Litsea monopetale

हे मध्यम आकाराचे झाड असते. पाने जांभळाच्या झाडासारखीच, पण आकाराने मोठी असतात. टेंभरासारखे फर (फळं) लागतात. पिकल्यावर खातात. रानआंब्याचे फळ पिकल्यावर टेंभरासारखीच चवीला गोड लागतात.

'हागी-उलटी' (हगवण-उलटी) असल्यास रानआंब्याची साल व फळे एकत्र किंवा वेगवेगळी कुटून खायला देतात.

प्ऱ्हाटी

कापूस

Gossypium arboreum

प्ऱ्हाटीच्या झाडापासूनच कापूस निघतो. प्ऱ्हाटीच्या झाडाचे दोन प्रकार आहेत. एक आहे 'लाल प्ऱ्हाटी' व दुसरी आहे 'पिवळी प्ऱ्हाटी'.

लाल प्ऱ्हाटीचे झाड लहान असते व याला लाल रंगाची फुले लागतात. याचा कापूस फार निघत नाही पण याच्यात औषधी गुणधर्म जास्त आहे.

पिवळ्या प्ऱ्हाटीचे झाड थोडे मोठे असते व पानेपण थोडी मोठी असतात. फुले पिवळ्या रंगाची असतात. याचा कापूस जास्त निघतो व कापूस चांगल्या प्रतीचा असतो. यालाच काही लोक 'देव-प्ऱ्हाटी'पण म्हणतात.

पोटदुखी असल्यास प्ऱ्हाटीच्या पानांचा रस काढून प्यायला देतात. मूळव्याध असल्यास पानांचा रस काढून दुधात किंवा पाण्यात साखर टाकून देतात.

एखादी मुलगी 'डगर' किंवा 'उपवर नाही झाली' (म्हणजे वयात येऊनही तिची मासिक पाळी सुरू झाली नाही) तर लाल प्ऱ्हाटीची अडीच फुले त्यात खडीसाखर व जिरे टाकून खायला देतात.

'कामेला' किंवा 'कवूळ' (कावीळ) झाल्यास कापसाची कोवळी बोंडे कांडून त्यांचा अर्क काढून त्यात खडीसाखर व जिरे टाकून प्यायला देतात. एखाद्या बाईला मासिक विटाळ कमी जात असल्यास प्ऱ्हाटीचे दहा-बारा 'दोडे' (दोडे म्हणजे कापसाच्या बोंड्यातला कापूस व बिया काढून उरणारा भाग), दोन लोटे पाण्यात टाकून शिजवून ते पाणी तीन दिवस सकाळ, संध्याकाळ व दुपार असे तीन वेळा देतात.

कापसापासून कपडे, उशा, गाद्या, दिव्याची वात बनवतात. बेंड लवकर पिकावा म्हणून त्यावर एरंडीच्या तेलात कापूस टाकून बांधतात.

प्ऱ्हाटीचे वाळलेले धांडे ढोरे खातात. सरकीपासून तेल काढतात. गाई-म्हशीला सरकी खायला देतात. त्यामुळे खूप चांगले दूध येते. सरकी वाळवून, कांडून, भुरका करून, दुधात टाकून बाळंतीण बाईला दिल्यास तिला पण खूप चांगले दूध येते. एखाद्या स्त्रीचे स्तन आकाराने लहान असले तर सरकीचा कशा प्यायला देतात. त्यामुळे स्तनांचा आकार मोठा होतो. किरीम झाल्यास सरकी जाळून त्याची मस (राख) पाण्यात टाकून प्यायला देतात. लघवी 'रोकली' (रोखलेली) असल्यास, उन्हाळी लागलेली असल्यास, गरमी-परम्याचा आजार असल्यास सरकी वाटून त्यात खडीसाखर व जिरे टाकून खायला देतात.

पुरुषाने चुकूनही सरकी खाऊ नये. खाल्ली तर 'बायल्या' बनतो. त्याच्या स्तनांचा आकार वाढून तो 'नामर्द' बनतो. त्याला मूल होत नाही.

कापूस म्हणजे शेतकऱ्यासाठी 'सोना' (सोने) आहे. कापूस विकून चांगला पैसा मिळतो. कोणत्याही पूजेत दिवा लावायला कापसाची वात लागतेच.

गाणे

पऱ्हाटी पेरायला काळी जमीन पाहिजे. आपल्या भागात लाल माती आहे. पऱ्हाटी चांगली होत नाही पण पैसा मिळतो म्हणून एक बाई आपल्या नवऱ्याच्या मागे लागते, कापूस लावा शेतात म्हणून. तिच्या हट्टामुळे नवरा पऱ्हाटी पेरतो. पण पुढे काय होते ते या खालील गाण्यात व्यक्त केलेले आहे.

बायको : कार्तिक-रोहणी
'मिरगाच्या' (मृगाच्या) बहिणी,
पावसाले आहे जोर हो,
अर्ध्या मिरगामध्ये पाऊस आला,
पऱ्हाटीची करा पेरणी ॥ १ ॥
नवरा : असेल संमती तुझी ग नारी,
आत्ताच जातो मी सावकारा घरी,
पेरणीसाठी सरकी आणतो,
गहाण ठेवतो कर्णफुली ॥ २ ॥
बायको : लवकर पेरण्याची करा तयारी,
तिथेच खाऊ आपण भाकरी,
कास्तकारीचे वखर गेले,
दूर आहे वावर ॥ ३ ॥
नवरा : 'दाणा' (दाण्या)मागे दाणा सुटला,
पऱ्हाटीची ग साधली 'पेर' (पेरणी),
ताजीतवानी दिसे पऱ्हाटी,
पेरणेवाली आहे हुशार ॥ ४ ॥
पण काय अघटित घडले?
हाय दैवाची लीला ग न्यारी,
रोप आलं थोडं थोडं,
पाण्याने बुडली पऱ्हाटी,
जीव झाला माझा 'अंकुर' (लहानसा) ॥ ५ ॥
बायको : केव्हापासून आले तुमच्या घरी,
नाही पाहिली कापडाची चोळी,
तुमच्या तंगीला कुठवर पाहूजी,
बिना बांगडी, धुंडी राहूजी? ॥ ६ ॥
नवरा : तुमच्या शेतीला लई झालो कष्टी,
उकरता वखराची माती,

माझ्या अंगाला लागली लंगोटी,
आधी धोतर-जोडी मी घेऊ,
का तुझ्या कर्णफुलाकडे पाहू? ॥ ७ ॥
बायको : तुमची नेहमीची आहे तंगी,
बिना कर्णफुलं कशी राहूजी? ॥ ८ ॥
नवरा : आधी सरकारचा 'वायदा' (कर्ज) देऊ का
तुझ्या कर्णफुलाकडे पाहू? ॥ ९ ॥
दोघे : वायदा आहे सरकारचा बहू,
आम्ही जाऊ हो सरकारच्या पाशी,
वायद्याचा निकाल करण्यासाठी,
सांगू पाण्याने बुडली पऱ्हाटी,
यंदाचा वायदा मांगू माफी ॥ १० ॥

शेवरी

Sesbania sesban

मध्यम आकाराचे झाड असते. लवकर वाढते. या झाडाच्या मुळाला गाठी गाठी असतात. या झाडाची मुळे दुसऱ्या झाडांना खत म्हणून फार उपयोगी आहेत. आंब्याचे झाड लावताना बाजूला शेवरी लावतात. शेवरीची सावली आंब्याला मिळते व शेवरी लवकर मरत असल्याने मग त्याचे खतपण आंब्याच्या झाडाला मिळते.

मुरडशेंग

Helicteres isora

मध्यम आकाराचे झाड असते. शेंगा लागतात. मुरडा मारून पोट दुखत असल्यास शेंग पाण्यात घासून खातात.

पांढरापळस

पांढरा परस

मध्यम आकाराचे झाड असते. याच्या खोडाचा रंग पांढरा असतो. फुलेपण पांढरी असतात. पाने गोल असतात. झाडाला बारीक बारीक काटे असतात. काड्या जाळण्यासाठी वापरतात. पण या काड्या चुलीत लावल्या तर 'इस्तव' (विस्तव) विझतो, 'धुवाँ' (धूर) होतो. काड्या नीट पेटत नाहीत. 'उफराट्या' (मागे) पेटत येतात. सारखे फुंकत राहावे लागते. त्यामुळे 'स्वैपाक' (स्वयंपाक) करताना खूप 'तरास' (त्रास) होतो.

धात जात असल्यास, या झाडाचा कुठलाही भाग वाटून देतात. 'मांडीला वरण जाला' (जांघेत गाठ येऊन दुखते - 'जांगलोड' व हे फुटून व्रण - जखम तयार होते) तर या झाडाची आंतरसाल आणून त्याला एरंडीचे तेल लावून गरम करून लावतात.

लघवीत 'अंगार' (आग) होत असल्यास, लघवीत धात जात असल्यास या झाडाच्या बियांत खडीसाखर टाकून खातात.

बाया म्हणाल्या, ''या झाडाचे मूळ म्हणजेच 'जेष्टमध'!'' हे असेच खात किंवा मसाल्यात, सुपारीत टाकतात. ज्येष्ठमध गोड लागते व थंड असते.

पांढर कुडा

Holarrhena pubescent

याला 'लहान कुडा'पण म्हणतात. साधारण मध्यम आकाराचे झाड असते. काड्या जाळण्यासाठी वापरतात.

कुड्याची साल किंवा मुळ्या ठेचून अर्क काढून त्यात साखर टाकून हगवणीत प्यायला देतात.

कुडाचे मूळ, भारकडचे मूळ व खरासलीचे मूळ एकत्र पाण्यात 'रांधून' (शिजवून) त्याचा कशा प्यायला दिला तर बाळंतपण लवकर होते.

शेळ्या-बकऱ्या कोवळी पाने खातात. पानांच्या पत्रावळी, द्रोण तयार करतात.

पाऊस पडल्यावर पांढऱ्या रंगाची फुले लागतात. आखाडीत येतात व नंतर 'नववीच्या' (नवीच्या) अवसेपर्यंत शेंगा असतात. फुलांना खूप सुंदर सुगंध असतो. फुलांची वेणी करून केसात लावतात. फुलांची भाजी करून खातात. या भाजीने तोंडाला खूप छान चव येते. इतर वेळीपण भाजी करता यावी म्हणून काहीजण फुले आणून वाळवून ठेवतात. फुलांच्या सुगंधामुळे कुडाच्या झाडाच्या जवळपास साप राहतात असा समज आहे. कोवळ्या शेंगांचीपण भाजी करून खातात. शेंगा व फुले गरम आहेत, कुणाला मानवते तर कुणाला नाही. पण 'बारा महिन्यांत' (वर्षात) एक वेळ तरी कुडाच्या फुलांची/शेंगांची भाजी खाल्ली पाहिजे; पण खूप खायला नको.

लहान लेकराला हगवण झाल्यास कुडाची शेंग व आटईची शेंग एकत्र उगाळून ते गंध देतात. किरीम झाल्यास कुडाच्या शेंगातल्या बिया कुटून किंवा उगाळून दुधात देतात.

पोळ्याच्या दिवशी बैलांना कुडाच्या पानांच्या पत्रावळीत जेवण देतात. पोळ्याच्या वेळी कुडाच्या शेंगांची भाजी करून कुडाच्याच पानांचे 'पात्र जोडून' (पत्रावळी बनवून) त्यात बैलाला व इतर सर्वांनाच जेवण वाढतात. पोळ्याच्या वेळी ज्या बाईला सात आसराचा उपास (उपवास) असतो, ती बाई कुडाच्या पानांची पत्रावळ न शिवता फक्त ती पाने मांडून त्यावर जेवण करते.

गणपतीच्या वेळी कुडाच्या पानांच्या एकवीस पत्रावळी व दोन कुडाची पाने जोडून केलेल्या एकवीस 'डोनांत' (द्रोणात) गणपतीला जेवण वाढतात. यासाठी कुडाच्या झाडाचे खूप

गोईण :

महत्त्व आहे. गणपतीच्या वेळी सगळेजण कुडाच्याच पानांच्या पत्रावळी बनवतात. त्यावेळी 'गठ्ठे बांधू बांधू' (गठ्ठेच्या गठ्ठे) कुडाच्या पत्रावळी बाजारात विकायला आणतात. इतर वेळी मोहाच्या, पळसाच्या पानांच्या पत्रवळी बनवतात.

गाणी

पोळ्याच्या वेळी पुढील गाणी म्हणतात :

आला पोळीयाचा (पोळ्याचा) सण,
आणल्या कुडाच्या शेंगा,
बैलाले जेवाले सांगा ॥
आला पोळीयाचा सण,
आणा 'कुडीया'च्या (कुडाच्या) पाना,
बैलाला जेवणाले सांगा ॥
आला पोळीयाचा सण,
साडी नेसेन मी हजाराची,
'जोडी' (बैलाची) पूजेन
मी माझ्या 'भरतारा'ची (भ्रताराची) ॥
आला पोळीयाचा सण,
साडी नेसेन मी पाचशेची,
'जोडी' (बैलाची) पूजेन मी माझ्या पिताजीची ॥

मोठा

काळा कुडा
Wrightia tinctoria

यालाच 'काला कुडा' किंवा 'रक्त कुडा' म्हणतात. मध्यम आकाराचे झाड असते. काड्या जाळण्यासाठी वापरतात. हगवण उलटीत साल उगाळून देतात.

'धात परमाच्या' आजारात (यात पुरुषाच्या लिंगातून व बाईच्या योनीतून पूयुक्त पाणी जाते) या झाडाचे मूळ कुटून त्याचा रस प्यायला देतात.

साप चावल्यास, कुटयाची साल व निरुकीच्या झाडाचे मूळ (खूपच कडू असते) एकत्र कुटून, मंत्र टाकून खायला देतात.

बोथली

मध्यम आकाराचे झाड असते. याच्या काड्या चुलीत जाळण्यासाठी, कुंपण करण्यासाठी वापरतात. याचा पाला शेळ्या-बकऱ्या, ढोरे-वासरे खातात.

या झाडाचा पाला जाळून त्याची 'मस' (राख) खोबरेल तेलात टाकून 'खसू' (खरूज) झाल्यास लावतात.

एका बादलीभर पाण्यात दिवसभर या झाडाचा पाला टाकून ठेवायचा व संध्याकाळी त्या पाण्याने लहान लेकरांना आंघोळ घालायची. एकदम 'थंड' असते. लेकरू रात्री शांत झोपते.

उन्हाळ्यात 'झॉव' (उन्ह) लागली तरी अशा पाण्याने आंघोळ केल्यास एकदम थंडगार वाटते. खूप फायदा होतो.

टाकर

याचे झाड असते. टाकरच्या पानांची भाजी करून खातात. विशेषत: ज्यांना 'वायवातीची शिकायत' (संधिवाताचा त्रास) आहे त्यांना मुद्दाम खायला देतात.

वायवाताचा आजार असला अंगावर सूज असली तर टाकरचा पाला गरम पाण्यात टाकून त्याने अंग शेकतात, आंघोळ करतात व थोडे पाणी पितातसुद्धा!

गरोदर बाईच्या अंगावर सूज आली तर टाकरचा पाला, निरगुडीचा पाला व गोडरीचा पाला एकत्र करून गरम पाण्यात टाकतात व त्या पाण्याने अंग शेकतात, आंघोळ करतात व तेच पाणी थोडे पितात.

दूधमोगरा

हे मध्यम आकाराचे झाड असते. काही लोक घरात शोभेसाठी लावतात. झाडातून दूध निघते.

बाळंतिणीला दूध येत नसल्यास या झाडाचे दूध प्यायला देतात. गायीलापण दूध कमी येत असल्यास या झाडाचे दूध पाजतात.

लहान लेकराला 'सर्दी-शिरकोंबा' (सर्दी) झाल्यास या झाडाचे दूध पाजतात.

बैलाला पोटात 'पित झाला' (म्हणजे बैलाला जर उलट्या झाल्या) तर दूधमोगऱ्याच्या फांद्या कुटून त्यात 'सांबार' (धणे) तिखट व जुनी चिंच टाकून पाजले तर बैल बरा होतो.

बोथी

Eriolaena quinquelocularis

हे मध्यम आकाराचे झाड असते. या झाडाला उधळी लवकर लागत नाही. या झाडापासून निघणारा 'वाक' (दोरी) एकदम पक्का असतो; लवकर तुटत नाही व खराब होत नाही.

टेंभरूच्या (तेंदूपत्त्याचे झाड) पानांचे 'मुडके' (पुडके किंवा गठ्ठे) बोथीच्या वाकाने बांधतात.

खरासली

Nyctanthen arboristris linn

मध्यम आकाराचे झाड असते. याचे दातण करतात. त्यामुळे तोंड 'प्यारा' (छान, चवदार) लागते. शेळ्या-बकऱ्या याचा पाला खूप आवडीने खातात.

बाळंतपण लवकर होण्यासाठी, खरासलीचे मूळ, भारकड झाडाचे मूळ व कुडाझाडाचे मूळ एकत्र पाण्यात शिजवून तो कशा (काढा) पाजतात.

पांढरे पाणी जात असल्यास खरासलीचा पाला पाण्यात कुटून त्या अर्कात, खडीसाखर टाकून तीन दिवस प्यायला देतात.

अंगात 'थंडी बाधली' (यात हात-पाय दुखतात, मुंग्या येतात) तर खरासली, वराकरी, येरोणी, भारकड आणि जोंधुर्ली यांची मूळे एकत्र कुटून, शिजवून त्याचा गोळा अंगाला घासतात. त्यामुळे अंगात ऊब येते.

सकुली (शिकुली)

शिकुली/सोनुली
Vicoa indica

मध्यम आकाराचे झाड असते. याच झाडाला काही जण 'शिकुली'पण म्हणतात.

बाळंतपण जर लवकर आले नाही तर सकुलीच्या झाडाचे अडीच पान 'कॉफीच्या चहात' (म्हणजेच कॉफीत) उकळताना टाकून ते प्यायला देतात.

याचे फळ गोल आकाराचे होऊन 'बागते' (वाकते). मुले ते फळ आंगठी म्हणून बोटात घालतात व गाणे म्हणतात.

सकुलीच्या येना,
आलो तुझ्या घरी, आन् टाकवलो मुंदी (आंगठी) ॥

आकवल

आकोल
Alangium salvifolium

मध्यम आकाराचे झाड असते. फळ खातात. फांदी मोडून दातण करतात. बाया म्हणाल्या, ''कडसूर (कडू) मारते दातण! पर (पण) तोंड चांगला प्यारा (छान) लागते.''

आकवल 'थंडी' (थंड) आहे. त्यामुळे 'गरमी' झाली, अंगावर फोडे झाले तर अकवलाचे मूळ पाण्यात टाकून ते पाणी प्यायला देतात. त्यामुळे उष्णता 'उतरून जाते'.

महारोगाच्या (कुष्ठरोग) रोगात आकवलचे मूळ व रिठ्याच्या जाडाचे मूळ एकत्र कुटून त्याचा अर्क प्यायला देतात.

'खसू' (खरूज), गजकर्ण असल्यास आकवलचे मूळ पाण्यात ठोकठाक करून पितात. 'कडू जहर' (खूप कडू) असते. त्यामुळे पोटातले जंत मरतात.

किरीम झाल्यास मूळ पाण्यात घासून ते गंध चाटायला देतात.

सागरगोटा

Caesalpinia bonduuc, Caesalpinia bonducella

काटेरी 'येला'सारखे (वेलासारखे) झुडूप असते. फळांना सागरगोटे म्हणतात. पोरीबाळी सागरगोटे 'खेरतात' (खेळतात). किरीम झाल्यास सागरगोटे उगाळून खायला देतात. 'खांडके' (फोडे) झाल्यास सागरगोटे उगाळून लावतात.

हिवतापात सागरगोटा, न्यायचा वेल व भुईनिंब सर्व एकत्र पाण्यात उकडून त्याचा कशा करून पाजतात.

कुदुरशी

Fluggea microcarpa

मध्यम आकाराचे 'फल्लर' (झुडूप) झाड असते. मोठ्या फांद्या जाळण्यासाठी वापरतात. बारीक काड्यांचा 'दातवण' (दातण) करतात.

येरोणीसारखीच फळे लागतात. पिकल्यावर फळे 'काडसर' (काळसर) दिसतात. फळे खातात. फार छान, गोड लागतात.

कोरटी

Barleria cristata

हे लहान काटेरी झाड असते. दंडात (शेतात) असते.

'रक्त हागी' (रक्त हगवण) लागल्यास या झाडाचे बी कुटून पाण्यात किंवा तसेच गोळी बनवून खायला देतात. बी वाटल्यावर चिकट होते. त्याची तार तुटते.

गरमी-परम्याच्या रोगातपण याच झाडाचे बी कुटून त्याचा रस प्यायला देतात. 'थंड' असते.

मोठा कामुना

Solanum indicum

मध्यम आकाराचे 'फल्ल' (झुडुपासारखे) झाड असते. गुरेढोरे, शेळ्या-बकऱ्या पाला खात नाहीत. हे झाड लवकर वाढते त्यामुळे कुंपणाला लावतात. या झाडाची पाने थोडी खरबरीत असतात.

गुदद्वाराला चीर पडली, मूळव्याधीचा त्रास असल्यास या झाडाचा पाला वाटून परसाकडच्या जागी लावतात.

अंगाला 'खुसू' (खरूज), इसब, गजकरण झाल्यास पाला वाटून लावतात.

नाजूक, सुंदर फुले येतात. शोभेसाठी छान दिसतात. फुलांमुळे या झाडावर खूप फुलपाखरे बसतात.

फळांचे 'झोके' (गुच्छ) लागतात. कच्चे फळ हिरवे व पिकलेले फळ जांभळ्या रंगाचे दिसते. पिकलेली फळे खातात. पिकलेल्या फळांचा काळा-जांभळा रंग निघतो. काही रंगेल पुरुष पांढरे केस काळे करायला हा रंग केसांना लावतात.

येरोणी

Ziziphus oenoplia

हे झाड काटेरी 'फल्लर' (झुडूप) असते. या झाडापासून घराला 'कटासा' (कुप किंवा कुंपण) तयार करतात. खळ्यामध्ये धान चुरण्याच्या वेळी, तणोस गाई-ढोरांनी नाही खाल्लं पाहिजे म्हणून, कुण्या माणसाने ते चोरून न्यावे नाही म्हणून, कास्तकार लोक, तणसीच्या ढिगाभोवती या झाडाचा 'कुंपावन' (कुंपण) करतात. फांद्या चुलीत जाळण्यासाठी वापरतात.

हगवण-उलटी लागली तर येरोणीच्या जाडाची साल कुटून आंबवलेल्या पाण्यात देतात.

येरोणीचं मूळ, वराकलीचं मूळ व बारटीचं मूळ आणून, एकत्र शिजवून 'कशा' (काढा) काढतात. त्याच्यात वैद लोक एक-दोन 'यम धर्म चिंतामण गोळी' (खलात टाकून बनवतात) उगाळून गरोदर व बाळंतीण बाईला देतात. याचा फायदा म्हणजे बाळंतपण लवकर होते आणि बाळंतपणानंतर 'बाळंतरोग' (बाळंतपणानंतर पागलसारखे करणे) होत नाही. हे औषध बाळंतरोग झाल्यावरपण देतात. पूर्वीच्या काळात गरोदर बाईला सातव्या महिन्यात पाच दिवस, पाच मात्रा देत होते. ''पूर्वीच्या काळात इंजेक्शन नव्हते. ही दवाई सहा-सात महिने उतरत नाही (म्हणजे शरीरात नष्ट होत नाही - गुण टिकून राहतो) पण इंजेक्शन मात्र उतरते.'' हेच औषध 'मदुरामायच्या बिमारीत' (टॉयफॉईड)पण देतात, दोषिक उठू नये म्हणून! (दोषिक उठणे म्हणजे पागलसारखे करणे.)

बारीक बारीक फळं - येरोण्या लागतात. कच्चे फळ हिरवे असतात; पिकल्यावर काळे होतात. कच्च्या येरोण्या खात नाहीत कारण त्यामुळे खोकला होतो. पण पिकल्यावर मात्र 'मस्त' (खूप) खातात. छान आंबट-गोड लागते.

येरोण्या हे फळ 'गरम' आहे. काही गरोदर बाया आवडीने खातात पण बाळंतीण बाई मात्र मुळीच खात नाही. कारण त्यामुळे आई व लेकरू दोघांनाही खोकला होतो.

देव येरोणी

Rhammus oenoplia

याचा वेल असतो 'फल्लर' (झुडूप) सारखा. एकाच जागी पसरतो. त्यामुळे काटेरी वेल

असूनही 'कुप' (कुंपण) करण्याच्या कामी येत नाही. याची पाने व फळे साध्या येरोणीच्या झाडापेक्षा मोठी असतात.

फळे लागतात. पिकल्यावर ही फळे येरोण्यांसारखीच दिसतात. ही फळे खातात, गोड लागतात. या वेलाचा काटा 'सुवाट' (मोठा व टोकदार) असतो. काटा 'गडला' (रूतला) तर खूप दुखते.

वयात येऊनही एखाद्या मुलीची महावारी साफ झाली नाही तर देवयेरोणीच्या मुळांचा 'कशा' (काढा) करून पाजतात तसेच त्या मुलीला पिकलेल्या देवयेरोण्या खायला देतात.

एखाद्या बाईला पांढरं पाणी किंवा पदर जात असल्यास देवयेरोणीच्या मुळांचा किंवा सालीचा पाण्यात शिजवून 'कशा' (काढा) काढून प्यायला देतात.

पोटदुखीचा त्रास असल्यास ओली साल पाण्यात 'कुटून' (ठेचून) खातात किंवा साल वाळवून तिचा भुरका करून पाण्यात टाकून पितात.

समदुर सोक

बेशरम
Ipomoea fistulosa

याच झाडाला 'बेशरम'पण म्हणतात. कारण हे झाड बेशरमासारखे कुठेही, कसेही वाढते. मध्यम आकाराचे झाड असते पण खूप पसरते.

खूप 'जहरी' (विषारी) झाड आहे. गाई-ढोर, बकऱ्या-शेळ्या पाला खात नाहीत. शेळीने किंवा बकरीने चुकून या झाडाचे पान खाल्ले तर 'ठिकून जाते' (दारू प्याल्यासारखी गुंगून जाते).

बाराही 'मास' (महिने) या झाडाला पाने असतात व थंड सावली असते. त्यामुळे या झाडात बरेचदा साप दिसून येतो. या झाडावरचा 'सर्प' (साप) चावला तर माणूस मुळीच वाचत नाही.

अंगात कुठे 'दुख भरला' (दुखत असेल, लचकलं असेल) तर पानाला एरंडीचे तेल लावून गरम करून बांधतात. तसेच कोवळे 'डिरे' (जिथून पानं फुटतात अशा कोवळ्या फांद्या) वाटून त्यात 'हरद' (हळद) टाकून बांधतात.

पोट फुगलेले असेल तर पानाला एरंडीचे तेल (त्यात थोडे मीठ टाकून) लावून, गरम करून पोटाला बांधतात.

या झाडाच्या काड्या चोपड्या असतात व लवकर जळतात. या काड्या जाळण्यासाठी वापरतात पण याच्यावर मोठा 'स्वैपाक' (स्वयंपाक) करता येत नाही.

हे झाड व त्याची पाने खूप विषारी असतात. कोणाला मारायचे असेल तर खायला देतात.

अडपल्लीच्या जना आजीने सांगितले, ''माझ्या ओळखीच्या एक बाईने शेतात नवऱ्यासाठी शिदोरी नेली. मच्छीची भाजी केली व वरती समदुरसोकच्या झाडाची तीन पाने ठेवली. त्या पानांचे विष खाली उतरले व नवरा मच्छीची भाजी खाऊन मेला.''

मैदी

Lawsonia inermis, Lawsonia alba

हे मध्यम आकाराचे काटेरी 'फल्लर' (झुडूप) असते व खूप पसरते. गुरेढोरे आत येऊ नयेत म्हणून घराला, 'दंडाला' (शेतीला) हे झाड रोवून 'कुंपावन' (कुंपण) करतात. गुरेढोरे, 'शेरड्या' (शेळ्या), बकऱ्या याचा पाला खातात.

मैदीचा पाला आणून कुटून एका वाटीत 'हरद' (हळद) व कात टाकून बाया ठेवतात आणि झाडणीच्या काडीने तळहातावर फुले काढतात. खूप छान लाल रंगते! ज्या बाईची मैदी जास्त रंगते, तिच्यावर तिचा नवरा जास्त 'पिरेम' (प्रेम) करतो असा समज आहे. लग्नाच्या वेळी तसेच आषाढ व श्रावण महिन्यात पोरीबाळी, बाया हौसेने मैदी लावतात.

मैदी खूप 'थंडी' (थंड) आहे. त्यामुळे एखाद्या बाईला गरमी - परम्याचा आजार असला तर, मैदीचा पाला आणून, कुटून त्याच्या रसात खडीसाखर व जिरे टाकून प्यायला देतात.

कुणाचे 'तोंड आले' (तोंडात फोडे झाले तर) मैदीच्या पाल्याने तोंड धुतात. म्हणजेच मैदीची पाने तोंडात चावून दात घासतात. तोंड हे 'गरमीने' येते व मैदीचा पाला खूप थंड असल्यामुळे गरमीला मारून टाकते.

धान-रोवणीच्या वेळी 'हात-पाय खाल्ले नाही पाहिजे म्हणून' (चिखल्या होऊ नये म्हणून) मैदीचा पाला कुटून त्यात काथ, चुना, हळद व 'चिच' (चिंच) टाकून हाताला, पायाला बांधतात. यामुळे चिखल्या होत नाही व सोबतच 'पाहायले' (बघायला) सुंदर दिसते!

एखाद्या बाईमाणसाच्या डोक्यात गरमी उठली असेल तर मैदीचा पाला कुटून त्याचा डोक्याला टोप बांधतात. गरमी खेचून घेते. पण काही जणांना यामुळे 'सर्दी शिरकोंबा' (सर्दी-पडसे) होऊ शकते कारण मैदी खूप 'थंडी' आहे.

काही रंगेल पुरुष केस पिकले तर मैदीचा पाला वाटून केसांना लावून केस रंगवतात. बाया असे करत नाहीत.

मैदीच्या काडीचा दातण करतात, खूप चांगले असते. 'मुखरोग' (हिरड्या सुजणे, दात दुखणे, तोंडाचा वास येणे, हिरड्यांतून रक्त-पू वाहणे) असेल तर मैदीच्या दातणाने फायदा होतो. दातांची कीड कमी होते.

लग्नात आषाढ व श्रावण महिन्यात पोरीबाळी बाया मैदी लावतात.

उटाटी

काटेरी झाड असते.

लेकराला 'डब्बा' (न्युमोनिया) झाला तर, उटाटीच्या झाडाला ठेचून, रस काढून आईच्या दुधात लेकराला पाजतात. ते औषध दुधात उतरते.

'दुधमिया', 'खाज मिया' (एक्झिमा किंवा इसब गोल - लहान लेकरात दुधमिया

म्हणतात व मोठ्या माणसात खाजमिया म्हणतात) किंवा 'खसू' (खरूज) झाली असेल तर उटाटीचे मूळ किंवा बिया कुटून त्याच्या रसात जिरे व खडीसाखर टाकून पितात. तसेच उटाटीचे मूळ किंवा बिया जाळून त्याची मस (राख) खोबरेल तेलात मिसळवून त्या जागी लावतात.

करवंदा

करवंद

Carissa carandus, Carissa spinarum

मध्यम आकाराचे काटेरी झाड असते पण चांगलाच 'फल्लर' (झुडूपासारखे) वाढते. हे झाड लवकर मोठे होत नाही. खूप हळूहळू वाढते. शेळ्या-बकऱ्या या झाडाचा पाला खात नाहीत. तसेच काटेरी झाड असल्याने 'कुप' (कुंपण) करण्याच्या कामी येते.

पावसाळ्यात फळे - करवंद लागतात. सुंदर दिसतात. या फळांची भाजी, 'रायता' (लोणचे), चटणी, मुरब्बा करतात. कच्चेपण खातात. काहीजण वरणातपण टाकतात. चटणीने तोंडात चव येते. करवंदे आंबट असतात त्यामुळे गरोदर बाया आवडीने खातात. आंबट असल्यामुळे बाळंतीण बाईला देत नाही कारण आई व 'लेकरू' (बाळ) दोघांनाही खोकला होतो.

करवंद हे 'उतार' अन्न आहे. उतार म्हणजे हे खाल्ल्याने इतर औषधांचा गुण जातो व इतर औषधी, गोळ्या, इंजेक्शन लागू पडत नाही. उतार अन्न म्हणून करवंद व जांभूळ या जुळ्या बहिणी आहेत.

'उतार' अन्न असल्यामुळे 'वरण' (व्रण किंवा जखम) झाल्यास करवंद मुळीच खात नाही.

काटेथुवा

Euphorbia nerifolia

काटेरी झाड असते. फांदी लावली तर झाड तयार होते. 'बांध्या'ला (शेतीला) या झाडाचे 'कुंपावन' (कुंपम) करतात. या झाडापासून दूध निघते.

पायात कुठे काच, काटा रुतला तर त्या जागी याचे दूध लावून बांधतात. काटा, काच 'आपसूकच' (आपणहूनच) निघून येते.

सर्दी-शिरकोंबा, खोकला, दमा, 'डब्बा' (न्युमोनिया) झाला तर दूध छातीला लावायचे व लोखंडी 'सोरोता' (सराटा) गरम करून दुरून शेक 'दावाचा' (द्यायचा).

मुलांना 'सर्दी-शिरकोंबा' (सर्दी, पडसे) झाल्यास हे झाड वाटून त्याच्या अर्कात 'हरद' (हळद) व एरंडीचे तेल टाकून त्यांच्या टाळूला लावतात.

दम-खोकला उठला असेल तर या झाडाचा अर्क काढून 'सहदात' (मधात) देतात.

टोंगळे सुजले असतील तर झाडाचा अर्क काढून लावतात.

वायवाताचा आजार असेल, हात-पाय दुखत असतील तर, या झाडाचा अर्क लावून शेकतात.

डोके दुखत असल्यास हे झाड कुटून त्याचा 'लादा' (लगदा) डोक्याला बांधतात किंवा त्याने डोके शेकतात.

कान दुखत असेल तर पान गरम करून, पिळून त्याचा रस कानात टाकतात.

भाराटी

भारकड

Maytenus emarginata

याच झाडाला काही लोक 'भारकड' म्हणतात. हे काटेरी झाड असते. 'फल्लर' (झुडूप) होते. या झाडाचे किंवा याच्या फांद्यांचे घराला, शेताला कुंपण करतात. कारण याचे काटे 'मस्त' (खूप) 'गडतात' (रुततात). शेळ्या-बकऱ्या पाला खातात.

खोकला झाल्यास याचे कोवळे 'डिरे' (जेथे पाने फुटतात अशा कोवळ्या शेंड्या) कच्चे खातात. कोवळ्या जिऱ्यांची भजीपण करून खातात. खोकल्यात 'वायवाताच्या' (संधीवाताच्या) आजारात, अंग दुखत असल्यास, अंगात मुंग्या येत असल्यास ही भाजी फार चांगली आहे.

कोवळे डिरे तुपात तळून, लहान बाळांना 'दुधमिया' किंवा मोठ्या माणसांना 'खाजमिया' (इसबगोल किंवा एक्झीमा) झाल्यास खायला देतात.

पायाला 'खांडक' (फोड) झाल्यास - (याला 'चिचोरे खांडक' म्हणतात) भाराटीच्या पानाला एरंडीचे तेल लावून फोडांना लावतात. पान चिकटून जाते व खांडूक बरा करूनच निघते.

'हाडूक' महिन्यात (ऑगस्ट-सप्टेंबर महिन्यात) फळे लागतात. पिकल्यावर ही फळे लोक आवडीने खातात.

या फळांची साल काढून, शिजवून भाजी करतात. वायवाताचा आजार असेल, अंगापायाला मुंग्या येत असतील तर ही भाजी खूप चांगली आहे.

झाडाला बारीक फुले येतात. या फुलांचा बार आणून, ते मोकळे व स्वच्छ करून, उकडून, कांद्याची फोडणी देऊन व थोडे आंबट टाकून 'तुडपुडी' (मोकळी) भाजी बनवतात. वायवाताच्या बिमारीत, खोकल्यात, अंगापायाला मुंग्या येत असल्यास ही भाजी फार चांगली आहे; चवपण छान लागते.

निवडुंग

नागफणा

Opuntia elatior

काटेरी झाड असते. पानं जाड-जाड असतात. याचे अनेक 'कलर' (प्रकार) असतात. काटेरी असल्यामुळे कुंपणाला लावतात.

जनावराला 'सडची बिमारी' झाल्यास या झाडाची अडीच पानं वाटून त्याचा रस पाजतात.

अंगावर कुठे सूज आली तर याच्या पानांचा गर गरम करून बांधात. सारे दुखणे ओढून घेते.

झाडापासून दूध निघते. या दुधात थोडे 'सहद' (मध) टाकून चाटण दिले तर शौचाला पातळ व साफ होते.

मूळव्याधीचा त्रास असला तर याची पाने वाटून, गरम करून 'त्या' जागेवर लावतात.

लहान मूल धापा टाकत असेल त्याला 'डब्याचा' (न्युमोनियाची) आजार झाला तर पाने गरम करून त्याचा लेप छातीला लावतात. त्यामुळे 'लहाक' (धापा टाकणे) 'बसते' (बरे होते).

काळा फेंडरा

Randia ulinigosa

हे मध्यम आकाराचे 'फल्लर' (झुडपासारखे) झाड असते. याच्या काड्या जाळण्यासाठी वापरतात. गुरेढोरे, शेळ्या-बकऱ्या पाला खातात.

साप चावल्यास या झाडाचे मूळ उगाळून देतात.

'मुखरोगात' (दाढेतून रक्त-'सांडत' (जात) असेल, दात दुखत असेल, तोंड सुजले असेल) या झाडाचे मूळ 'कुटून' (ठेचून) खडीसाखरेसोबत खायला देतात किंवा पाण्यात टाकून प्यायला देतात.

झाडाला मोठी गोल-गोल फळे लागतात. फळे भाजून खातात. ''बाके (छान) लागतात मोठे तुपट!'' (चांगले, तुपासारखे चवदार!)

फळाची साल व बी काढून, त्याचे बारीक तुकडे करून, आळूच्या भाजीसारखी भाजी बनवतात.

विशेषत: रोवणीच्या वेळी बोटांना चिखल्या होऊ नयेत म्हणून याचे फळ फोडून, हातापायाला बोटांच्या मध्ये लावतात. काळा रंग लागतो. घासल्याने हा रंग हळूहळू निघतो.

जंगली जनावरे विशेषत: हरीण, सांबर, नीलगाय हे फळ मोठ्या आवडीने खातात.

पांढरा फेंडरा

Gardenia turgida

मध्यम आकाराचे झाड असते. पावसाळ्यात फळे लागतात. काड्या जाळण्यासाठी वापरतात. फुलांची भाजी करून खातात. कच्चे फळ आणून, साल काढून, फोडी चिरून, शिजवून, पाणी फेकून, कांदे टाकून 'तुडपुडी' (मोकळी) भाजी बनवतात. रस्सा ठेवत नाही. आळूच्या भाजीसारखीच ही भाजी लागते. भात, भाकरी, पोळीसोबत खायला ही भाजी छान लागते.

कसई

Bridelia retusa, Bridelia squamosa

हे मध्यम आकाराचे काटेरी झाड असते. फांद्यांचा वापर कुंपणासाठी करतात. काड्या जाळण्यासाठी वापरतात.

या झाडाचे दातण फार छान असते. झाडाला उन्हाळ्यात आंबट-गोड फळे लागतात. ही फळे मुले आवडीने खातात.

पितोंडी

पिपोंडी
Kirganelia reticulata

यालाच काहीजण 'पिपोंडी'पण म्हणतात. हे मध्यम आकाराचे झुडपासारखे वाढणारे झाड असते. अनेक जण शेताच्या घराच्या कुंपणावर पितोंडी लावतात. बारीक बारीक फळे लागतात. पिकल्यावर फळे काळी-जांभळी दिसतात. पिकलेले फळ मुले खातात. बकऱ्या-शेळ्या, पाला व फळे खातात.

पितोंडीच्या झाडाचे दातण करतात. त्यामुळे मुखरोग होत नाही व दात-हिरड्या मजबूत होतात.

पण पितोंडी 'गरम' आहे त्यामुळे दातण केल्यावर कुणाला 'तोंड येते' (तोंडात फोडे होतात). कुणाला मात्र काहीच त्रास होत नाही.

काटबोर

Zylia xylopyra

हे झाड 'फल्लर' (झुडपासारखे) असते. झाडाला काटे असतात. त्यामुळे या झाडाच्या फांद्यांचा घराभोवती 'गुंपा' (आवार किंवा कुंपण) करतात. काड्या जाळण्यासाठी वापरतात. शेळ्या, बकऱ्या पाने खातात.

'हाडूक महिन्यात' (ऑगस्ट-सप्टेंबर) या झाडाला बोरासारखे लहान लहान फळांचे झुपके लागतात. फळे कच्ची खात नाहीत पण पिकल्यावर खातात; छान गोड लागतात.

सगुणकाठी

Dichrostachys cinera

लहान काटेरी झुडपासारखे झाड असते. हे झाड बाभळीच्या झाडासारखे दिसते. याची फुले पिवळ्या रंगाची असतात. शेळ्या-बकऱ्या पाला खातात. कुंपणाला व रस्त्याच्या बाजूला ही झाडे लावतात.

धायटी

Woodfordia fruticofa

हे झाड 'फल्लर' (झुडपासारखे) वाढते. लाल रंगाची फुले येतात. या झाडाची आंतरसाल लालसर रंगाची दिसते. या झाडाच्या फांद्या जाळायला वापरतात. धायटीच्या फुलांचा, सालीचा रंग निघतो. हा रंग मुले होळीला वापरतात.

पोटदुखी असल्यास, 'किरीम' (कृमि/जंत) झाल्यास, हगवण लागल्यास, आम्लपित्ताची तक्रार असल्यास, लघवीत आग होत असल्यास धायटीची फुले किंवा आंतरसाल पाण्यात शिजवून त्याच्या 'कशात' (काढ्यात) खडीसाखर व जिरे टाकून प्यायला देतात. थंड वाटते.

भूक लागत नसल्यास, अन्न चालत नसल्यास, उलटी किंवा मळमळ वाटत असल्यास धायटीच्या फुलांचा कशा प्यायला देतात.

धायटीची फुले शंकराला, मारुतीला वाहतात.

काटेकोरांटी

Barleria prionites

हे काटेरी लहान झाड असते. पिवळी, पांढरी सुंदर फुले लागतात. फुलांचे गजरे करून पोरीबाळी, बाया वेणीला, आंबाड्याला लावतात. दात दुखत असल्यास, हिरड्या सुजल्या असल्यास त्यातून रक्त - पू वाहत असेल, तोंडाची दुर्गंधी येत असल्यास या झाडाची पाने चावून खातात.

याची फुले देवाला वाहतात.

धोबीण

धोब

Dalbergia paniculata

मध्यम आकाराचे झाड असते. फांद्या व खोड जाळण्यासाठी वापरतात. शेळ्या-बकऱ्या, गाई-म्हशी पाला खातात.

वराकली

वराकलीचा वेल असतो. खूप काटे असतात.

वराकलीचे झाड त्याच्या फळांसाठी प्रसिद्ध आहे. कच्च्या-कोवळ्या फळांची भाजी करतात. भाजी करण्यासाठी, अगोदर फळ पाण्यात शिजवून घेऊन ते पाणी 'येरून टाकतात.' (पाणी पिळून काढून टाकतात.) नंतर त्यात कांद्याची फोडणी, मसाला, तिखट, मीठ, थोडसे आंबट व कोणतीही डाळ तुरीची, चण्याची किंवा लाखोरीची, टाकून शिजवतात. 'तुडपुडू'

(मोकळी) भाजी बनवायची - कोंबडीच्या अंड्याच्या भाजीसारखी! ही भाजी पोळी, भाकर व भातासोबत खायला छान लागते.

फळ वाळवून ठेवून इतर वेळीपण ही भाजी बनवतात.

एकादशीला मुद्दाम ही भाजी बनवतात.

इशन कट्या

मोठा वेल असतो. हा वेल खूपच पसरतो. या वेलाच्या लहान काड्या जाळण्यासाठी वापरतात.

'मदुरामायची बिमारी' (टॉयफॉईड) झाली तर वैद्य या झाडाचा पाला कुटून, त्याचा कशा काढून त्यात गोळी (धातूची बनवलेली असते) घासून देतात. इशनकट्याचा पाला पाण्यात टाकून आंघोळ केल्याने थंड वाटते. आंघोळीत वापरण्यासाठी लोक या वेलाचा पाला 'वरपून' (ओरपून) नेतात.

आतोना

Terminalia tomentosa

याचा 'येल' (वेल) असतो. बुडाला रत्नाळीसारखे कांदे असतात.

आतोन्याच्या कांद्याचा 'रांधा करून' (शिजवून भाजी करणे) अशक्त बाईमाणसाला खायला देतात. चांगली ताकद येते.

आतोन्याच्या पानांचीपण भशालीच्या पानांसारखीच भाजी करतात.

कारले

Momordica charantia

याचा वेल असतो. फळांना 'कारली' म्हणतात. याचा पाला, फळे खूप कडू असतात.

लेकराचे आंगावरचे दूध पिणे सोडावे म्हणून स्त्रिया कारलीचा पाला वाटून 'थनाला' (स्तनाला) लावतात. लहान बाळाला, मोठ्या माणसाला डबल न्युमोनिया झाला, खोकला येत असला तर कारलीच्या पाल्याचा रस काढून, त्यात आंबेहळद टाकून, छातीला लेप लावून, शेक 'दावाचा' (द्यायचा) - गरम सराट्याने, दुरूनच!

'हागी' (संडास किंवा शौचाला) रोकली असेल तर कारल्याचा पाला कुटून, संडासाच्या जागी लावतात. त्यामुळे संडास चांगली येते. काही लोक या सोबत उंदराच्या लेंड्यापण वाटून लावतात.

लघवी 'रुकली' (झाली नाही तर) वरीलप्रमाणे नुसता कारल्याच्या पानांचा रस किंवा सोबत उंदराच्या लेंड्या वाटून 'कोथ्याला' (ओटीपोटीला) लावतात. किरीम झाल्यास कारल्याच्या

पानांचा रस प्यायला देतात. चामडीला कुठे खाज असेल तर त्या जागी कारलीचा पाला वाटून लावतात. तळपायाची आग होत असल्यास कारलीचा पाला वाटून लावतात. 'साखरेची बिमारी' (मधुमेह) असल्यास रासेज कारल्याच्या पानांचा रस पितात.

कारल्याची भाजी करून खातात. 'डब्याच्या' (न्युमोनियाच्या) आजारात 'मदुरामायच्या' (टायफॉईड) आजारात, मुद्दाम कारल्याची भाजी खायला देतात. कारले 'गरम' आहे. त्यामुळे बाळंतपण झाल्यावर त्या बाईला मुद्दाम कारल्याची भाजी खायला देतात.

कारले व 'मुंगण्याच्या' (शेवग्याच्या) शेंगा एकत्र करून भाजी शिजवली तर शुद्ध 'जहर' (विष) तयार होते. खाल्ले तर माणूस मरतोच! एखाद्या बाईला नवरा सोडायचा असल्यास, ती ही भाजी नवऱ्याला खायला देते.

अरकफरी

हरदफरी
Cansjera rheedii

यालाच 'हरदफरी' किंवा 'हळदफरी' म्हणतात. याचा वेल असतो. झाडावर खूप उंचीपर्यंत पसरतो. याच्या काड्या जाळण्यासाठी वापरतात.

अर्ध डोके दुखत असल्यास जंगलात जाऊन या वेलाचा मोठा द्रातण घेऊन दातण करीत यायचे. कोणी 'हटकलं' (टोकले) की 'का एवढा मोठा दातण?' तर तो दातण, चिरा करून फेकून द्यायचा. डोके दुखणे थांबते - त्याला 'हटक पडते' (टोकल्या जाते).

या वेलाचे कोवळे डिरे (नवीन पाने फुटतात त्या फांद्या) आणून, बारीक चिरून, शिजवून 'आरून घ्यायचे' (पाणी पिळून फेकून द्यायचे - हिरवे पाणी निघते) व मग त्यात कांदा, तिखट, मीठ, 'हरद' (हळद) व आंबट चिंच टाकून त्याची कोंबडीच्या अंड्याच्या भाजीसारखी 'तुडपुडी' (मोकळी) भाजी बनवायची. भातासोबत खायला खूप छान लागते. ज्यांच्याकडे आहे ते चण्याची दाळ टाकून भाजी 'रांधतात' (शिजवतात). फारच छान लागते. तापात बहुतेक जण ही भाजी खातात कारण त्यामुळे तोंडाला छान चव येते. वायवाताचा आजार असल्यास ही भाजी जरूर खावी.

'डोकसं' (डोके) दुखत असल्यास या वेलाचा पाला कांडून 'डोईला' (डोक्याला) बांधतात.

काही 'दोषिक उठला' (म्हणजे वेड्यासारखे करत असेल) तर किंवा डोके दुखत असेल तर अरकफरीची फांदी पाल्यासकट कुटून एका मडक्यात मुलाची लघवी व मीठ घेऊन त्यात टाकून, गरम करून त्याचा टोप डोक्याला बांधायचा. डोके एकदम शांत होते.

फळे खातात. काही खांडूके (फोड) झाले तर फळे वाटून लावतात. फळांपासून तेल काढतात. हे तेल खायला रुचकर असते. खांडक/फोडे झाले तर त्या जागी हे तेल लावतात.

'अर्धमस्तकाच्या बिमारीत' (अर्ध डोके दुखत असल्यास) अरकफरीच्या मोठ्या वेलाच्या बिया, कानात, गळ्यात बांधतात.

इंद्रावन

इंद्रावण
Citrullus colocynthis

याचा 'येल' (वेल) असतो. बुडाशी कांदा असतो. उंदीर 'डसला' (चावला) तर इंद्रावनचा कांदा खातात.

इंद्रावनचा वेल घराला बांधतात - शुभशकुन म्हणून व घरात भूत-दैत येऊ नये म्हणून!

एखाद्या बाईला मूलबाळ होत नसल्यास इंद्रावनाचा वेल, 'लुदरवंती' व 'पुत्रवंती' यांचा दुधात किंवा पाण्यात काढा करून प्यायला देतात. (लुदरवंती व पुत्रवंती हा एक प्रकारचा गोळा असतो; गाईच्या पोटातून निघतो व त्याला केस असतात.

'कामेलाच्या' आजारात (कावीळमध्ये) इंद्रावनची मुळी पाण्यात घासून घेतात.

'थनाला' (स्तनाला) फोड झाला, सूज आली तर इंद्रावनचे कांदे किंवा मुळी कुटून लावतात. डोक्यात बेंड झाले तर कांदे ठेचून लावतात. 'वायवाता'च्या (संधीवाताच्या) आजारात कांदे ठेचून, गरम करून सांध्यांना बांधतात.

या वेलाला डाळिंबासारखी लाल फळे लागतात. शोभेसाठी ही फळे दाराला लावतात. 'टोकर' (सालपट) काढून त्यात लेंडी-पिपरी, सुंठ व 'मोड' (याच्या काड्या असतात) टाकून, कुटून, दम उठल्यास सहदात 'चाटण' (चाटायला) देतात.

मरायच्या वेळी माणूस घाबरल्यासारखा करत असेल किंवा काही 'दोषिक उठला असेल' (बाळंतरोग किंवा इतर वेळी पागलसारखे वागणे) तरीपण वरील औषध देतात. तसेच दोषिक उठल्यास इंद्रावनच्या बिया व कडू पडवळाच्या बिया एकत्र वाटून, गोळी करून तीन दिवस तीन मात्रा देतात.

मारबत

शतावरी
Asparagus racemosus, Asparagus adscendens

याचा काटेरी वेल असतो. बुडाशी मुळाला कांदा असतो. हा कांदा 'रोवला' (पेरला) तर नवीन वेल 'वापतो' (उगवतो). हा कांदा कच्चापण खातात.

या वेलाच्या मुळ्या शिजवून, वाळवून त्याची 'भुकनी' (भुकटी) करून, पाण्यात किंवा दुधात बाळंतीण बाईला दूध चांगले यावे म्हणून देतात.

एखादा पुरुष 'कमजोर' (लैंगिकदृष्ट्या) किंवा 'नामर्द' असला तर, मारबतच्या मुळ्या ठेचून किंवा शिजवून खायला देतात. तो पुरुष चांगला मजबूत बनतो!

लघवीत आग होत असल्यास किंवा लघवी 'रोकली' असल्यास (झाली नसल्यास) मुळ्या ठेचून त्याचा रस पाण्यात टाकून पाजतात.

पांढरे पाणी जात असल्यास, या वेलाच्या ओल्या किंवा 'वारल्या' (वाळलेल्या) मुळ्या पाण्यात टाकून तो रस प्यायला देतात.

नाकातून रक्त जात असल्यास मुळी दुधात शिजवून देतात.

या वेलापासून 'नारायण तेल' काढतात. वाताच्या विकारात या तेलाने मालीश केल्यास खूप फायदा होतो.

लहान बाळाला 'दीट लागला' (दृष्ट) तर, मारबतीच्या तीन-चार काड्या, चिमणीचे घरटे, दोनचार मिरच्या आणि दोनचार 'डोई'चे (डोक्याचे) केस तव्यावर एकत्र गरम करून लहान लेकराच्या 'जेवा'च्या (जेवणाच्या) 'ताटीवर' (ताटलीवर) थापतात. 'गिलासभर' (ग्लासभर) म्हशीच्या शेणाचे पाणी घेऊन लेकराला ओवाळून तो ग्लास त्या ताटलीवर उपडा ठेवतात. लेकराच्या पोटाचा रोग किंवा 'दीट' निघाला तर ग्लास निघतो; नाहीतर तो ग्लास तसाच 'डिकून' (चिपकून) राहतो.

आता जंगलतोड झाल्यामुळे जंगलात मारबतीचा वेल पूर्वीपेक्षा फार कमी दिसून येतो.

दिवाळीच्या दिवशी मारबतीची काडी गोवऱ्यांवर गरम करून त्याने बैलाला लासवतात. तसेच दिवाळीच्या पहिल्या दिवशी मारबतीच्या काडीने स्त्री-पुरुष, लहान मुले या सर्वांच्या मानेवर, 'चाऱ्यावर' (कपाळावर) लासवतात. याला मारबतीचा 'केस' किंवा 'शेट' म्हणतात. 'दीट' (दृष्ट) लागू नये म्हणून हे करतात. पूर्वीच्या काळी दिवाळीच्या दिवशी 'वरठी' (वठ्ठी-धोबी) येऊन लासवून द्यायचा.

मारबतीचा पूर्ण 'येल' (वेल) किंवा काड्या 'मारबतीच्या दिवशी' (पोळ्याच्या दुसऱ्या दिवशी) घरात दाराजवळ लावतात. घरात भूत-प्रेत येऊ नये, कोणाला दीट लागू नये म्हणून हे करतात.

उतरण

Daenia extensa, Pergularia daemia

याचा वेल असतो. धान 'चुरायच्या' (चुरणीच्या) वेळी, खळ्याच्या आत उतरणीचा वेल टाकतात, धान चांगला 'उतरला' (निघाला) पाहिजे म्हणून!

बाळंतपण लवकर नाही झाले किंवा मंद कळा येत असल्या तर उतरणीचा वेल कुटून पाण्यात प्यायला देत. त्यामुळे चांगल्या कळा येतात. किंवा अडीच पाने गुळात टाकून खायला देतात. तसेच बाळंतपण लवकर नाही झाले तर, उतरणीचा वेल आणून त्या बाईच्या पायाला बांधतात. त्यामुळे गर्भ तवकर खाली 'उतरते' (बाहेर येतो) वर 'पडत वरी' (पडतपर्यंत) ठेवायचे व मग सोडून द्यायचे. ही पाने किंवा वेल कोणाला नकळत तोडायचे. तोडताना कुणी हटकले तर चालत नाही.

उतरणीची अडीच पाने तोडून, त्यांचा रस काढून बैलाच्या 'गोरोज'मध्ये टाकून हगवणीत खायला देतात. (मेलेला बैल तरुण असला तर मादगी लोक बैलाच्या काळजातून हा गोरोज काढतात.)

'मदारामायचा ताप' (टॉयफॉईड) आला तर उतरणीची अडीच पाने आणून आंघोळीच्या वेळी पाण्यात पिळतात. त्यामुळे ताप उतरतो.

सर्दीखोकला झाल्यास पानांचा रस देतात. लहान मुलांना सर्दीखोकला झाला तर उतरणीची फुले 'रांधून' (शिजवून) खायला देतात. फुले फार कडू असतात म्हणून शिजल्यावर पाणी पिळून टाकून व तेल, तिखट, मीठ फोडणी टाकून भातासोबत खायला देतात. लहान मुलांना 'दुधफुली' (न्युमोनिया) झाल्यास या फुलांची घुटी करून देतात.

लहान बाळाचे पोट फुगले तर उतरणीच्या पानांना एरंडीचे तेल लावून थोडे गरम करून पोटाला बांधतात.

लेंडी-पिपरी

पिंपळी
Piper longum

याचा वेल असतो. याच्या मुळाला 'पिपरीमूळ' म्हणतात व फळाला (शेंगा असतात) लेंडी म्हणतात. या झाडाच्या शेंगा - लेंडी, खूप हलक्या असतात व त्याच्या आत बारीक बिया असतात.

वाताच्या व दम्याच्या विकारात, पाल्यासकट शेंगाचा भुरका करून त्याचा 'कशाय काढून' (काढा बनवून) प्यायला देतात.

दम्यात, खोकल्यात लेंडी दिव्यावर भाजून पिपरीसोबत खायला देतात.

लहान लेकरांना खोकला झाल्यास लेंडी जाळून त्याचा भुरका मधात किंवा दुधात 'चाटण म्हणून देतात' (चाटायला देतात)

पिपरी 'गरम' असते. बाळंतपणाच्या वेळी कळा कमी येत असल्यास किंवा वार लवकर न पडल्यास पिपरीचा 'कशाय' (काढा) पाजतात.

बाळंतपणानंतर पाच दिवस, बाळंतीण बाईला सोजी व पिपरीचे लाडू देतात. पिपरीच्या लाडूमुळे गर्भाशय चांगले साफ होते. पिपरीच्या लाडूत सूंठ, पिपरी, लेंडी, जायफळ, कायफळ, मायफळ, ज्येष्ठमध, दूधकांडी, गोखरू (लहान व मोठे दोन्ही), कंबरकस (याचे बारीक दाणे असतात), साखो (दाणे असतात), सफेद मिस्त्री, लसूण मिस्त्री, काळी मिरची, मेथी, काजू, किसमीस, बदाम, खारीक, आक्रोड, खोबरे, साखर आणि तूप किंवा जवस तेल टाकतात.

भशाल

Hymenodictyon excelsum, (Roxb)

याचा वेल असतो. खाली मुळाशी कांदे असतात. खालचा कांदा 'रोवला' (पेरला) वर वेल 'वापते' (उगवते).

बाईला, म्हशीला, गाईला, बकरीला चांगले दूध येण्यासाठी हे कांदे शिजवून खायला देतात.

भशालीची पाने चांगली गोल - 'वाटोरे - वाटोरे' (वाटोळे) व 'खरपूस' (खरबरीत)

असतात. पाने हातात घेऊन सोलून पानाच्या शिरा फेकून द्यायच्या व पानांचे बारीक बारीक तुकडे करून त्यात तांदळाचे पीठ, थोडे बेसन, तिखट, मीठ, कांद्याचे बारीक तुकडे इत्यादी सर्व टाकून चांगले चुरून घ्यायचे. गंजाला 'आतरा' (कपडा) बांधून 'परसा'च्या (पळसाच्या) किंवा मोहाच्या पानाला हे पीठ लावून आतरावर मांडतात - कोणी आतराऐवजी तणीस मांडतात. पण हे धड राहात नाही. मग वाफवून त्याच्या बारीक फोडी करायच्या व तेलात कांद्याची फोडणी टाकून कोणी भाजी बनवतात तर कोणी वरण बनवतात. भातासोबत खायला खूप छान लागते. ही भाजी म्हणजे 'टॉनिक माल' आहे.

कवसकुरी

काचकुरी / खाजकुरी

Mucuna pruriens, Mucuna prurita, Dolichos pruriens, Stizolobium pruriens

या झाडाला काही लोक 'काचमुरी', 'खाजकुरी', खायकुयरी किंवा 'कवणकुरी' असेपण म्हणतात. याचा वेल असतो; जमिनीवर, झाडावर खूप पसरतो.

लहान मुलाला किरीम झाले किंवा उलटी-हगवण लागली तर या वेलाचे मूळ खोदून आणून ठेचून त्याची गुळात गोळी बांधतात व तीन मात्रा खायला देतात.

हगवण-उलटी लागल्यास, या वेलाच्या पानांचा अर्क काढून त्यात खडीसाखर व जिरे टाकून पाजतात. हे औषध सर्वच वयोगटात लागू पडते.

या वेलाला फार सुंदर लाल रंगाची फुले लागतात व मग त्यांना शेंगा - फळे लागतात. या फळांना 'भुरे-भुरके' (बारीक-सारीक) केस असतात. ते अंगाला लागले तर खूप खाज येते. नुसता स्पर्श जरी झाला तरी खाजवून - खाजवून माणूस वेडा होऊन जातो. पुऱ्या (पूर्ण) अंगावर 'दादरे' येतात (पित्त उमटते). ही खाज कमी व्हावी म्हणून अंगाला गाईचं शेण लावतात.

अधरयेल

Cassytha filiformis

हा वेल असतो.

'गरमी-परमा' (गुप्तरोग) व पांढरे पाणी जाण्याचा त्रास असेल तर, अधरयेल ठेचून, पाण्यात खडीसाखर व जिरे टाकून पितात. खूप थंड असते.

ज्या बाईला 'रक्तसुर्ला किंवा विटाळसुर्ला उठते' (म्हणजे मासिक पाळीच्या वेळी पोटात खूप दुखते) तिला अधरयेल, कांदा, लसूण व आले, सर्व एकत्र कुटून त्याचा रस प्यायला देतात.

अंगावर सूज आली तर अधरयेल, रावणबेल, टाकरचा पाला आणि निगुडीचा पाला सर्व एकत्र करून, पाण्यात टाकून ते पाणी गरम करतात व त्या पाण्याने आंघोळ करतात, अंग शेकतात.

अंगावर सूज आली तर शनिवारी अधरयेल आणून त्याचा 'बन' देतात. म्हणजे हाताला, गळ्यात अधरयेल बांधतात.

कोणाला 'ठोका-ठाका' केला (म्हणजे बाहेरचे किंवा भूत लागले) तर वैद त्या व्यक्तीला अधरयेलाचा 'धुवाँ देतो' (म्हणजे अधरयेल जाळून त्याचा धूर अंगावर जाऊ देतात.)

पिवरयेल

Combretum ovalifolium

याचा 'येल' (वेल) असतो. मोठ्या झाडावर चांगलाच 'पनावते' (पसरतो). या वेलाच्या लहान फांद्या शेळी-बकरीला खायला देतात. याच्या काड्यांचा दातण करतात. त्याचा 'पिवरा' (पिवळा) रंग निघतात पण दात पिवळे होत नाहीत. दातण चांगला असतो.

काही दुखले खुपले, जखम झाली, फोड झाले तर पाल्यात हळद टाकून कुटून बारीक करून लावायचा. कसेही दुखणे असेल तरी थांबून जाते, घाव बुजतो.

या वेलाच्या लाकडापासून 'डायका' (एक प्रकारची ढोलकी - ढिवर - लोक हे वाद्य वाजवतात) बनवतात. 'बुड्ढे' (म्हातारे) लोक मेले तर डायका वाजवून त्यांना 'उतरवतात'. म्हणजे ते इतरांच्या अंगात येतात असे मानतात की या अंगात आलेल्या माणसांना मेलेला माणूस 'वळखतो' (ओळखतो).

इकडोडी

Marsdenia volubilis

याचा वेल असतो. कोणत्याही झाडावर चढतो. जंगलात, शेतात दिसून येतो. या वेलाच्या खाली मुळाला कांदा असतो. हा कांदा 'रोवला' (जमिनीत लावला) तर वेल 'वापतो' (उगवतो).

या वेलापासून दूध निघते. शेळ्या-बकऱ्या पाला खातात. 'सफेद' (पांढरी) बारीक फुले येतात. या फुलांची भाजी करून खातात. पावसाळ्यात लांब, 'ठोकळ' (जाड) फळे लागतात. कोवळे फळ तसेच कच्चे किंवा भाजी करून खातात. जरड फळ खात नाही टाकून देतात.

कच्चे फळ खाल्ल्यावर तोंडात छान वाटते. वरून पाणी प्याले तर गोड लागते - आवळ्यासारखेच!

फळ आणि फुले भाजी करण्याच्या आधी उकडून घेतात. कारण थोडे कडू असतात. कारलीच्या भाजीसारखी ही भाजी लागते. लोक आवडीने खातात. ही भाजी लवकर शिजत नाही. ही भाजी 'गरम' असते. बाळंतिणीला दूध चांगले यावे म्हणून मुद्दाम जास्त खायला देतात.

फळांचा 'रायता' (लोणचे) पण टाकतात. बाळंतीण बाईला दूध नसेल किंवा कमी

असेल तर इकडोडीची मुळी खणून आणून पाण्यात ठेचून पाच दिवस देतात.

इकडोडीचे वेल आता खूप कमी दिसतात; कारण हा वेल झाडावर असतो व बरीच झाडतोडणी झाली आहे.

केना

Commelina benghalensis

वेलासारखे जमिनीवर पसरते. पावसाळ्यात जास्त दिसून येते.

केनाच्या पानांचे भजे करतात. याच्या पानांची 'तुडपुडी' (मोकळी) किंवा 'दारभाजी' (दाळभाजी) बनवितात.

केनाची भाजी 'थंडी' आहे. त्यामुळे बाळंतीण बाईला खायला देत नाहीत. कारण त्यामुळे बाईला 'वायवात' (सांधे दुखणे-सुजणे) व बाळाला खोकला होतो.

गौरी पूजनात केनाची पाने वापरतात.

गणपतीला केनाची पाने वाहतात. गणपतीच्या पूजेत या पानाचे खूप महत्त्व आहे.

येल्या पळस

पळसवेल
Butea superba

पळसाच्याच झाडाचा हा प्रकार आहे. पण हा 'येलासारखा' (वेलासारखा) पसरतो (म्हणून नाव!) याची दांडी लांब असते व पान थोडे मोठे असते.

याचे खोड व 'खांद्या' (फांद्या) जाळण्यासाठी वापरतात. मुळापासून व सालीपासून 'वाक' (दोरी) काढतात. या वाकापासून ढोरांसाठी दावे व शिंके बनवतात. टेंभराच्या पानांचे 'मुडके' (पुडके) या वाकाने बांधतात.

पानाच्या पत्रावणी व द्रोण तयार करतात. पावसाळ्यात पांघरण्यासाठी जे 'मोरे' वापरतात, ते तयार करायला या झाडाचे पानंत वापरतात.

महत्त्वाची गोष्ट म्हणजे जंगलात रस्ता चुकलेले तहान लागली असता, याचे खोड तोडून त्यातून निघालेले पाणी पितात. त्यामुळे तात्पुरती तहान भागते.

काटवल

Artocarpus integrifolia

याचा वेल असतो. जंगलात, शेतात पावसाळ्यात उगवतो. जमिनीवर पसरतो. काही लोक या वेलाला झाडावर किंवा 'कुंपावन वर' (कुंपनावर) चढवतात. याच्या बुडाला मुळाशी कांदा असतो. हा कांदा 'रोवला' (जमिनीत लावला) तर नवीन वेल तयार होतो.

फळे लागतात. त्यांना काटवल म्हणतात. कच्च्या काटवलांची भाजी बनवतात. या

भाजीची चव मटणासारखी लागते. लोक आवडीने खातात. काटवलीत मसाला भरून भाजी बनवतात; तसेच थोडी चण्याची दाळ टाकून 'मोकळा चून सारखा' (झुनका) घट्ट बनवतात. घट्ट भाजी चांगली लागते. पातळ भाजी चांगली नाही लागत! कांदा मात्र भरपूर टाकतात.

काटवल 'गरम' आहे. काटवल जास्त खाल्ले तर हगवण लागते. 'गरम' आहे म्हणून काटवलची भाजी गरोदर व बाळंतीण बायांना खायला देत नाहीत.

रानतोंडले

Coccinia grandis

याचा वेल असतो. या वेलांच्या मुळाशी कांदे असतात. ते उकडून करतात. 'सकनारू' (रत्नाळी) सारखे चांगले गोड लागतात. अंगात उष्णता असली तर कांदा आणून ठेचून खातात.

फळ म्हणजे तोंडली लागतात. गावठी तोंडलीपेक्षा रानतोंडली ही आकाराने मोठी व 'बांडी' (आखूड) असतात.

रानतोंडली तशीच कच्ची किंवा भाजी करून खातात. रानतोंडलीची भाजी खाल्ली तर ती व्यक्ती 'क्रॅक' (वेडी) होते, तसेच बहिरेपणा येतो असा समज आहे. या दोन्ही कारणांमुळे खाणारेच खातात; जास्त लोक खात नाहीत!

पिनफट

याचा वेल असतो. हा वेल खाली बागून (वाकून) जातो. याच्या काड्या जाळण्यासाठी वापरतात.

या वेलाला लहान, साबुदाण्यासारखे फळ लागतात. ही फळे पाण्यात शिजवून 'एरुन टाकायचं' (म्हणजे हाताने पिळून पाणी फेकून द्यायचे) नंतर त्यात तिखट, मीठ, कांदे टाकून 'तुडपुडी' (मोकळी) भाजी बनवायची. कोंबडीच्या अंड्याच्या भाजीसारखी छान रुचकर लागते.

ही भाजी 'गरम' असते. गरोदर व बाळंतीण बाईला खायला देत नाहीत. गरोदरपणात ही भाजी खाल्ली तर उष्णतेने 'गर्भ उतरून जातो' (गर्भपात होतो) व बाळंतीण बाईने खाल्ले तर मुलाला हगवण लागते.

नीलकंठा

Gentiana kurroo

याचा वेल असतो.

वायवाताचा विकार असल्यास अंग दुखत असलयास हा वेल पाण्यात शिजवून त्या पाण्याने शेकतात.

फुटाणा

याचा वेल असतो. पावसाळ्यात जास्त दिसून येतो. या वेलाला लहान-लहान फुटाण्यासारखे फळ लागते. लोक कच्चे व पिकलेले फळ खातात. गोड लागते.

शेतात काम करताना बाया हे फळ खातात. छान लागते व तोंडात काही चावणे सुरू असल्यामुळे झोपपण लागत नाही.

या फळांची गंमत म्हणजे पावसाळ्याच्या सुरुवातीला ही फळे गोड लागतात पण पोळ्याच्या नंतर हाडूक महिन्यात हे फळ 'कडसूर-जुर' (खूप कडू) लागतात. 'खाऊसा वाटत नाही' (खावसे वाटत नाही).

तोंडली

Coccinia grandis

याचा वेल असतो. खाली बुडाशी कांदा असतो. हा रोवला तर 'येल वापतो' (वेल उगवतो).

फळांना 'तोंडली' म्हणतात. काही लोक कच्च्या तोंडल्याची भाजी करून खातात. तोंडल्याची भाजी जास्त खाल्ली तर माणूस वेडा बनतो व बुद्धू बनतो. मेंदू खराब होतो. त्यामुळे पुष्कळ लोक ही भाजी खात नाहीत. मोठ्या माणसांनी खाल्ली तरी लहान मुलांना सहसा खायला देत नाहीत.

तोंडले कच्चे खायला छान लागते पण त्यामुळे बहिरेपणा येतो.

नागवेल

पान

Piper betle

याचा वेल असतो. याची पाने विडा बांधून खातात. ताजी पाने खाल्याने ठसा लवकर पडतो. सर्दी-खोकल्यात, आवाज बसला असल्यास मुद्दाम विडा खायला देतात. विडा खाल्ल्याने 'थकान' (थकवा) दूर होतो. अंगावर कुठे गाठ, 'सुजन' (सूज), 'व्रण' (जखम) असल्यास त्यावर ताजे पान गरम करून बांधतात. विड्याची पाने खाल्ल्याने सर्दी 'पिकते'. 'सर्दी पिकते' म्हणजे पातळ शेंबूड घट्ट होतो. सर्दी-खोकला झाल्यास पाने वाटून त्याच्या रसात चुना, काथ, ओवा टाकून पाजतात. पान 'गरम' आहे. त्यामुळे 'थंडी' बसते.

मूल रडत असले, त्याच्या पोटात दुखत असले, किंवा त्याचे पोट साफ नाही झाले तर पाने गरम करून पोट शेकतात किंवा पोटाला बांधतात. 'पाने' गरम असल्याने बाळंतीण बाई खाते; लेकराला सर्दी-खोकला होऊ नये म्हणून!

वैद्य मंत्र टाकताना मंतरलेले पान खायला देतात. विशेषत: घसा दुखत असेल, गळ्यात सूज असेल तर यात पानाला सरळ बाजूने चुना लावतात, पानाचे देठ तोडत नाहीत व एका दमात पान खाल्ले पाहिजे.

डांगरू

खरबूज

Citrullus vulgaris

याचा वेल असतो. उन्हाळ्यात फळे लागतात, त्यांना 'डांगरू' म्हणतात. 'हिरव्या' (कच्च्या) डांगराची भाजी छान होते. पिकलेले डांगरू खातात.

डांगरू हे फळ 'थंड' आहे. डांगरू खाल्ल्यावर ताबडतोब पाणी पिऊ नये नाहीतर उन्हाळी लागते. बाळंतीण बाईला डांगरू खायला देत नाही कारण थंडी वस्तू आहे. बाळंतीण बाईने डांगरू खाल्ले तर नवजात बाळाचे पोट फुगते तसेच बाळाचे कान फुटतात.

लघवीत आग होत असल्यास डांगराच्या बिया वाटून खायला देतात. 'पिशाबी' (लघवी) व 'परसाकडे' (शौचाला) 'रोकली' (रोखली) असल्यास डांगराच्या बिया वाटून 'कोथ्याला' (आटीपोटाला) बांधतात.

लहान लेकराला डांग्या खोकला झाला किंवा मोठ्या माणसालाही खोकला असला तर डांगराच्या बिया जाळून त्याची 'मस' (राख) 'सहदात' (मधात) खातात.

भांग घोटताना त्यात डांगराच्या बिया टाकतात.

टरबूज

Citrullus lanatus

याचा वेल असतो. नदीच्या पात्रातल्या वाळूत (थोड्या ओलसर जागी) हा वेल खूप पसरतो. फळांना टरबूज म्हणतात. पिकलेले टरबूज रसाळ व गोड असते. टरबूज थंड असते. उन्हाळ्यात खाल्ल्याने उष्णता होत नाही पण टरबूज खाल्ल्यावर ताबडतोब पाणी पिऊ नये. नाहीतर उष्णता होते व उन्हाळी लागते.

टरबूज खाल्ल्याने अंगात शक्ती येते पण जास्त खाल्ल्याने अपचन होते. कच्च्या टरबूजाची व टरबूजाच्या सालीची भाजी बनवतात.

पोहन

Typha angustata, Typha angustifolia

पोहनचे झाड पाण्यावर असते. कमळाच्या झाडासारखीच मोठी पाने असतात. झाडाच्या बुडाला 'भिश्या' असतात. भिश्या म्हणजे पाईपासारखी लांब लांब मुळे. पाण्याच्या आत असतात. गुडघाभर पाण्यात आत खोदले तर या भिश्या निघतात. या भिश्या आणून कापून त्याची भाजी करतात.

पोहनच्या पानांच्या पत्रावळी बनवतात. पोहनचे पान भाजल्या जागेवर, 'खांडकांवर' (फोडांवर) लावतात. त्यामुळे माशा बसत नाहीत व जखम लवकर भरते. पोहनची पाने जाळून त्याची 'मस' (राख) खांडकांना लावतात.

पोहनच्या पानाला वर फूल लागते. त्या फुलाचा 'दोडा' असतो. दोडा म्हणजे कापसाच्या बोंडल्यासारखे असते. फुलाच्या आत बिया असतात. सोयाबीनच्या बियांसारख्या या बिया दिसतात. या बियांना 'घोगरा' म्हणतात. या बिया अशाच कच्च्या खातात. छान लागतात.

कमळ

Nymphaea pubescens, Nymphaea lotus

कमळाचा वेल पाण्यात असतो. याच्या मुळाशी कांदा असतो. हा कांदा पाण्याच्या आत चिखलात असतो. या मुख्य कांद्याभोवती त्याच्या वर गोल गोल बारीक कंद लागतात. त्यांना 'फुत्या' म्हणतात. कंद व फुत्या उकडून खातात. छान लागतात. फुत्या व कंद कापल्याबरोबर पिवळे दिसतात. पण थोड्या वेळाने त्यांचा रंग काळा पडतो.

कमळाच्या फुलांच्या आत गोल बोंडे लागतात. या बोंडांना 'कोकोबा' किंवा 'लड्डू' म्हणतात. याच्या आत काळ्या किंवा लाल रंगाचे बारीक दाणे असतात. हे दाणे 'खाकसासारखे' (खसखससारखे) दिसतात. या बारीक दाण्याच्या लाह्या फोडून खातात. या लाह्यात गूळ टाकून त्याचे लाडू बनवितात. या लाह्या इतक्या बारीक व हलक्या असतात की त्या तोंडात टाकल्या व आपण बोललो तर सर्व लाह्या उडून जातात.

देवाला कमळाचे फूल वाहतात. कमळाचे फूल फार सुंदर दिसते. सकाळी सूर्योदयाच्या वेळी ही फुले उगवतात. पोटात आग पडत असल्यास कमळाची फुले पाण्यात उकळून ते पाणी प्यायला देतात. गरोदरपणात पोटात दुखत असल्यास किंवा गर्भ उतरून जाऊ नये म्हणून कमळाची फुले पाण्यात किंवा दुधात उकळवून ते प्यायला देतात.

शिंगाडा

Trapa natans, Trapa bispinosa

शिंगाड्याचा वेल पाण्यात पसरतो. याच्या फळांना शिंगाडे म्हणतात. शिंगाडे उकडून खातात. छान लागतात. कच्चे शिंगाडे हिरवे असतात पण उकडणारे लोक हिराकस पाण्यात टाकून शिंगाडे उकळवतात. म्हणून शिंगाडे काळे, दिसायला सुंदर दिसतात.

शिंगाडा 'थंड' आहे. गरोदर बाया आवडीने खातात. पण बाळंतिणीला सव्वा महिना होईपर्यंत शिंगाडे खायला देत नाही.

शिंगाडे वाळवून त्याचे पीठ बनवतात. शिंगाड्याच्या पिठापासून जिलेबी बनवतात. छान लागते. उपवासाला शिंगाड्याच्या पिठाचे भजे, शिरा, थालीपिठ बनवून खातात.

न्याय

याचा वेल असतो. याची पाने 'चिरु' (बारीक) असतात. या झाडाचा 'कशा'-(काढा) करून 'थंडीतापात' (हिवतापात) देतात.

गूळवेल

Tinospora cordifolia

वेल असतो. झाडावर 'पगरतो' (पसरतो). तिखट, मीठ, चिंच टाकून किंवा लसूण, जिरे, तीळ टाकून या वेलाच्या पानांची चटणी बनवतात. जेवण चालत नसेल, मळमळ-उलटी असेल किंवा तापात तोंड कडू आले असेल तर ही चटणी खातात. 'बाकी' (छान) लागते. त्यामुळे तोंडाला चव येते. वाताचा विकार उसल्यास गुळवेलाचा पाला व आंब्याचा पाला एकत्र पाण्यात शिजवून त्या पाण्याने आंघोळ करतात, अंग शेकतात. हात-पाय मोडला किंवा 'उसण' (लचक) भरली तर जवस तेल गरम करून गुळवेलाच्या पानाला लावून ते पान लावतात. 'कामेलात' (काविळमध्ये) पानांचा रस दह्यात किंवा ताकात किंवा साखरेच्या पाण्यात देतात किंवा गुळवेलाचा काढा काढून पाजतात.

मूळव्याधीच्या आजारात पानांचा रस काढून ताकात टाकून प्यायला देतात. चर्मरोगात उदा. पांढरे डाग, चट्टे असल्यास, अंगाला खाज येत असल्यास गुळवेलाचा काढा करून पाजतात. आवरक्त 'हागी' (हगवण) किंवा 'नळहागी' (कॉलरा) झाल्यास या वेलाची पाने व मुळ्या एकत्र कुटून त्याचा रस पाजतात. 'मदुरामायच्या' (टॉयफॉईडच्या) आजारात, दम-खोकल्यात, तापात किंवा कुठल्याही 'जीर्ण तापात' (अनेक दिवस ताप येतच असल्यास) गुळवेल वाटून त्याचा रस पाजतात किंवा 'शहदात' (मधात) चाटण देतात.

गणभोवरा

याचा वेल असतो. पांढरी फुले 'उगवतात' (लागतात). फुलांची वेलाच्या मोठ्या देठांची भाजी करतात.

'झाडा' (शौचाला) साफ नाही झाला तर गणभोवऱ्याची फुले व बिया तसेच खातात किंवा बिया जाळून त्याची 'मस' (राख) पाण्यात टाकून पितात.

पुंगरू

पुंगरू
Plumeria rubra

यालाच काही जण पुंगरुन किंवा पुंगूर किंवा पुंगलीपण म्हणतात.

याचा वेल असतो. खूप 'पगरतो' (पसरतो). पाने बारीक असतात व फुले पांढऱ्या रंगाची असतात.

'किरीम' (जंत) झाल्यास, या वेलीच्या काड्यांच्या माळा करून, हाताला, पायाला कंबरेला बांधतात. याच्या 'सुगंधाने' (वासाने) जंत मरतात.

लहान लेकराला हगवण लागली तर या वेलाची अडीच पाने आणून, कुस्करून त्याचा रस आईच्या दुधात किंवा तसाच पाण्यात टाकून पाजतात.

लहान लेकराला 'दुधफुली' किंवा 'डब्बा' (न्युमोनिया) झाल्यास, या वेलाची अडीच पाने कुस्करून त्याचा रस आईच्या दुधात पाजतात.

अंगाला काही फोड-बेंड आले तर याच्या पानाला एरंडीचे तेल लावून मग ते पान गरम करून लावतात. सारा 'रस' (पू) निघून जातो.

सेरडिरा

शेरडिरा
Euphorbia airucalli

याचा वेल असतो. काटे असतात. खाली मुळाला 'कांदे' (कंद) असतात. हे कांदे शिजवून भाजी करतात.

पानाची व कोवळ्या 'डिऱ्यांची' (नवीन फांद्या फुटतात त्या!) पण भाजी करतात. पाण्यात शिजवून 'येरुन घ्यायचं'. (पाणी पिळून काढून टाकायचे) काही जण कांदे, तिखट, मीठ टाकून, फोडणी करून भाजी करतात तर काही लोक त्यात उडदाचे वडे टाकून भाजी बनवतात.

'फर' (फळे) लागतात. कच्चे फळ आणून, शिजवून, येरून घ्यायचे व मग ते पाट्यावर वाटून, परत त्यातले पाणी पिळून काढून घ्यायचे. तिखट, मीठ, थोडे आंबट टाकून व कांदे बारीक चिरून, त्याची फोडणी घालून 'तुडपुडी' (मोकळी) भाजी बनवायची. भातासोबत 'खावाले' (खायला) छान लागते.

या झाडाला 'रामदातण' म्हणतात; कारण असा समज आहे की जंगलात असताना रामाने याच झाडाचा दातण केला होता.

रानपडोळा

जंगली पडवळ
Trichosanthes cucumerina

याचा वेल असतो. याला फळे लागतात. गावठी पडोळ्यापेक्षा हे फळ खूप लहान असते. ही फळे खूप कडू असतात. जनावरपण खात नाही.

फळ पिकले की बियांसकट भाजून त्याची गोळी करून 'घटसरप' (घटसर्प) झाला किंवा 'चिकटा बिलटा' (चिक्कट ठसा) पडला किंवा गळ्यात सूज आली तर खायला देतात.

काही 'दोषिक उठला' (म्हणजे वेड्यासारखे करत असेल, बाळंतरोग असेल) तर बिया

उगाळून त्याचा गंध चाटायला देतात. दोषिक उठला तर काही जण कडू पडवळाच्या बिया आणि इंद्रावनच्या बिया एकत्र वाटून, गोळी बनवून तीन मात्रा देतात.

तिपनी

Teramnus labialis, Oxalis corniculata

याचा वेल असतो. वेलाला तीन-तीनच पाने असतात.

लहान लेकराला हगवण लागली तर या वेलाचा पाला कुटून, त्यात तिखट, मीठ व तांदळाचे किंवा ज्वारीचे पीठ टाकून, गोळे करून, वाफवून, बाळंतीण बाई खाते; म्हणजे लहान लेकराची हगवण थांबते. या औषधाचा गुण आईच्या दुधातून लेकरात उतरतो.

वाशीन

याचा वेल असतो व खूप पसरतो. या वेलापासून 'वाक' (दोरी) बनवतात.

या वेलाच्या पाल्याला बारीक बारीक चिरून, त्याची 'तुडपुडी' (मोकळी) भाजी बनवतात. छान लागते.

वायवाताचा आजार असेल, अंगात कुठे दुखत असेल तर वाशीनची भाजी जरूर खावी. वात, दुखणे कमी होते. वायवात होऊच नये म्हणून पण वाशीनची भाजी खातात.

एखाद्या बाईला 'पदर' (पांढरे पाणी) जात असल्यास, वाशीनचा पाला सुकवून, कुटून त्याची भुकटी थोड्या पाण्यात टाकून प्यायला देतात. खूपच थंड आहे. ही भुकटी पाण्यात टाकल्यास एकदम रक्तासारखी गोठून जाते.

खोबरेल येल

खोबर वेल / अनंतमूळ
Hemidesmus indicus

याचा वेल असतो. वेलाचा खूप छान वास येतो. या वेलाचे दोन प्रकार असतात.

१) बारीक पानांचा वेल - यात वास जास्त असतो. याला 'नरझाड' म्हणतात व या वेलाचा उपयोग पुरुषांसाठी करतात.

२) मोठ्या पानांचा वेल - यात वास कमी असतो. याला 'मादी' किंवा 'बाईझाड' म्हणतात व या वेलाचा उपयोग बायांसाठी करतात.

या वेलाचे मूळ कुटून चहात टाकतात. छान लागते. विलायचीसारखा सुगंध येतो. पौष्टिकपण आहे.

ज्या बाईला मूलबाळ नीट 'ठाकत नाही' म्हणजे मेलेले मूल जन्माला येते किंवा कमी वजनाचे मूल जन्माला येते तिला गरोदरपणात खोबरेल वेलाचे मूळ गाईच्या दुधात देतात.

मोठा भोवरा

Legerstromia speciosa

याचा वेल असतो. पांढरी फुले लागतात.फळांना 'भोवरे' म्हणतात. पानांची, फुलांची, फळांची, दोडांची भाजी करून खातात. आधी पाण्यात उकडून पाणी पिळून घेतात व मग मोकळी भाजी करतात. छान लागते.

'झाडा' (शौचाला) नाही झाला तर याच्या बिया जाळून त्याची 'मस' (राख) पाण्यात प्यायला देतात.

खापरफुटी

खपरकुटी
Boerha-via diffusa,Trianthema portulacastrum

याचा वेल असतो. जमिनीवर खूप पसरतो. याच्या पानांची 'तुडपुडी' (मोकळी) भाजी बनवतात. ही भाजी 'गरम' आहे. त्यामुळे बाळंतिणीला देत नाही.

एखाद्या बाईला 'रक्तसुर्ला' किंवा 'विटाळसुर्ला' असेल (म्हणजे मासिक पाळीच्या वेळी दुखणे) तर, तांदळाच्या लाल-पिवळ्या 'अक्षदा' (अक्षता) नेऊन झाडावर टाकायचे व मग मुळी आणून कुटून 'आंघोळीच्या वेळी' (चौथ्या दिवशी) गुळात घालून द्यायचे. या औषधाने तो विटाळसुर्ला बसला तर तिला मुलेबाळे होतात; नाहीतर नाही.

रान मटारू

Dioscorea bublifera (Linn)

याचा वेल असतो. जमिनीत 'मटारू' (कंद) लागतात. कच्चे मटारू कडू असतात. त्यामुळे खात नाहीत. पण कच्चे मटारू धुवून, त्याच्या बारीक फोडी करून, मोहात टाकून, शिजवून खाल्ले तर छान गोड लागते.

बाळंतीण बाईला रान-मटारू खायला देत नाही कारण 'थंडी' आहे. तिला गावठी मटारू खायला देतात कारण ते 'गरम' आहे.

गावठी मटारू

Dioscorea bublifera (Linn)

याचा वेल असतो. वेलावर 'खांदोखांदी'(फांदोफांदी) कांदे असतात. त्यांना 'मटारू' म्हणतात.

मटारू हे 'गरम' असते.

मटारू मोठे झाल्यावर 'इस्तवात' (विस्तवात) भाजून किंवा उकडून तसेच किंवा गुळासोबत बाळंतीण बाईला खायला देतात. त्यामुळे 'मामाभाचीचे दुख' उठत नाही व उठलं असेल तर

कमी होते. (मामाभाचीचे दुख म्हणजे, बाळंतपणानंतर गर्भाशय आकुंचन पावून कडक होते व त्यात खूप दुखते. कडक झालेले गर्भाशय दोन गोळे एकमेकांना चिकटवल्यासारखे दिसते. या दोन गोळ्यांना 'मामा-भाची' म्हणतात).

मुलीला पहिले 'नहाण' (मासिकपाळी) आल्यावर, पुढे बाळंतपणात तिला मामा-भाचीचं दुखणे होऊ नये म्हणून मटारू उकडून खायला देतात.

इतर लोकदेखील आवडीने गावठी मटारू खातात.

माहूर

Bauhinia vahlii

याचा वेल असतो. या वेलापासून 'वाक' (दोरी) काढतात. हा वाक खूप पक्का असतो. वाकाचा उपयोग शिंके विणायला, बंडीच्या धुरीला बांधायला करतात.

या वेलाची पाने आकाराने मोठी असतात. पानांचा उपयोग जेवणासाठी पत्रावळी विणायला, 'मोरे' (पावसाळ्यात अंग झाकायला) तयार करायला करतात. पानांचे 'साती' (छत्री) बनवतात. पावसाळ्यात डोके झाकायला याचा उपयोग होतो.

दिवाळीत माहूरच्या वाकाचे गाई-बैलांसाठी 'गेट्टे' विणतात.

मोमनारू

Dioscorea bublifera

याचा वेल असतो. गावठी मटारूसारखेच वेलीला वरती कंद लागतात. या कंदांना 'मोमनारू' म्हणतात. मोमनारूचे कंद उकडून खातात.

मोमनारूचे कंद गरम असतात. त्यामुळे, बाळंतिणीला खायला देत नाहीत कारण मुलाला हगवण लागते.

पांढरा गुंजा

Abrus precatorius

याचा वेल असतो. फळांना 'गुंजा' म्हणतात. डोळे दुखत असले किंवा डोळ्यांनी नीट दिसत नसल्यास, पांढरा गुंजा उगाळून त्याचे गंध डोळ्यात काजळासारखे लावतात.

पांढऱ्या गुंजात हिरडा व अफू टाकून 'जंगम लोक' काजळ बनवतात. हे काजळ लावल्यावर आधी खूप जळते व मग मात्र थंड वाटते. रोज नाही लावायचे! आठ दिवसात एकदा लावतात, जेवणानंतर! यामुळे डोळे छान थंड राहतात. दृष्टी सुधारते. लोक स्वत: विकत घेऊन लावतात.

लाल गुंजा
Abrus precatorius

याचा वेल असतो. फळांना 'गुंजा' म्हणतात. गुंजा दिसायला सुंदर दिसतात. गुंजा ओवून, त्याच्या माळा गळ्यात घालतात. गुंजांचे चेंडू बनवून लहान मुले खेळतात. घोटा किंवा हात किंवा पाय मुरगळला असेल तर लाल गुंजाचा पाला कुटून लहान लेकराच्या लघवीत शिजवून दुखणाऱ्या जागेवर बांधतात. ते सारे दुखणे ओढून घेते असा समज आहे. गुंजाचा पाला आवळीच्या पाल्यासारखा दिसतो. गुंजाचा पाला खाऊन काहीही खाल्ले, उदा. माती, तरी गोड लागते. सोनार लोक पूर्वी मापासाठी गुंजा वापरायचे. 'तोळा', 'गुंजा', 'मासा' अशी मापे असायची.

मालगुंजा
Abrus precatorius

याचा वेल असतो पण खूप जास्त पसरतो. पाने मोठी असतात. शेंगा लागतात व एका शेंगेच्या आत एकच 'ठोकळ' (मोठी) बी असते. (इतर प्रकारच्या गुंजामध्ये एका शेंगेत अनेक बिया असतात). या बियांना 'मालगुंजा' म्हणतात. 'मदुरामायच्या' (टायफॉईडच्या) तापात बिया - मालगुंजा वाटून साखरेत टाकून खातात. हा वेल खूप पसरत असल्याने 'कुप' (कुंपन) बनविण्याच्या कामी येतो.

ढोकयेल
डोकेल
Ampelocissus latifolia

यालाच काही जण 'डोकेल' किंवा 'डोकेला' म्हणतात. वेल असतो. कुठल्याही मोठ्या झाडावर हा वेल चढतो. पाने चांगली मोठी असतात. विषारी आहे; त्यामुळे खात नाहीत.

जंगलातून लाकडाची मोळी आणताना ती मोठी या वेलाने 'आरुन' (बांधून) घेतात. तसेच 'कुंपावन' किंवा 'कुंपावर' (कुंपण) करताना, काड्या बांधण्यासाठी या वेलाची 'वाक' (दोरी) करतात.

सदासावली
Ipomea maxina (linn)

याचा वेल असतो. लहान लहान फळे लागतात-ते खातात. बीपासून परत झाड 'वापते' (उगवते).

धातू - परम्याच्या रोगात, या वेलाचा पाला 'ओरपून' (तोडून), वाटून त्याचा अर्क काढतात व त्यात खडीसाखर व जिरे टाकून सकाळ-संध्याकाळ अशा पाच मात्र देतात. एकदम आराम पडतो.

बोदेला

याचा वेल असतो. जमिनीवरच 'पगरतो' (पसरतो). लहान लहान फळे लागतात. कच्च्या फळातल्या बिया काढून त्याची भाजी करतात. काहीजण त्यात चण्याची दाळ टाकतात. छान लागते. पिकलेले फळ खातात. 'डांगरासारखे' (खरबूज) गोड लागते.

येल्या अरन
येल्या आरण

वेल असतो. 'शेरड्या' (शेळ्या), बकऱ्या पाला खातात.

वायवाताच्या विकारात पानांचा कशा काढून त्याने शेकतात व अंग धुतात.

'मुखे थंडी' (यात शरीराचे 'कुटके - कुटके' - सांधे दुखतात) झाली म्हणजे येल्या अरनचा वेल व पळसाच्या झाडाची आंतरसाल पाण्यात शिजवून त्या पाण्याने शेकतात व आंघोळ करतात.

सुपली
गोकर्णी
Clitoria ternatea

सुपली व गोकर्ण एकच झाड आहे. याचा वेल असतो. हा वेल पावसाळ्यात जास्त दिसून येतो. हा वेल जमिनीवर जास्त पसरतो. या वेलाला दोन रंगांची फुले लागतात - जांभळी व पांढरी! ही फुले पूजेसाठी वापरतात. गुरेढोरे, शेळ्या-बकऱ्या पाला खातात.

गौरीच्या वेळी फुलांची गौर करतात. त्यात सुपलीची फुले लावतात.

शिकरी

लहान झाड असते. नाक चोंदले असेल, शिंक येत नसेल किंवा डोके दुखत असेल तर शिकरीचा पाला वाटून नाकात ओढतात. त्यामुळे मस्त शिंक येते व नाक मोकळे वाटते.

शिकरीची फुले, दारूची फुले एकत्र करून पाच दिवस, पाच मात्रा, सकाळ-संध्याकाळ एखाद्या बाईला दिल्यास तिला मूलबाळ होत नाही.

गोडरी
Sphaeranthus indicus

लहान झाड असते. 'भुईवरच' (जमिनीवर) खूप पसरते. झाडाच्या शेंड्याला जांभळी फले लागतात. 'वायवाताच्या बिमारीत' (सांधेदुखी, सांध्यांवर - अंगावर सूज) पूर्ण झाड पाण्यात

उकळून तो कशा पितात. त्यानेच आंघोळ करतात व शेकतात.

'माऊलीचा ताप' (टॉयफॉईड, गोवर, कांजण्या) असेल तर हे झाड वाळवून, जाळून त्याचा 'धुवों' (धूर) देतात.

प्रदर किंवा पांढरे पाणी जात असल्यास या झाडाचे मूळ कुटून त्यात पाणी, खडीसाखर टाकून प्यायला देतात. खूप गुणकारी मानतात. नवेगावच्या एका सुईण आजीने स्वत:चा अनुभव सांगितला, ''खूप वर्ष मला प्रदर जाण्याचा त्रास होता. पुष्कळ इलाज केला पण फायदा झाला नाही. शेवटी गोडरीच्या उपावाचा (उपचाराचा) फायदा झाला.''

रानभेंडी

वनभेंडी
Urena lobata, Abelmoschus manihot

लहान झाड असते. पानांचा आकार हा गावठी भेंडीच्या पानांपेक्षा मोठा असतो. भेंड्या लागतात. त्याची भाजी करून खातात.

पोटात मुरडा मारत असल्यास या झाडाचे मूळ उपटून, धुऊन, पाण्यात ठेचून, त्यात खडीसाखर व जिरे टाकून खायला देतात.

बैल 'पोगडला' (पातळ हागला) तर मुळासकट झाड आणून पाण्यात ठेचून ते पाणी पाजतात.

मेंढुली

Triumfetta rotundifolia

हे लहान झाड असते. पावसाळ्यात सर्वत्र दिसते. याच्या पानांना एक प्रकारची पांढरी चमक असते.

माणसाला, ढोराला काही जखम झाली; किडा किंवा विंचू 'डसला' (चावला) तर या झाडाचा पाला वाटून जागेवर लावतात. एकदम थंड वाटते व जखम लवकर भरते. कुऱ्हाडीचा मार जरी लागला तर हा पाला लावल्याने जखम लवकर 'बुजून येते' (भरते).

दुधाना

दुधभाजी
Euphorbia hirta

लहान झाड असते. बारीक बारीक पाने असतात. जमिनीवर हे झाड 'मस्त पगरते' (पसरते). या झाडापासून दूध निघते. त्यावरून नाव आहे.

बाळंतीण बाईला दूध येत नसल्यास किंवा कमी येत असल्यास या झाडाचा कशा करून पाजतात.

तसेच गाई-म्हशीला, बकरीला दूध येण्यासाठी या झाडाचा कशा करून पाजतात.

रानवड

हे लहान झाड असते. 'भुईवर' (जमिनीवर) पसरते.

एखाद्या बाईला धात किंवा परमा जात असल्यास, रानवडाचे मूळ पाण्यात कुटून त्यात खडीसाखर व जिरे टाकून प्यायला देतात; खूप फायदा होतो.

लोंडुली

लेंडुली
Triumfetta rhomboidea

हे लहान झाड असते.

गाई-म्हशीला दूध येण्यासाठी हे झाड चारतात.

पांढरे पाणी जात असल्यास लोंडुलीचे मूळ, पिटोंडीचे मूळ व कोलाटीचे मूळ एकत्र कुटून त्याचा रस काढतात व त्यात पाणी, खडीसाखर आणि जिरे टाकून प्यायला देतात. 'थंड' असते व सारी उष्णता ओढून घेते.

सोनामुखी

Cassia angustifolia

हे लहान झाड असते.

अजीर्ण झाले, पोट 'डांबारलं' (फुगले), भूक लागत नसेल, किरीम झाले असतील, झाडा (परसाकडे) साफ होत नसेल तर सोनामुखीचा पाला किंवा मुळ्या वाटून त्याचा रस पाण्यात प्यायला देतात. एकदम फायदा होतो.

दम-खोकला असल्यास, पाला वाटून त्याचा रस मधात देतात किंवा पाला जाळून त्याची 'मस' (राख) मधात चाटण म्हणून देतात.

काही जखम झाली, वरण (व्रण) - फोडे झालेत तर सोनामुखीचा पाला वाटून लावतात. जखम लवकर भरते.

तरोटा

Cassia tora

हे लहान झाड असते. 'बरसातीत' (पावसाळ्यात) सर्वत्र दिसते.

तरोट्याच्या पानांची भाजी करून लोक आवडीने खातात. भाजी करताना पानांना तव्यावर भाजून, गरम करून त्यात पाणी घालून पिळून टाकतात. त्यामुळे लाल पाणी निघून जाते. अशा प्रकारे भाजून, पाणी काढून भाजी केली तर कॉलरा होत नाही असे इथल्या लोकांचे मत आहे.

इथले लोक पाने जरूर भाजतात. काही जण मात्र जरड पान भाजतात, कोवळे नाही. ही

भाजी 'गरम' आहे त्यामुळे काही जणांना हगवण होते. बरसातीत (पावसाळ्यात) जर पाऊस आला तरच भाजी खायची. 'तपन' (उन्ह) असलं तर नाही खायचं कारण कॉलरा लागतो.

ही भाजी 'गरम' असल्यामुळे गरोदर व बाळंतीण बाईला मुळीच देत नाहीत. गरोदरपणात जर दिली तर गर्भ उतरून जातो व बाळंतिणीला दिली तर लेकराला हगवण लागते.

कोवळ्या शेंगांचीपण भाजी करतात. अंगाला खाज, खरुज फोडे, इसब, गजकर्ण असल्यास पाला वाटून लावतात. एकदम फायदा होतो.

देवतरोटा

रानतरोटा
Cassia occidentalis

हे लहान झाड असते. बरसातीत (पावसाळ्यात) सर्वत्र उगवते. याच्या शेंगा भाजून खातात. छान लागतात.

ब्रह्मराक्षस

लहान झाड असते पण याची पाने खूप मोठी असतात. म्हणूनच या झाडाचं नाव 'ब्रह्मराक्षस' आहे. झाडाच्या मुळाशी कांदा असतो. तो 'रोवला' (लावला) तर झाड 'वापते' (उगवते).

डोके दुखल्यास पानाला एरंडीचे तेल लावून गरम करून डोक्याला बांधतात.

कुठे बेंड झाला, मोठा 'खांडूक' (फोड) झाला तर पानाला एरंडीचे तेल लावून गरम करून बांधतात. सारा पू व दु:ख खेचून घेते.

हिरवी मिरची किंवा 'वारली' (वाळली) मिरची टाकून पानांची चटणी बनवतात.

'मदुरामायच्या' (टॉयफॉईड) बिमारीत जीभ 'बकल येऊन जाते' (म्हणजे तोंडात, जिभेवर खूप फोड येतात व त्यामुळे शब्द बोलताच येत नाही), अशावेळी ही चटणी खाल्ली तर तोंड चांगले 'तुपट-तुपट' (तूप खात असल्यासारखे) छान लागते.

'इचू' (विंचू) 'डसला' (चावला) तर या झाडाची 'खांदी' (फांदी किंवा दांडी) ठोकून चावलेल्या जागी लावतात.

कुबड मोडी

कंबरमोडी
Tridax procumbens

हे लहान झाड असते. जमिनीवर पसरते. बारीक बारीक फुले लागतात.

काही किडा-कीटक चावला तर त्या जागेवर पान कुस्करून लावल्यास मुळीच आग होत नाही.

काही जखम झाली तर पाला कुस्करून लावावा. त्यामुळे दुखत नाही, रक्त जाणे थांबते व जखमपण लवकर भरते.

कुठे 'दुख' झाला (बेंड झाला) जखम झाली तर पान कुटून त्या 'हरद' (हळद) मिळवून लावले तर एकदम फायदा होतो. 'कुऱ्हाड राहो का वासला बसो' (मिस्त्री, वाढई लोकांना वासल्याचा मार बसतो), कुबडमोडीचा पाला मस्त 'जंतर' (उपयोगी) आहे.

रानआले

रानआला
Zingiber officinale

हे लहान झाड असते व जंगलात पाणी असलेल्या जागी जास्त करून दिसते. याच्या मुळात आल्यासारखी कांडी असते. म्हणून या झाडाला रानआले म्हणतात.

अंगावर कुठे जखम झाली तर रानआले कुटून जखमेला बांधतात. त्यामुळे जखम लवकर भरते.

रानआले, रानतोंडलीचा कांदा, आतोनाचा कांदा हे सर्व सुकवून त्यांची एकत्र कुटून 'भुकनी' (भुकटी) बनवतात व ती तुपात तळून, साखरेच्या पाकात टाकून कमशक्ती असलेल्या माणसाला, बाईला खायला देतात. हे खाल्ल्याने माणूस 'पोकतो' (लठ्ठ होतो) व अंगात शक्ती येते. ''मोठा टॉनिक माल आहे!''

भुईनिंब

हे लहान झाड असते.

लहान लेकराला 'किरीम' (जंत) झाल्यास पूर्ण झाड खोदून आणून, वाळवून, पाण्यात टाकून देतात. थोडेसे 'कडसूर' (कडवट) लागते.

'जीर्णताप' (जास्त दिवस ताप) असल्यास हे झाड पाण्यात शिजवून ते पाणी प्यायला देतात.

कुणाला 'बोका उठला' (आम्लपित्ताचा विकार) तर हे जाड पाण्यात टाकून ते पाणी प्यायला देतात.

भुईआवळा

Phyllanthus neruri,Phyllanthus asparulatus, Phyllanthus lawil

लहान झाड असते. याची पाने बारीक असतात. पावसाळ्यात या झाडाला पांढरी फुले लागतात. या झाडाचे फळ दिसायला आवळ्यासारखेच दिसते पण आकाराने खूपच लहान असते. या फळांच्या आत अगदी बारीक बारीक बिया असतात.

दम-खोकला असल्यास हे झाड वाटून त्याचा रस पितात, तसेच अंगावर कुठेही सूज आली, भूक लागत नसेल, पोट दुखत असेल, 'कामेला' (कावीळ) झाला असल्यास भुईआवळ्याचे झाड वाटून त्याचा रस पाजतात. अंगावर खाज, चट्टे, गजकर्ण, खरूज असल्यास भुईआवळा वाटून त्याचा लेप लावतात. कुठे जखम झाली, फोडे झाले, लचक भरली तर भुईआवळ्याचे झाड वाटून लावतात. त्यामुळे दुखणे कमी होते व जखम लवकर भरून येते.

'पदर जाण्याचा' (पांढऱ्या पाण्याचा) त्रास असल्यास विटाळ जास्त जात असल्यास भुईआवळ्यासचे झाड मुळासकट वाटून 'धुवणीत' (तांदूळ धुताना निघणारे पाणी) टाकून प्यायला देतात.

रानतूर

Atylosia scarabaeoides

हे लहान झाड असते पण झुडूपासारखे वाढते. या झाडाच्या काडीपासून 'वाक' (दोर) काढतात. या वाकापासून शिंक, दावे तयार करतात. या वाकापासून बाजापण विणतात. झाडाचे धांडे चुलीत जाळतात. फुलांची भाजी बनवतात. झाडाला शेंगा लागतात पण शेंगा खात नाहीत.

गुणीत

Ophiuros exaltatus

हे लहान झाड असते. याची पाने सुंदर दिसतात.

'इचू' (विंचू) डसला (चावला) तर गुणीताची मुळी (मूळ) घासून त्या जागेवर लावतात.

विंचू चावला तर गुणीताच्या मुळाचा बंद करून (काही लोक त्याला भारून - मंत्रून) त्याचा धागा बांधतात. हाताला विंचू चावल्यास मनगटाला बांधतात व पायाला विंचू चावल्यास पायाच्या आंगठ्याला बांधतात.

'ठाकऱ्या इचू' (लाल-काळ्या रंगाचा मोठा विंचू किंवा इंगळी) चावला तर शिंदीच्या झाडाच्या गाभ्यात गुणीताची धुतलेली मुळी टाकतात व दोन्ही एकत्र चावून चावून खातात.

गंगावन

लहान झाड असते. जमिनीवर 'पगरते' (पसरते). शाळेत जाणारे पोर-पोरी या झाडाचे पान पाटीला चोळतात. त्यामुळे पाटी एकदम चोपडी होते.

तूप कढवताना त्यात या झाडाचे पान टाकतात. त्यामुळे तूप 'रवेदार' (दाणेदार) होते व त्याला छान सुवास येतो. तुपातले हे पान खायला छान लागते.

ब्रह्मदांडी

या झाडाची पाने व कुसराचे फुल एकत्र कुटून, दम्याची बिमारी असल्यास, सहदात (मधात) टाकून खायला देतात.

लाल मिरची

Capsicum annuum

लहान झाड असते. मिरच्या लागतात. पिकल्यावर लाल होतात. पिकलेल्या मिरच्या वाळवून कांडून त्याचे लाल तिखट बनवतात. लाल तिखटाला 'हिरोती' किंवा 'कसोडी' म्हणतात. लाल तिखटाशिवाय भाजीला चवच नसते.

मिरची 'गरम' आहे. त्यामुळे 'गरमी' असलेल्या लोकांनी, ज्यांचा 'बोका उठतो' (बोका उठणे म्हणजे आम्लपित्त! यात पोटात बोका गुरगुरल्यासारखा गुर, गुर असा आवाज येतो म्हणून बोका उठणे हे नाव पडले) त्यांनी जास्त खाऊ नये.

कुत्रा चावलेल्या जागी मिरची पावडरचा लेप लावल्यास विष बाहेर येते, दुखणे थांबते व जखम लवकर भरते.

डोकेदुखी, पोटदुखी व कंबरदुखी असल्यास मिरची पावडरचा लेप लावतात.

चावलेला साप विषारी आहे की नाही हे बघण्यासाठी मिरची खायला देतात. साप विषारी असल्यास मिरची तिखट लागत नाही.

विंचू चावलेल्या जागी मिरची पाण्यात वाटून लावल्यास ताबडतोब आराम होतो.

लघवीत त्रास होत असल्यास मिरची खाल्ल्याने लघवी मोकळी होते.

मिरचीचा एक वेगळा प्रकार आहे. ती आकाराने खूप लहान असते. याला 'बुगडी मिरची' म्हणतात. वैद्य अनेक औषधी देताना सोबत बुगडी मिरची देतात.

कुलथा

कुरथा

Dolichos uniflorus

लहान झाड असते. कुलथ्याचे दोन प्रकार असतात. काळा कुलथा व पांढरा कुलथा. दोन्ही छान असतात. कुलथ्याचे झाड हे जनावरांसाठी पौष्टिक खाद्य आहे.

कुरथ्याची दाळ लोक खूप खातात. ही दाळ 'टॉनिक' (पौष्टिक) आहे. कुरथ्याची दाळ 'गरम' आहे. खाल्ल्यास गर्भ पडतो म्हणून गरोदरपणात खात नाहीत. पण बाळंतपणानंतर कुरथ्याचा 'चून' (पिठले/बेसन), 'घुगरी' (घुगऱ्या/उसळ), 'गरम' म्हणून मुद्दाम खातात. कुरथ्याच्या दाळीच्या मुगवडीसारख्या वड्या बनवतात. कुरथ्याच्या दाळीच्या घुगऱ्या बनवतात, बेसन करतात, 'आरण' करतात (आरण म्हणजे एखाद्या रस्सेदार पातळ भाजीत थोडे बेसन टाकणे). कुरथ्याच्या चुनीत (पिठात) आंबट टाकून बेसन किंवा पिठले बनवतात.

कुरथा पाण्यात भिजवून त्या पाण्याला लसणाची फोडणी देऊन 'कडण' करतात. असे 'रांधलेले' (शिजवलेले) पौष्टिक पाणी पितात. एखाद्या मुलीची वयात येऊनही मासिक पाळी सुरू न झाल्यास कुरथ्याच्या 'कडणात' (शिजवलेले पाणी) लाल जिलबुलीची फुले टाकून एक-दोन मात्रा प्यायला देतात.

एखादी बाई किंवा एखादा माणूस थंड पडला असेल, बोलचाल बंद झाली असेल तर कुरथा भाजून त्याच्या बेसनात एरंडीचे तेल टाकून अंगात उष्णता फुटण्यासाठी तळहाताला, तळपायाला चोळतात.

दम्याच्या विकारात कुरथ्याची बिडी ओढतात. दम्यात, पोटदुखीत, जंत झाल्यास, मासिक पाळीच्या वेळी पोटात दुखत असल्यास कुरथा खातात. 'कामेलात' (कावीळमध्ये), लघवीत आग होत असल्यास कुरथ्याच्या झाडाचा काढा पितात.

चाकवत

Chenopodium album

लहान झाड असते. चाकवतचे दोन प्रकार असतात. मोठा चाकवत व लहान चाकवत. लहान चाकवत जास्त रुचकर लागते. चाकवतची भाजी करून खातात. कांदा टाकून भाजी करतात तर कुणी 'दारभाजी' (डाळभाजी) बनवतात. पौष्टिक व चवदार असते. चाकवतची भाजी 'गरम' असते. लवकर पचते.

चाकवतची भाजी खाल्ल्याने भूक वाढते, अंगात ताकद येते. एखादा पुरुष 'कमजोर' (नामर्द) असल्यास त्याला चाकवतची भाजी खायला देतात. चाकवतची भाजी खाल्ल्याने पोटातल्या कृमी मरतात. 'कामेलात' (कावीळमध्ये) चाकवतची भाजी मुद्दाम खायला देतात.

बोरू

Crotalaria juncea

लहान झाड असते. या झाडापासून 'वाक' (दोरी) काढतात. या वाकापासून दावे, बाजा, शिंके विणतात; बैलाचे कासरे, 'पेरट्या' (वेसणी) बनवतात.

या झाडाच्या बिया कुटून पाण्यात कालवून 'पालवाने' (कपड्याने) गाळतात. चिक्कट पाणी निघते. त्यात साखर टाकून पांढरे पाणी जात असल्यास प्यायला देतात.

बोरूचे झाड लावलेल्या जागी जमीन सुपीक होते. नंतरचे पीक 'मस्त' (चांगले) येते.

इकजिरा

कडुजिरा

झेंडूच्या झाडासारखे लहान झाड असते. पांढरी फुले लागतात. याच्या बिया जिऱ्यासारख्या

दिसतात पण चवीला कडू जहर असतात. हे झाड पूर्ण कडू जहर असते.

कुठलेही औषध बनवताना वैदू लोक त्यात थोडा इकजिरा (कडूजिरा) टाकतात. 'किरीम' (जंत), ताप, पोटदुखी, 'कामेला' किंवा 'कवूळ' (कावीळ) झाल्यास 'कोरी हंडी' (नवीन मडके) लाल गरम करून त्यात बकरीचा 'मूत' (लघवी) व इकजिरा टाकून ते सात दिवस प्यायला देतात.

किरीम झाले तर बिया वाटून पाण्यात टाकून पाजतात. अजीर्ण झाले, 'झाडा' (शौचाला) साफ नाही झाला, पोटाला 'फुगारा आला' (फुगले) तर कडूजिऱ्याच्या बिया खातात.

सूर्यफूल

Helianthus annuus

लहान झाड असते. सुंदर पिवळी फुले लागतात. या फुलांवर खूप किडे, मधमाशा बसतात. या फुलांतल्या बिया भाजून खातात. बियांपासून काढलेले तेल खाण्याच्या कामी येते.

आजकाल अनेक शेतकरी मुद्दाम आपल्या शेतात सूर्यफुलाची झाडे लावतात. बिया विकून चांगला पैसा मिळतो. पण पाण्याची सोय नसेल तर झाडे मरून जातात.

फोफंडे

कपाळफोडी

Cardiospermum halicacabum

लहान झाड असते. या झाडाची फळे लहान मुले आपल्या कपाळावर फोडतात; खेळ करतात. फळ पिकल्यावर त्यातले बी खातात.

दिवाळी

Tephrosia hamiltonii

लहान झाड असते. 'दंडात' (शेतात) राहाते.

उलटी-हगवण लागली तर या झाडाची 'मुळी' (मूळ) पाण्यात 'ठोकून' (ठेचून) देतात.

या झाडाला शेंगा लागतात. या शेंगा म्हशीच्या 'खुराकीत' (चाऱ्यात/अन्नात) टाकल्या तर म्हशीला चांगले दूध येते.

वाबीट

Sabai grass

लहान झाड असते. पण खाली जमिनीवर खूप 'पगरते' (पसरते). या झाडाला 'खाकसासारखा' (खसखससारखे) बी निघते. दुष्काळात वाबीटचे बी दळून भाकरी करून खातात. अनेक सुईणींनी सांगितले की त्यांनी स्वत: वाबीटची भाकरी दुष्काळात खाल्ली आहे. पण हे बी

खूपच बारीक असते व ते काढण्यासाठी किंवा गोळा करण्यासाठी बरीच मेहनत करावी लागते.

गुलचिवडी

तेरडा

Impatiens balsamina

लहान झाड असते. सुंदर फुले लागतात. या फुलांचा देवाच्या पूजेत 'उपाय' (उपयोग) करतात.

तुरस

अ) तुळस/तुरस ब) काळी तुळस

Ocimum sanctum, Ocimum americanum

लहान झाड असते. तुळशीचे दोन प्रकार असतात. हिरवी तुळस व काळी तुळस. दोन्ही प्रकार खूप पवित्र व उपयोगी आहेत.

तुळस घराजवळ लावल्यास साप, 'इचू' (विंचू), 'मच्छर' (डास), कीटक, भूत-प्रेत घरात येत नाहीत.

महारोगाच्या रोगात तुळशीची मुळी वाटून पाण्यात प्यायला देतात. गांधीलमाशी किंवा किडा चावल्यास तुळशीच्या मुळाजवळची माती लावतात.

उचकी थांबत नसली तर तुळशीच्या पानांचा रस काढून 'सहदात' (मधात) चाटण देतात. खोकला झाला, ताप आला तर तुळशीची अडीच पाने तोडून गुळात गोळी करून कोणाला न कळता तीन मात्रा द्यायच्या. अंगाला खाज आली, खसू (खरूज) झाली किंवा फोड आले तर तुळशीचा पाला वाटून त्याचा रस लावाचा (लावायचा). अंगावर 'धावडे' (पित्त) उठले तर तुळशीच्या पाल्याचा रस लावायचा. आवाज बसला - घोगरा झाला तर तुळशीच्या पाल्याचा रस घेतल्याने आवाज 'मोकरा' (मोकळा) होतो. घशातला 'बिलटा' (ठसा) पण निघून जातो. ताप, सर्दी-खोकला झाल्यास पोटात दुखत असल्यास, भूक लागत नसल्यास, तुळशीच्या पाल्याचा रस पितात.

रोज तुळशीचा पाला खाल्ला तर 'साखरेची बिमारी' (मधुमेह) कमी होते. रोज तुळशीचा पाला खाल्ला तर मूलबाळ होत नाही. रोज सकाळी तुळशीचे एक पान जरी खाल्ले तरी दिवसभर मन प्रसन्न असते.

तुळशीची रोज पूजा करतात. घराच्या अंगणात तुळशीचे वृंदावन बांधतात. सकाळ-संध्याकाळ, तुळशीपाशी दिवा लावून बाया तुळशीला प्रदक्षिणा घालतात.

तुळस म्हणजे 'क्रिष्णा'ची (कृष्णाची) बायको! तुळशीचे 'लगीन' (लग्न) दरवर्षी थाटात करतात.

तुळशीला आई मानतात.

कोणी बाईमाणूस मरायची वेळ आली तर जवळ तुळस ठेवतात; मोक्ष मिळतो.

गाणी

१. - तुळशीचा 'खांदा' (फांदी) लवलव बागे (वाकते),
वारा मंजुळसा लागे॥
- तुळशीचा पाला 'खावाल' (खायला) तिखट,
देव-गोविंद मुकाट॥
२. - तुळसा माझे बाई,
नको हिंडू जंगलात,
जागा देतो अंगणात॥
- तुळसा माझे बाई,
नको हिंडू 'कुप-काठी' (कुंपणाकाठी)
जागा देतो मी आंगणी॥
- तुळसा माझे बाई,
नको हिंडू राना - 'बनी' (वनी)
जागा देतो मी 'ब्रिंदवणी' (वृंदावनी)॥
३. - माझा मन आवडीन, झाड रोवी ग तुळस,
सुवास गेली स्वर्ग - लोक॥
- 'आपयेला' (आपल्या) 'हस्तकाने' (हाताने) ग,
झाड रोवयलो 'तुळुशी' (तुळशी),
आन वास गेली ग,
तुकाराम बोले॥ कैलासी - देवापाशी;
- पंढरीला जाता जाता कोण कोण,
करू एक मन, करू एक मी,
पुढे आहे बन, तुळशीचा!
तुळशीच्या मंजुळा वाहू देवावरी,
मखमल्या झुली नंद्यावरी॥

(महादेवाला जाताना हे वरील गाणं म्हणतात.)

रुई

Calatropis gingantea, Calatropis procera, Asclepias gigantea

लहान झाड असते. या झाडापासून दूध निघते.

किरीम पडत असतील तर रुईच्या पानाचे थेंबभर दूध लहान मुलाला पाजायचे. लहान बाळाला सर्दी-खोकला झाला तर रुईचे दूध टाळूवर लावतात. डोळ्यांना लागू देत नाही कारण डोळे 'फुटतात' (जातात). हातापायात काटा किंवा काच 'गडला' (रुतला) असेल तर त्यावर

रुईचे दूध बांधतात. 'आपसूक' (आपणहून) निघून येते. रुहीच्या दुधात उतरणीचे मूळ किंवा उरसुडीचे मूळ बांधून गर्भाच्या 'पिवसीत' (पिशवीत, गर्भाशयात) टाकले तर गर्भ उतरतो. काही जणांना रुईचे दूध लावले तर तो उततो. ते कमी व्हावे म्हणून त्या जागी खोबरेल तेल लावावे.

गळ्यात गाठी आल्या, गळ्यात सूज आली, गलगंड झाले तर रुईच्या झाडाखालची माती आणून, थोडी गरम करून गळ्याला, गालाला, कानाच्या मागे लावतात.

काही बेंड किंवा फोड झाले तर, रुईची मुळी पाण्यात उगाळून लावतात. अंगावर कुठे सूज आली तरी मुळी पाण्यात उगाळून लावतात. रुईच्या झाडावर 'हिवरे-पिवरे' (हिरवे-पिवळे) तांदूळ करून, टाकून, झाडाच्या मुळ्या आणून कांड्या करून गर्भाशयात 'आत चालवलं' (आत टाकले) तर गर्भ पडतो. रुईच्या झाडाची मुळी आणून 'झोट्यात' (आंबाड्यात) खुपसले तर बाळंतपण लवकर होते. बाळंतपण झाल्याबरोबर झोटा उघडून मुळी फेकून द्यायची. नाहीतर 'फूल' (वर) आतमध्येच राहून जाते, पडत नाही.

लहान लेकराचे किंवा मोठ्या माणसाचे पोट 'डांबारले' (फुगले) तर रुईच्या पानांना एरंडीचे तेल लावून, गरम करून त्याने पोट शेकायचे. तांदळाच्या पिठाची किंवा गव्हाच्या पिठाची भाकर रुईच्या पानावर टाकून गोवऱ्यावर किंवा चुलीत भाजून भाकर खाल्ली (पान नाही!) तर किरीम होत नाही.

या झाडाला छान फुले लागतात. रुईची फुले, तांब्याचा पैसा, पिपरी व हिंग एकत्र हंडीत भरून भट्टीत गरम करून त्याची 'मस' (राख) बनवायची आणि मधात टाकून त्याचे चाटण दम्याच्या आजारात द्यायचे.

रुईची फुले वाळवून घरात ठेवतात. कोणालाही दम लागला तर ताबडतोब मस करून मधात चाटण देतात. कोणाला मूल-बाळ नाही झाले तर रुईच्या झाडावर 'पिवळे तांदूळ' (अक्षता) टाकून मंत्र टाकतात. झाड जर ओलेच राहिले, वाळले नाही तर 'कुसवा साधते' (म्हणजे मूल होते) आणि झाड जर 'वारले' (वाळले) तर 'कुसवा साधणार नाही' (मूल होणार नाही) असे मानतात. (अडपल्ली गावचा एक शिंपी हा 'उपाव' (उपाय) बरेचदा करतो असे अनेकांनी सांगितले.)

रुईची फुले मारुतीच्या आणि महादेवाच्या पूजेत अतिशय महत्त्वाची आहेत. मारुतीच्या मूर्तीला रुईच्या पानांचा हार चढवतात.

रुईच्या झाडाखाली पाण्याचा झरा राहातो व तो महादेवावर अभिषेक करतो असा समज आहे. त्यामुळे विहीर खोदण्याची जागा निवडताना रुईचे झाड असलेली जागा बघतात.

डोरली

रानवांगा, Solanum indicum.
Solanum melongenu, Solanum surattense, Solanum miriacanthum

लहान झाड असते. जमिनीवर 'पगरते' (पसरते). विषारी नाही. उलट काही 'जहर' (विष) 'अंगात' (पोटात) गेले तर, पूर्ण झाड आणून, कुटून त्याचा रस तिळाच्या तेलात प्यायला देतात.

अंगाला काही खाज किंवा 'इसब' (एक्झिमा) झाला तर पूर्ण झाड कुटून त्याचा रस लावतात.

डोरली, येरोणी, भारकड, वराकली आणि खरासली यांची मुळे एकत्र कांडून, त्यात शिजवून, थंडी-तापात, खोकल्यात व कुठल्याही 'ज्वरात' (तापात) तीन-चार मात्रा देतात. आजार एकदम कमी होतो.

दात दुखत असल्यास कोणाला न सांगता मुळी आणून विड्याच्या पानात टाकून खातात.

भांड्यात पाणी घेऊन वर फडके बांधून त्यावर डोरलीची फुले, अडुसाची फुले आणि उतरणीची फुले ठेवून, 'उकडून' (वाफवून) घ्यायचे. नंतर या उकडलेल्या फुलांना कुटून लहान मुलांना खोकला झाल्यास तीन दिवस पाजायचे.

डोरलीला वांग्यासारखी फळे लागतात. यांना 'रानवांगी' म्हणतात. कच्च्या फळांची भाजी करून खातात. वाताचा विकार असल्यास ही भाजी जरूर खावी. रानवांगी गरम आहे.

रानवांगी जाळून त्याची 'मस' (राख) करून त्यात वेलची व लवंग टाकून दमा असल्यास, मधात त्याचे चाटण देतात.

पिकलेली रानवांगी चिरून त्यातल्या बिया काढायच्या. 'जगऱ्या' (शेणाच्या गोवऱ्या) पेटवून, त्यावर लोखंडी सराता ठेवून त्यावर या बिया मांडायच्या. त्यावर, मडक्याचे झाकण - त्याला मध्ये 'छेद' (छिद्र) करून 'मांडायचं' (ठेवायचे). 'येरवाची' (बांबूची) नळी त्यावर लावून दुसरे टोक कानाला लावायचे. त्या धुरामुळे दात जर किडलेले असतील तर त्याच्या अळ्या तोंडातून खाली पडतात. (?)

भूतगांजा

यालाच रान भां म्हणतात. हे लहान झाड असते. या झाडाला एक प्रकारचा सुवास असतो.

लहान लेकराला, मोठ्या माणसाला कोणालाही भूताने झपाटले तर हे झाड जाळून, त्याचा धुवाँ (धूर) देतात.

'सर्दी-शिरकोंबा' (सर्दी-पडसे) ताप-खोकला झाला तरीपण या झाडाचा जाळून धूर देतात.

हातापायाला चिखल्या झाल्या तर हे झाड वाटून लावतात.

तांदुळका

कुकुडका
Celosia argentea

लहान झाड असते. विशेषत: पावसाळ्यात सर्वत्र दिसून येते. कोंबड्याच्या तुऱ्यासारखी पांढरी व दाट गुलाबी फुले लागतात. ही फुले 'शो'साठी (शोभेसाठी) खूप छान दिसतात.

पानांची 'तुडपुडी' (मोकळी) किंवा दारभाजी (दाळभाजी) करून खातात. छान लागते. ही भाजी 'थंडी' आहे. गरोदर बाईला ही भाजी खायला देत नाहीत कारण तिला हगवण लागते. बाळंतीण बाईलापण ही भाजी खायला देत नाहीत. 'थंडी' असल्यामुळे त्या बाईला 'वायवात' होते (अंग व पाय दुखतात) व लेकराला सर्दी खोकला होतो. ही भाजी दुधातून उतरते.

फुलातून काळे बी खाली पडते व परत त्याचे नवीन 'वापते' (उगवते).

मोठा चिकणा

Sida acuta,Sida rhombifolia,Sida cordifolia,Sida retusa

हे लहान झाड असते. याला 'पिवले' (पिवळे) फुले लागतात. 'डबरी वात' असल्यास (या वाताच्या विकारात सारे सांधे सुजतात व त्यात खूप दुखते) मोठा चिकण्याचे मूळ पाण्यात शिजवून त्या पाण्याने तीन वेळा आंघोळ करायची व ते पाणी तीन वेळा प्यायचे. तो माणूस एकदम उठून चालायला लागतो. मोठा 'हुकूम'(गुणकारी) औषध आहे.

एखाद्या व्यक्तीला लकवा मारल्यास मुळीचा काढा करून, साखर टाकून प्यायला देतात.

मूलबाळ होत नसल्यास मुळ्या आणून, वाळवून त्याची भुकटी साखरेसोबत देतात.

गरमी-परम्याचा रोग (गुप्तरोग) असली, लघवीत 'अंगार' (आग) होत असली किंवा पांढरे पाणी जात असेल तर या झाडाचा वाटून रस काढतात व त्यात खडीसाखर आणि जिरे टाकून प्यायला देतात.

सब्जा

Ocimum basilicum

लहान झाड असते. या झाडाला तुळशीच्या झाडासारख्या पण मोठ्या मंजुळा असतात. या झाडाला विशेष सुवास असतो. हे झाड घराजवळ राहिल्यास घरात साप आणि डास येत नाहीत. घरात डास जास्त झाले तर या झाडाची पाने आणि मंजुळा कुस्करून त्याचा रस अंगाला लावतात. वासामुळे डास चावत नाहीत. डास घरात येऊ नये म्हणून या झाडाच्या खांद्या (फांद्या) किंवा पूर्णच झाड उपटून आणून घरात ठेवतात.

हगवण होत असल्यास सब्जाच्या झाडाची अडीच पाने खायला देतात.

भाजीत, वरणात, पिठल्यात, शिजवताना सब्जाचे पान टाकतात. सुवास येतो.

लहान कामुनी

Solanum nigrum

लहान झाड असते. भुरकी पांढरी फुले येतात. हिरवे फळांचे घोस लागतात. खात नाही कारण विषारी आहे.

पातुर

लहान झाड असते. पावसाळ्यात सर्वत्र दिसून येते. याच्या पानांची 'तुडपुडी' (मोकळी) व 'दारभाजी' (दाळभाजी) बनवतात. ही भाजी 'गरम' आहे; बाळंतिणीला खायला देत नाही कारण बाळाला हगवण लागते.

घोळ भाजी

Portulaca cleracea

लहान झाड असते. जमिनीवर खूप 'पगरते' (पसरते). पावसाळ्यात जास्त 'वापते' (उगवते). घोळीचे दोन प्रकार असतात. लहान पानांची व मोठ्या पानांची घोळभाजी दोन्ही प्रकार खातात. याची दाळभाजी बनवतात. ही भाजी थोडी चिकट असते.

चवळीची भाजी

चवळाई

Amaranthus viridif, Amaranthus tricolor

लहान झाड असते. या भाजीचे अनेक 'कलर' (प्रकार) आहेत. उदा. लहान पानांची भाजी, मोठ्या पानांची भाजी, लाल पानांची भाजी, लाल दांडे असलेली भाजी - यालाच 'चवळी माठ' किंवा 'माटाची भाजी'पण म्हणतात.

काटेरी असलेल्या झाडाची भाजी खात नाही. त्याची भाजी केली तर ती चिकट-चिकट होते व त्याने हगवण लागते. इतर सर्व प्रकारच्या झाडांच्या पानांची मोकळी भाजी व 'दारभाजी' (दाळभाजी) बनवतात. फोडणीत खूप कांदा घातला तर भाजी गोड लागते. 'झाडा साफ नाही झाला' (शौचाला साफ नाही झाले) तर ही भाजी देतात. गरोदर बाईला मुद्दाम ही भाजी खायला देतात. त्यामुळे गरोदर बाईच्या अंगात ताकद येते व तिचे पोट साफ राहाते.

पांढरे पाणी जात असलेल्या बाईला या झाडाच्या मुळ्या वाटून त्याच्या रसात खडीसाखर व जिरे टाकून प्यायला देतात.

अंगाला कुठे भाजले तर हे झाड वाटून त्याचा लेप लावतात. थंड असते.

बाळंतीण बाईला मात्र ही भाजी खायला देत नाहीत. कारण त्यामुळे लहान बाळ जास्त 'हागते' (शौचाला होते). ''मायच्या दुधातून भाजी उतरते ना!''

आंबाडी

आंबाडी : पिवळी फुले/लाल फुले

Hibisuis cannabinus, Hibiscus sabdariffa

लहान झाड असते. आंबाडीची भाजी दोन 'कलर'ची (प्रकारची) असते. - 'खायची किंवा गावठी आंबाडी' व 'बोरू काढण्याची किंवा जंगली आंबाडी'.

खायची आंबाडी - याची पाने खूप आंबट असतात. पानांची चटणी, 'तुडपुडी' (मोकळी) भाजी व 'दारभाजी' (दाळभाजी) बनवतात. ही भाजी काही जणांना 'थंडी' व काही जणांना 'गरमी' असते. गरोदर बाईला आंबट खाण्याची आवड होते म्हणून मुद्दाम ती ही भाजी खाते. बाळंतीण बाईला मात्र ही खायला देत नाहीत कारण आंबट असल्यामुळे तिला व तिच्या मुलाला खोकला होतो.

या झाडाला सुंदर लाल-पिवळी फुले लागतात. या फुलांची चटणी करतात; मुरब्बा करतात व ही फुले 'बेसनात' (पिठल्यात) वरणात टाकतात. फुले वाळून त्यांचा भुरका करून ठेवतात. उन्हाळ्यात हा भुरका पाण्यात टाकून पितात. हे शरबत प्याल्याने 'झाँव' (उन्ह) लागत नाही. एकदम 'थंड' असते.

बोरूची (जंगली) आंबाडी - या झाडाचा 'वाक' (दोर) खूप चांगला निघतो व हा वाक मजबूत असतो. या वाकाने बाजा विणतात, 'चराट' (बालटी/बादली बांधण्याची रस्सी) तयार करतात. हा वाक खूपच उपयोगी आहे, सर्वच कामात कामी येतो.

जंगली आंबाडीची झाडे कापून, गठ्ठे बांधून, तळ्या-बोड्यात नेऊन, पाण्यात टाकून, 'कुहू' (कुजू) घालतात व मग त्याचा वाक काढतात.

पकान भेद

Bergenia lingulata

हे झाड नदीत असते. खूप 'पगरते' (पसरते). हे झाड गरम आहे. याची मुळे आणून, कुटून दम्याच्या विकारात देतात. याचा पाला बारीक चिरून त्यात तिखट, मीठ व आंबट टाकून 'तुडपुडी' (मोकळी) भाजी बनवतात. ही भाजी 'वायवाताच्या' (संधीवाताच्या) विकारात अंगापायाला मुंग्या येत असल्यास व दम्यात खूप गुणी आहे. जरूर 'खाहावा' (खावी). गाई-बैलाला, म्हशीला वात झाला तरी ही भाजी खायला देतात.

याचा पाला आणून बाया त्याचे 'आयते' (धिरडे) बनवतात. यासाठी पाला धुवून, बारीक खुडून तांदळाच्या दाण्यात भिजू घालतात व मग पाट्यावर त्यात हिरवी मिरची, सांबार टाकून चांगले वाटून घेतात. थोडीशी 'हरद' (हळद) व मीठ टाकतात. चुलीवर तवा मांडतात. पीठ 'पतला' (पातळ) करून त्याचे आयते बनवतात. 'तपलाले' (गरम) आयते छान लागतात. 'थंडे पडले' (थंड झाले) तर 'आखूड' (कडसर) लागतात.

पाला बारीक चिरून तांदळाच्या पिठात किंवा लाखोरीच्या बेसनात टाकून तिखट, मीठ, हळद, सांबार टाकून 'मुठे' (वडे) तळतात. गरम गरम मुठे छान लागतात.

पकान भेदाच्या झाडाला 'दोडे' म्हणून येतात. फुलासारखे असते. लहाक - दम असला तर या दोड्यात, 'सूठ' (सुंठ), 'विलाई' (विलायची), कुसर व सुरुंद यांची फुले, झाडणीचे कुसर, 'जवारीचे' (ज्वारीचे) जोंधळे टाकून, वाटून कोणी गुळात गोळी करून देतात. तर कोणी सहदात (मधात) 'चाटणी' (चाटण) म्हणून देतात.

धुतरा

Datura stramonium, Datura metel, Datura innoxia

यालाच काही लोक धुतुरा म्हणतात. लहान झाड असते. 'जहरी' (विषारी) आहे. जनावरेपण खात नाही! नुसता पाला जरी खाल्ला तरी माणूस किंवा जनावर मरते. कोणाला मारायचे असल्यास धुतरा खायला देतात.

पाय सुजला किंवा कुठे जखम होऊन सूज आली तर त्यावर धुतऱ्याचा पाला कुटून त्याचा अर्क लावतात.

दुधाच्या गाठी होऊन 'थनात' (स्तनात) बेंड झाला किंवा सूज आली तर पाला कुटून त्याचा लेप बांधतात.

धुतऱ्याचा पाला कुटून, त्याचा अर्क काढून - ''चांगला हिरवा निघतो!'' - त्याच्यात एरंडीचे किंवा मातीचे किंवा खायचे तेल टाकून, गरम करून सात 'उत' (उकळ्या) 'मारायच्या' (घ्यायच्या) व कुठे 'वायवात' (संधिवात) आला, अंगात दुखणे किंवा लचक भरली, 'लखवा' (लकवा) मारला तर त्याने मालीश करतात.

हत्तीपाय असल्यास त्यावर धुतऱ्याची पाने बांधतात. नाहीतर धुतऱ्याची पाने व रुईचे मूळ एकत्र कुटून, त्याच्या रसात मातीचे किंवा सरसूचे तेल टाकून पायाला 'जिरवतात' (मालीश करतात); पण विशेष फायदा होत नाही.

या झाडाला सुरेख फुले येतात. ही फुले जाळून, त्याची 'मस' (राख) तेलात मिसळवून कुठे जखम झाल्यास लावतात.

पाय सुजले तर धुतऱ्याची फळे तेलात उकळून त्याने मालीश करतात.

धुतऱ्याचे बीपण विषारी असते. खरूज झाल्यास धुतऱ्याचे बी पाण्यात वाटून लावतात. कोणाला मारायचे असल्यास धुतऱ्याचे बी खाऊ घालतात. खेड्यात अनेक लहान मुले खेळता-खेळता चुकीने धुतऱ्याचे बी खाऊन मरतात. धुतऱ्याचे विष उतरविण्यासाठी तूप, दूध व साखर मिसळवून खायला देतात किंवा मिठाचे पाणी पाजतात.

तंबाखू

Nicotiana tobacum

लहान झाड असते. बरेच 'माड्या' (आदिवासी) लोक आपल्या घराच्या अंगणातच याची शेती करतात. माड्या लोक ताजा ताजा तंबाखू, बिडी ओढायला व खायला वापरतात. तंबाखूची पाने वाळवून 'चिलीम' म्हणून विकतात. चुन्यासोबत तंबाखू तसाच खातात किंवा बिड्याच्या पानात टाकून खातात.

तबाखूची बिडी, सिगारेट, 'चुट्टा' (चिरुट) बनवतात व ओढतात. तंबाखूची नस नाकात ओढतात. डोके दुखत असेल, सर्दीने नाक बुजलेले असेल तर याचा फायदा होतो पण मग

याची सवयच लागते.

तंबाखूने दात घासतात. त्यामुळे मुखरोग होत नाही व दातपण पक्के राहतात. पण याची सुद्धा सवय लागते. तंबाखू खाल्ल्याने दात काळे होतात.

पुरुषाची 'शीर फुगली' (अंडकोषावर सूज आली) तर तंबाखूची पाने गरम करून बांधतात.

तंबाखू ओढल्याने दम - खोकला होतो व 'हाडाच्या काड्या बनतात' (माणूस कमजोर होतो) तरी बरेच लोक तंबाखू खातात.

तंबाखूची सवय (व्यसन) लागली तर ते सोडणे मोठे कठीण काम होते.

हळदीचे झाड

Curcuma domestica, Curcuma longa

रान हळद, Curculigo orchioide

लहान झाड असते. मुळाला, जमिनीच्या आत हळदीच्या गाठी लागतात. या गाठींना 'हळकुंड' म्हणतात. या गाठी वाळवून, कांडून हळद तयार करतात.

हळदीच्या गाठीला जमिनीत लहान शेंगासारखे फुटवे लागतात. या शेंगाची भाजी करतात. 'जुन्या' (वाळलेल्या) गाठीची हळद करतात.

हळद खाण्यासाठी वापरतात. हळदीशिवाय भाजीला शोभा नाही.

'कामेला' (कावीळ) झाला तर, हळदीची पावडर दह्यात किंवा ताकात टाकून रोज प्यायला देतात.

लेकरू जन्माला झाल्यावर त्याची नाळ लवकर पडावी, त्यात पू होऊ नये म्हणून लेकराच्या 'बोंबलीला' (बेंबीला) हळद लावतात.

बाळंतीण बाईच्या घडीवर हळद व ते देतात. त्यामुळे बाईला 'बाळंतदोष' होत नाही.

बाळंतीण बाईच्या देहीला (योनीत) आत हळद लावतात. हळद व एरंडीचं तेल योनीत आत टाकून सुईण पाच दिवस धुते. घाण वास येऊ नये, बाळंतज्वर होऊ नये म्हणून असे करतात.

बाळंतीण बाईला कपाळाला हळद व तेल लावतात. त्यामुळे बाळंतरोग (यात बाई पागलसारखी करते) होत नाही.

गरमी, फोडे, खाज, खरूज झाले तर कडूलिंबाचा पाला वाटून त्यात हळद टाकून लावतात.

कुठेही 'घाव' (जखम) झाला तर त्यात हळद भरतात.

किरीम झाल्यास, हळद पावडर व वावडिंग गरम पाण्यात टाकून पाजतात.

सर्दी-खोकला, दम-ताप असला तर आल्याच्या किंवा तुळशीच्या काढ्यात अथवा दुधात, हळद व गूळ टाकून पितात.

- गोईण :

अंगाची चामडी (कातडी) गोरी दिसावी म्हणून हळद लावतात.

मुका मार बसला तर तुळशीचा पाला वाटून त्यात हळद टाकून खातात व जागेवर लावतात.

या झाडाच्या पानांचा उपयोग नाही.

देवधर्मात हळद हवीच. हळदीशिवाय देवाची पूजा होत नाही. सवाष्ण बाया, पोरीबाळी, कपालाला हळद-कुंकू लावतात. लग्नात नवरा-नवरीच्या अंगाला हळद लावतात हळद टाकून 'अक्षदा' (अक्षता) पिवळ्या करतात. ''हळद म्हणजे मात-मायचा अंगारा.''

झेंडू

Tegetes erecta, Tegetes patula

लहान झाड असते. या झाडाच्या पानांचा एक खास (विशेष) वास असतो. या वासामुळे झेंडूच्या झाडाजवळ साप येत नाहीत. त्यामुळे घरोभोवती झेंडू लावतात.

कान फुटला किंवा कान दुखत असला तर झेंडूच्या पानांचा रस कानात टाकतात.

लचक भरली, सांधा दुखला, ठेच लागली तर झेंडूचा पाला वाटून त्याचा रस लावतात.

किडा चावला, अंगावर 'धावडे' (पित्त) उठले तर, झेंडूच्या पानांचा रस लावतात. थंड वाटते.

काही जखम झाली तर त्या जागी पाला वाटून लावतात. जखम लवकर भरते.

या झाडाला छान फुले लागतात. ही फुले 'शो'साठी (शोभेसाठी) छान दिसतात. फुले पूजेत वापरतात. फुलांची वेणी करून केसात लावतात. फुलांच्या आत छोटी गाठ असते. ती खातात - खोबऱ्यासारखी गोड लागते.

'परसाकडच्या जागी' (गुदमुखात) चीर पडली, मूळव्याधीची 'शिकायत' (त्रास) असली तर झेंडूच्या कळ्या किंवा फुले वाटून त्या जागी लावतात.

फुलांचा वापर पूजेसाठी होतो. लक्ष्मीपूजनाच्या दिवशी झेंडूच्या फुलांचा मान असतो. दिवाळीच्या वेळी घरात झेंडूच्या फुलांचे तोरण बांधतात. दिवाळीत फुलांचे हार करून गाई-बैलांच्या गळ्यात घालतात व शिंगांना बांधतात.

गाणे

महादेवाला जाताना लोक खालील गाणे म्हणतात -

पंढरीला जाता जाता करू एक मन,
पुढे आहे बन, झेंडवाचे!
झेंडवाचे फुलं वाहू देवावरी,
मखमल्या झुली नंद्यावरी!!

कुंबा

Lepidagathis cristata. Lepidagathis mitif

हे लहान झाड असते. 'वावरा'त (शेतीत) राहाते व जमिनीवर पसरते. या झाडाला 'बोंडुर्ली' (बोंडी) येऊन त्यावर कागदासारखी पांढरी फुले लागतात.

दसऱ्याला या झाडाचे खूप महत्त्व आहे. दसऱ्याच्या दिवशी सकाळी गोवऱ्या थापून पाच पांडव तयार करतात. कुंब्याचे झाड आणून पूजा करतात. संध्याकाळी रावणाला मारून 'सोना' (सेहरा किंवा आपट्याची पाने) आणतात.

गाणे

तुळशीच्या झाडाचे बाकी इतर दिवशी खूप 'सत्त्व' (महत्त्व) असते; पण दसऱ्याला नाही. त्यामुळे दसऱ्याच्या दिवशी तुळशी कोमेजून असते. अशा वेळी कुंबा म्हणते -

काऊन रडता तुळसाबाई?
माझा सत्त्व पाहिला नाही!

गोष्ट

दसऱ्याच्या दिवशी पांडव वनवासात जातात. काशीला जातात. तिथे आई मरते. आईचे दहन करून 'रक्षा' (राख) टाकून बसतात. 'तपमानामुळे' (उन्हामुळे) आंग लासत असते. त्यावेळी घरी 'द्रौपदा' (द्रौपदी) पांडवांचा धावा करते. पाच गोवऱ्यांचा पाच पांडव करून पूजेसाठी तुळस बघायला जाते पण तुळस भेटत नाही, कुंबा भेटते; तर तेच आणून पूजा करते.

द्रौपदी म्हणते -
उन्हाळ्याचे उन्ह शेकते सोळा काडी,
माझे पांडव चालते पायी,
दुयोधन का बोलते,
द्रुपता माझी भावसून!!

द्रौपदीचा धावा ऐकून पांडव लवकर घरी येतात. पूजेला, तुळशीऐवजी वेळेवर द्रौपदीला कुंबा भेटली म्हणून दसऱ्याच्या दिवशी कुंबाचे फार महत्त्व आहे.

पानफुटी

घायमारी

Kalanchoe pinnata

यालाच काहीजण घायमारीपण म्हणतात. याच्या पानांना खाचा असतात व तिथून नवीन पाने फुटतात. म्हणून पानफुटी हे नाव!

अंग भाजले तर पाने ठेचून लावतात. आग कमी होते व जखम लवकर भरून येते.

दूध पाजणाऱ्या बाईच्या स्तनात दुधाच्या गाठी येऊन सूज आली असल्यास, ठनक (दुखत) मारत असल्यास पाने ठेचून बांधतात. एकदम आराम होतो.

काही वरण (व्रण), जखम असल्यास पान ठेचून त्या जागी बांधतात. त्यामुळे जखमेत खाज, पू होत नाही व ती लवकर भरते.

रक्तहागी (आवरक्त हगवण) होत असल्यास पाला कुटून त्याच्या रसात खडीसाखर टाकून पाजतात.

अंगात कुठेही जखम होऊन रक्त जात असल्यास, पाने वाटून बांधतात. रक्त जाणे एकदम थांबते.

विंचू किंवा दुसरा किडा चावून आग होत असल्यास पाने वाटून लावतात. आग एकदम शांत होते; थंड वाटते.

सदाफुली

जगन्नाथ

Catharanthus roseus

लहान झाड असते. बाराही मास (महिने) झाडाला फुले असतात. जांभळे व पांढरे, दोन रंगाची फुले असतात. फुले शोभेसाठी सुंदर दिसतात.

काही खाज-खरूज, गजकरण, इसब झाले तर या झाडाच्या मुळ्या व पाने वाटून लावतात.

साखरेची बिमारी (मधुमेह) असल्यास, पाच दिवस रोज सकाळी कोवळे तीन पान खातात.

ढोरे,-बकऱ्या पाने खात नाहीत.

चिटकुली

चिटको / चितरुख

Symphorema polyandrum

लहान झाड असते. याची पाने मिरचीच्या झाडाच्या पानांसारखीच असतात.

मुलगी जर 'डगर झाली नाही' (म्हणजे मुलीचे वय होऊनही जर तिची मासिक पाळी सुरू झाली नाही) तर, अडीच चिटुकलीचे पान व त्यात खडीसाखर आणि जिरे टाकून त्या पोरीला खायला देतात.

'महारोगाच्या' (कुष्ठरोगाच्या) रोगात या झाडाच्या फांद्या खायच्या तेलात शिजवून अंगाला लावतात.

कुष्ठरोग असल्यास चण्याची दाळ भिजवून त्यात चिटुकलीच्या फांद्या व टटूचे मूळ मिसळून, वाटून, गाईच्या तुपात वडे 'रांधून' (बनवून) खायला देतात.

तिरोणी

त्रिपंखी

Coldenia procumbens

याच झाडाला 'तिलवणी' म्हणतात. लहान झाड असते. पिवळी फुले लागतात. शेंगा लागतात पण खात नाहीत.

कान दुखला किंवा फुटला तर पाला वाटून त्याचा रस कानात टाकतात.

'दोषिक उठला', 'बाळंतदोष झाला' (यात बाळंतीण बाई वेड्यासारखी करते) तर तिरोणीची मुळी, कामुनीची मुळी, इंद्रावनचे बी आणि लसूण सर्व एकत्र वाटून खायला देतात.

आदमुदा

याच झाडाला काही लोक मईमुदा, आदमुसा किंवा आदमुथा म्हणतात. हे झाड जमिनीवर खूप पगरते (पसरते).

या झाडाला ओव्यासारख्या बिया लागतात. त्या बिया खातात. ''आदमुदा म्हणजे शुद्ध ओवाच!''

या बिया गरम पाण्यात उकडून घेऊन, वाळवून डब्यात भरून ठेवायच्या. खूप वर्षे टिकतात. हा असा उकडलेला आदमुदा खाल्ल्याने पोटात आग पडत नाही आणि तो चविष्ट असतो.

कुठल्याही रोगात, तापात, विशेषत: मदुरामायच्या (टॉयफॉईडच्या) रोगात दिल्यास खूपच छान! ताप उतरतो. गाईच्या दुधात किंवा तांदळाच्या पिठाच्या कांजीत, दह्यात किंवा ताकात आदमुदा व खडीसाखर देतात.

आदमुद्याच्या बियांचा 'कशा' (काढा)पण करून पितात.

आदमुदा खाल्ल्यावर 'बाहेरकडे' (शौचाला) चांगली होते. पोटदुखी, अजीर्ण बसते. उष्णता कमी होते व त्यामुळे मन शांत होते.

मूळव्याधीचा त्रास असल्यास आदमुदा व खडीसाखर खायला देतात.

दात दुखत असल्यास दातांना आदमुद्याची पावडर चोळतात.

आदमुदा हा 'सर्वाले' (सर्वांना) 'पडते' (उपयोगी ठरते).

गोखरू

Tribulus terrestris, Pedalium murex

हे लहान झाड असते. जमिनीवर 'पगरते' (पसरते). या झाडाच्या फळांना 'गोखरू' म्हणतात. त्यांना काटे असतात. त्यामुळे ते माणसांच्या, जनावरांच्या अंगाला चिकटतात.

मूत्ररोगात गोखरू फारच गुणकारी आहे. लघवीत आग होत असेल, लघवीत रक्त किंवा धातू/खर जात असेल तर गोखरूचे फळ पाण्यात शिजवून ते पाणी खडीसाखर टाकून प्यायला देतात.

'गरमी परम्याची बिमारी' (गुप्तरोग किंवा लैंगिक संबंधातून पसरणारे रोग) असली किंवा पांढरे पाणी जात असेल तर गोखरूच्या काढ्यात खडीसाखर व जिरे टाकून प्यायला देतात.

एखाद्या पुरुषाला 'स्वप्नदोष' असला (म्हणजे झोपेत आपणहून वीर्य गळत असेल) तर

त्याला गोखरूचा काढा पाजतात.

एखाद्या पुरुषाचा 'जोर' किंवा 'शक्ती' कमी (लैंगिक संबंधात) असली तर किंवा तो 'नामर्द' असला तर गोखरू व 'मारबतीचे' (शतावरीचे) मूळ एकत्र पाण्यात शिजवून तो काढा प्यायला देतात. ''गोखरू व मारबतीच्या काट्यासारखा लिंग जोर करते व गोखरूसारखा बाईला जास्त चिकटते.'' - एक सुईण आजी म्हणाल्या.

कडू भाजी

Glossogyne pinnatifoda

लहान झाड असते. पावसाळ्यात 'वापते' (उगवते) व मस्त 'पगरते' (पसरते). याला बारीक फुले लागतात. या झाडाच्या पानांची 'तुडपुडी' (मोकळी) भाजी बनवतात. भाजी करताना त्यात 'खटाई' (चिंच) व भरपूर कांदा टाकतात. छान लागते.

कडुवेल

कंदवेल
Cissus quadrangularis

नेहमी हिरवागार दिसणारा हा एक प्रकारचा वेल आहे. दुसऱ्या झाडावर चढून खूप 'पगरतो' (पसरतो). याच्या फांद्या मांसल असतात व त्यांना मध्ये-मध्ये जोड असतात. त्यामुळे हे झाड साखळीसारखे दिसते. या जोडातून पाने फुटतात, यांच्या मांसल फांद्या तोडल्यावर त्यातून दुधासारखा रस निघतो.

'हड्डी' (हाड) मोडल्यास हे झाड वाटून त्या जागी लेप लावतात व बाजूला बारीक बारीक काड्या ठेवून पक्के बांधून ठेवतात. प्रत्येक दोन-तीन दिवसांनी परत लेप लावतात. झाड वाटून त्याचा थोडासा रस प्यायलापण देतात. हाड लवकर जुळून येते.

अशाच प्रकारे अंगात कुठे लचक भरली असेल, जखम सुजली असेल तर त्या ठिकाणीपण कडूवेल ठेचून त्याचा लेप लावतात.

अजीर्ण झाल्यास, पोटदुखी असल्यास, मूळव्याधीचा त्रास असल्यास कडूवेलाच्या कोवळ्या फांद्यांची व पानांची भाजी करून खातात किंवा कडूवेल वाटून त्याचा रस पितात.

हिरड्या सुजल्या असतील, हिरड्यांतून पू-रक्त वाहत असेल तर कडूवेल वाटून त्याचा रस हिरड्यांना लावून चोळतात व थोडा रस पितात.

करदळी

Canna indica

यालाच 'कडदुळी'पण म्हणतात. लहान झाड असते. खूप पसरते. बुडाशी कांदा असतो. सुंदर लाल, पिवळी फुले लागतात. शोभेसाठी व देवाच्या पूजेसाठी या फुलांचा वापर करतात.

लहान लेकरांना नीट संडास नाही झाली व पोट फुगले किंवा 'श्वास लागला' (न्युमोनियाचा आजार) तर या झाडाच्या पानाला एरंडीचे किंवा इतर कोणतेही खाण्याचे तेल लावून साधारण 'आस' (गरम) करून पोटाला बांधतात. त्यामुळे पोटाचा फुगारा कमी होतो, धाप कमी होते व संडासपण साफ होते.

धानभाजी

Ammannia baccifera

लहान झाड असते. पावसाळ्यात धानाच्या शेतीत मोठ्या प्रमाणात दिसून येते. या भाजीची पाने लांब असतात. पिवळ्या रंगाची बारीक फुले लागतात. धानभाजीची दाळभाजी बनवून खातात. '' 'टॉनिक माल' आहे. खायलापण छान लागते.''

वर

या झाडाचे दोन प्रकार असतात. एक 'खायचा वर' आणि दुसरा 'घांगऱ्या वर'.

खायचा वर - हे लहान झाड असते. पावसाळ्यात उगवते. दिसायला सुंदर दिसते. या झाडाची दांडी आणून, सोलून त्याचे वडे बनवतात. वडे बनविण्यासाठी दांडे कुटून, त्यात तांदळांचे पीठ, तिखट, मीठ व हळद टाकून, चुरून त्याचे लहान-लहान वडे थापून तळतात. भाजीसाठी दांडे बारीक चिरून 'खटाई' (आंबट) टाकून कांद्याची फोडणी देऊन बनवतात. दांडीचे बारीक तुकडे करून दाळीत-वरणात व 'चुनात' (पिठल्यात)पण टाकतात.

घांगऱ्या वर - हे झाड दिसायला खायच्या वराच्या झाडासारखेच दिसते पण याच्या वरती देठाला फळांचे झोके यातात. हे झाड व फळ विषारी आहे; खात नाहीत.

कोचई

Colocasia antiquorum

हे लहान झाड असते. ओल असलेल्या जागी खूप 'पगरते' (पसरते). खाली मुळाशी कांदा असतो. कोचई ही धोप्याच्या झाडासारखीच दिसते. पण कोचईची दांडी व कांदा पांढरा असतो तर धोप्याचे लाल असते. खाण्यासाठी कोचईपेक्षा धोपा जास्त चांगला असतो. कांदा खात नाही कारण 'खाज करते' (खाजवते). पानांची दाळभाजी करतात व पानांना 'चून' (बेसन) लावून, वाफवून वडेपण तळतात. घशात खाज येऊ नये म्हणून भाजी करताना त्यात आंबट टाकतात. उदा. चिंच, आमचूर, आंबट दही किंवा ताक. बाळंतीण बाईला कोचईची भाजी खायला देत नाहीत. कारण योनीत खाज येते.

गणपती बसवताना व शिरवताना, नवरात्रात देवी बसवताना कोचईच्या पानांची डाळभाजी

जरूर बनवतात. महालक्ष्मी जेवतात, त्या दिवशीपण कोचईची भाजी महत्त्वाची असते.

धोपा

Colocasia esculenta

लहान झाड असते. खूप 'पगरते' (पसरते). बुडाशी मुळाला जमिनीत 'कांदे' (कंद) असतात. या कंदांना 'घुया' म्हणतात. या झाडाची पाने मोठी असतात. पानांना लांब दांडी असते. हे झाड साधारणपणे नदी, तलाव, दलदल, विहिरीकाठी, नकळाच्या आसपास ओलसर जागी दिसून येते.

घुयांची (कंदांची) भाजी करतात. भाजी करण्यासाठी कंद पाण्यात उकडून घेतात. नंतर त्याची सालटी काढून, फोडी करून, तेलात तिखट, मीठ व फोडणी टाकून मोकळी भाजी बनवतात.

पानांची 'तुडपुडी' (मोकळी) भाजी व दारभाजी (दाळभाजी) बनवतात. काही जणांना या पानाची भाजी खाल्ल्याने तोंडाला, घशाला, जिभेला खाज येते. खाज येऊ नये म्हणून भाजीत आंबट चिंच किंवा आमधुर टाकतात. कावीळ झालेल्या लोकांना मात्र धोप्याचे पान किंवा कच्ची घुई खाल्ल्याने खाज येत नाही.

मुळव्याधीचा विकार असल्यास, 'कामेला' (कावीळ) झाल्यास, पानांची व घुयांची भाजी करून खातात. धोप्याच्या पानांची व घुयांची भाजी खाल्ल्याने बाळंतीण बाईला दूध चांगले येते. धोप्याच्या पानांना 'चुन' (बेसन) लावून, वाफवून नंतर वडे तळतात. हे वडे चवीला छान लागतात. तोंडाला खाज येऊ नये म्हणून बेसन भिजवताना त्यात थोडे ताक किंवा चिंचेचे पाणी टाकतात. आंबटपणामुळे खाज कमी होते.

कानात दुखत असल्यास धोप्याच्या पानाचा रस काढून त्याचे एक-दोन थेंब कानात टाकतात. केस गळत असल्यास घुया वाटून रस काढतात व तो रस डोक्याला लावतात. नारूच्या फोडावर घुई वाटून लावल्यास काही दिवसांतच नारू बाहेर पडतो.

अंगावर कुठे जखम झाली, फोड आले तर त्यावर पाने वाटून लावतात. बेंड झाल्यास त्यावर पाने वाटून लावल्याने सारा पू व सूज निघून जाते. जखमेतून खूप रक्त जात असल्यास त्यावर पाने वाटून लावल्यास रक्त जाणे कमी होते.

कुत्री

कुत्रा
Limnophila indica

लहान झाड असते. पावसाळ्यात जास्त दिसते. गावात, जंगलात, तलावाच्या पाळीवर बहुतेक असते.

हे फार महत्त्वाचे झाड आहे. बाळंतपण करायला जाताना सुईणबाई हे झाड 'संगच'

(सोबतच) घेऊन जाते. बाळंतपण जर लवकर झाले नाही तर तांदळाच्या 'अक्षदा' (अक्षता) बाईवर ओवाळून, झाडावर टाकून, त्याचे मूळ कुटून, कोमट पाण्यात दोन-चार द्यायचे. लवकर बाळंतपण होते. मूळ 'गरमी' (गरम) आहे.

कुत्रीचे मूळ पाण्यात कुटून पंडू रोगात तो रस प्यायला देतात.

आव-परसाकडे होत असल्यास मूळ कुटून देतात.

मूळ आणून, कांडून ते पाण्यात घुसळले तर पांढरे पाणी निघते. रात्रभर ठेवून वरचे पाणी फेकून द्यायचे व खाली जो गाळ जमतो तो वाळवून त्याची पावडर करायची. आजारात ही पावडर 'सहदात' (मधात) द्यायची. यात जास्त सत्त्व असते.

चैत्रगौर टाकताना कुत्रीची पाने पूजेसाठी नेतात. सत्यनारायणच्या पूजेत पण पाने वापरतात. सत्यनारायणाच्या पूजेत आणि इतरही वेळेला हवन करताना पूर्ण झाड कामी येते.

भंगारा

Clerodendron viscosum

हे लहान झाड असते. विशेषतः पावसाळ्यात दिसून येते व जमिनीवर पसरते. याला पांढरी बारीक फुले येतात.

बैलाला काही जखम झाली तर या झाडाचा पाला वाटून लावतात. तसेच बैलाच्या पोटात काही आजार झाला तर याचा पाला वाटून त्याचा रस पाजतात.

चुचू भाजी

भरडा भाजी

यालाच 'भरडा भाजी'पण म्हणतात. लहान झाड असते वा पावसाळ्यात सर्वत्र दिसून येते. बारीक पाने असतात. या पानांची 'तुडपुडी' (मोकळी) किंवा 'दारभाजी' (दाळभाजी) बनवतात. किरीम झाल्यास ही भाजी खायला देतात. ही भाजी 'गरम' आहे. जास्त खाल्ली तर हगवण लागते.

लाल शेदरी

Bixa orellana

हे लहान झाड असते. याला लाल-शेदरी रंगाची फुले लागतात. ही फुले देवाच्या पूजेसाठी वापरतात.

गाणे

आपयेला हस्तकान ग, झाड रोवयलो शेंदरी,
आन् फलं तोडते मंजुळी।

देवाच्या ग पूजेसाठी,
तुकाराम बोले।।

कुरमुरी

कुरम
Leea crispa, Leea aspera

लहान झाड असते. घराला, वावराला (शेताला) कुंपण करण्यासाठी या झाडाच्या काड्या वापरतात. काड्या जाळण्यासाठीपण वापरतात. कच्चे, पिकलेले फळ खातात.

कटकी

कुटकी
Verbascum chinense

गवतासारखे लहान झाड असते. कुटकीच्या बिया फोडून लाह्या करतात. या लाह्या खातात. कुटकीच्या लाह्या साखरेच्या किंवा गुळाच्या पाकात टाकून त्याचे लाडू तयार करतात.

किरीम झाल्यास या झाडाच्या मुळ्या व पाला एकत्र वाटून देतात. तापात किंवा हाडीतापात कुटकीच्या मुळ्या व पाला वाटून देतात. आव-रक्त 'हगवणीत'पण कुटकीच्या मुळ्या व पाला वाटून देतात.

जलोदर झाल्यास कुटकी वाळवून त्याचे चूर्ण देतात. 'कामेलात' (कावीळ), पंडूरोगात कुटकीचे चूर्ण देतात. फार उपयोगी आहे. कुटकीमुळे रक्त शुद्ध होते.

शौचाला साफ होत नसल्यास, भूक कमी असल्यास, साऱ्या अंगावर सूज असल्यास कुटकीचे चूर्ण मधात खायला देतात.

आगाडा

आघाडा
Achyranthes aspera

हे लहान झाड असते. पावसाळ्यात जास्त दिसून येते. याची पाने गोल असतात. पानाची 'तुडपुडी' (मोकळी) किंवा 'दारभाजी' (दाळभाजी) बनवतात.

'इचू' (विंचू), उंदीर किंवा कुत्रा चावला तर या झाडाची मुळी पाण्यात कुटून ते पाणी पितात व चावलेल्या जागी लावतात.

लघवी अटकत येत असली किंवा उन्हाळी लागली असली तर, आगाड्याच्या पानांच्या रसात खडीसाखर व जिरे टाकून प्यायला देतात.

काटा, काच 'गडला' (रुतला) तर पाला वाटून त्या जागेवर बांधतात. आपसूक (आपणहून) निघून येते व दुखणे बंद होते.

कान दुखत असला, कानातून पू वाहत असला तर आगाड्याच्या पानांचा रस कानात टाकतात.

चैत्रगौरीच्या पूजेत पान वापरतात.

गणपतीला आगाड्याची पाने वाहतात.

ऋषीपंचमीला आगाड्याची भाजी खातात व आगाड्याच्या काडीनेच दात घासतात.

अक्कलकाढा

Spilanthes paniculata

लहान झाड असते. लघवी साफ येत नसली, अटकत येत असली, लघवीत आग होत असली, खोकला येत असला, घशात खरखर होत असली, घसा दुखत असला, पित्ताचा विकार असला, 'वायवाताचा' (संधीवाताचा) विकार असला, अंगात कुठे 'दुख भरला असला' (दुखत असेल) तर अक्कलकाढ्याचे झाड वाळवून, जाळून त्याची 'मस' (राख) मधात टाकून खातात.

वायवातात, अंग दुखत असल्यास, घशात दुखत असल्यास अक्कलकाढ्याचे झाड कच्चेच वाटून किंवा त्याचे चूर्ण पाण्यात किंवा तेलात मिसळवून त्याने मालीश करतात.

'मुखरोग' (दात दुखणे, हिरड्या सुजणे, हिरड्यातून पू-रक्त वाहणे, तोंडाचा वास येणे इत्यादी) असल्यास अक्कलकाढ्याच्या चूर्णाने दात घासतात.

'जीभ तोतरी येत असेल' किंवा जीभ अटकली असेल, जड पडली असेल तर अक्कलकाढ्याच्या झाडाच्या फांद्या, पाने चावून खातात.

सर्पगंधा

Rauvolfia serpentina

लहान झाड असते. गुलाबी, पांढरी, निळी फुले लागतात.

झोप येत नसल्यास या झाडाचा 'कशा' (काढा) प्यायला देतात. गाढ झोप लागते. एखादी व्यक्ती 'बहकल्यासारखी' (वेड्यासारखी) करत असेल तर या झाडाच्या मुळ्या वाटून त्याचा रस प्यायला देतात.

(आम्ही डॉक्टर मंडळी रक्तदाब (ब्लडप्रेशर) वाढले तर सर्पगंधापासून तयार केलेल्या रिझर्पीन नावाच्या गोळ्या खायला देतो; पण आमच्या खेड्यातल्या बायांना या विषयी काहीच माहिती नव्हती.)

अश्वगंधा

Withania somnifera

लहान झाड असते. वांग्याच्या झाडासारखे दिसते. याची फळे वाटाण्यासारखी असतात. कच्ची फळे हिरवी असतात व पिकलेली फळे लाल दिसतात. या झाडांच्या मुळांचा औषधी

उपयोग करतात. कच्च्या मुळांचा वास घोड्यासारखा असतो म्हणून झाडाचे नाव आहे अश्वगंधा.

कंबरदुखीत, लघवीला सारखे जावे लागत असल्यास अश्वगंधाच्या मुळ्या वाळवून त्याची 'भुकनी' (भुकटी किंवा चूर्ण) खायला देतात.

पांढरे पाणी जात असल्यास अश्वगंधा चूर्ण व वंशलोचन सकाळ-संध्याकाळ मधात किंवा दुधात टाकून खायला देतात.

'स्वप्नदोष असेल' (झोपेत लैंगिक संबंध केल्यासारखे होणे, वीर्य गळणे), 'शीघ्रपतन' (पूर्ण लैंगिक समाधान होण्याआधीच वीर्य गळणे) असल्यास अश्वगंधाच्या मुळ्या व शतावरीच्या मुळ्या कच्च्या वाटून किंवा वाळवून त्याचे चूर्ण दुधात टाकून देतात. नियमीतपणे अश्वगंधाच्या मुळाचे चूर्ण खाल्ल्याने अंगात ताकद येते. पुरुषाची 'कमजोरी' (शारीरिक व लैंगिक) दूर होते, म्हातारपण लवकर येत नाही.

लहान मुलाची नीट वाढ होत नसल्यास, अश्वगंधाच्या कच्च्या मुळ्या वाटून त्याचा रस किंवा वाळवलेल्या मुळ्यांचे चूर्ण मधात देतात.

गरोदर व बाळंतीण बायांना अंगात ताकद यावी म्हणून अश्वगंधाच्या मुळ्या पाण्यात कुटून त्याच्या रसात खडीसाखर टाकून प्यायला देतात. बाळंतीण बाईला दूध चांगले यावे म्हणून अश्वगंधाच्या मुळ्यांचा काढा देतात.

चिराईत

किराईत
Andrographis paniculata

लहान झाड असते. खाली बुडाशी जमिनीच्या आत 'कांदे' (कंद) असतात. हे कंद काढून, वाळवून चूर्ण करून ठेवतात. खूप 'कामाले येते' (उपयोगी पडते).

'कामेला'त (काविळीमध्ये), तापात, मळमळ-उलटी होत असल्यास, भूक लागत नसल्यास चिराईताच्या कंदाचे चूर्ण पाण्यात टाकून प्यायला देतात.

काही फोड, खांडक, जखम झाली तर चिराईताच्या कंदाचा कशा (काढा) पाजतात. ज्वर-तापात, अंगाची आग होत असल्यास चिराईताच्या कंदाचा काढा पाजतात व चिराईताच्या कंदाचे चूर्ण पाण्यात मिसळून त्याचा लेप अंगाला लावतात. त्यामुळे 'थंड' वाटते, 'दाह' (आग) कमी होते.

पुनर्नवा

घेटुळी
Boerhavia diffusa

लहान वेल असतो, जमिनीवरच 'पगरतो' (पसरतो). लहान गुलाबी फुले लागतात.

पोटाला 'फुगारा आला' (पोटात गॅसेस झाले, पोट फुगले), अजीर्ण झाले, 'झाडा' (शौचाला) साफ नाही झाला, लघवी साफ नाही झाली, लघवीत 'अंगार' (आग) होत असली, दम खोकला असेल तर या झाडाचा काढा करून पाजतात व भाजी करून खायला देतात.

अंगात कुठे 'लचक' (उसण) भरली, अंगावर कुठेही सूज आली तर या झाडाची भाजी खातात, काढा करून पितात किंवा झाड वाटून त्याचा लेप सूज आलेल्या जागी लावतात. त्यामुळे 'दुख' (दुखणे) व सूज निघून जाते.

'किरीम' झाले, नारूचा रोग झाला तर मुळासकट पूर्ण झाडाचा 'कशा' (काढा) करून पाजतात. अंगावर पांढरे चट्टे आले, खाज आली, कुष्ठरोगाचा रोग झाला तर घेटुळीची भाजी करून खातात व पूर्ण झाड वाटून त्याचा लेप लावतात.

स्तनात गाठ आली, स्तनात बेंड झाला, स्तन सुजले किंवा स्तनात दुखत असले तर घेटुळीचे झाड मुळासकट वाटून लावतात. तोंडात फोडे आले तर घेटुळीची भाजी करून खातात किंवा घेटुळीचे झाड मुळासकट वाटून त्याचा रस तोंडात लावतात.

डोळे दुखत असले, डोळ्यांत खाज येत असेल, डोळे लाल झाले असतील तर घेटुळीच्या झाडाचा रस काढून एक-दोन थेंब डोळ्यात टाकतात.

वाघनखी

Martynia annua

लहान झाड असते. मोठी सुंदर फुले लागतात. याची फळे वाघाच्या नखासारखी दिसतात. म्हणून झाडाचे नाव आहे वाघनखी! हे झाड पावसाळ्यात जास्त दिसून येते.

या झाडाचे तेल काढून सुपांना, टोपल्यांना लावतात. रंग काळाशार असतो व या टोपल्या व सूप जास्त काळ टिकतात.

साप चावलेल्या जागी या झाडाचे फाळ तसेच लावतात (स्पर्श करतात) किंवा फळ पाण्यात वाटून लावतात. त्यामुळे विष चढत नाही असा समज आहे. अनेक साप खेळवणारे लोक सोबत वाघनखीची फळे ठेवतात.

ब्राह्मी

Centella asiatica

लहान वेलासारखे झाड असते. जमिनीवर खूप 'पगरते' (पसरते). हे झाड साधारणपणे तलावाकाठी, नदीकाठी ओलसर जागी दिसून येते. काही 'दोषिक उठला' (म्हणजे एखादी व्यक्ती वेड्यासारखी करत असेल), 'आकडी' (फिट) येत असतील, विस्मरण होत असेल, मनावर खूप ताण असेल, झोप येत नसेल, चिडचिडेपणा असेल, आवरक्ताची हगवण होत असेल तर ब्राह्मीची पाने वाटून त्याच्या रसात खडीसाखर व जिरे टाकून प्यायला देतात.

दात दुखत असल्यास ब्राह्मीच्या दांड्या चावून खातात. लघवी अटकत येत असल्यास ब्राह्मीच्या रसात साखर टाकून देतात त्यामुळे लघवी साफ होते.

ब्राह्मीचे झाड कडू असते. म्हणून या झाडाचा रस किंवा काढा घेताना त्यात थोडी साखर

किंवा 'शहद' (मध) टाकावे.

ब्राह्मी व आवळे मिसळवून तेल काढतात. हे तेल 'थंड' असते. डोक्याला लावल्याने शांत वाटते व झोप चांगली लागते.

माका

भृंगराज
Eclipta prostrata, Eclipta alba

लहान झाड असते. जमिनीवरच खूप 'पगरते' (पसरते). लहान लेकरांना दम, खोकला, 'सर्दी-शिरकोंबा' (सर्दी पडसे) असेल तर माक्याचे झाड वाटून त्याच्या रसात थोडे मध टाकून त्याचे 'चाटण' (चाटायला) देतात.

डोके दुखत असल्यास, अंधारी व चक्कर येत असल्यास, माक्याच्या रसात खडीसाखर टाकून देतात. 'जीर्ण तापात' (खूप दिवस ताप येत असल्यास), 'कामेलात' (कावीळ) माक्याच्या रसात खडीसाखर व दूध किंवा 'शहद' (मध) टाकून प्यायला देतात.

अंगावर कुठे सूज आली, फोड झाले, लचक भरली तर माक्याची पाने वाटून त्याचा लेप लावतात. माक्याचे तेल काढतात. माका व माक्याचे तेल 'थंड' असते. माक्याचे तेल डोक्याला लावल्यास शांत वाटते व झोप चांगली लागते. माक्याचे तेल लावल्याने पांढरे केस काळे होतात. डोके दुखत असेल तर माक्याच्या तेलाचे एक-दोन थेंब नाकात टाकतात. माक्याचे तेल लावून अंगाचे मालीश केले तर शरीर मजबूत होते व त्वचा नरम पडते.

नीळ

Indigofera tinctoria

लहान लहान झाडे असतात. जंगलात खूप दिसून येतात. याच झाडापासून कपड्यांना द्यायची नीळ तयार करतात. टेकाडावरील ओलसर भागात ही झाडे जास्त दिसून येतात.

अंगाला खाज-खरूज झाली, 'गजकरण' (गजकर्ण) झाला, फोड, बेंड झाले तर हे झाड वाटून लावतात. जखमेवर हे झाड वाटून लावतात. जखम लवकर भरून येते.

'आकडीची बिमारी' (फिट्स) असल्यास, नसा व स्नायू कमजोर असल्यास, अर्धांगवायूचा झटका आल्यास, बाळंतरोगात हे झाड मुळासकट उपटून आणून, पाण्यात शिजवून त्याचा कशा प्यायला देतात. एखादा माणूस वेड्यासारखा करत असल्यासही या झाडाचा काढा प्यायला देतात.

अफु

गांजा
Cannabis indica, Cannabis sativa

यावर चर्चा करताना बाया म्हणाल्या, ''पूर्वीच्या काळी पुष्कळ आफू मिळत होती. पण

आता सरकारने बंदी घातल्याने, 'अधीमधेच' (कधीतरी) कुठेतरी मिळते. चोरून-लपून याचा झाड लावावे लागते. कारण औषधी गुणकारी आहे.''

लहान झाड असते. पांढऱ्या रंगाची फुले लागतात. फळे लहान 'डाळींबा' (दाळिंबा) सारखी दिसतात. या झाडाच्या कच्च्या फळांना 'डोडे' म्हणतात. या डोड्यांना संध्याकाळी चारी बाजूंनी चीर मारून ठेवली तर सकाळपर्यंत त्याच्याभोवती दुधासारखा पदार्थ जमा होऊन 'वारून' (वाळून) जातो. तो खरवडून घेतात, त्यालाच आफू म्हणतात.

बाया म्हणाल्या, ''आम्ही पूर्वीच्या बाया दिवसभर जंगलात, शेतात जाताना लहान मुलांना आफूची छोटीशी गोळी दुधात देत होतो. त्यामुळे संध्याकाळी आम्ही घरी येईपर्यंत बाळ झोपूनच राहे.''

अफूने नशा येते, सवय लागते, झोप येते, त्यामुळे खूप जास्त खाऊ नये, 'हुशारीने'च (काळजीपूर्वक) वापर करावा. अफूचा वापर कुणीही करू नये, ज्याला जमते, समजते त्यानेच करावा. अफूची नशा चढली, अफूची जास्त मात्रा पोटात गेली तर ते विष उतरविण्यासाठी मीठ व मोहरीची पावडर पाण्यात मिसळवून ते पाणी प्यायला देतात. उलटी होऊन निचरा होतो.

'डोका' (डोके) दुखत असेल, झोप येत नसेल, डोळ्यात 'आक्रेशन' करत असेल (दुखत असेल) मूळव्याधीचा त्रास असेल तर थोडीशी आफू तेलात मिसळवून त्या जागेवर लावतात. कानात दुखत असेल तर थोडीशी आफू तेलात मिसळवून कानात टाकतात.

'नळहागी' (कॉलरा), 'रक्तहागी' (आव रक्त हगवण) लागली तर आफू तुपात किंवा तेलात मिळवून गोळी करून लहानशी खायला देतात. याच त्रासात आफूच्या झाडाचे 'डोडे' (कच्ची फळे) उकळवून ते पाणी प्यायला देतात. संडास एकदम 'आरून घेते' (घट्ट होते, थांबते)

भांग

लहान जाड असते. पूर्वी भांगाची खूप झाडे होती. आता जास्त दिसतच नाही. सरकार लावू देत नाही. भांगेमुळे नशा येते.

लाजाळू

Mimosa pudica, Neptunia triquetra, Desmanthus triquetruf

लहान काटेरी झाड असते. जमिनीवर खूप 'पगरते' (पसरते). या झाडाला स्पर्श केला तर त्याची पाने आकुंचन पावून बंद होतात. म्हणून लाजाळू हे नाव! फुले गुलाबी रंगाची लागतात.

आवरक्ताची हगवण असेल, मूळव्याधीचा त्रास असेल, आम्लपित्ताचा त्रास असेल, छातीत किंवा पोटात दुखत असेल तर हे झाड कुटून त्याचा रस पाण्यात टाकून प्यायला देतात किंवा झाड पाण्यात शिजवून त्याचा 'कशा' (काढा) प्यायला देतात.

बायांना पांढरे पाणी किंवा प्रदर जाण्याचा त्रास असल्यास लाजाळूच्या पानांचा रस काढून त्यात खडीसाखर व जिरे टाकून प्यायला देतात.

हाड मोडले किंवा काही जखम झाली तर त्या जागी लाजाळूचे झाड वाटून लावतात व पानाचा रस पाजतात. त्यामुळे मोडलेले हाड लवकर जुळते व जखम पण लवकर भरते. हाता-पायावर सूज असेल, हात-पाय दुखत असता तर लाजाळूच्या पानांचा लेप लावतात तसेच पानांचा रस पितात.

एखादा पुरुष 'कमजोर' (नामर्द) असल्यास, लाजाळूचे झाड पाण्यात वाटून त्याचा रस किंवा लाजाळूचे झाड पाण्यात शिजवून त्याचा 'कशा' (काढा) पाजतात.

मसली

मुसली (कंद)
Curculigo orchioides

लहान झाड असते. जंगलात ओलसर जागी खूप दिसून येते. खूप 'पगरते' (पसरते). बुडाशी मुळाला 'कांदे' (कंद) असतात. मुसलीचे दोन प्रकार आहेत. काळी मुसली व पांढरी मुसली. दोन्ही खूप गुणकारी आहेत.

एखाद्या बाईला पदर किंवा पांढरे पाणी जाण्याचा रोग असल्यास मुसलीचा कांदा शिजवून खायला देतात. बाळंतीण बाईला अंगात कमी ताकद असलेल्या व्यक्तीला, पंडूरोगात, ज्वरतापात मुसलीचे कंद शिजवून त्यात साखर टाकून खायला देतात खूप 'टॉनिक माल' (शक्तिवर्धक) असतो. मुसलीचे कंद उकडून किंवा वाळलेल्या मुसलीच्या कंदाची 'भुकनी' (पावडर) पाण्यात टाकून बाळंतीण बाईला दिल्यास दूध चांगले होते.

धान

तांदूळ
Oryza sativa

तांदूळ किंवा धान हे या भागातले प्रमुख अन्न आहे. अनेक खेड्यात आजुबाजूचे जंगल कापून जाळून त्यावर धानाची शेती करायला लोकांनी सुरुवात केलेली आहे. धानाला भरपूर पाणी पाहिजे आणि सुदैवाने गडचिरोलीत बराच पाऊस पडतो. धानाच्या शेतीसाठी जमिनीत पाणी साचून रहावे म्हणून बांध्या तयार करतात.

धानाचे किंवा तांदळाचे रोप हे लहान गवतासारखेच दिसते. तांदळाचे अनेक 'परकार' (प्रकार) असतात. तांदळाचा भात बनवून खातात. धानाच्या लाह्या भाजून खातात. ह्या लाह्यांचे मुरल्यांचे (मुरमुऱ्यांचे) लाडू बनवून खातात. भाताची पेज बनवतात. ही पेज पचायला हलकी व 'थंड' असते; त्यामुळे अंगात शक्ती येते व शांत वाटते. तांदळाच्या पिठापासून आंबील, चकली, शेव, आप्पालू, अनारसे बनवतात 'ज्वरात' (तापात), हगवणीत तांदूळ व मुगदाळ मिसळवून मऊ शिजवून (खिचडी) खायला देतात.

धानाच्या कोंड्यापासून विटा तयार करतात. धानाचा कोंडा जाळून त्याची 'मस' (राख)

भांडी घासायला वापरतात. भांडी स्वच्छ निघतात. पायाला भेगा पडल्या, पायाची चामडी फाटली, चिखल्या झाल्या तर धानाचा कोंडा जाळून त्याची 'मस'(राख) पाण्यात भिजवून लावतात. त्यामुळे दुखणे व जखम लवकर भरते.

पांढरे पाणी जात असल्यास, लघवीत आग होत असल्यास, तांदळाच्या 'धुवणीत' (तांदूळ धुतांना निघणारे पांढरे पाणी) खडीसाखर व जिरे टाकून पितात.

घसा 'सुकत असेल' (खूप तहान लागून घसा कोरडा पडला असेल) तर तांदळाची धुवणी, त्यात साखर टाकून पाजतात. अनेक म्हाताऱ्या बाया म्हणाल्या, ''पूर्वीच्या काळी आम्ही घरातच धान कांडून तांदूळ खात होतो, पण आजकालच्या पोरी काम नको म्हणून धान चक्कीत पाठवतात. पूर्वी आम्ही 'गाड्यात' (मडक्यात/मातीच्या भांड्यात) भात शिजवायचो, आजकालच्या पोरी अल्युमिनियमच्या किंवा स्टीलच्या भांड्यात रांधतात. त्यामुळे भातातले सारे सत्त्व, गोडी निघून जाते. असा भात खाल्ल्याने पूर्वी जास्त प्रमाणात नसलेले अनेक नवीन नवीन रोग आजकाल दिसून येतात. उदा. प्रदर जाणे, लघवीत धातू जाणे, हायड्रोसिलचा आजार, कमजोरी इत्यादी.''

लग्नात, पूजेत तांदळाच्या 'अक्षदा' (अक्षता) पाहिजेतच. त्याशिवाय पूजा होत नाही. नागपंचमीला धानाच्या लाह्यात वाळलेल्या मोहा टाकून घराच्या आजुबाजूला टाकतात. 'कान्होबाला' (जन्माष्टमीला), गणपती व दुर्गा विसर्जनाच्या वेळी गावातल्या कुठल्याही मोठ्या पूजेच्या वेळी, भागवत सप्ताहात धानाच्या व 'जवारीच्या' (ज्वारीच्या) लाह्याचा काला बनवतात.

मयत करताना प्रेताला विसावा देण्याआधी गढ्यात तांदूळ टाकतात. आखाडीला नव्या धानाचा भात करून खातात. तांदळाच्या पिठाचे दिवे करतात. कच्चे तांदूळ खात नाही. कच्चे तांदूळ खाल्ले तर पोटात दुखते व खाणाऱ्या व्यक्तीच्या लग्नात पाऊस पडतो असा समज आहे.

उरसुडी

Vetiveria zizanioides

हे एक प्रकारचे गवत आहे. उरसुडी कापून, त्याच्या पेंड्या बांधतात. कुणाच्या घरी कौले नसली तर घराच्या छपरावर या पेंड्या टाकतात. या गवताच्या चटया बनवितात; टोपल्या विणतात; घरात पाण्याची झड येऊ नये म्हणून भिंतीला, ओसरीला त्याच्या झांज्या 'बागवतात' (वाकवतात). या गवतापासून पावसाळ्यात लोक जे 'मोरे' पांघरतात, ते बनवतात. 'ढिवर लोक' (मासे पकडणारे) हे गवत वाळवून ठेवतात व 'मच्छी' (मासोळ्या) मारून या गवतावर 'हाथरून' (पसरवून) मच्छी भाजतात. मच्छी अशा प्रकारे भाजली तर जास्त चांगली राहते.

खाली मुळात लहान लहान कांदे 'बसतात' (धरतात, उगवतात). पाऊस पडला म्हणजे मुले हे कांदे खोदून आणून 'धु-धा करून' (धुवून) कच्चेच खातात किंवा काही जण पाण्यात मीठ टाकून त्यात ते कांदे उकडून, 'निसून' (सोलून) खातात. छान 'कचर कचर' लागतात.

या गवताला खूप मुळे फुटतात. या मुळांचा काढा बनवून, तेलात टाकून, डोक्याला लावले तर डोक्याला, डोळ्याला खूप थंड वाटते. कुणाच्या डोक्यात, डोळ्यात आग असली तर हे तेल फार उपयोगी ठरते. उरसुडीचे मुळे, रुईच्या दुधाने बांधून छोट्या छोट्या कांड्या तयार करून गर्भपात करण्यासाठी योनीत टाकतात. ओलसरपणामुळे या काड्या फुगतात व गर्भाशयाचे तोंड उघडून गर्भ पडतो.

उरसुडीच्या मुळ्या माती घट्ट धरून ठेवतात. म्हणून 'बोडीच्या' (लहान तलाव) बांधीला हे गवत मुद्दाम लावतात. त्यामुळे बांधी 'घट्ट' (मजबूत) राहते.

उरसुडीच्या मुळांपासूनच 'खस' वाळा बनवतात. या खसपासून ताट्या बनवतात. खसच्या ताट्या उन्हाळ्यात खिडकीला, दरवाज्याला, कूलरमध्ये लावतात. त्यावर पाणी टाकले तर 'सुवासिक' (सुगंधित) थंड वारा लागतो.

उरसुडीचे मूळ पाण्यात टाकून ठेवले तर त्याचा 'सुवास' (सुगंध) येतो. उन्हाळ्यात हे पाणी पितात. 'झाँव' (उन्ह) लागू नये म्हणून मोठी माणसे, लहान लेकर, त्याने आंघोळ करतात. थंड असते.

गाणी : वनवासात सीतामाई उरसुडीचे गवत उशाशी घेऊन झोपली होती. त्यावेळी सीतामाई गवताला म्हणते,

सासू माझी कैकयी,
मला केला वनवास।
गवताची केली उशी
झोप लागली मला कशी,
तुझ्या वनवासानं?॥

नागमुथा

नागरमोथा
Cyperus scariosus

यालाच 'नागमोथा' किंवा 'नागरमुथा' किंवा 'नागरमोथा' पण म्हणतात. गवतासारखे असते, खाली बुडाशी कांदा असतो.

'जीर्णतापात' (जास्त दिवस ताप असल्यास उदा. मदुरामाय - टॉयफॉईडच्या आजारात) किंवा अंगात खूप ताप असेल तर, नागमुथाचे झाड, मनुका, खाराक, बदाम, वावडिंग, कडुलिंबाच्या एकवीस लहान काड्या आणि गुळवेल, सर्व एकत्र करून, त्याचा 'कसा' (काढा) करून पाजतात. ताप एकदम 'शांत होतो' (कमी होतो).

हगवण-उलटी, आव-रक्त हगवण किंवा 'नळहागी' (कॉलरा) असल्यास, नागमोथ्याची मुळी वाटून पाण्यात टाकून प्यायला देतात किंवा मुळी पाण्यात शिजवून, ते पाणी प्यायला देतात. त्याने पाण्यावरची 'आस' (इच्छा) कमी होते. तहान शमते.

उलटी होत असल्यास, नागमोथा, वावडिंग व सुंठ एकत्र वाटून, 'सहतात' (मधात)

त्याचे 'चाटण' (चाटायला) देतात.

बाळंतीण बाईला नागमोथा वाटून दिल्यास दूध चांगले व भरपूर येते.

धुर्वा

दुर्वा / हरळी
Cynodon dactylon

हे एक प्रकारचे गवत आहे. जमिनीवर खूप पसरते. काही लोक यालाच 'हरळ' किंवा 'हरळी' पण म्हणतात.

नाकातून रक्त वाहत असल्यास, दुर्वा कुटून, त्याचा रस नाकात टाकतात. एकदम 'गुण घडतो.' (फायदा होतो)

ज्वर-ताप असेल, मदुरा-मायचा आजार (टॉयफॉईड) असेल तर दुर्वा कुटून, त्याच्या रसात खडीसाखर टाकून पाजतात. ताप उतरतो व थंड वाटते.

लघवी अटकत येत असली किंवा रोकलेली असली किंवा उन्हाळी लागली असली, तर दुर्वा वाटून त्याचा रस पाजतात.

डोकं फार दुखत असेल, डोळे दुखत असतील तर दुर्वा वाटून, त्याचा लेप कपाळाला, **डोळ्याला** लावतात. एकदम थंड वाटते.

उचकी थांबत नसल्यास दुर्वा वाटून, 'सहदात' (मधात), 'चाटण' (चाटायला) देतात.

गरमी-परम्याचा रोग असेल, पांढरे पाणी जात असेल, अंगावर गरमीचे चट्टे उमटले असतील तर दुर्वा वाटून, त्याच्या रसात खडीसाखर व जिरे टाकून प्यायला देतात.

''दुर्वा असल्याशिवाय गपणपतीची पूजा होत नाही. गणपतीला एकवीस दुर्वा वाहतात''

''असा समज आहे की या गवताला मरण नाही. त्यावर अमृत टाकलेले असते, त्यामुळे कितीही दुष्काळ पडला, इतर सर्व झाडे सुकून किंवा मरून गेली तरी दुर्वा जिवंत राहते. देवाच्याच घरचे झाड आहे ते!''

कुसर

Aristida funiculata

हे एक प्रकारचे गवत आहे. कोवळं कुसर, गुरेढोरे आवडीने खातात. मोठे कुसर, घराच्या छपरावर टाकतात. मोठे झालेले कुसर अंगाला 'गडते' (रुतते) कुसराचे फूल क्वचितच 'भेटते' (दिसते); फूल बुडाला लागते.

पोटात 'दुख भरला' (दुखत असल्यास) तर कुसराचे फूल खातात. काही लोक, पोटात दुख भरला तर 'सरुंदाचे फुल' (सुरणाचे फूल) व कसुराचे फूल एकत्र खातात.

म्हणी

''उंबर फोडून कुसर 'दवतेस' (दाखवतेस) काय?''

''दुसऱ्याच्या डोल्यात कुसर दिसते 'पर' (पण) स्वत:च्या डोळ्यातले मुसळ दिसत नाही.''

झाडणी

हे झाड गवतासारखे असते. याचे झाडू बनवतात. एक रुपयाची एक झाडणी विकल्या जाते. घर गळू नये म्हणून छपरावर हे गवत टाकतात. याच्या काड्यांचा, पत्रावळी शिवण्यासाठी वापर होतो.

पांज

Panicum paludosum

हे एक प्रकारचे गवत आहे पण छान नरम असते. या गवताच्या चटया, 'मोरे' (पावसाळ्यात पांघरायला) विणतात.

परम्याचा रोग असल्यास, या गवताचे मूळ पाण्यात वाटून, त्यात खडीसाखर व जिरे टाकून प्यायला देतात.

पड्यार

Saccharum spontaneum

हे एक प्रकारचे गवत आहे. शेतात दिसून येते. याला पांढरी फुले - तुरे लागतात. पड्यारचे गवत 'आटवून' (पीळ देऊन) त्यापासून दोरी बनवतात. या दोरीने बाजा विणतात. पड्यारचे गवत कापून घराच्या छपरावर टाकतात.

पोटदुखी असल्यास पड्यार, कुसर व सुरुंद यांची फुले, सागाचे बी सर्व एकत्र वाटून त्याची गुळात गोळी बांधून खायला देतात.

सावा

Echinochloa colonum

गवतासारखे लहान झाड असते, शेतात दिसून येते. पोळ्याच्या 'सीझन' (काळात) मधे याला फळे लागतात. या फळांना वाळवून त्यातील बिया काढतात.

या बिया कांडून दुष्काळात त्याची भाकरी, आंबील बनवून खातात. बिया काढण्यासाठी खूप मेहनत करावी लागते. अनेक सुईणींनी सांगितलं की दुष्काळात त्यांनी स्वत: हे खाल्ले आहे.

जंगलातील उस

गेड्या ऊस

याला 'गेड्या-ऊस' म्हणतात. माणसे, ढोरे, रानम्हशी, रानडुक्कर याचे खडे खातात, गोड लागते.

देवनरी

पोई

Sehima sulcatum

याला 'पोई' म्हणतात. हे झाड उसाच्या झाडासारखे दिसते. खाली बुडाशी आल्यासारखा कांदा असतो. हा कांदा 'रोवला' (लावला) तर नवीन झाड उगवते.

रक्त-हगवण होत असल्यास, मूळव्याधीचा त्रास असल्यास, हा कांदा आणून, धुवून, सोलून, ओल्या फडक्यात गुंडाळून, त्याला माती लावून 'निव्यात' (निखाऱ्यावर) भाजून, वाटतात व अर्क काढतात. या अर्कात खडीसाखर व जिरे टाकून, तसंच किंवा दह्यात वा ताकात किंवा तांदळाच्या 'धुवणीत' (तांदुळ धुताना निघणारे पांढरे पाणी) टाकून प्यायला द्यायचं. खूप चांगला गुण येतो.

ढिवर लोकांजवळ मासोळ्या मारायचे एक अवजार असते. त्याला 'इसरा' म्हणतात. ढिवर लोक देवनरीचे झाड आणून, सुकवून, जाळ्याला दोऱ्यात ओवून, इसऱ्याला बांधता. मणी पण बांधतात. मण्याचा भाग खाली तर देवनरीचा (पोईचा) भाग वर असतो. त्यामुळे जाळे पाण्यात बुडत नाही; तरंगत रहाते.

गोकर

गोकर

लहान झाड असते. बाळंतीण बाईला, हे झाड 'कुटून' (ठेचून) एकतर साखरेसोबत भाजून खायला देतात किंवा गूळ व जवस तेलात खायला देतात. हे स्त्रीसाठी 'टॉनिक' आहे.

कडू कांदा

कडू कांदा

Dioscorea belophylla

याच्या बुडाला, खाली कांदा असतो. कच्चा कांदा खूपच कडू असतो. या कांद्याच्या बारीक फोडी करुन मोहात शिजवून खाल्ल्यास गोड लागते.

सुरंद

सुरण

Amorphophallus campanulatus

याला काही जण 'सुरण', 'सुरुंद' म्हणतात. लहान झाड असते. खाली बुडात 'कांदा'

असतो. या कांद्याची भाजी करतात. कांदे वाळवून त्याच्या वड्या करतात. कांदा तसाच खाल्ला तर खाज येते म्हणून 'जांबाचा' (पेरूचा) पाला किंवा चिंचेचा पाला टाकून सुरुंद उकडवायचं. संध्याकाळी भाजी करायची असली तर सकाळी 'शिजवायचे' (उकडून घ्यायचे) त्यामुळे त्याचा गुण त्यालाच जातो. भाजी शिजवताना आंबट टाकतात. त्यामुळे चव चांगली येते व खाज पण कमी होते.

कांदा उकडून, सोलून, त्याच्या फोडी करून वाळवायच्या. मूळव्याध असल्यास याची भाजी करून खायची. सुरुंद 'गरम' आहे. कुणाला जमते, कुणाला नाही.

ढोरा-वासराला 'सड' झाली (सड म्हणजे पोटात आजार) तर सुरुंद, चुनी चिंच, तिखट, मीठ व स्वयंपाक घरात जो काळा 'धुवाँ' (धूर) बसतो तो झाडून, सर्व एकत्र करुन पाजायचं.

कुठल्याही कारणाने पोट दुखत असल्यास, सुरुंदाचे फूल गुळात खायला देतात.

सुरुंद, कुसर, ओवा यांची फुले, सुपारी, आंबेहळद, एक-दोन बदाम, दोन 'इलायची' (वेलची) सर्व वाटून, गर्भाशयाला सूज असेल किंवा योनिमार्गात पडदा असेल तर 'खावाया' (खायला) द्यायचे किंवा योनिमार्गात आत टाकून, हाताने मालीश करायची.

सुरुंदाचे फूल व कुसराचे फूल वाटून, त्यात अफू व गांजा घोटून, पोतल्या बनवून, पूर्ण दारूच्या पाण्यात टाकून ठेवायच्या व एखाद्या बाईचे 'फूल' (गर्भाशय) वाकडे असल्यास, त्याच्या (गर्भाशयाच्या) आजूबाजूला व तोंडावर या पोतल्या ठेवायच्या. एकूण तेरा पोतल्या ठेवायच्या. बरे झाल्यावर या पोतल्या आपणहून पडून जातात.

माचंदा कांदा

कांदा

यालाच 'ठिकारू कांदा' पण म्हणतात. जंगलात याची वेल दिसून येते. या वेलाला तीनच पाने असतात. वेलाच्या बुडाशी कांदा असतो.

किरीम झाल्यास हा कांदा ठेचून, त्याची भाकर बनवून पोटाला बांधतात.

अंगात कुठे काही दुखापत झाली तरी या कांद्याची भाकर बांधतात. सारे दुखणे खेचून घेते!

हा कांदा खातात. खाण्यासाठी कांदा जमिनीतून खोदून आणायचा. मग त्या कांद्याच्या 'चाण्या' (बारीक चकत्या) करायच्या. बुरडाकडून 'वाडगा' (मोठी टोपली) आणून त्यात या चाण्या टाकतात व मग ही टोपली नदीच्या किंवा तलावाच्या पाण्यात तीन-चार दिवस बुडवून ठेवतात, कारण कच्चा कांदा खाल्ला तर जीभ 'डसते' (जिभेवर तोंडात फोड येतात). नंतर त्या चाण्या आणून, 'वारवून' (वाळवून) ठेवायच्या. कुंभाराकडून मोठे मडके आणून ते फोडायचे व त्याचे लाह्या फोडण्यासाठी जशी खापर असते, तशी खापर करायची. या खापरीत नदीची माती टाकून, ते चुलीवर मांडायचे. रेती 'मस्त' (चांगली) गरम झाल्यावर मग, त्यात हे चाणे भाजायचे. चाणे मस्त फुटतात. 'जवारीच्या लाह्यावानी' (ज्वारीच्या लाह्यांसारखे!) त्यावर थोडे

मीठ टाकून खायचे. फार छान लागते.

वाळलेल्या चाण्या, गुळाच्या पाकात टाकून पण खातात.

सर्वच लोक, अशाप्रकारे खूप आवडीने - माचंदाचा कांदा खातात. पण घराच्या बाईला खूप मेहनत करावी लागते!

पांढरी शेंदरी

Bixa orellana

या झाडाच्या फुलांचा रंग पांढरा असतो. खाली बुडाशी कांदा असतो. कांदा पौष्टिक आहे. कांद्याचा 'रांधा करून' (शिजवून) कमशक्ती असलेल्या बायांना खायला देतात.

एखाद्या बाईला मूल-बाळ होत नसल्यास, या कांद्यात काजू, किसमीससारखा सर्व मेवा टाकून लाडू बनवतात व त्या बाईला खायला देतात.

'गरमी', 'उष्णता', 'पांढरं पाणी जाणे' असे रोग असल्यास, पांढऱ्या शेंदरीचा पाला वाटून, त्याच्या रसात खडीसाखर व जिरे टाकून प्यायला देतात.

या झाडाचे फळ मुले खातात. पांढरे पाणी जात असल्यास हे फळ वाटून, त्याचा अर्क काढून, त्यात खडीसाखर व जिरे टाकून, प्यायला देतात.

हरदुलीचे कांदे

Crotalaria ramosissima

लहान झाड असते. बुडाला जमिनीत कांदे असतात. हे कांदे 'हाडूक' महिन्यात (ऑगष्ट-सप्टेंबर) येतात व आल्यासारखे दिसतात. या कांद्याची भाजी करून खातात.

कचोरी कांदा

लहान झाड असते. याच्या बुडास कांदे असतात. हे कांदे उकडून किंवा भाजून खातात. बैल-ढोरे पण हे कांदे खातात.

डोटोमाटी

'माटी' म्हणजे आदिवासी भाषेत कांदा किंवा कंद.

डोटोमाटीचा वेल व बुडाशी मोठा कांदा असतो.

कांदा खात नाही कारण विषारी आहे.

महार कांदा

हे लहान झाड असते. जंगलात खूप दिसून येते. याची पाने मोठ्या गवतासारखी दिसतात. बुडाशी कांदा असतो.

हा कांदा खूप विषारी असतो. या कांद्याचा अर्क कुणाला प्यायला दिला तर तो माणूस मरतोच. काही स्त्रिया नवरा नको असेल तर, हा कांदा 'रांधून' (शिजवून) त्याला खायला देतात. काही लोक आपल्या 'दुस्मनाला' (दुष्मनाला) मारायचे असेल तर त्याला जेवणासाठी बोलावून हा कांदा शिजवून देतात.

हा कांदा खायला जरी विषारी असला तरी 'दुखावर' (बेंड, फोड, लचक) फार चांगला मानतात. अंगात कुठे दुखले खुपले, मोठा फोड, बेंड झाला तर कांदा 'चेंदून' (ठेचून) 'पालवात' (कपड्यात) बांधून, थोडे 'कोमट' (गरम) करून, दुखाला बांधायचे. ते सारे दुःख ओढून घेते.

कापूर कांदा

लहान झाड असते. याच्या बुडाला कांदे असतात. कांदे तसेच कच्चे किंवा शिजवून खातात. गोड लागतात.

वरंबी

वरंबी ही एक प्रकारची 'कुत्र्याची छत्री' आहे. पावसाळ्यात आभाळ गरजून पाऊस पडतो. त्यावेळी 'डुंबरातून' (वारुळातून) वरंबी 'फुटते' (बाहेर येते). साध्या पावसात डुंबर फुटत नाही पण आभाळात वीज गरजली तर त्या आवाजाने डुंबर फुटून, वरंबी बाहेर येते. आखाडीला, जांभूळवसीला, नागपंचमीला, आभाळ गरजल्यावर बहुदा वरंबी फुटतेच!

वरंबी पांढरी-पांढरी असते. वरंबीचे तीन प्रकार आहेत. एक आहे 'शीत वरंबी' ही बारीक असते. खात नाही. दुसरा प्रकार आहे 'दसरी वरंबी'. ही वरंबी दसऱ्याला, रावणाच्या दिवशीच फुटते. मोठी असते. काळसर व 'रट्' (कडक) असते. याची भाजी करून खातात. ही वरंबी आणून फोडी करून, वाळवून बारीक भुरका करुन 'गाड्यात' (मडक्यात) ठेवायचे. बाळंतपण लवकर नाही झाले तर थोडासा भुरका गरम पाण्यात टाकून द्यायचे म्हणजे चांगल्या कळा सुरू होतात. तिसरा प्रकार आहे 'मध्यम आकाराची वरंबी' याची भाजी करून खातात.

सकाळी जाऊन वरंबी आणायची 'धु-धा करुन', लसूण, मटन मसाला व थोडा चिंचेचा आंबटपणा टाकून भाजी बनवायची. 'शुद्ध' (अगदी) मटनासारखी लागते ही भाजी!

वरंबी खोडीक (फोडीक) वस्तू आहे. खाल्ल्याने कुणाला 'वरण' (व्रण) होतो. कुणाचा कान फुटतो. त्यामुळे वरंबी सर्वांना मानवत नाही. गरोदर व बाळंतीण वरंबी मुळीच खात नाही. कारण खाल्ले तर बाळाचे कान फुटतात.

पूर्ण उगवलेली, फुलासारखी दिसणारी वरंबी खात नाही कारण त्यात अळ्या असतात. गोल पाकळ्या उगवण्याच्या आधीची वरंबी खातात.

अडपल्लीच्या जना आजींनी सांगितले, ''आमची आई आम्हाला वरंबी मुळीच खाऊ नका म्हणून सांगायची. कारण माझी आई व काकू आखाडीच्या दिवशी जंगलात काड्या आणायला गेल्या होत्या. डुंबर मस्त फुटला होता. डुंबरात नाग असेल.

त्याचा 'इख' (विष) वरंबीला लागला असेल. काकूला व आईला माहीतच नाही. त्यांनी वरंबी आणल्या, काकूने धू-धा न करताच भाजी शिजवली व तिनेच आवडीने खाऊन पाहिली तर ती मेली!''

कोरफड

Aloe vera

लहान झाड असते. गवतासारखे दिसते. याची पाने लांब व जाड असतात. आणि पानांना बाजूला काटे असतात.

अंग भाजले तर कोरफडचे पान सोलून आतला गर भाजलेल्या जागी लावतात. त्याने आग कमी होते व जखम लवकर भरते.

दम, खोकला व ताप येत असल्यास, कोरफडीचे पान 'इस्त्यावर' (विस्तवावर) भाजून, त्याचा रस काढून त्यात खडीसाखर व पाणी टाकून पाजतात.

बेंड, फोडे झाले तर, त्या जागी कोरफडच्या पानाचा गर गरम करून लावतात हा गर पू व सार दुखणे खेचून घेतो.

हाड मोडल्यास, कोरफडच्या पानांचा गर बांधतात. त्यामुळे दुखणे कमी होते व हाड लवकर जुळते.

एखाद्या बाईला 'रक्तसुर्ला किंवा विटाळसुर्ला' (मासिक पाळीच्या वेळी पोटात दुखणे) असल्यास, कोरफडच्या पानाचा गर गरम करून, त्यात गूळ टाकून, ते खायला देतात.

कोरफडचे मूळ माती धरून ठेवते. म्हणून तलावाच्या बांधावर लोक हे झाड लावतात. ''आजकाल जंगल 'खाता' (खाते). पण हे झाड लावते.''

कोरफड हे फार जुने झाड आहे. पूर्वीच्या काळी लोक याचा गर खायचे, याच्या पानांचे कंबरेला बांधायला कपडे करायचे, याचे काटे सुईसारखे वापरायचे. असे मानतात की हे झाड जंगलात / झाडीत नैसर्गिकपणे जिथे जिथे दिसून येते, त्या जागी पुरातन काळात लोक वस्ती करून राहत होते.

जरूर बनवतात. महालक्ष्मी जेवतात, त्या दिवशीपण कोचईची भाजी महत्त्वाची असते.

धोपा

Colocasia esculenta

लहान झाड असते. खूप 'पगरते' (पसरते). बुडाशी मुळाला जमिनीत 'कांदे' (कंद) असतात. या कंदांना 'घुया' म्हणतात. या झाडाची पाने मोठी असतात. पानांना लांब दांडी असते. हे झाड साधारणपणे नदी, तलाव, दलदल, विहिरीकाठी, नकळाच्या आसपास ओलसर जागी दिसून येते.

घुयांची (कंदांची) भाजी करतात. भाजी करण्यासाठी कंद पाण्यात उकडून घेतात. नंतर त्याची सालटी काढून, फोडी करून, तेलात तिखट, मीठ व फोडणी टाकून मोकळी भाजी बनवतात.

पानांची 'तुडपुडी' (मोकळी) भाजी व दारभाजी (दाळभाजी) बनवतात. काही जणांना या पानाची भाजी खाल्ल्याने तोंडाला, घशाला, जिभेला खाज येते. खाज येऊ नये म्हणून भाजीत आंबट चिंच किंवा आमचुर टाकतात. कावीळ झालेल्या लोकांना मात्र धोप्याचे पान किंवा कच्ची घुई खाल्ल्याने खाज येत नाही.

मुळव्याधीचा विकार असल्यास, 'कामेला' (कावीळ) झाल्यास, पानांची व घुयांची भाजी करून खातात. धोप्याच्या पानांची व घुयांची भाजी खाल्ल्याने बाळंतीण बाईला दूध चांगले येते. धोप्याच्या पानांना 'चुन' (बेसन) लावून, वाफवून नंतर वडे तळतात. हे वडे चवीला छान लागतात. तोंडाला खाज येऊ नये म्हणून बेसन भिजवताना त्यात थोडे ताक किंवा चिंचेचे पाणी टाकतात. आंबटपणामुळे खाज कमी होते.

कानात दुखत असल्यास धोप्याच्या पानाचा रस काढून त्याचे एक-दोन थेंब कानात टाकतात. केस गळत असल्यास घुया वाटून रस काढतात व तो रस डोक्याला लावतात. नारूच्या फोडावर घुई वाटून लावल्यास काही दिवसांतच नारू बाहेर पडतो.

अंगावर कुठे जखम झाली, फोड आले तर त्यावर पाने वाटून लावतात. बेंड झाल्यास त्यावर पाने वाटून लावल्याने सारा पू व सूज निघून जाते. जखमेतून खूप रक्त जात असल्यास त्यावर पाने वाटून लावल्यास रक्त जाणे कमी होते.

कुत्री

कुत्रा

Limnophila indica

लहान झाड असते. पावसाळ्यात जास्त दिसते. गावात, जंगलात, तलावाच्या पाळीवर बहुतेक असते.

हे फार महत्त्वाचे झाड आहे. बाळंतपण करायला जाताना सुईणबाई हे झाड 'संगच'

(सोबतच) घेऊन जाते. बाळंतपण जर लवकर झाले नाही तर तांदळाच्या 'अक्षदा' (अक्षता) बाईवर ओवाळून, झाडावर टाकून, त्याचे मूळ कुटून, कोमट पाण्यात दोन-चार द्यायचे. लवकर बाळंतपण होते. मूळ 'गरमी' (गरम) आहे.

कुत्रीचे मूळ पाण्यात कुटून पंडू रोगात तो रस प्यायला देतात.

आव-परसाकडे होत असल्यास मूळ कुटून देतात.

मूळ आणून, कांडून ते पाण्यात घुसळले तर पांढरे पाणी निघते. रात्रभर ठेवून वरचे पाणी फेकून द्यायचे व खाली जो गाळ जमतो तो वाळवून त्याची पावडर करायची. आजारात ही पावडर 'सहदात' (मधात) द्यायची. यात जास्त सत्त्व असते.

चैत्रगौर टाकताना कुत्रीची पाने पूजेसाठी नेतात. सत्यनारायणच्या पूजेत पण पाने वापरतात. सत्यनारायणाच्या पूजेत आणि इतरही वेळेला हवन करताना पूर्ण झाड कामी येते.

भंगारा

Clerodendron viscosum

हे लहान झाड असते. विशेषत: पावसाळ्यात दिसून येते व जमिनीवर पसरते. याला पांढरी बारीक फुले येतात.

बैलाला काही जखम झाली तर या झाडाचा पाला वाटून लावतात. तसेच बैलाच्या पोटात काही आजार झाला तर याचा पाला वाटून त्याचा रस पाजतात.

चुचू भाजी

भरडा भाजी

यालाच 'भरडा भाजी'पण म्हणतात. लहान झाड असते वा पावसाळ्यात सर्वत्र दिसून येते. बारीक पाने असतात. या पानांची 'तुडपुडी' (मोकळी) किंवा 'दारभाजी' (दाळभाजी) बनवतात. किरीम झाल्यास ही भाजी खायला देतात. ही भाजी 'गरम' आहे. जास्त खाल्ली तर हगवण लागते.

लाल शेदरी

Bixa orellana

हे लहान झाड असते. याला लाल-शेदरी रंगाची फुले लागतात. ही फुले देवाच्या पूजेसाठी वापरतात.

गाणे

आपयेला हस्तकान ग, झाड रोवयलो शेंदरी,
आन् फलं तोडते मंजुळी।

करणकुवारी

हे झाड 'फणीसारखे' (कंगव्यासारखे) दिसते. झाड तसे 'जहरी' (विषारी) आहे. पण शोभेसाठी व औषधी गुणामुळे मुद्दाम लावतात. काटे असतात. याचे मूळ पाणी धरून ठेवते.

पाय किंवा बोट दुखले किंवा सुजले तर या झाडाची 'फणी' (पान) आणून, दिव्याच्या ज्योतीवर गरम करून, 'जेवणखान' (जेवण) झाल्यावर त्या जागी बांधायचे. सलसल करून, सर्व दुखणे निघून जाते. एरंडीच्या तेलासारखे चिकट असते. बांधून झाल्यावर हात स्वच्छ धुवायचे कारण विषारी आहे.

एखाद्या बाईला 'उष्णता' असेल (म्हणजे डोळे लाल येऊन, त्यातून पाणी गळते, डोके दुखते.) तर फणीची वरची पट्टी काढून डोक्याला बांधले तर डोके दुखणे थांबते व उष्णताही निघून जाते.

डोळे आले तर किंवा डोळ्यांत रक्त जमले तर किंवा डोळ्यांत गरम वाटत असेल तर, करणकुवारीची आंतरसाल एकवीस वेळा पाण्याने धुऊन डोळ्यांना पट्टी बांधायची. थंड वाटते.

शंकहाड

वांदे

Vanda tessellata, Vanda roxburghii

यालाच 'वांदे' पण म्हणतात. ही 'परजीवी वनस्पती' आहे. म्हणजे दुसऱ्या झाडावर वाढते; जमिनीवर नाही! मोठ्या झाडांवर उदा. आंबा, मोह, येन, टेंभरू, हिरडा, बेहडा, कोजब, मोका, बिवला व इतर अनेक झाडावर, शंकहाड गवतासारखे उगवते. पळसाच्या झाडावर मात्र शंकहाड वाढू शकत नाही कारण पळस हा 'रामाचा झाड म्हणजेच सीतामाईचा पुरुष' आहे.

गडचिरोलीच्या जंगलात सहा प्रकारचे शंकहाड दिसून येतात. फुले वेगवेगळी असतात, व त्यावरून हे प्रकार ठरतात. पावसाळ्यात फुले येतात; सुंदर दिसतात.

खांडक - फोड झाल्यास, शंकहाड वाळवून, जाळून त्याची 'मस' (राख) खोबरेल तेलात किंवा कुठल्याही 'खावाच्या' खायच्या तेलात टाकून लावतात. कानाच्या मागे फोडे येऊन चामडीला 'कात्री लागते' (म्हणजे चामडी फाटल्यासारखी होते) तेव्हा त्या जागी ही मस लावली तर ताबडतोब 'गुण' घडतो (फायदा होतो).

शहद (सहद)

मध

जंगलात अनेक मोठ्या झाडांवर 'गांधीलमाशा' (मधमाशा) 'घर' (मधाचे पोळे) बांधतात. साधारणपणे तलावाकाठी, नदीकाठी असलेल्या झाडांवर या मधमाशांची पोळी जास्त दिसून येतात. मध काढण्यासाठी रात्रीच्या वेळी पूर्ण अंगाला 'खावाचा' (खायचे) तेल लावून मशालीने

करणकुवारी

हे झाड 'फणीसारखे' (कंगव्यासारखे) दिसते. झाड तसे 'जहरी' (विषारी) आहे. पण शोभेसाठी व औषधी गुणामुळे मुद्दाम लावतात. काटे असतात. याचे मूळ पाणी धरून ठेवते.

पाय किंवा बोट दुखले किंवा सुजले तर या झाडाची 'फणी' (पान) आणून, दिव्याच्या ज्योतीवर गरम करून, 'जेवणखान' (जेवण) झाल्यावर त्या जागी बांधायचे. सलसल करून, सर्व दुखणे निघून जाते. एरंडीच्या तेलासारखे चिकट असते. बांधून झाल्यावर हात स्वच्छ धुवायचे कारण विषारी आहे.

एखाद्या बाईला 'उष्णता' असेल (म्हणजे डोळे लाल येऊन, त्यातून पाणी गळते, डोके दुखते.) तर फणीची वरची पट्टी काढून डोक्याला बांधले तर डोके दुखणे थांबते व उष्णताही निघून जाते.

डोळे आले तर किंवा डोळ्यांत रक्त जमले तर किंवा डोळ्यांत गरम वाटत असेल तर, करणकुवारीची आंतरसाल एकवीस वेळा पाण्याने धुऊन डोळ्यांना पट्टी बांधायची. थंड वाटते.

शंकहाड

वांदे
Vanda tessellata, Vanda roxburghii

यालाच 'वांदे' पण म्हणतात. ही 'परजीवी वनस्पती' आहे. म्हणजे दुसऱ्या झाडावर वाढते; जमिनीवर नाही! मोठ्या झाडांवर उदा. आंबा, मोह, येन, टेंभरू, हिरडा, बेहडा, कोजब, मोका, बिवला व इतर अनेक झाडावर, शंकहाड गवतासारखे उगवते. पळसाच्या झाडावर मात्र शंकहाड वाढू शकत नाही कारण पळस हा 'रामाचा झाड म्हणजेच सीतामाईचा पुरुष' आहे.

गडचिरोलीच्या जंगलात सहा प्रकारचे शंकहाड दिसून येतात. फुले वेगवेगळी असतात, व त्यावरून हे प्रकार ठरतात. पावसाळ्यात फुले येतात; सुंदर दिसतात.

खांडक - फोड झाल्यास, शंकहाड वाळवून, जाळून त्याची 'मस' (राख) खोबरेल तेलात किंवा कुठल्याही 'खावाच्या' खायच्या तेलात टाकून लावतात. कानाच्या मागे फोडे येऊन चामडीला 'कात्री लागते' (म्हणजे चामडी फाटल्यासारखी होते) तेव्हा त्या जागी ही मस लावली तर ताबडतोब 'गुण' घडतो (फायदा होतो).

शहद (सहद)

मध

जंगलात अनेक मोठ्या झाडांवर 'गांधीलमाशा' (मधमाशा) 'घर' (मधाचे पोळे) बांधतात. साधारणपणे तलावाकाठी, नदीकाठी असलेल्या झाडांवर या मधमाशांची पोळी जास्त दिसून येतात. मध काढण्यासाठी रात्रीच्या वेळी पूर्ण अंगाला 'खावाचा' (खाय्रचे) तेल लावून मशालीने

मधमाशांचे घर जाळले, तर साऱ्या माशा उडून जातात. चावत नाहीत व घरातून छान मध गळते. हा मध भांड्यात शिशीत जमा करतात. लोक बाजारात जाऊन मध विकतात. चांगला 'पैका' (पैसा) भेटतो.

मधात खूप औषधी गुण आहे. 'जितका जास्त जुना मध तितका त्याचा 'सत्त्व' (गुण) मोठा!' मध खातात. पोळी सोबत छान लागते. थोडेसे मध पाण्यात टाकून सकाळी घेतले तर दिवसभर ताजे वाटते, थकवा येत नाही.

'झाडा' (शौचाला) साफ होत नसेल, भूक लागत नसेल तर 'मधाचा चाटण देतात' (मध चाटून खातात) 'मैदा' (चरबी) वाढली, अंगात सुस्ती भरली, अंग जड पडले, वात-विकार असला तर मधात थोडे पाणी घालून प्यायला देतात.

जखमेवर, भाजल्याजागी, तोंडात 'निखारे आले' (तोंड आले), बेंड किंवा फोड झाले तर त्यावर मध लावतात. 'पदर' (पांढरे पाणी) जात असल्यास, मध व पाणी प्यायला देतात. वैद्य अनेक औषधी 'भुकन्या' (भुकट्या/पावडरी) मधात चाटण म्हणून देतात.

डोळे दुखत असले, डोळ्यांनी नीट दिसत नसेल, डोळे लाल झाल्यास, डोळ्यांत 'टीक पडल्यास' (मोतीबिंदू झाल्यास) मधात थोडे पाणी घालून त्याचे एक-दोन थेंब डोळ्यांत टाकतात. थंड वाटते व दृष्टी चांगली होते.

कफ-खोकला असला, 'बिल्टा' (ठसा) घशात अडकून राहिली तर पाण्यात थोडे मध टाकून प्यायला देतात. घसा साफ होतो.

जंगलात 'आसोली' (अस्वल) खूप आवडीने मध खातात. देवा-धर्मात मधाचा 'नैवेद' (नैवद्य) 'दावतात' (दाखवतात)

नदीची माती

पूर्वीच्या काळी लोक नदीची काळी चिकण माती खायचे. कारण तेव्हा इतर काही खायलाच मिळायचे नाही. गरीब लोक अजून पण ही माती खातात, विशेषत:, दुष्काळात! जनाबाई इलमवाल या अडपल्ली गावच्या सुईण बाईंनी सांगितले, ''आमच्या लहानपणी, अनेकदा आमची आई आम्हांला ही माती खायला द्यायची; कारण घरात दुसरे काहीच नसायचे.''

पुष्कळ गरोदर बायांना 'काळ्या मातीचे डोहाळे' लागते. त्या आवडीने नदीची काळी माती खातात.

वैदू लोक 'किरमा'ची (जंताची) गोळी बनवून नदीच्या मातीत खायला देतात.

मधमाशांचे घर जाळले, तर साऱ्या माशा उडून जातात. चावत नाहीत व घरातून छान मध गळते. हा मध भांड्यात शिशीत जमा करतात. लोक बाजारात जाऊन मध विकतात. चांगला 'पैका' (पैसा) भेटतो.

मधात खूप औषधी गुण आहे. 'जितका जास्त जुना मध तितका त्याचा 'सत्त्व' (गुण) मोठा!' मध खातात. पोळी सोबत छान लागते. थोडेसे मध पाण्यात टाकून सकाळी घेतले तर दिवसभर ताजे वाटते, थकवा येत नाही.

'झाडा' (शौचाला) साफ होत नसेल, भूक लागत नसेल तर 'मधाचा चाटण देतात' (मध चाटून खातात) 'मैदा' (चरबी) वाढली, अंगात सुस्ती भरली, अंग जड पडले, वात-विकार असला तर मधात थोडे पाणी घालून प्यायला देतात.

जखमेवर, भाजल्याजागी, तोंडात 'निखारे आले' (तोंड आले), बेंड किंवा फोड झाले तर त्यावर मध लावतात. 'पदर' (पांढरे पाणी) जात असल्यास, मध व पाणी प्यायला देतात. वैद्य अनेक औषधी 'भुकन्या' (भुकट्या/पावडरी) मधात चाटण म्हणून देतात.

डोळे दुखत असले, डोळ्यांनी नीट दिसत नसेल, डोळे लाल झाल्यास, डोळ्यांत 'टीक पडल्यास' (मोतीबिंदू झाल्यास) मधात थोडे पाणी घालून त्याचे एक-दोन थेंब डोळ्यांत टाकतात. थंड वाटते व दृष्टी चांगली होते.

कफ-खोकला असला, 'बिल्टा' (ठसा) घशात अडकून राहिली तर पाण्यात थोडे मध टाकून प्यायला देतात. घसा साफ होतो.


जंगलात 'आसोली' (अस्वल) खूप आवडीने मध खातात. देवा-धर्मात मधाचा 'नैवेद' (नैवद्य) 'दावतात' (दाखवतात)

नदीची माती

पूर्वीच्या काळी लोक नदीची काळी चिकण माती खायचे. कारण तेव्हा इतर काही खायलाच मिळायचे नाही. गरीब लोक अजून पण ही माती खातात, विशेषत:, दुष्काळात! जनाबाई इलमवाल या अडपल्ली गावच्या सुईण बाईनी सांगितले, ''आमच्या लहानपणी, अनेकदा आमची आई आम्हांला ही माती खायला द्यायची; कारण घरात दुसरे काहीच नसायचे.''

पुष्कळ गरोदर बायांना 'काळ्या मातीचे डोहाळे' लागते. त्या आवडीने नदीची काळी माती खातात.

वैदू लोक 'किरमा'ची (जंताची) गोळी बनवून नदीच्या मातीत खायला देतात.


मोवई

पळस




कुंभीचे फूल



बेहडा

काट सावर



रुई





तेंदुपत्त्याचे फुटवे



कदंब (करंब)

लोगडी (लोखंडी)
वाळलेल्या जंगलात हिरवे बेट



घोगर





कुंभी



बाहव्याचा फुलोरा